# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.०८/२०२०** **दिनांक ०९.०६.२०२०**
**स्थळ- मा.जिल्हा न्यायालय,अहमदनगर** **वेळ- सकाळी ११.०० वाजता**

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथील जनहित याचिका नं.१२०/२०१९ यावर दिनांक ०९/१०/२०१९ रोजी मा.न्यायालयाने दिलेल्या आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी करीता नियुक्त केलेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची सभा मंगळवार दिनांक ०९/०६/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता साई सभागृह,शिर्डी येथे आयोजित करणेत आली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/३११/२०२०, दि.०१.०६.२०२० अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आलेले होते.

तसेच सदरहु सभा शिर्डी ऐवजी मा.जिल्हा न्यायालय,अहमदनगर येथे आयोजित केली असलेबाबत जा.नं.एसएसएस/वशी-०४/३३८,३३९,३४०/२०२०, दि.०६.०६.२०२० अन्वये सर्व मा.सदस्यांना कळविणेत आले होते.

त्यानुसार सदरहु सभा मंगळवार दिनांक ०९/०६/२०२० रोजी सकाळी ११.०० वाजता मा.जिल्हा न्यायालय,अहमदनगर येथे सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.न्या.श्रीकांत आणेकर, प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, अहमदनगर.
२. मा.श्री.अरुण डोंगरे (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.
३. मा.श्री.दिलीप स्वामी, अप्पर महसुल विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक.
४. मा.श्रीमती गीता प्रविण बनकर, सहा.धर्मादाय आयुक्त, अहमदनगर.

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत आली.
त्यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु केली.

---

**विषय नं.०१** **दि.११.०५.२०२० रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.३०६** **दिनांक ११.०५.२०२० रोजी अहमदनगर येथे झालेल्या मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करतांना खालील प्रमाणे दुरुस्त्या करण्यात आल्या व त्यास मान्यता देण्यात आली.**

१. **निर्णय क्र.२५९-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पातंर्गत कार्यान्वीत “online.sai.org.in” या संकेतस्थळासाठी तसेच संस्थान अंतर्गत Internet वापरासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन पात्र पुरवठाधारकाकडून इंटरनेट लिंक उपलब्ध होईपर्यंत किंवा आज पासुन दोन महिने यापैकी जे आधी घडेल तो पर्यंत मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेली 10 Mbps Internet Link चालू ठेवणेकामी M/s Bharti Airtel Ltd यांना कार्यादेशातील आहे त्याच दराने (Annual Bandwidth Charge Rs.1,80,000/-+Tax) व अटी/शर्तीनुसार मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

(माहिती तंत्रज्ञान विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पातंर्गत कार्यान्वीत “online.sai.org.in” या संकेत स्थळासाठी तसेच संस्थान अंतर्गत Internet वापरासाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात येऊन पात्र पुरवठाधारकाकडून इंटरनेट लिंक उपलब्ध होईपर्यंत मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार सद्यस्थितीत कार्यान्वीत असलेली 10 Mbps Internet Link चालू ठेवणेकामी M/s Bharti Airtel Ltd यांना कार्यादेशातील आहे त्याच दराने (Annual Bandwidth Charge Rs.1,80,000/-+Tax) व अटी/शर्तीनुसार मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

२. **निर्णय क्र.२६२-**

यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) सुविधा DTH (डिश टिव्ही) टिव्ही चॅनल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी M/s Tata Comm व M/s Associated यांना पुर्वीचेच दरानुसार मागील कार्यादेशातील अटी/शर्तीप्रमाणे त्यांच्या पुर्वीच्या कार्यादेशाची मुदत संपल्यानंतर एक महिना कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)

**याऐवजी खालील प्रमाणे वाचण्यात यावे.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) सुविधा DTH (डिश टिव्ही) टिव्ही चॅनल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी M/s Tata Comm व M/s Associated यांना पुर्वीचेच दरानुसार मागील कार्यादेशातील अटी/शर्तीप्रमाणे त्यांच्या पुर्वीच्या कार्यादेशाची मुदत संपल्यानंतर तीन महिने कालावधीसाठी मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.०२** **चक्रीय पध्दतीने मान्यता दिलेला विषय वाचून कायम करणे.**
**करनिर्धारण वर्ष २०१८-१९ व २०१९-२०ची रिफंड रक्कम रु.२०,८५,०२,५४०/- करनिर्धारण वर्ष २०१६-१७ चे देय करापोटी वर्ग करणेबाबत आयकर विभागास कळविणेबाबत.**

**प्रस्ताव-** आयकर विभागाने करनिर्धारण वर्ष २०१५-१६ पासून आयकर निर्धारण व २०१३-१४ पासून फेर करनिर्धारणे करण्याचे धोरण अवलंबून साधारणतः श्री साईबाबा संस्थान हे धार्मिक ट्रस्ट वा धर्मादाय ट्रस्ट असा युक्तीवाद करुन संस्थान धर्मादाय ट्रस्ट असून मंदिराच्या दक्षिणापेटयांमध्ये मिळणा-या देणगीवर आयकर आकारणी सुरु केली आहे. बाबत, विहीत पद्धतीने मा.व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने मा.उच्च न्यायालय, मुंबई, मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे दाद मागितली असून मा.उच्च न्यायालयाने फेर करनिर्धारण व अपील मध्ये कर निश्चित करावा, तसेच मा.सर्वोच्च न्यायालयाने २०१५-१६ व २०१३-१४ ची एकत्रित अपील सुनावणी घ्यावी. अपीलमध्ये अनुषंगीक सर्व तरतूदींचा अभ्यास करुन कर निश्चित करावा, तोपर्यंत कर भरण्यास स्थगिती आदेश दिला आहे.

आयकर कायदा १९६१ कलम २४५ अन्वये, “Income Tax Act empowers the Assessing Officer do adjust the refund against any tax demand i.e. outstanding from the tax payer” सदर तरतूदीस अनुसरुन आयकर विभागाने करनिर्धारण वर्ष २०१८-१९ व २०१९-२० चे आयकर विवरणपत्रात रिफंड असणारी रक्कम करनिर्धारण वर्ष २०१३-१४, २०१५-१६, २०१६-१७ व २०१७-१८ पोटी रिफंड वजा जाता प्रलंबित असलेल्या रु.४३७,४९,४८,३१०/- आयकरापोटी वर्ग करणेबाबत ई-मेलद्वारे दि.०९.०५.२०२० रोजी नोटीस पाठविली आहे.

सदर नोटीस संस्थान कर सल्लागार सीए आर.आर. मुनी, मुंबई, सीए व्ही.के. बेसवाल, मुंबई व सीए दिपक टिकेकर, मुंबई यांना पाठविण्यात आली होती व त्यावर त्यांचे कायदेशीर मार्गदर्शन मागविले होते. या संबंधीत आवश्यक कागदपत्रे त्यांना पाठविण्यात आल्यानंतर सीए आर.आर. मुनी यांनी दि.११.०५.२०२० रोजीचे ई-मेलद्वारेअभिप्राय दिला होता. बाबत, आणखी स्पष्ट अभिप्राय मिळणेबाबत दि.२९.०५.२०२० रोजी ई-मेलद्वारे मागणी केली होती. त्यावर त्यांनी, “For the Assessment Year 2013-14 & 2015-16 the department is presently restricted from making any recovery as per the order of the Hon’ble Supreme Court. With regards to AY 2016-17 the demand as per record is shown at Rs.128.17 Crores and for AY 2017-18 the demand raised is Rs.58.45 Crores. We suggest that the refund due for AY 2018-19 & 2019-20 be agreed to be adjusted against AY 2016-17.Trust is in appeal, on successful decision availed in Sansthan’s favour refund will issued with interest.” अशाप्रकारे थोडक्यात अभिप्राय असून सोबत सीए आर.आर. मुनी यांचा अभिप्राय जोडला आहे.

आयकर विभागाने करनिर्धारणे/फेर करनिर्धारणे करुन प्रलंबित असलेल्या आयकराबाबत माहिती दिली आहेव त्या वर्षांसंबंधीत रिफंड रक्कमेचा तपशिल खालीलप्रमाणे :-

| Assessment Year | Demand Raised Date | Tax Amount Rs. | Information regarding yearwise refunds |
|---|---|---|---|
| 2013-14 | 19.03.2019 | 128,78,96,580/- | 27,55,490/- Refund received |
| 2015-16 | 20.02.2018 | 122,04,61,840/- | 1,28,38,047/- Refund adjusted in Assessment Order Rs.1,23,32,99,891/- |
| 2016-17 | 31.03.2018 | 128,20,08,190/- | 2,02,38,940/- Refund adjusted in Assessment Order Rs.130,22,47,132/- |
| 2017-18 | 30.12.2019 | 58,45,81,700/- | 2,47,68,139/- Refund adjusted in Assessment Order Rs.60,93,49,839/- |

आर्थिक वर्ष २०१८-१९ व २०१९-२० मध्ये आयकर विवरणपत्राप्रमाणे रिफंड असलेली रक्कम खालीलप्रमाणे :-

| Assessment Year | Demand Raised Date | Tax Amount Rs. | *Yearwise Refund* | Remark |
|---|---|---|---|---|
| 2018-19 | Assessment in Process | | 3,41,14,130/- | As per notice required to adjust against outstanding demand for AY 2013-14, 2015-16, 2016-17 & 2017-18 |
| 2019-20 | Assessment in Process | | 17,43,88,410/- | |
| | | Total Refund Rs. | 20,85,02,540/- | |

विभागाचा अभिप्राय:- आयकर कायदा १९६१ कलम २४५ अन्वये, करदात्याला देय असलेली रिफंड रक्कम करदात्याकडून वसूलपात्र आयकर रक्कमेतून वर्ग करुन घेण्याची तरतूद आहे. तसेच संस्थान कर सल्लागार यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार करनिर्धारण वर्ष २०१८-१९ व २०१९-२० संबंधीत रिफंड रक्कम रु.२०,८५,०२,५४०/- करनिर्धारण वर्ष २०१६-१७ चे प्रलंबित आयकर रक्कम रु.१२८,२०,०८,१९०/- असल्याने २०१६-१७ चे देय कर रक्कमेपोटी आयकर विभागास वर्ग करुन घेण्यास सुचविता येईल. अशाप्रकारे करदात्याने सुचविले नाही तरी आयकर विभाग आयकर कायद्यातील कलम २४५ चे तरतुदीनुसार रक्कम वर्ग करुन घेऊ शकतो, अशी तरतूद असल्याने संस्थानचे वतीने आयकर विभागाने विचारणा केल्यामुळे तसे सुचविणे योग्य होईल.अशाप्रकारे रक्कम वर्ग केली तरी संस्थान अंतिम कर निश्चिती करिता आयकर अपील, ITAT (Appeal), मा.उच्च न्यायालय, मा.सर्वोच्च न्यायालय येथे बाबत न्याय मागण्याची तरतूद आहे.

तरी आयकर कायदा १९६१ कलम २४५ अन्वये, आयकर विभागाने करनिर्धारण वर्ष २०१८-१९ व २०१९-२० संबंधीत रिफंड रक्कम रु.२०,८५,०२,५४०/- करनिर्धारण वर्ष २०१३-१४,२०१५-१६ ऐवजी करनिर्धारण वर्ष २०१६-१७ चे देय करापोटी वर्ग करणेबाबत सुचविण्यास व संस्थान कर सल्लागारांमार्फत विहीत पद्धतीने कार्यवाही करणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे चक्रीय पद्धतीने मान्यता मिळणेकामी सादर.

**निर्णय क्र.३०७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आयकर कायदा १९६१ कलम २४५ अन्वये, आयकर विभागाने करनिर्धारण वर्ष २०१८-१९ व २०१९-२० संबंधीत रिफंड रक्कम रु.२०,८५,०२,५४०/- करनिर्धारण वर्ष २०१३-१४,२०१५-१६ ऐवजी करनिर्धारण वर्ष २०१६-१७ चे देय करापोटी वर्ग करणेस व संस्थान कर सल्लागारांमार्फत विहीत पद्धतीने कार्यवाही करणेस चक्रिय पध्दतीने मान्यता देण्यात आलेली आहे. आजचे सभेमध्ये त्याचे अवलोकन करुन नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)**

---

**विषय नं.०३** **कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना... संस्थान आस्थापनेवरील कायम, कंत्राटी व कंत्राटी कर्मचारी यांना माहे मे-२०२० चे वेतन आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ) विषयाची पूर्वपीठीका –**

**(अ-१)** आपणांस विदितच आहे की, **कोव्हीड १९** (कोरोना व्हायरस) या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी करावयाचे प्रतिबंधात्मक उपायोजनेनुसार मा. भारत सरकार व मा. महाराष्ट्र शासन यांचेकडून संपूर्ण

भारत देशात तसेच महाराष्ट्र राज्यात दिनांक २३ मार्च, २०२० पासून संपूर्ण LOCKDOWNघोषित करणेत आलेला होता. मा. केंद्र व राज्य शासनाने या LOCKDOWN चा कालावधी आजपावेतो ०३ वेळा वाढविलेला आहे.

**आता,** मा. महसूल व वन विभाग, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुर्नःवसन विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक १९ मे, २०२० रोजीचे आदेशान्वये, या **LOCKDOWNची मुदत (कालावधी) दिनांक ३१ मे, २०२० अखेर काही अटी-शर्तीवर तसेच काही अत्यावश्यक बाबींसाठी सवलत देऊन** वाढविणेत आलेली असून, **आज अखेर** LOCKDOWN **ची कठोर अंमलबजावणी स्थानिक महसूल व पोलिस प्रशासनामार्फत सुरु आहे.**

**(अ-२)** सामान्य प्रशासन विभागाकडील वेळोवेळी पारित करणेत आलेल्या आदेशांनुसार, कोव्हीड १९ या साथीच्या रोगाचा प्रादुर्भाव रोखणेसाठी मा. शासनाने निर्देशित केलेल्या उपाययोजनेनुसार, दिनांक २३ मार्च, २०२० पासून संस्थान आस्थापनेवरील अत्यावश्यक सेवेचे विभाग वगळतां, सर्व विभागातील कर्मचा-यांच्या कार्यालयातील/कार्यस्थळावरील उपस्थितीवर टप्प्या-टप्प्याने निर्बंध आणणेत आले होते, त्याची अंमलबजावणी ही माहे मार्च, २०२० पासून आजपावेतो म्हणजेच माहे मे, २०२० मध्येही सलग व कायम ठेवणेत आलेली आहे.

**(अ-३)** कोव्हीड १९ या साथी रोगाच्या प्रादुर्भावात काही बदल न झाल्याने, किंबहुना त्यामध्ये अधिकच वाढ झाल्याने, मा.केंद्र व राज्य शासनाकडूनदिनांक २३ मार्च, २०२०पासून लागू करणेत आलेल्या LOCKDOWN च्या कालावधीत दिनांक ३१ मे,२०२०पर्यन्त सलग वाढ करणेत आल्याने, संस्थान व्यवस्थापनामार्फतही दिनांक २३ मार्च, २०२० पासून सुरु असणारे दैनंदिन कार्यालयीन कामकाजात तसेच कर्मचा-यांच्या उपस्थितीबाबत कुठलाही बदल करणेत आलेला नाही.

**(अ-४)** संस्थान आस्थापनेवरील अधिकारी / कर्मचारी यांना विहित पध्दतीने माहे मार्च, २०२० व माहे एपिल, २०२० चे वेतन आदा करणेबाबत, मा. तदर्थ समितीचे मान्यतेने व्यवस्थापन व प्रशासन स्तरावर कार्यवाही करणेत आलेली आहे.

उपरोक्त कार्यवाही करत असतांना, मा. वरिष्ठ अधिकारी यांचे निर्देशानुसार, कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी यांना आदा करावयाचे ४० टक्के वाढीव वेतनाबाबत तसेच रुग्णालय विभागाकडील वैद्यकिय अधिकारी व इतर यांना आदा करावयाचे प्रोत्साहन भत्ता **(Incentive Allowance)** बाबत आणि इतर विभागांकडे उक्ते / ठोक पध्दतीने काम दिलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटदारांकडे काम करणा-या कर्मचा-यांना वेतन आदा करणेबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० चे सभेपुढे विचारार्थ व निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता.

या सविस्तर प्रस्तावात, सामान्य प्रशासन विभाग/कामगार विभागामार्फत संस्थान व्यवस्थापनामध्ये व आस्थापनेवर कार्यरत असणारे खाली नमूद केलेल्या विविध प्रकारे कार्यरत असणारे कर्मचा-यांचा समावेश करणेत आलेला होता -

०१. कायम कर्मचारी तसेच प्रतिनियुक्तीवरील अधिकारी / कर्मचारी

०२. संस्थान कायम कंत्राटी कर्मचारी (५९८ कर्मचारी)

०३. कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी

०४. बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी(उक्ते पध्दतीने काम दिलेल्या कंत्राटदारामार्फत कार्यरत विशेषतः निवासस्थाने, प्रसादालय, लाडू प्रसाद निर्मिती, रुग्णालये आदि विभाग )

०५. निश्चित मानधनावर / निश्चित किंवा ठराविक कालावधीसाठी कार्यरत कर्मचारी

**(अ-५)** मा. तदर्थ समितीचे **दिनांक ११ मे, २०२०** रोजीचे सभेत विषयक्रमांक ०१, ०२, ४३ व ६३ संदर्भात जो **एकत्रित निर्णय क्रमांक २३५** घेणेत आलेला आहे, **त्यामध्ये कर्मचा-यांचे वेतनाच्या अनुषंगाने प्रामुख्याने खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेले आहेत –**

*" .. .. **34.** The Committee was informed that the employees working with the Trust were awarded incentive 40% to 200% of their salary, apart from minimum wages payable to them. This Committee was informed that such payment of incentive (ranging from 40% to 200%) is pursuant to the decision taken by erstwhile Committee on 25.02.2017.*

***35.** The Chief Executive Officer of the Trust has pointed out that because the temple is closed since $17^{th}$ March, there is virtually no income to the Trust. He submitted that payment of incentive to such employees including Doctors and paramedical services is not*

*justified because even the O.P.D. in both hospitals as well as admission in the hospital is drastically reduced and has come down to about 1/4th of the regular flow of the patients.*

***36.*** *In the above background, in the peculiar circumstance i.e. lockdown declared by the Central / State Government in view of* ***Covid-19*** *and due to huge reduction of the income of the Trust, the Committee is unanimous in taking a decision,* ***that until further orders (of the Committee), no incentive be paid to any of the employees of the Trust.*** *(This be taken as Decision A for clarity)"*

***37.*** *So far as payment of salary / wages to the regular employees and those who are working on contract basis are concerned (except 598 employees referred to in subject at Sr. No.2), the Government Resolution dt. 31.03.2020 was pointed out to the Committee. This Committee is of the view that principle of* ***'no work no pay'*** *cannot be invoked in present extra ordinary situation. However, the Committee cannot be oblivious of the fact that the income of the Trust has drastically reduced. The temple (which is main source of income) is close since 17 March 2020. Monthly expenditure on the head of salary/ wages of all the employees of the Trust only, in approximately18 Crore.We are informed that in the last month, only Rs. 1,51,18,009/- were received by way of on-line donation which is even not sufficient to meet out one / two day's expenses of the Trust, Presently the Trust is involved in various activities of humanity like providing food, shelter and other facilities to the hundreds of poor and needy, on day to day basis after the Lockdown was declared.* ***Considering the economic situation we are persuaded to decidethat for the present, all the employees (except 598 employees) be paid their salary / wages for the month of April 2020 payable in May 2020.*** *(This be taken as Decision-B for clarity.)*

*38. So far as 598 employees to whom appointment order was issued by the then Chief Executive Officer is concerned, the concerned department of the Trust has not come up with a clear picture before this Committee. The fate of the Agreement, which the Trust had with the Contractors, is in limbo. The concerned department now want that this Committee to take up decision on Subject No. 43 listed on the Agenda of today's meeting. Unless comprehensive decision is taken as to regularization / appointment of 598 employees on contract basis directly by the Trust or otherwise, as well as decision on the agreement, which Trust had with the Contractors, such request in subject No. 43 cannot be considered.* ***The Trust is at liberty to submit detailed proposal in this regard before this Committee along with entire correspondence with the State Government and decisions taken by erstwhile committee.*** *(This be taken as Decision C for Clarity)*

***39.*** *Now coming to payment of salary / wages to said 598 employees, this committee is put in difficult situation. On one hand it is clear from the record that in absence of any decision by erstwhile Committee to appoint said 598 employees on contract basis directly on the Trust, nor there is any such decision being taken by this Committee, the order of appointment issued to said 598 employees by the then Chief Executive Officer of the Trust is a question to be decided. Secondly, the fate of the agreement, which the Trust had with the Contractors is to be decided. This Committee cannot predict the stand that is likely to be taken by the Labour Contractors with regard to said employees.* ***In such circumstance, on humanitarian grounds this Committee is of the view that payment of about 60% of the wages (as per Minimum Wages Act and G.R. issued from time to time. However, without any incentive as decided by the erstwhile Committee on 25.02.2017) be paid to such 598 employees for the month of April paid in May 2020, he be paid full salary / wages of the respective days of work and in addition to it he be paid such 60% of***

***monthly wages for remaining days to be adjusted in future.*** *Trust to obtain written undertaking from such employees to the above effect. (This be taken as Decision-D for clarity.)*

***40.*** *The decision taken herein shall be subject to the decision / directions by the Hon'ble High Court on Civil Application that will be filed by the Trust in this regard in PIL No. 120 of 2019."*

**(अ-६)** उपरोक्त **परिच्छेद अ-५** मध्ये नमुद केलेल्या निर्णयापुर्वी, सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक २३ एप्रिल, २०२० रोजी सादर करणेत आलेल्या टिपणीनुसार, कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत / ठेकेदारामार्फत कार्यरत असणारे कर्मचारी वगळतां, संस्थान आस्थापनेवरील कायम कर्मचारी आणि कायम कंत्राटी कर्मचारी (५९८) यांचे माहे एप्रिल, २०२० चे वेतन सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्रमांक साप्रशा / आस्था / १०० / २०२०, दिनांक ०५ मे, २०२० मधील अटी-शर्तीस अधिन राहून विहित पध्दतीने आदा करणेत आलेले आहे.

**(अ-७) याव्यतिरिक्त,** सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक २३ एप्रिल, २०२० चे टिपणीवरील निर्देशानुसार, मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेपुढे वर नमुद केलेप्रमाणे सविस्तर प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. या प्रस्तावावर मा. तदर्थ समितीने दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेपुढील विषयपत्रिकेतील विषय क्रमांक ०१, ०२, ४३ व ६३ या विषयांचा एकत्रित असा निर्णय **परिच्छेद अ-५** मध्ये नमुद केलेप्रमाणे पारित केल्याने, सामान्य प्रशासन विभागाकडील आदेश क्रमांक साप्रशा / आस्था / १६४ / २०२०, दिनांक २१ मे, २०२० अन्वये कंत्राटी कर्मचारी ठेकेदारमार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांना वेतन आदा करणेबाबत काही अटी-शर्तीसह सुधारित आदेश पारित करणेत आला.

**(अ-८)** उपरोक्त **परिच्छेद अ-७** मध्ये नमुद केलेनुसार, दिनांक २१ मे, २०२० रोजी पारित करणेत आलेल्या आदेशातील **अटी-शर्तींचा गोषवारा** खालीलप्रमाणे –

***०१.*** *माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करणेबाबत सामान्य प्रशासन विभागामार्फत दिनांक ०५ मे, २०२० रोजी पारित करणेतआलेल्या आदेशातील अ. नं. ०२ मध्ये नमुद केलेनुसार, माहे एप्रिल, २०२० मध्ये कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी यांना तूर्त किमान वेतन कायद्यानुसार आणि किमान वेतन दरानुसार देय्य होणारे वेतन नेहमीचे विहित पध्दतीने आदा करणेत यावे. याकामी अ.नं. ०२ ते ११ मध्ये नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार वेतनबिले तयार करणेत यावीत.*

***०२. कंत्राटी कर्मचारी व इतर यांना आदा करणेत येणारे ४० टक्के वाढीव वेतन तूर्त आदा करणेत येऊ नये.*** *या ४० टक्के वाढीव वेतनाबाबत मा. तदर्थ समितीचे मान्यतेने यथावकाश अलाहिदा स्वतंत्र आदेश पारित करणेत येईल.*

***०३.*** *कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे निश्चित मानधनावरील / वेतनावरील अधिकारी / कर्मचारी यांना माहे एप्रिल, २०२० चे वेतन विहित पध्दतीने आदा करावे.* ***तथापि, त्यांना ४० टक्के वाढीव वेतन अथवा प्रोत्साहन भत्ता अथवा इतर भत्ते तूर्त आदा करणेत येऊ नये.***

*०४.* ***कंत्राटी कर्मचारी यांची माहे जानेवारी ते मार्च, २०२० अखेर आठवडा सुटीसह हजेरी दिवसाची गणना करुनव त्याची येणारी सरासरी म्हणजेच (माहे जानेवारी+फेब्रुवारी+मार्च, २०२० मधील हजर दिवस) भागिले ०३=माहे एप्रिल,२०२० मधील सरासरी हजर दिवस) ही माहे एप्रिल, २०२० ची हजेरी गृहित धरुन किमान वेतन दरानुसार माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करणेत यावे.***

***०५.*** *सर्व विभागप्रमुखांनी तसेच कामगार विभाग आणि कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार यांनी कंत्राटी कर्मचारी यांची वेतन बिले तयार करतांना, जे कंत्राटी कर्मचारी माहे जानेवारी, २०२०/ माहे फेब्रुवारी, २०२० आणि माहे मार्च, २०२० या तीन महिन्यांचे कालावधीत सलग कामावर गैरहजर असतील त्यांना माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करणेत येऊ नये.*

***०६.*** *संस्थान आस्थापनेवरील ज्या विभागांकडे स्त्री कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत, अशा स्त्री कंत्राटी कर्मचारी यांनी संबंधित कंत्राटी कर्मचारी कंत्राटदाराकडे संबंधित विभागामार्फत विहित पध्दतीने प्रसुती रजा मिळणेबाबत अर्ज केलेला असेल अशा कंत्राटी स्त्री कर्मचा-यांबाबत त्या-त्या संबंधित विभागांनी स्वतंत्ररित्या कार्यालयीन टिपणी सादर करुन, त्यांना माहे एप्रिल,२०२० चे वेतन ( प्रत्यक्ष कामावर हजर असलेल्या दिवसाची हजेरी गृहित धरुन किमान वेतन दरानुसार येणारे वेतन ) संबंधित कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत आदा करणेची कार्यवाही करावी.*

*०७.* *वरील अ.नं. ०५ व ०६ मध्ये नमूद केल्याव्यतिरिक्त, जे कंत्राटी कर्मचारी माहे जानेवारी, २०२० ते माहे मार्च, २०२० या सलग कालावधीत गैरहजर आहेत, परंतु माहे एप्रिल, २०२० मध्ये कामावर आलेले आहेत, अशा कर्मचा-यांबाबत संबंधित विभागांनी त्यांच्या कामाची निकड व आवश्यकता लक्षात घेऊन, त्यांना कामावर कां हजर करुन घेणेत आले याची योग्य कारणामीमांसा देऊन, त्याबाबत संबंधित विभागामार्फत स्वतंत्ररित्या कार्यालयीन टिपणी सादर करुन त्यांना माहे एप्रिल,२०२० चे वेतन ( प्रत्यक्ष कामावर हजर असलेल्या दिवसाची हजेरी गृहित धरुन किमान वेतन दरानुसार येणारे वेतन ) संबंधित कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत आदा करणेची कार्यवाही करावी.*

*०८.* *ज्या विभागांनी कामाचे आवश्यकतेनुसार व गरजेनुसार कंत्राटी कर्मचारी यांना कामावर बोलावले असेल किंवा त्यांना कामाच्या डयुटीज् दिलेल्या असतील, परंतु असे कंत्राटी कर्मचारी कामावर हजर राहिले नसतील तर त्यांना त्या-त्या दिवसाची गैरहजेरी गृहित धरुन त्या दिवसांचे वेतन आदा करणेत येऊ नये, म्हणजेच अ.नं.०४ नुसार येणारे सरासरी हजर दिवसातून सदरचे दिवस वजा करणेत यावेत.*

*०९.* *ज्या विभागांनी कामाचे आवश्यकतेनुसार व गरजेनुसार कंत्राटी कर्मचारी यांना कामावर बोलावले असेल किंवा त्यांना कामाच्या डयुटीज् दिलेल्या असतीलआणि ते कंत्राटी कर्मचारी कामावर हजर राहिले असतीलआणि त्यांची कामावरील प्रत्यक्ष हजर दिवस हे अ. नं. ०४ नुसार येणारे सरासरी दिवसांपेक्षा जास्त दिवस येत असतील तर त्यांना प्रत्यक्ष हजर दिवसाप्रमाणे वेतन आदा करणेत यावे.*

*१०.* *संबंधित सर्व कंत्राटी कर्मचारी कंत्राटदार / ठेकेदार यांनी उपरोक्त बाबी विचारांत घेऊन, प्रत्येक विभागाचे स्वतंत्र बिले तयार करावीत. या वेतन बिलांसोबत त्या-त्या विभागात कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांची सरासरी हजेरी दर्शविणारे सविस्तर तक्ते जोडावेत, जेणेकरुन संबंधित विभागप्रमुखांना तसेच कामगार विभागास बिलांची तपासणी करुन बिल आदायगीबाबत लेखी अभिप्राय देणे सोयीचे होईल.*

*११.* *सर्व विभागप्रमुखांनी तसेच कामगार विभागाने कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी यांची बिले सादर करतांना दिनांक ११ एप्रिल, २०२० रोजीचे आदेशात नमूद केलेप्रमाणे, बिलांवर अभिप्राय सुस्पष्ट नोंदवून, सदरची बिले विहित पध्दतीने मा. वरिष्ठ अधिका-यांचे मान्यतेसाठी सादर करावीत.*

***१२.*** ***ज्या विभागांकडे बाह्यस्त्रोत कर्मचारी कंत्राटदारामार्फत बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी/निश्चित मानधनावर/निश्चित किंवा ठराविक कालावधीसाठी कर्मचारी कार्यरत आहेत, त्या विभागांनी/अशा विभागांनी त्यांची माहे एप्रिल,२०२० ची वेतनबिले स्वतंत्ररित्या कार्यालयीन टिपणीसह मा.वरिष्ठ अधिका-यांचे मान्यतेस्तव सादर करावीत.***

*१३.* *माहे मे,२०२० चे वेतनाबाबत (माहे जून, २०२० मध्ये आदा करावयाचे वेतनाबाबत), उपरोक्त परिस्थितीत काही बदल झाल्यास, त्याप्रमाणे परिस्थितीनुरुप अलाहिदा आदेश पारित करणेत येईल.*

या अटी-शर्तीनुसार माहे एप्रिल, २०२० चे वेतनाची (माहे मे, २०२० मध्ये आदा करावयाचे वेतनाची) कार्यवाही सुरु करणेत आलेली असून, सर्व संबंधित कर्मचा-यांना वेतन आदा करणेबाबतची कार्यवाही सर्व संबंधित विभागांमार्फत करणेत येत आहे/आली आहे.

**(अ-९) आता,** सामान्य प्रशासन विभागामार्फत पारित करणेत आलेल्या दिनांक ०५ मे,२०२० चे आदेशातील अट क्र.०६ आणि दिनांक २१ मे, २०२० चे आदेशातील अट क्र.१३ मध्ये नमुद केलेनुसार, माहे मे, २०२० चे वेतनाबाबत (म्हणजेच माहे जून, २०२० मध्ये आदा करावयाचे वेतनाबाबत) करावयाचे प्रस्तावित कार्यवाहीचे अनुषंगाने खालील बाबींवर विचार विनिमय होणेस विनंती.

**(ब) कर्मचारी वेतनाबाबत प्राप्त झालेली निवेदने/विनंतीपत्रे -**

**०१.** अध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान असंघटीत कर्मचारी संघटना, शिर्डी यांचे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना अग्रेषित केलेले दिनांक १२ मे, २०२० व दिनांक २० मे, २०२० रोजीचे निवेदनात खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे, त्याचा थोडक्यात गोषवारा –

*“.. ..मात्र, आता संस्थान प्रशासनाने या कर्मचा-यांचे ४० % वेतन कपात करण्याचा निर्णय घेतलेला आहे. लॉकडाऊनमुळे या कामगारांना आर्थिक संकटाशी सामना करताना मोठया अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. आई, वडील, पत्नी, मुले यांचे संगोपणाची जबाबदारी कर्मचा-यांवर आहे. काही कर्मचारी संस्थानच्या कामातून मिळणा-या पगारात उदरनिर्वाह होत नसल्याने अन्य छोटा मोठा व्यवसाय किंवा नोकरी करतात, मात्र सध्या ते ही बंद आहेत. एकीकडे पैसे मिळण्यासाठी शोधलेला पर्याय बंद त्यात संस्थानकडून ४०% वेतनकपात केली जात असल्यामुळे दुहेरी संकटात हे सर्व कर्मचारी सापडलेले आहेत.*

***वेतन कपातीनंतर या कर्मचा-यांना त्यांचे कुंटूंबाचा उदरनिर्वाह करणे अशक्य होणार आहे. तरी आपण या कर्मचा-यांबाबत सहानुभूतीपूर्वक विचार करुन त्यांची वेतन कपात थांबवावी, ही नम्र विनंती.***"

**०२.** मा. आ. श्री. राधाकृष्ण एकनाथराव विखे पाटील,शिर्डी विधानसभा सदस्य,महाराष्ट्र राज्य यांनी वैयक्तिकरित्या मा. तदर्थ समितीचे सर्व सदस्य तसेच मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना अग्रेषित केलेल्या दिनांक १८ मे, २०२० रोजीचे विनंती पत्रात खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे, त्याचा थोडक्यात गोषवारा -

*".. ..श्री साईबाबांचे समाधिस्थान शिर्डी एक जागतिक श्रध्दास्थान असुन वर्षभर भाविकांच्या गर्दीने फुलून गेलेली शिर्डी गत पन्नास दिवसांपासून ठप्प झालेली आहे. पर्यायाने संस्थानचे उत्पन्न व कर्मचा-यांचे कामही थांबलेले आहे.*

*उत्पन्न बंद झाल्याने कर्मचा-यांच्या पगारात कपात करणेत येणार तसेच कर्मचारी कपात केले जाणार अशा स्वरुपाच्या चर्चा समाज माध्यमातून व प्रत्यक्ष भेटीतून माझ्याकडे आलेल्या आहेत.*

*वास्तविक श्री साई संस्थान राज्यातील एक नामांकित व वलयांकित संस्थान असून संस्थानचा कारभार राज्य शासनाच्या ध्येय धोरणे व कायद्यानुसार चालत असतो. केंद्र व राज्य शासनाने कोणत्याही आस्थापनांनी आपल्या कर्मचा-यांचे पगारात कपात करु नये अथवा कर्मचा-यांना कामावरुन दूर करु नये असे धोरण घेतलेले असल्याने संस्थान शासन धोरणाच्या विपरीत कृती कशी करु शकते ?*

*अनेक वर्ष संस्थान सेवेत कार्यरत कर्मचा-यांना अशा प्रकारे आर्थिक आरिष्टय निर्माण झाल्यास त्यांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण होईल तसेच त्यांच्या पाल्यांचे शिक्षण, पालकांचे आजारपण व इतर कौटुंबिक जबाबदा-या निभावणेसुध्दा कठीण होईल. या सर्वच कर्मचा-यांनी मेहनतीने साईभक्तांची व संस्थानची सेवा इमानेइतबारे केलेली आहे.*

*उत्पन्न कमी झाल्याने बचतीचे उपाय करणे गरजेचेच आहे. त्यामुळे नवीन अनावश्यक उपक्रमांना फाटा देणे उचित ठरेल. तथापि कर्मचारी अथवा पगार कपात केल्यास संस्थान कर्मचा-यांमध्ये प्रचंड असंतोष निर्माण होईल.*

***कृपया, संस्थानच्या कोणत्याही कर्मचा-यांचे पगार कपात अथवा कर्मचारी कपात करणेत येऊ नये, ही विनंती***."

**०३.** मा. खा. श्री. सदाशिव लोखंडे, संसद सदस्य, शिर्डी लोकसभा, भारत यांनी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना अग्रेषित केलेल्या दिनांक २५ मे, २०२० रोजीचे विनंती पत्रात खालीलप्रमाणे विनंती केलेली आहे, त्याचा थोडक्यात गोषवारा -

*".. ..वरिल विषयान्वये कळविण्यात येते की, संपूर्ण जग कोरोना व्हायरस Covid 19 च्या प्रादुर्भावामुळे अत्यंत अडचणीचा सामना करीत आहे, याबाबतच्या गंभीर समस्यांना भारताला देखील सामोरे जावे लागत आहे. त्या विरुध्दच्या एकत्रित प्रयत्नांचा भाग म्हणून यापुर्वी केंद्र शासन आणि राज्य शासनाच्या संदर्भीय आदेशान्वये कशा प्रकारे खबरदारी घ्यावी व समाजातील कामगार वर्गाला याचा दुष्परिणाम होणार नाही याबाबत काय उपाययोजना करावी या अनुषंगाने सविस्तर सुचना देण्यात आलेल्या आहेत. खाजगी आस्थापनांवर काम करणा-या कामगार व कर्मचारी यांना मदत करणेबाबत विशेषतः कंत्राटी काम करणा-या कामगारांचे वेतन कमी करु नये अशा सूचना यापूर्वी देण्यात आलेल्या आहेत. तसेच जर काही कारणास्तव अशा कामगारांना कामावर येता आले नाही तर ते कामावर नसलेला कालावधी देखील त्यांच्या पगारी रजेचा कालावधी म्हणून गृहित धरावा ज्यामुळे या कामगारांच्या दैनंदिन जीवनामध्ये अडथळा येणार नाही.* ***या कालावधीत कोणत्याही कामगाराचे वेतन अथवा पगार कमी होणार नाही परिणामी त्यांचे आर्थिक नुकसान होणार नाही याचीही काळजी घेण्यात यावी.***

***वरील आदेशाची काटेकोर अंमलबजावणी व्हावी याबाबतची दक्षता सर्व संबंधित कार्यालय प्रमुखांना देण्यात यावी.***"

**(क) माहे मे, २०२० चे वेतनाबाबत करावयाचे कार्यवाहीचा प्रस्ताव –**

**(क-१) प्रतिनियुक्तीवरील अधिकारी यांचे वेतन -**

मा. केंद्र व राज्य शासनाने कोव्हीड-१९ या विषाणूचे प्रादुर्भावात वाढ झाल्याने, दिनांक १९ मे, २०२० आदेशानुसार,LOCKDOWNचा कालावधी/मुदत **दिनांक ३१ मे, २०२०** अखेर वाढविल्याने, संस्थान आस्थापनेवर दैनंदिन कामकाजाचे नियोजन व नियंत्रण करणेसाठी मा. शासनाकडून प्रतिनियुक्तीने कार्यरत असणारे

मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी, प्रशासकीय अधिकारी व संरक्षण अधिकारी (पोलिस उपनिरीक्षक) असे एकुण ०५ अधिकारी यांचे माहे मे, २०२० चे पूर्ण मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करता येईल.

**(क-२) कायम (स्थायी) कर्मचारी यांचे वेतन -**

श्री साईंचे समाधी दर्शनासाठी शिर्डी येथे येणारे भक्तांना मुलभूत सेवा-सुविधा जसे, दर्शन, प्रसाद भोजन, निवास, सुरक्षा, वैद्यकीय व्यवस्था विनासायास व विनाविलंब प्राप्त व्हाव्यात म्हणून तसेच इतर अनुंषगिक कामकाजासाठी एकूण ४० विभाग कार्यरत असून, माहे मे, २०२० अखेर संस्थान आस्थापनेवर एकूण १९०७ कायम (स्थायी) कर्मचारी कार्यरत आहेत.

संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे कायम (स्थायी) कर्मचा-यांना मा. तदर्थ समिती व प्रशासकीय स्तरावरील मान्यतेने LOCKDOWN च्या कालावधीतील माहे एप्रिल, २०२० चे वेतन मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करणेत आलेले आहे.

LOCKDOWN च्या कालावधीत मा. शासनाचे नियमांचे पालन करुन, संस्थान आस्थापनेवरील प्रामुख्याने रुग्णालये, आरोग्य (स्वच्छता), संरक्षण, प्रसादालय, बगीचा, बांधकाम, विद्युत आदि अत्यावश्यक सेवेतील विभागांसह इतर अन्य विभागांकडे कार्यरत असणारे सर्व कायम (स्थायी) कर्मचा-यांना आवश्यकतेनुसार व गरजेनुसार चक्रीय पध्दतीने / आळीपाळीने कामावर बोलविणेत आलेले होते व त्यानुसार सदर कर्मचारी हे कामावर ही हजर होते. याबाबीचा विचार करुन, संस्थान आस्थापनेवरील कायम (स्थायी) कर्मचा-यांना माहे मे, २०२० चे पूर्ण मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करता येईल.

**(क-३) कायम कंत्राटी कर्मचारी (५९८ कर्मचारी) यांचे वेतन -**

मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ आणि त्या अनुषंगाने प्रशासकीय स्तरावरील मान्यतेनुसार, सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत संस्थान सेवेत असणारे कुशल / अकुशल ६३५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी ५९८ कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना, किमान वेतन कायद्यानुसार व किमान वेतन दरानुसार माहे जानेवारी, २०२० मध्ये कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून संस्थानांचे विविध विभागांकडे नियुक्त्या देणेत आलेल्या आहेत.

या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना LOCKDOWNचे कालावधीत मा. शासनाचे नियमांचे पालन करुन,आवश्यकतेनुसार व गरजेनुसार चक्रीय पध्दतीने / आळीपाळीने कामावर बोलविणेत आलेले होते व सदर कर्मचारी हे कामावर ही हजर होते. त्यामुळे त्यांना कायम (स्थायी) कर्मचा-यांप्रमाणे प्रशासकीय स्तरावरील मान्यतेनुसार व मा. तदर्थ समितीने चक्रीय पध्दतीने दिनांक ०७ एपिल, २०२० रोजी दिलेल्या मान्यतेनुसार, हजर दिवसांचे प्रमाणात (आठवडा सुट्टीची गणना करुन) माहे एप्रिल, २०२० चे पूर्ण मासिक वेतन किमान वेतन कायद्यानुसार व **किमान वेतन दरानुसार** आदा करणेत आलेले आहे. या बाबीचा विचार करुन, संस्थान आस्थापनेवरील या ५९८ कायम कंत्राटी कर्मचा-यांना माहे मे, २०२० चे पूर्ण मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करता येईल.

**तथापि,** याबाबत विवेचन असे की,

**०१.** मा. तदर्थ समितीने दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेतील विषय क्रमांक ०१, ०२, ४३ व ६३ या प्रस्तावांचे अनुषंगाने **एकत्रित निर्णयातील अ.नं. ३९** मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे -

*".. ..**39.** Now coming to payment of salary / wages to said 598 employees, this committee is put in difficult situation. On one hand it is clear from the record that in absence of any decision by erstwhile Committee to appoint said 598 employees on contract basis directly on the Trust, nor there is any such decision being taken by this Committee, the order of appointment issued to said 598 employees by the then Chief Executive Officer of the Trust is a question to be decided. Secondly, the fate of the agreement, which the Trust had with the Contractors is to be decided. This Committee cannot predict the stand that is likely to be taken by the Labour Contractors with regard to said employees**. In such circumstance, on humanitarian grounds this Committee is of the view that payment of about 60% of the wages (as per Minimum Wages Act and G.R. issued from time to time. However, without any incentive as decided by the erstwhile Committee on 25.02.2017) be paid to such 598 employees for the month of April paid in May 2020, he be paid full***

***salary / wages of the respective days of work and in addition to it he be paid such 60% of monthly wages for remaining days to be adjusted in future.*** *Trust to obtain written undertaking from such employees to the above effect. (This be taken as Decision-D for clarity.) "*

**०२.** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णयानुसार, माहे डिसेंबर, २००० पूर्वी व त्यानंतर माहे डिसेंबर, २००५ अखेर संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे एकूण ९१६ कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत सामावून घेणेबाबत दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजी मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. या प्रस्तावास अनुसरुन, मा. शासन व संस्थान व्यवस्थापनामार्फत पत्रव्यवहार होऊन, मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार, सन २००१ – २००४ या कालावधीत संस्थानमध्ये कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे ६३५ कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना किमान वेतन दरानुसार संस्थान आस्थापनेवर कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून मान्यता दिलेली आहे. या शासन निर्णयास अनुसरुन, संस्थान प्रशासनामार्फत प्रशासकीय स्तरावर मंजूर झालेल्या टिपणीनुसारच, माहे जानेवारी, २०२० मध्ये एकुण ५९८ कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना **कायम कंत्राटी कर्मचारी म्हणून किमान वेतन दरानुसार** संस्थान सेवेत सामावून घेणेत आलेले आहे.

**०३.** या ५९८ कुशल / अकुशल कायम कंत्राटी कर्मचा-यांना माहे जानेवारी, २०२० मध्ये देणेत आलेल्या नियुक्ती आदेशात खाली नमुद केलेल्या महत्वाच्या अटींचा समावेश आहे -

*" .. .. ०२. श्री. -- -- -- यांची नियुक्ती मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजी मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर* ***कंत्राटी कर्मचारी म्हणून ११ महिन्यांकरीता तात्पुरत्या स्वरुपात करणेत येत असून,*** *त्यांनी सध्या संस्थानचे -- -- -- विभागात कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून कामावर हजर व्हावे.*

*०३. त्यांची नियुक्ती ही तात्पुरत्या स्वरुपात कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून असल्याने त्यांना दरमहा रुपये ५११३/- मात्र किंवा रुपये ५,११३/- मात्र इतके मासिक एकत्रित वेतन किंवा* ***किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय होणारे वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन (प्रती दिन / प्रती दिवस विहित पध्दतीने गणना करुन येणारे वेतन) आदा करण्यात येईल.***

*०४. उपरोक्त प्रमाणे एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्यात येत असलेतरी, संबंधित कर्मचा-याच्या* ***संस्थानच्या नोकरीतील दर्जा (Status) हा कंत्राटी कर्मचारी म्हणून राहील.*** *त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. "*

उपरोक्तप्रमाणे नियुक्ती आदेशातील अट क्रमांक ०३ नुसार या ५९८ कुशल / अकुशल कायम कंत्राटी कर्मचारी यांना **किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय होणारे वेतन** (म्हणजेच कुशल कंत्राटी कर्मचारी यांचे करीता रुपये ४३०.५४ वअकुशल कंत्राटी कर्मचारी यांचे करीता रुपये ३६८.५४ मात्र प्रती दिन / प्रती दिवस या प्रमाणे गणना करुन ) प्रती दिन विहित पध्दतीने गणना करुन माहे जानेवारी, फेब्रुवारी व मार्च, २०२० मध्ये वेतन आदा करणेत आलेले आहे. सदरचे कंत्राटी कर्मचा-यांना इतर कंत्राटी कर्मचारी यांचेप्रमाणे ४० टक्के वाढीव वेतन लागू करणेत आलेले नाही / लागू नाही.

**०४.** उपरोक्त संस्थान आस्थापनेवरील ५९८ कायम कंत्राटी कर्मचा-यांना LOCKDOWNचे कालावधीतील माहे मार्च, २०२० व माहे एप्रिल, २०२० चे वेतन आदा करतांना खाली नमूद केलेल्या **मा. केंद्र व राज्य शासन निर्णयांचा / निर्देशांचा / मार्गदर्शक सुचनांचा आधार घेणेत आलेला आहे–**

*१.* ***वित्त विभाग, भारत सरकार*** *यांचेकडील दिनांक २३ मार्च, २०२० रोजीचे कार्यालयीन परिपत्रकात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -*

*" .. .. 2. Due to these measures, there is a likelihood of* ***a number of contractual, casual and outsourced staff such as house-keeping staff etc. being required to stay at home, which under normal circumstances would result in deduction in their pay / wages.*** *In order to avoid any undue hardships under the prevailing extraordinary circumstances, it has been decided that where every any such contractual, causal and outsourced staff of Ministries / Departments and other organizations of Government of India****, is required to stay at home in view of lockdown order regarding COVID-19 prevention, as announced***

***by various States / UT Governments, they shall be treated as "on duty" during such period of absence and necessary pay / wages would be paid accordingly."***

२. ***मा. कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी मा. कामगार उपआयुक्त, मुंबई शहर*** *यांना अग्रेषित केलेल्या दिनांक २० मार्च, २०२० रोजीचे पत्रात खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे –*

*" .. .. In the backdrop of such challenging situation, all the Employers of Public / Private Establishments may be advised to extend their coordination by not terminating their employees, particularly casual or contractual workers from job or reduce their wages.* ***If any worker takes leave, he should be deemed to be on duty without any consequential deduction in wages for their period. Further, if the place of employment is to be made non-operational due to COVID-19, the employees of such unit will be deemed to be on duty.***

***The termination of employee from the job or reduction in wages in this scenario would further deepen the crises and will not only weaken the financial condition of the employee but also hamper their moral to combat their fight with this epidemic. In view of this you are therefore directed to issue necessary Advisory to the Employers / Owners of all the establishments in your jurisdiction. "***

३. ***मा. उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, महाराष्ट्र शासन*** *यांचेकडील* ***दिनांक ३१ मार्च, २०२०*** *रोजीचे शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे -*

*" .. ..* ***सर्व खाजगी आस्थापना, कारखाने, कंपन्या, दुकाने (अत्यावश्यक सेवा आस्थापना वगळून) इत्यादी आस्थापनांचे सर्व कामगार (कंत्राटी, बाह्यस्त्रोताव्दारे उपलब्ध करुन घेण्यात आलेले कर्मचारी व कामगार, तात्पुरत्या कालावधीसाठीचे कर्मचारी व कामगार, रोजंदारीवरील कामगार) ज्यांना कोरोना वायरस Covid-१९ च्या प्रादुर्भावामुळे महाराष्ट्र शासनाच्या आदेशामुळे घरी / स्थानबध्द राहावे लागत आहे, अशा सर्व कामगार/कर्मचारी हे कर्तव्यावर असल्याचे समजण्यात यावे व त्यांना संपूर्ण वेतन व भत्ते अदा करण्यात यावेत.***

***हे आदेश महाराष्ट्रातील सर्व निमशासकीय, औद्योगिक, वाणिज्यिक, व्यापारी व दुकाने आस्थापनांना लागू राहतील. या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी व्हावी*** *याबाबतची दक्षता सर्व संबंधित कार्यालय प्रमुखांनी घ्यावी.*

***उपरोक्त आदेश सर्व सार्वजनिक उपक्रम, महामंडळे व स्थानिक स्वराज्य संस्था यांना देखील लागू राहतील, असे नमूद करणेत आलेले आहे."***

**०५.** उपरोक्त **परिच्छेद (क-३)** मधील **उपपरिच्छेद (०१)(०२)(०३)(०४-१/२/३)** मधीलविवेचनास अनुसरुन, मा. तदर्थ समितीने दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेतील विषय क्रमांक ०१, ०२, ४३ व ६३ अनुषंगाने घेतलेला **एकत्रित निर्णयातील अ.नं. ३९ चे** (वरील परिच्छेद क-३ (०१) मध्ये नमूद) बाबतीत पुर्नःविचार होणे गरजेचे व आवश्यक आहे.

याबाबत कारणमीमांसा अशी की, ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना मा. शासन निर्णयानुसार संस्थान सेवेत सामावून घेणेबाबतचा प्रशासन स्तरावर घेतलेला निर्णय हा विषय स्वतंत्र असून, त्याबाबत अलाहिदा प्रस्ताव किंवा अहवाल मा. तदर्थ समितीचे समक्ष सादर करणेत येईल.

तसेच मा. केंद्र व राज्य शासनाने पारित केलेल्या शासन निर्णयानुसार, किंबहुना मार्गदर्शक सुचनांनुसार सर्व कर्मचारी (कंत्राटी, बाह्यस्त्रोताव्दारे उपलब्ध करुन घेण्यात आलेले कर्मचारी व कामगार, तात्पुरत्या कालावधीसाठीचे कर्मचारी व कामगार, रोजंदारीवरील कामगार) यांना संपूर्ण वेतन व भत्ते आदा करणेबाबत सार्वजनिक हिताचे दृष्टीने कळविलेले आहे.

या मा. शासनाकडील निर्देशांनुसार व मा. तदर्थ समितीने दिनांक ०७ एप्रिल, २०२० रोजीचे चक्रीय पध्दतीचे मान्यतेनुसार आणि प्रशासकीय स्तरावरील दिनांक २३ एप्रिल, २०२० चे मंजूर टिपणीनुसार, संस्थान आस्थापनेवरील सर्व कायम, कायम कंत्राटी व कंत्राटी कर्मचा-यांचे माहे मार्च, २०२० व माहे एप्रिल, २०२० चे वेतन विहित पध्दतीने आदा करणेत आलेले आहे. **तथापि,** आता मा. तदर्थ समितीने ५९८ कंत्राटी कर्मचा-यांचे वेतनाबाबत दिनांक ११ मे, २०२० रोजी घेतलेला निर्णय हा पूर्वीचे निर्णयाचे अनुषंगाने विरोधाभास दर्शवित

असल्याने, संस्थानाचे कर्मचा-यांना वेतन आदा करणेबाबत एकाच संस्थेत दुहेरी धोरण अवलंबित असल्याचे दिसून येत आहे, असे मत आहे.

तसेच, याबाबत स्थानिक पातळीवरील लोकप्रतिनिधींनी तसेच असंघटीत कामगार संघटनेनी **परिच्छेद ब** मध्ये नमूद केलेप्रमाणे, **कर्मचा-यांचे वेतन कपात करु नये,**अशी विनंती केलेली आहे.

त्यामुळे उपरोक्त सर्व बाबींचा विचार करुन, या ५९८ कायम कंत्राटी कर्मचारी यांना LOCKDOWN चे कालावधीत मा. शासनाचे नियमांचे पालन करुन,आवश्यकतेनुसार व गरजेनुसार चक्रीय पध्दतीने / आळीपाळीने कामावर बोलविणेत आलेले असल्याने, त्यांना माहे एप्रिल, २०२० चे आदा करणेत आलेल्या वेतनास कार्योत्तर मान्यता देऊन, माहे मे, २०२० चे पूर्ण मासिक वेतन पूर्वीचेच विहित पध्दतीने **किमान वेतन दरानुसार** विहित पध्दतीने आदा करता येईल, असे मत आहे.

**(क-४) कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी यांचे वेतनाबाबत –**

संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत सध्या खालीलप्रमाणे कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत -

१. कुशल/अकुशल कंत्राटी कर्मचारी (साधारणतः सर्व विभागात कार्यरत)

२. कुशल/अकुशल सुरक्षा निरीक्षक/सुरक्षारक्षक/बंदूकधारी सुरक्षारक्षक/माजी सैनिक (संरक्षण विभाग)

३. निश्चित मानधन / वेतनावर आणि निश्चित कालावधीसाठी नियुक्त करणेत आलेले कर्मचारी (उदा. भूसंपादन सल्लागार, मोजणीदार, वैद्यकीय अधिकारी, पॅरा मेडिकल स्टाफ, शिक्षक इत्यादी– विशेषतः रुग्णालये/मालमत्ता/प्रकाशने/आयटीआय विभाग ई.)

४. बाह्यस्त्रोत स्त्री/पुरुष पारिचारिका व इतर (किमान वेतनावर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत- रुग्णालये विभाग)

वर नमुद केलेप्रमाणे संस्थान आस्थापनेवरील सर्वसाधारणपणे सर्वच विभागात कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत आहेत. मा. शासनाचे दिनांक ३१ मार्च, २०२० चे निर्देशानुसार आणि मा. तदर्थ समितीचे मान्यतेने माहे मार्च, २०२० आणि माहे एप्रिल, २०२० चे मासिक वेतन उपरोक्त **परिच्छेद अ-८** मध्ये सविस्तर नमूद केलेप्रमाणे विशिष्ट कार्यपध्दती निश्चित करुन आदा करणेत आलेले आहेत.

आताही, म्हणजेच उपरोक्त कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी यांना माहे मे, २०२० चे वेतन **परिच्छेद अ-८** मध्ये सविस्तर नमूद केलेप्रमाणे विशिष्ट कार्यध्दती निश्चित करुन किंवा त्या पध्दतीचा अवलंब करुन आदा करता येईल.

**(क-५)** या व्यतिरिक्त संस्थान आस्थापनेवरील खालील विभागांकडे उक्ते/ठोक पध्दतीने काम दिलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटदारामार्फत बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी कार्यरत आहेत –

०१. (अ) श्री साईनाथ रुग्णालय (हाऊसकिपींग)
(ब) श्री साईनाथ रुग्णालय (पारिचारिका )
(क) श्री साईनाथ रुग्णालय (इतर कर्मचारी)

०२. (अ) श्री साईबाबा हॉस्पीटल (हाऊसकिपींग)
(ब) श्री साईबाबा हॉस्पीटल (पारिचारिका)
(क) श्री साईबाबा हॉस्पीटल (इतर कर्मचारी)

०३. श्री साई प्रसादालय (चपाती / पुरी / नाष्टा पाकिटे / हाऊसकिपींग / वाढपी आदि)

०४. लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग ( बुंदी प्रसाद / बुंदी लाडू प्रसाद )

०५. व्दारावती / श्री साई आश्रम / श्री साई धर्मशाळा निवासस्थान विभाग (हाऊसकिपींग)

उपरोक्त नियुक्त करणेत आलेल्या बाह्यस्त्रोत कंत्राटदारांना ज्या-त्या संबंधित विभागांमार्फत स्वतंत्ररित्या अटी-शर्तीसह कार्यादेश देणेत आलेले आहेत. त्यामुळे अशा बाह्यस्त्रोत कंत्राटदारांकडे कार्यरत असणा-या कंत्राटी कर्मचा-यांना वेतन मिळणेबाबत कशी व कोणती कार्यपध्दती अवलंबवावी याबाबत त्या-त्या विभागांनी स्वतंत्ररित्या प्रशासकीय स्तरावर प्रस्ताव सादर करुन त्याबाबतची मान्यता घ्यावी, असे मत आहे.

**(ड)** सध्या विषयांकित कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव वाढता असून, मा.केंद्र व राज्य शासनाने दिनांक ३१ मे,२०२० पावेतो संपूर्ण देशात/राज्यात LOCKDOWN ची परिस्थिती काही अंशी सवलती देऊन जैसे थे ठेवलेली आहे. त्यामुळे उपरोक्त **परिच्छेद (अ)** मधील पूर्वपीठीकेस अनुसरुन, **परिच्छेद क मधील उपपरिच्छेद (क-१ ते क-५)** मध्ये नमूद केलेप्रमाणे, संस्थान व्यवस्थापनाकडे/आस्थापनेवर विविध विभागाकडे, विविध पध्दतीने कार्यरत असलेल्या कर्मचा-यांनामाहे मे, २०२० चे (माहे जून २०२० मध्ये आदा करावयाचे)

वेतन/पगार/मानधनआदि आदा करणेकामी उपरोक्त सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे विचारार्थ व निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आस्थापनेवरील कायम, कंत्राटी व कंत्राटी कर्मचारी तसेच बाह्यस्त्रोत कंत्राटी कर्मचारी यांना माहे मे-२०२० चे वेतन आदा करणेबाबत खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.**

**१. मा.शासनाकडून प्रतिनियुक्तीने कार्यरत असणाऱ्या अधिकाऱ्यांना माहे मे, २०२० चे पूर्ण मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करण्यात यावे.**

**२. संस्थान आस्थापनेवरील कायम (स्थायी) कर्मचा-यांना माहे मे, २०२० चे पूर्ण मासिक वेतन विहित पध्दतीने आदा करण्यात यावे.**

**३. संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे ५९८ कंत्राटी कर्मचारी त्यांचेबाबत निर्णय प्रलंबीत आहे, या कर्मचाऱ्यांना तसेच कंत्राटदारामार्फत असणारे कंत्राटी कर्मचारी, बाहयस्त्रोत कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी आणि उक्त्या दराने दिलेल्या ठेक्याचे कंत्राटदाराकडे कार्यरत असणारे कर्मचारी यांना माहे मे २०२० मध्ये प्रत्यक्ष कामावर हजर असलेल्या दिवसाचे वेतन हे किमान/विहीत वेतनदरानुसार १०० टक्के आणि कोव्हीड १९ लॉकडाऊन कालावधीतील उर्वरीत दिवस कामावर हजर नसल्याने, त्या दिवसांचे वेतन हे किमान/विहीत वेतनदरानुसार ५० टक्के आदा करण्यात यावे.**

**४. रुग्णालय विभागाकडील ५९८ कंत्राटी कर्मचारी त्यांचेबाबत निर्णय प्रलंबीत आहे, या कर्मचाऱ्यांना तसेच कंत्राटदारामार्फत असणारे कंत्राटी कर्मचारी, बाहयस्त्रोत कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचारी आणि उक्त्या दराने दिलेल्या ठेक्याचे कंत्राटदाराकडे कार्यरत असणारे कर्मचारी यांना माहे मे-२०२०चे वेतन आदा करतांना ज्या कर्मचाऱ्यांची उपस्थिती ५० टक्के व त्यापेक्षा जास्त असेल अशा कर्मचाऱ्यांना किमान/विहीत वेतनदरानुसार १०० टक्के वेतन आदा करण्यात यावे, तसेच ज्या कर्मचाऱ्यांची उपस्थिती ५० टक्क्यापेक्षा कमी असेल अशा कर्मचाऱ्यांना अ.नं.३ प्रमाणे वेतन आदा करण्यात यावे.**

**५. मा. राज्य शासनाने दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना लॉकडाऊन कालावधीत कार्यालयात हजर राहण्यापासून सुट/सवलत दिलेली असल्याने अशा दिव्यांग अधिकारी/कर्मचारी यांना माहे मे-२०२० चे १०० टक्के वेतन किमान/विहीत वेतनदरानुसार आदा करण्यात यावे.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग/सर्व निवासस्थाने विभाग/
प्रसादालय विभाग/लाडू प्रसाद निर्मिती विभाग/ रुग्णालये विभाग)**

---

**विषय नं.०४** **संस्थानमध्ये कंत्राटदारामार्फत कामावर असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत कंत्राटी पध्दतीने करणेत आलेल्या नियुक्तीबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीने दिलेल्या निर्देशानुसार कार्यवाहीचा अहवाल मान्यतेस्तव सादर.**

**प्रस्ताव-** विषयाची पूर्वपीठीका -

(अ-१) मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील पदांचा आकृतीबंध मंजूर करणेबाबतचे दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ शासन निर्णयानुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास, म्हणजेच एकूण ४८२६ पदांना (स्थायी २९०८ पदे+अस्थायी १९१८ पदे) खालील अटी-शर्तीस अधिन राहुन मान्यता दिलेली आहे. या अटी-शर्तींचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे –

(०१) समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

(०२) सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्ये ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

(०३) सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

(०४) सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.

(०५) आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृत्तीवेतन लागू असणार नाही.

(०६) समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.

(०७) समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.

(०८) समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

(०९) आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतूद ठेवावी.

(१०) तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

*(११) आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-यांचापरिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.*

**(अ-२)** त्यानंतर, मा. शासनाने दिनांक २५ सप्टेंबर, २०१४ रोजीचे शासन निर्णयानुसार, संस्थान संचलित श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल या शाळेच्या प्राथमिक विभागासाठी मुख्याध्यापक (एक पद) व श्री साईबाबा हॉस्पीटलकरीता परफ्यूजनिस्ट (०१ पद) नव्याने समाविष्ट करणेस मान्यता दिली.

**(अ-३)** त्यानंतर मा. शासनाने दिनांक १७ नोव्हेंबर, २०१७ चे पत्रानुसार, संस्थानकडील विविध पत्रव्यवहारास अनुसरुन असे कळविले आहे की, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या सर्व विभागातील कामकाजाचा आढावा घेऊन वाढीव पदे मंजूर करण्याचा सुधारित व एकत्रित आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनास सादर करावा.

**(अ-४)** याच कालावधीत, श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल, शिर्डी कडील विद्यार्थी संख्येत झालेली वाढ व त्यामुळे तुकडयांच्या संख्येत झालेली वाढ लक्षात घेऊन १० वाढीव सहाय्यक शिक्षक पदांना मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेस्तव सादर करणेत आलेला होता. त्यास अनुसरुन, मा. शासनाने दिनांक २० डिसेंबर, २०१७ रोजीचे शासन निर्णयानुसार, सहायक शिक्षक संवर्गातील १० पदे निर्माण करणेस मान्यता दिलेली आहे.

**(अ-५)** दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयानुसार मंजूर आकृतीबंधात, उपरोक्त परिच्छेद अ-२ व अ-५ मध्ये नमूद केलेल्या वाढीव पदांची मान्यता विचारात घेतां,सध्या एकूण ४८३८ (४८२६+०२+१०) पदांचा आकृतीबंध मंजूर असून, यामध्ये स्थायी पदे २९२० (२९०८+१२) + कंत्राटी पदे १९१८ यांचा समावेश आहे.

**(अ-६)** दरम्यानचे कालावधीततत्कालीनमा. व्यवस्थापन समितीचे दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७६५ (२३) अन्वये, संस्थान प्रशासनाकडील दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे पत्राव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कॉन्ट्रॅक्टर्समार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल-८११ व कुशल-१०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव मा. शासनाकडे सादर करणेत आला. सदरहू मूळ प्रस्तावावर मा. शासनाकडून विचारणा करणेत आलेल्या बाबींवर वेळोवेळी अलाहिदा पत्रव्यवहार करणेत आलेला आहे.

**(अ-७)** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे मान्यतेने, संस्थान प्रशासनामार्फत दिनांक ०८ डिसेंबर,२०११ रोजी सादर करणेत आलेल्या (परिच्छेद अ-६ मध्ये नमूद केलेप्रमाणे) कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेच्या प्रस्तावाबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजी मा. मुख्यमंत्री यांचे शासकीय निवासस्थानात झालेल्या संस्थान कामकाजासंबंधित आढावा बैठकीचे इतिवृत्त मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील पत्र दिनांक ०१ मार्च, २०१८ (प्रत्यक्ष प्राप्त दिनांक ०९ मार्च, २०१८ ) इकडील कार्यालयास प्राप्त झालेले होते.

उपरोक्त दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे आढावा बैठकीचे इतिवृत्तातील विषय क्रमांक ०४ श्री साईबाबा संस्थानच्या कुशल व अकुशल ९१३ कर्मचा-यांना नियमित करणेबाबत यावर खालीलप्रमाणे निर्णय घेणेत आलेला आहे –

*(०१) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आकृतीबंधातील कंत्राटी पदांना स्थायी पदे म्हणून मान्यता देणेत यावी.*

*(०२) सदर पदांवरील पदभरती प्रक्रिया राबविण्यात यावी.*

*(०३) पदभरती प्रक्रीयेमध्ये श्री साईबाबा संस्थानमधील कामाचा अनुभव, त्यांचे कौशल्य आणि मागील सेवा कालावधीस प्राधान्य देण्यात यावे व त्यासाठी २५ गुण ग्रेस स्वरुपात देण्यात यावेत.*

**(अ-८)** याच अनुषंगाने मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडून दिनांक १२ सप्टेंबर,२०१८ रोजीचे पत्राने असे कळविणेत आले होते की,

*“.. .. (दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे मा. मुख्यमंत्री यांच्या आढावा बैठकीतील निर्णय क्र.०४) सदर निर्णयानुसार संस्थानच्या आकृतीबंधात सुधारणा करणे आवश्यक आहे. यास्तव या अनुषंगाने संस्थानमार्फत व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावा. ”*

**(अ-९)** उपरोक्त तत्कालीन मा. मुख्यमंत्री महोदय यांचे निवासस्थानी दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१८ रोजीचे बैठकीतील निर्णयानुसार, कंत्राटी पदे स्थायी पदांमध्ये रुपांतरीत झालेनंतर त्यावरील नेमणुकांसाठी पदभरती प्रक्रीया कशी राबवावी याबाबत स्पष्ट निर्देश देणेत आलेले नाहीत. तसेच पदभरती प्रक्रियेमध्ये कंत्राटी कर्मचा-यांना कामाचा अनुभव, त्यांचे कौशल्य आणि मागिल सेवा कालावधीसाठी २५ गुण ग्रेस देणेत यावेत असे कळविले आहे, याबाबतही स्पष्टता नाही. तसेच सेवेतील आरक्षणाबाबत ही स्पष्टता नाही. सध्या संस्थानमध्ये कार्यरत असणारे कंत्राटी कर्मचा-यांपैकी बहुतांशी कर्मचारी हे ४३ वर्षापेक्षा जास्त वयाचे आहेत, त्यामुळे पदभरती करतांना वयोमर्यादेचे निकषात त्यांचा समावेश होणे शक्य नाही, त्यामुळे त्यांना वयोमर्यादेत सूट द्यावी किंवा कसे तसेच सेवेतील आरक्षण याबाबत मा. शासन स्तरावरुन मार्गदर्शन मिळणेकामी संस्थान प्रशासनामार्फत दिनांक ०१ डिसेंबर,२०१८ अन्वये विनंती पत्र देणेत आलेले होते.

**(अ-१०)** त्यानंतर मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक ३१ डिसेंबर, २०१८ (प्राप्त दिनांक १५ जानेवारी, २०१९) अन्वये खालीलप्रमाणे कळविले होते -

१. *शासनाच्या दिनांक १२ सप्टेंबरच्या (या टिपणीतील संदर्भ क्रमांक ०८) पत्रान्वये कळविल्यानुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या सन २००९ मधील मंजूर आकृतीबंधात १११८ पदे जी कायम स्वरुपी कंत्राटी दाखविण्यात आली आहेत त्या पदांपैकी किती पदांना स्थायी पदे म्हणून रुपांतरीत करणे आवश्यक आहे,*

२. *यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांना किती वित्तीय भार येणार आहे,*

३. *उपरोक्त मुद्यांच्यासह व्यवस्थापन समितीच्या मान्यतेने आकृतीबंधाचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.*

**(अ-११)** संस्थानमध्ये कर्मचारी कंत्राटारामार्फत कंत्राटी पध्दतीने काम करत असलेले माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे व सन २००१ ते २००५ अखेर पर्यन्त ढोबळमानाने ९१६ अकुशल, कुशल व सुरक्षा कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत नियमित नेमणुका देणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला आहे. या ९१६ कंत्राटी कर्मचा-यांची माहिती खालील प्रमाणे आहे -

**तक्ता अ**

| **अ. नं.** | **तपशील** | **माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे परंतु दि. २२ ऑगष्ट, २००४ अखेर संख्या** | **दि.२३ ऑगष्ट, २००४ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर संख्या** | **दि.३१ डिसेंबर, २००५ अखेर एकूणसंख्या (३+४=५)** |
|---|---|---|---|---|
| **१** | २ | **३** | ४ | **५** |
| ०१ | **तांत्रिक कुशल कर्मचारी** | ०५२ | ०१६ | ०६८ |
| ०२ | **कुशल कर्मचारी** | ०३९ | ०१७ | ०५६ |
| ०३ | **अकुशल कर्मचारी** | ३५६ | ११२ | ४६८ |
| ०४ | **कुशल सुरक्षा कर्मचारी** | ००४ | ००१ | ००५ |
| ०५ | **अकुशल सुरक्षा कर्मचारी** | १८४ | ०६१ | २४५ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | **एकुण (१)** | ६३५ | २०७ | ८४२ |

उपरोक्त **तक्ता अ** व मूळ दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजी सादर केलेल्या प्रस्तावातील कर्मचा-यांच्या संख्येत खाली नमूद केलेल्या कारणांमुळे काही कंत्राटी कर्मचारी कमी झालेने फरक पडलेला आहे-

**तक्ता ब**

| **अ. नं.** | **तपशील** | **माहे डिसेंबर, २००० पुर्वीचे परंतु दि. २२ ऑगष्ट, २००४ अखेर कमी झालेली संख्या** | **दि.२३ ऑगष्ट, २००४ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर कमी झालेली संख्या** | **दि.३१ डिसेंबर, २००५ अखेर एकूणकमी झालेली संख्या (३+४=५)** |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| ०१ | **काम सोडून गेलेले** | ४२ | १२ | ५४ |
| ०२ | **मयत झालेले** | १० | ०१ | ११ |
| ०३ | **वयोमर्यादा ओलांडल्याने** | ०७ | ०१ | ०८ |
| ०४ | **अभिलेख सापडत नसलेले** | ०४ | ०१ | ०५ |
| ०५ | **कमी केलेले** | ०३ | ०४ | ०७ |
| | **एकुण (२)** | ६६ | १९ | ८५ |
| | **एकुण (तक्ता क्र.०१+०२)** | ७०१ | २२६ | ९२७ |

**थोडक्यात,** मूळ प्रस्तावात नमूद केलेले ९१६ कर्मचारी अधिक नजरचुकीने राहून गेलेले माहे डिसेंबर, २००५ पूर्वीचे ११ कर्मचारी असे मिळून एकूण ९२७ कंत्राटी कर्मचारी आहेत / होते.

उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेल्या विवेचनास आणि विषयांकित प्रस्तावाच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या पत्रव्यवहारास अनुसरुन, या प्रस्तावाबाबत करणेत आलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे सविस्तर नमूद केली आहे.

**सद्यःस्थिती -**

**(ब-१)** दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजीचे प्रस्तावाव्दारे, संस्थानमध्ये माहे डिसेंबर, २००० पूर्वीचे तसेच सन २००१ ते माहे डिसेंबर, २००५ अखेर पर्यन्त या कालावधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या काम करत असलेल्या अकुशल - ८११ व कुशल - १०५ अशा एकूण ९१६ कंत्राटी कामगारांना संस्थान सेवेत नियमित नेमणूका देणेस मान्यता मिळणेसाठी प्रस्ताव सादर करणेत आलेला होता.

या प्रस्तावाचे अनुषंगाने, उपरोक्त परिच्छेद अ मध्ये नमुद केलेल्या सविस्तर विवेचनास तसेच संदर्भांकित पत्रव्यवहारास अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२०१३ / २२ / प्र.क्र.७० / का.१६, दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ अन्वये शासन निर्णय पारित केलेला आहे.

**(ब-२)** मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी **" श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्या आस्थापनेवरील कंत्राटी कर्मचा-यांना एकत्रित मासिक वेतन मंजूर करण्याबाबत "** या शीर्षाखाली पारित केलेल्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे -

*"** .. ..**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी येथे **सन २००१ ते २००४**या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत असलेल्या **६३५**कर्मचा-यांपैकी कुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,९१३/- (रु. पाच हजार नऊशे तेरा फक्त) व अकुशल कर्मचा-यांना दरमहा रु. ५,११३/- (रु. पाच हजार एकशे तेरा फक्त) इतके मासिक एकत्रित वेतन **किंवा किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय वेतन यापैकी जे जास्त असेल ते वेतन देणेस मंजुरी देऊन** शासनाच्या दि. ०७.०८.२००९ रोजीच्या शासन **निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदावर नियुक्ती देण्यास** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी),*

*अधिनियम, २००४ मधील कलम १३ (४) व त्याखालील परंतुकास अनुसरुन तसेच पुढील अटीस अधीन राहून श्री साईबाबा संस्थानच्या व्यवस्थापन निधीतून अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे. उपरोक्तप्रमाणे **एकत्रित मासिक वेतन** मंजूर करण्यात येत असले तरी, संबंधित कर्मचा-याचा **संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status)हा कंत्राटी कर्मचारी** म्हणून राहील. त्यास श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडे कायमस्वरुपी नोकरी मागण्याचा हक्क असणार नाही. "*

**(ब-३)** उपरोक्त विवेचनानुसार व सामान्य प्रशासन विभागाकडील वेळोवेळी सादर करणेत आलेल्या कार्यालयीन टिपणीवरील आदेशानुसार, दिनांक २३ मे, २०१९ रोजीचे कामगार विभागाकडील टिपणी-वजा-पत्रासोबत प्राप्त झालेल्या ६३५ कर्मचा-यांचे यादीनुसार, त्यामध्ये समाविष्ट असणारे कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर हजर असलेले) मधील हजर दिवसांची तसेच त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी करुन खाली नमूद केलेप्रमाणे नियुक्ती आदेश दिनांक ०२ जानेवारी, २०२० अखेर पारित करणेत आलेले आहेत-

**तक्ता क्रमांक ०१**

| अ.नं. | तपशील | संख्या | शेरा / कारण |
|---|---|---|---|
| **(अ)** | **दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील कंत्राटी कर्मचा-यांची संख्या** | **६३५** | -- |
| ०१ | यादीत एक नांव दोन वेळेस आलेले कंत्राटी कर्मचारी | ००१ | श्री. रविंद्र भडांगे यांचे नांव यादीतील अ.नं.५० आणि अ.नं. ५४ वर ही आलेले आहे, त्यापैकी यादीतील अ. नं. ५० नुसार नियुक्ती आदेश पारित करणेत आलेला आहे. |
| ०२ | यादीतील ६० वर्षे वयोमान पूर्ण केलेले कंत्राटी कर्मचारी | ००१ | श्रीमती पंचफुला राठोड (यादीतील अ.नं.०२) वयोमान ६० वर्षे पूर्ण झाल्याने नियुक्ती आदेश पारित करणेत आलेला नाही. |
| ०३ | यादीतील मयत झालेले कंत्राटी कर्मचारी | ००२ | श्री. दिवेकर (यादीतील अ.नं.६०) व श्री. कसबे (यादीतील अ.नं.५६४) हे मयत असल्या कारणाने नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले नाहीत. |
| ०४ | यादीतील दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतरचे कंत्राटी कर्मचारी | ००८ | सदरचे कंत्राटी कर्मचारी हे दिनांक २३ ऑगष्ट, २००४ नंतर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कामावर हजर झालेले आहेत, त्यामुळे त्यांना नियुक्ती आदेश देणेत आलेले नाहीत. (यादीतील अ.नं. ५७२, ५७४, ५७६, ५७७, ६३२, ६३३, ६३४ व ६३५ ) |
| ०५ | यादीतील सतत गैरहजर असणारे कर्मचारी | ००७ | कामगार विभागामार्फत ०१ वर्षापेक्षा जास्त तसेच ०१ वर्षाचे आतिल कालावधीत सतत गैरहजर असणारे एकूण २५ कंत्राटी कर्मचा-यांचे बाबतीत अलाहिदा कार्यवाही सुरु आहे. या २५ कंत्राटी कर्मचा-यांपैकीतसेच ज्या कंत्राटी कर्मचा-यांची नांवे ६३५ कंत्राटी कर्मचा-यांचे यादीत आहेत, परंतु सध्या कामावर हजर नाहीत अशा कंत्राटी कर्मचा-यांना नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले नाहीत (यादीतील अ.नं. ८९, १७२, २४०, ४९१, ५०४, ६०० व ६११) |
| ०६ | यादीतील सन २००१ ते सन २००४ (दि.२२/०८/२००४)या कालावधीत कामावर नसणारे कर्मचारी | ०१५ | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील सन २००१ ते सन २००४ या कालावधीत हजर नसणारे / कामावर नसणारे परंतु माहे डिसेंबर, २००० पुर्वी कामावर हजर असणारे कर्मचारी. (यादीतील अ.नं.३, ४, ९, २७, ४८, ८२, ८४, १०५, ११४, ११६, १२२, १२९, १४९व १६९) |
| **(ब)** | **एकूण (अ.नं.०१ ते ०६)** | **०३४** | -- |
| **(क)** | **पारित करणेत आलेले आदेश ((अ) –(ब))** | **६०१** | **दिनांक २३ मे, २०१९ रोजी कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील ६०१ पात्र कर्मचा-यांना आदेश पारित** |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | **करणेत आले.** |
| **(ड)** | यादीत समाविष्ट आहेत परंतु नियुक्ती आदेश स्वीकारले नाही असे कर्मचारी | **००३** | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्यायादीनुसार हजर दिवस व कागदपत्रांची पडताळणी करुन नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले होते परंतु काही कारणास्तव नियुक्ती आदेश स्वीकारले नाहीत असे कर्मचारी (यादीतील अ.नं.७६, ९० व ५३३ ) |
| **(इ)** | नियुक्ती आदेश स्वीकारुन सेवेत रुजू झालेले एकूण कंत्राटी कर्मचारी<br>**एकूण (क-ड)** | **५९८** | कामगार विभागाकडून प्राप्त झालेल्या यादीतील कंत्राटी कर्मचा-यांचे सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४ अखेर कामावर असलेले) या कालावधीतील हजर दिवस आणि कागदपत्रांची पडताळणी करुन नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले असून, सदर कर्मचारी सेवेत रुजू झाले आहेत. |

**(ब-४)** उपरोक्त **परिच्छेद ब-३** मधील, **तक्ता क्रमांक ०१(इ)**मध्ये नमुद केलेप्रमाणे, कंत्राटी कर्मचा-यांना पारित करणेत आलेल्या नियुक्ती आदेशातील कर्मचा-यांचा विभागाप्रमाणे व प्रकारानुसार (कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी) यानुसार थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे -

**तक्ता क्रमांक ०२**

| **अ. नं.** | **नियुक्ती आदेश स्वीकारुन सेवेत रुजू झालेले कंत्राटी कर्मचारी** | **कंत्राटी कर्मचारी** | | | **कंत्राटी कर्मचारी** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **कुशल** | **अकुशल** | **एकुण** | **पुरुष** | **स्त्री** | **एकुण** |
| **०१** | **५९८** | **०८७** | **५११** | **५९८** | **५६३** | **०३५** | **५९८** |

**तक्ता क्रमांक ०३**

| **अ.नं.** | **विभागाचे नांव** | **कंत्राटी कर्मचारी** | | | **कंत्राटी कर्मचारी** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **कुशल** | **अकुशल** | **एकुण** | **पुरुष** | **स्त्री** | **एकुण** |
| **1** | **2** | **3** | **4** | **(3+4)=5** | **6** | **7** | **(6+7)=8** |
| ०१ | सामान्य प्रशासन विभाग | ०१ | ०६ | ०७ | ०७ | ०० | ०७ |
| ०२ | जनसंपर्क विभाग | ०१ | ०४ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| ०३ | लेखाशाखा | १० | ०२ | १२ | १२ | ०० | १२ |
| ०४ | माहिती तंत्रज्ञान विभाग | ०२ | ०२ | ०४ | ०३ | ०१ | ०४ |
| ०५ | मंदिर विभाग | ०१ | २५ | २६ | २६ | ०० | २६ |
| ०६ | प्रकाशने विभाग | ०१ | ०२ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| ०७ | आरोग्य विभाग | ०२ | ९० | ९२ | ८५ | ०७ | ९२ |
| ०८ | संरक्षण विभाग | ०२ | १४३ | १४५ | १३५ | १० | १४५ |
| ०९ | फायर ॲण्ड सेफ्टी विभाग | ०० | ०४ | ०४ | ०४ | ०० | ०४ |
| १० | बांधकाम विभाग | ०४ | ०० | ०४ | ०४ | ०० | ०४ |
| ११ | पाणीपुरवठा विभाग | ०५ | ०२ | ०७ | ०७ | ०० | ०७ |
| १२ | बगीचा विभाग | ०० | ०३ | ०३ | ०२ | ०१ | ०३ |
| १३ | विद्युत विभाग | १४ | ०२ | १६ | १६ | ०० | १६ |
| १४ | मेकॅनिकल विभाग | ०३ | ०२ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| १५ | ध्वनिक्षेपण विभाग | ०३ | ०० | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| १६ | सीसीटीव्ही कंट्रोल सेल | ०१ | ०४ | ०५ | ०५ | ०० | ०५ |
| १७ | साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग | ०० | १४ | १४ | १४ | ०० | १४ |
| १८ | साईप्रसाद निवासस्थान विभाग | ०१ | १० | ११ | ११ | ०० | ११ |
| १९ | व्दारावती भक्तनिवासस्थान विभाग | ०२ | ०१ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| २० | श्री साई आश्रम विभाग | ०० | ०४ | ०४ | ०४ | ०० | ०४ |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| २१ | श्री साई धर्मशाळा | ०१ | ०१ | ०२ | ०२ | ०० | ०२ |
| २२ | श्री साई प्रसादालय | ०२ | ७७ | ७९ | ७६ | ०३ | ७९ |
| २३ | कॅन्टिन विभाग | ०२ | ३६ | ३८ | ३८ | ०० | ३८ |
| २४ | लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग | ०१ | ०७ | ०८ | ०८ | ०० | ०८ |
| २५ | भांडार विभाग | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ |
| २७ | वाहन विभाग | १३ | ०३ | १६ | १६ | ०० | १६ |
| २८ | मुंबई कार्यालय | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ |
| २९ | श्री साईबाबा इंग्लिश मिडियम स्कूल | ०४ | ०३ | ०७ | ०२ | ०५ | ०७ |
| ३० | श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय | ०१ | ०२ | ०३ | ०३ | ०० | ०३ |
| ३१ | श्री साईनाथ रुग्णालय | ०६ | २३ | २९ | २४ | ०५ | २९ |
| ३२ | श्री साईबाबा हॉस्पीटल | ०४ | ३७ | ४१ | ३८ | ०३ | ४१ |
| | **एकूण** | **८७** | **५११** | **५९८** | **५६३** | **३५** | **५९८** |

**(ब-५)** उपरोक्त **परिच्छेद ब-३** मधील **तक्ता क्रमांक ०१**मध्ये नमूद यादीतीलज्या कर्मचा-यांचे नियुक्ती आदेश प्रलंबित ठेवणेत आलेले आहेत, अशा कर्मचा-यांबाबत कागदपत्रांची पडताळणी पूर्ण झालेनंतर किंवा त्यांचे नियुक्तीबाबत येणा-या अडचणींचे यथायोग्य निराकरण झालेनंतर,त्यांना नियुक्ती आदेश देणेबाबतची कार्यवाही यथावकाश मा. व्यवस्थापन समिती / मा. तदर्थ समितीचे मान्यतेसाठी यथावकाश प्रस्तावित करणेत येईल.

**(क)** विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम - २००४ मधील **कलम – १३** मधील **समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी** या शीर्षाखाली **उपकलम ०४** मध्ये खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे –

*“ .. .. ४. समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षमतेने चालविण्यासाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिका-यांची (मुख्य कार्यकारी अधिका-याव्यतिरिक्त)व कर्मचा-यांची नेमणूक करता येईल.*

*परंतु,ज्या अधिका-याला किंवा कर्मचा-याला दरमहा दोन हजार रुपयांहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिका-याची किंवा कर्मचा-याची नेमणूक, समितीकडून, असे पद राज्य शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यन्त, केली जाणार नाही. ”*

**तसेच,**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम - २००४ मधील **कलम – १६** मधील **सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेचे कर्मचारी संस्थान विश्वस्त व्यवस्थेकडे नेमून देणे** या शीर्षाखाली खालीलप्रमाणे नमूद केलेले आहे –

*“ .. .. नियत दिवसाच्या लगतपूर्वी, जी व्यक्ती पूर्वीच्या विश्वस्तव्यवस्थेच्या सेवेत असेल आणि त्याच्या कामकाजासंबंधात काम करीत असेल अशी कोणतीही व्यक्ती ही, नियत दिवसाच्या लगतपूर्वी तिला जे वेतन लागू होते त्याच वेतनावर व सेवेच्या त्याच इतर अटी व शर्तीवर, नियत दिवसापासून समितीच्या नियंत्रणाखाली, संस्थान विश्वस्त व्यवस्थेच्या कामकाजाशी संबंधित अशा सेवेसाठी नेमून देण्यात आल्याचे व नियुक्त केल्याचे मानण्यात येईल, आणि सेवेच्या अशा शर्तीमध्ये राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेखेरीज त्या व्यक्तीचे अहित होईल अशा रितीने समितीकडून कोणताही बदल करण्यात येणार नाही किंवा अशा व्यक्तीला सेवेतून काढून टाकण्यात येणार नाही.*

*परंतु, या अधिनियमाच्या किंवा नियमांच्या तरतुदींनुसार अशा कोणत्याही व्यक्तीची सेवा समाप्त करण्याच्या समितीच्या अधिकारावर या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे परिणाम होणार नाही. ”*

उपरोक्त **कलम १३** व **कलम १६** मधील तरतुदीचा विचार करतां, विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने, तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने दिनांक १९ नोव्हेंबर, २०११ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ७६५(२३) अन्वये, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस दिनांक ०८ डिसेंबर, २०११ रोजी, कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत माहे डिसेंबर, २००० पूर्वी व त्यानंतर माहे जानेवारी,२००१ ते माहे डिसेंबर,२००५ पर्यन्त कार्यरत असणारे एकूण ९१६ कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचा-यांना संस्थान सेवेत सामावून घेणेबाबतचा प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. सदर प्रस्तावास मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे शासन निर्णयान्वये, सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी पध्दतीने कामावर असलेल्या व सध्या कार्यरत

असलेल्या ६३५ कर्मचा-यांना किमान वेतन कायद्यानुसार अनुज्ञेय होणारे वेतनावर तसेच दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर केलेल्या आकृतीबंधातील कंत्राटी पदांवर नियुक्ती देणेस मान्यता दिली.

मा. शासनाने दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजी दिलेल्या मान्यतेनुसार, उपरोक्त **परिच्छेद ब** मध्ये सविस्तर विवेचन केलेनुसार, सन २००१ ते सन २००४ (दिनांक २२ ऑगष्ट, २००४) अखेर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कुशल / अकुशल म्हणून कार्यरत असलेल्या एकूण ६३५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी ६०१ कंत्राटी कर्मचा-यांना नियुक्ती आदेश पारित करणेत आलेले आहेत, त्यापैकी सेवेत रुजू होणेस इच्छुक असलेल्या ५९८ कर्मचा-यांना कंत्राटी कर्मचारी म्हणून ११ महिन्याचे कालावधीसाठी विहित अटी-शर्तीनुसार संस्थान सेवेत सामावून घेणेत आलेले आहे.

**प्रस्ताव -**

**(ड-१)** उपरोक्त **परिच्छेद अ** ते **परिच्छेद क मध्ये** नमूद केलेला वस्तुस्थितीदर्शक सविस्तर अहवाल मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेपुढे विचारार्थ / निर्णयार्थ सादर करणेत आलेला होता.

मा. तदर्थ समितीने दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेतील विषय क्रमांक ०१, ०२, ४३ व ६३ चे अनुषंगाने **एकत्रित निर्णय क्रमांक २३५** पारित केलेला आहे.

या एकत्रित निर्णयातील बाब क्रमांक ०१ ते ३३ मध्ये विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने मा. तदर्थ समितीचे निष्कर्ष नोंदविणेत आलेले आहेत. तसेच या एकत्रित निर्णयातील बाब क्रमांक ३४ ते ३९ मध्ये संस्थान आस्थापनेवरील विविध प्रकारे कार्यरत असणारे कर्मचा-यांचे माहे एप्रिल, २०२० चे वेतनाबाबत निष्कर्ष-वजा-निर्णय नमूद करणेत आलेले आहेत.

या एकत्रित **निर्णय क्रमांक २३५** मधील **बाब क्रमांक ३८ आणि ४०** मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे

*“ .. .. **38.** So far as 598 employees to whom appointment order was issued by the then Chief Executive Officer is concerned, the concerned department of the Trust has not come up with a clear picture before this Committee. The fate of the Agreement, which the Trust had with the Contractors, is in limbo. The concerned department nowwant that this Committee to take up decision on Subject No. 43 listed on the Agenda of today’s meeting. Unless comprehensive decision is taken as to regularization / appointment of 598 employees on contract basis directly by the Trust or otherwise, as well as decision on the agreement, which Trust had with the Contractors, such request in subject No. 43 cannot be considered. **The Trust is at liberty to submit detailed proposal in this regard before this Committee along with entire correspondence with the State Government and decisions taken by erstwhile committee.** (This be taken as Decision C for Clarity)*

***39.*** *.. ..*

*__40.__ The decision taken herein shall be subject to the decision / directions by the Hon’ble High Court on Civil Application that will be filed by the Trust in this regard in PIL No. 120 of 2019.”*

**(ड-२)** उपरोक्त **परिच्छेद ड-१** मध्ये नमूद केलेल्या मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेतील एकत्रित निर्णय क्रमांक २३५ (३८) मधील बाबींस अनुसरुनविवेचन असे की,

**परिच्छेद अ** ते **परिच्छेद क** मध्ये नमुद विषयाची पूर्वपीठीका व करणेत आलेल्या कार्यवाहीची सद्यःस्थिती विचार घेतां, संस्थान आस्थापनेवर कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत / ठेकेदारामार्फत कार्यरत असणारे ६३५ कंत्राटी कर्मचा-यांपैकी ५९८ कंत्राटी कर्मचा-यांना तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार आणि मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून ११ महिन्याचे कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात नियुक्ती आदेश देणेत आलेले आहेत. या नियुक्ती आदेशात, सदर कर्मचा-यांचा ***संस्थानच्या नोकरीत दर्जा (Status)हा कंत्राटी कर्मचारी***म्हणून राहिलआणि त्यांना किमान वेतन कायद्यानुसार प्रति दिन / प्रति दिवस गणना करुन येणारे किमान वेतन आदा करणेत येईल, असे स्पष्ट नमूद करणेत आलेले आहे.

यापूर्वी मा. तदर्थ समितीचे सभेपुढे, मा. शासनाकडील दिनांक १७ सप्टेंबर, २०१९ रोजीचे शासन निर्णयानुसार, सन २००१ ते २००४ या कालावधीत कंत्राटी कर्मचारी कंत्राटदारामार्फत कार्यरत असणारे कंत्राटी

कर्मचा-यांना संस्थान आस्थापनेवर कुशल / अकुशल कंत्राटी कर्मचारी म्हणून सामावून घेणेत आलेल्या कार्यवाहीबाबतचा अहवाल सादर करणेत आलेला होता.

या अहवालावर मा. तदर्थ समितीचे दिनांक ११ मे, २०२० रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन, विषय क्रमांक ०१, ०२, ४३ व ६३ चे अनुषंगाने घेणेत आलेल्या एकत्रित निर्णय क्रमांक २३५ मधील बाब क्रमांक ३८ नुसार, उपरोक्त प्रस्ताव पुन्हा सविस्तररित्या मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करणेचे निर्देश असल्यामुळे, उपरोक्त **परिच्छेद अ** ते **परिच्छेद क** मध्ये नमुद केलेल्या कार्यवाहीस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे विचारार्थ/निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३०९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, याबाबत संस्थान सविस्तर प्रस्ताव सादर करील असे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सांगीतले करीता सदरचा विषय तहकुब ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.०५** **प्रशासकीय अधिकारी पदावर पदोन्नतीने नेमणूक मिळणेकामी कर्मचाऱ्यांचे आलेल्या अर्जावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** **अ) विषयाची पुर्वपिठीका -**

**अ-१)** मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.०७/०८/२००९ रोजीचे आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास काही अटी शर्तीसह मान्यता दिलेली असुन त्यात खालीलप्रमाणे अटी-शर्ती नमुद करण्यात आलेल्या आहेत -

**अट-शर्त** क्र.१ - समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर

नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

क्र.२ - सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्य ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

क्र.३ - सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

क्र.४- सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.

क्र.५- आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृत्तीवेतन लागू असणार नाही.

क्र.६- समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.

क्र.७ – समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.

क्र.८- समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरून व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

क्र.९- आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतुद ठेवावी.

क्र.१०- तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

क्र.११- आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.

**अ-२)** तसेच, मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.२८/१०/२०१३ रोजीचे निर्णय व जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४४६०/२०१४, दि.२७/१२/२०१४ रोजीचा आदेशान्वये, संस्थान अधिनियम २००४ मधील तरतुदीस अनुसरून दि.०१/०१/२०१५ पासून शासनाने मान्यता दिलेले विनियम संस्थानला लागू करण्यात आलेले आहे. लागू केलेल्या सर्व साधारण सेवा अटी विनियम, २०१३ मधील प्रकरण ४ - नियुक्त्या, परिवीक्षा, सेवा समाप्ती आणि नियत वयमान मधील **कलम १२ सेवाप्रवेश** मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

**सेवाप्रवेश-**

(१) समिती आदेशाव्दारा विविध गटातील आणि प्रवर्गातील सेवा प्रवेशाचे धोरण आणि पध्दत घालुन देईल आणि उमेदवाराने भरावयाचा अर्ज नमुना किंवा नमुने आणि अशा अर्जांना जोडावयाची प्रमाणपत्रे आणि प्रमाणलेख विहित करेल.

(२) संस्थानाचे नियुक्ती प्राधिकारी संस्थानाच्या सेवेत सेवाप्रवेश आयोजित करताना वेळोवेळी महाराष्ट्र शासनाने अनुसूचीत जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, अपंग व्यक्ती, माजी सैनिक, या प्रवर्गातील उमेदवारांच्या किंवा शासनाने विहित केलेल्या इतर प्रवर्गातील उमेदवारांच्या शासकीय सेवा प्रवर्गाशी निगडीत वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांचे पालन करतील.

तसेच, प्रकरण ४ - नियुक्त्या, परिवीक्षा, सेवा समाप्ती आणि नियत वयमान मधील **कलम २४ पदोन्नती** मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

**पदोन्नती-**

(१) शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार भरण्यासाठी उपलब्ध असलेल्या पदांची संख्या लक्षात घेऊन समिती संस्थानातील पदे पदोन्नतीने किंवा थेट सेवा प्रवेशाने किंवा पुर्णपणे किंवा अशतःदोन्ही पध्दतीने भरण्याचा हक्क राखुन ठेवीत आहे.

(२) सर्वसाधारणपणे "गुणवत्ता आणि सेवाजेष्ठता " हे तत्व पदोन्नतीसाठी लागू करण्यात येते आणि संस्थानाचा कोणताही कर्मचारी जेष्ठतेच्या आधारे पदोन्नतीचा दावा करू शकत नाही.

(३) या संबंधीच्या समितीच्या सर्वसाधारण निकषानुसार कार्यकारी अधिकारी विविध पदावरील पदोन्नतीसाठी निकष निश्चित करू शकतात.

(४) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, आणि इतर मागासवर्गीय आणि शासनाने वेळोवेळी निश्चीत केलेले यासारखे इतर प्रवर्ग यामध्ये समाविष्ट असलेल्या संस्थानाच्या कर्मचा-यांना पदोन्नती देताना संस्थानाच्या अशा कर्मचा-यांनी पदोन्नतीसाठी इतर अटी पुर्ण करण्याच्या अधीन राहुन राज्य शासनाच्या अशा प्रवर्गातील कर्मचा-यांना वेळोवेळी लागू असलेले महाराष्ट्र शासनाचे संबंधीत नियम, विनियम आणि आदेश विचारात घेतले जातील.

**अ-३)** तसेच, दि.२८ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवरील विविध संवर्ग, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नती इत्यादीबाबत छाननी करून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या नियुक्ती व पदोन्नतीच्या विनियमाचे प्रारूप पदांचा तपशिलांच्या परिशिष्टासह शासनास तातडीने सादर करण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

संस्थानने विभागनिहाय व पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करुन त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १२/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४९३ अन्वये मान्यता घेऊन, सदर सेवाप्रवेश नियम (Recruitment Rules) परिशिष्ठासह जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७०/२०१४, दि.२६/०६/२०१४ रोजीचे प्रस्तावाअन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते.

तथापी, जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७०/२०१४, दि.२६/०६/२०१४ रोजीचे प्रस्तावावर मा.विधी व न्याय विभाग यांनी पत्र क्र.सासंवि २०१५/५१९/प्र.क्र.३२/का.१६, दि.३० जुन, २०१५ अन्वये, लेखी पत्र पाठविले असुन सदर पत्रान्वये शासनाने संस्थान सेवाप्रवेश नियमांना पुर्वप्रसिध्दी देणे आवश्यक असुन सादर करणेत आलेले सेवा प्रवेश नियम पुर्व प्रसिध्द करुन, हरकती मागविणेत येऊन योग्य त्या सुधारणा करुन पुन्हा सादर करणेत यावेत, असे कळविले आहे.

उपरोक्त अटी-शर्तीस अनुसरून प्रारूप सेवाप्रवेश नियम मा.व्यवस्थापन समिती दि.२७/०७/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२३ नुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२०२५/२०१५, दि.२७/०८/२०१५ चे परिपत्रकान्वये पूर्व प्रसिध्द करुन हरकती मागविण्यात आलेल्या होत्या. याकामी प्राप्त झालेल्या काही हरकतींवर मा.वरिष्ठ अधिकारी यांचे समक्ष सुनावणी घेऊन त्या फेटाळण्यात आल्या किंवा अंशतः मंजुर करणेत आल्या. सदरचा प्रस्ताव सन २०१४ पासुन प्रलंबित आहे.

**अ-४)** प्रलंबित सेवाप्रवेश नियम तसेच इतर आस्थापनाविषयक कामे करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६ फेब्रुवारी, २०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६५ अन्वये श्री त्र्यंबक अंबादास खैरे, ॲड.डॉ.मधुकर दगडु गिरी, श्री बाळासाहेब बापुराव भंडारकवठे व श्री अशोक विठ्ठलराव शिंदे, सेवानिवृत्त शासन अधिकारी यांचे कार्यगटाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. आस्थापनाविषयक नियुक्त कार्यगटाने कामकाज सुरू केलेले असुन

सदरचे कामकाज पुर्ण झालेनंतर शासनाचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येईल. सुधारित आकृतीबंधाचे कामकाज पुर्ण झालेनंतर सेवाप्रवेश नियम तयार झालेनंतर पदोन्नती
साखळी, एकल पदे, बिंदूनामावली, सरळसेवा व पदोन्नतीचे प्रमाण इ. बाबी निश्चित होतील व त्यानंतरच विहित पध्दतीने पदोन्नतीचे नियमानुसार कार्यवाही करावी लागणार आहे.

**अ-५)** मा. शासनाचे मान्यतेसाठी दि.२६ जुन, २०१४ रोजी सादर करणेत आलेल्या **प्रारूप सेवाप्रवेश नियमांमध्ये** सर्व साधारणपणे "प्रशासकीय अधिकारी" पदासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता व पात्रता नमुद/प्रस्तावित करणेत आलेली होती.

**विभाग - सामान्य प्रशासन विभाग**

| **Designation पदनाम** | **Pay scale वेतनश्रेणी** | **Total Post एकुण पदसंख्या** | **Qualification पात्रता** | |
|---|---|---|---|---|
| | | | **By Nomination** | **By Promotion** |
| Administrative Officer प्रशासकीय अधिकारी | (६ व्या वेतनआयोगानुसार) 15600-39100 Grade Pay 5400<br>(७ व्या वेतनआयोगानुसार) S-20 (56100-177500) | 05 (दि.7/8/2009 चे मंजूर आकृतीबंधानुसार) | On Deputation from Government of Maharashtra | 1) Graduate from any Government recognized University;<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course;<br>3) Experience minimum 5 years in Superintendent OR Law Officer OR Labour Officer OR Accounts Officer in Sansthan. |

मा. शासनाचे मान्यतेसाठी सादर करणेत आलेल्या **प्रारूप सेवाप्रवेश नियमांमध्ये** सरळसेवा व पदोन्नतीने पदे भरण्याचे प्रमाण ५०:५० असे प्रस्तावित करणेत आलेले होते. परंतु, अद्याप सेवाप्रवेश नियमांना शासनाची मान्यता मिळालेली नाही.

**अ-६) यापुर्वी,** संस्थान आस्थापनेवरील प्रशासकीय अधिकारी या रिक्त पदांचे भरतीबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०७/२०१२ रोजीच्या सभेमध्ये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.
"संस्थानचा दिवसेंदिवस वाढता व्याप व नवीन संगणकीय माहिती तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी विचारात घेता सध्या रिक्त असणा-या प्रशासकीय अधिकारी या पदांच्या ५०% पदांवर शासनाकडुन महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत निवड करण्यात आलेल्या तहसिलदार संवर्गातील व अन्य संवर्गातील अधिका-यांना प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे व उर्वरित ५०% पदे संस्थान सेवेतील कर्मचा-यांमधुन पदोन्नतीने घेणेत यावे आणि एक प्रशासकीय अधिकारी पद तांत्रिक दृष्टया संस्थानचे कामाचे स्वरूप पहाता संस्थानने ठरविलेल्या आवश्यक शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव असलेल्या संवर्गातील घेणेबाबत प्रस्ताव सादर करावा. "

**अ-७)** मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक १५ मार्च, २०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २११ नुसार " महाराष्ट्र शासनाकडून दि.०७/०८/२००९ रोजी मंजूर होऊन आलेल्या संस्थानच्या कर्मचारी आकृतीबंधानुसार ०५ प्रशासकीय अधिका-यांची पदे मंजुर असून, त्यापैकी ०१ पद भरलेले असून इतर ०४ पदे रिक्त आहेत. यामधील ०२ पदांवर शासनाकडून योग्य व लायक अधिकारी प्रतिनियुक्तीने प्रशासकीय अधिकारी या पदावर घेणेबाबत पत्रव्यवहार चालू आहे. त्यामुळे ०२ पदांवर सेवाजेष्ठता व शैक्षणिक पात्रतेनुसार श्री. सुर्यभान विठ्ठलराव गमे व श्री सुभाष नारायण गर्कल यांना प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यात यावी. तसेच उर्वरित ०२ पदांवार श्री. उत्तम पंढरीनाथ गोंदकर व श्री. दिलीप त्र्यंबक उगले यांना शासनाकडून योग्य व लायक अधिकारी प्रतिनियुक्तीने उपलब्ध होईपर्यंत (अॅड व्हॉक नेमणूक) या अटीवर प्रशासकीय अधिकारी या पदावर सेवाजेष्ठता व शैक्षणिक पात्रतेनुसार पदोन्नतीने नेमणूक देण्यात यावी. त्याच बरोबर त्यांना सदर पदाचे लागु असलेले वेतन बॅण्ड, ग्रेड पे व अनुज्ञेय असणारे भत्ते देण्यात यावे, असे ठरले."

त्यानुसार, जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४२१६/२०१४, दि.२० मार्च, २०१४ नुसार श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, यांना व जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४२१७/२०१४, दि.२० मार्च, २०१४ नुसार श्री सुभाष

नारायण गर्कल यांना प्रशासकीय अधिकारी या पदावर कार्यात्मक पदोन्नती देण्यात आलेली होती. तसेच जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/आस्था/४२१८/२०१४, दि.२० मार्च, २०१४ नुसार श्री उत्तम पंढरीनाथ गोंदकर यांना व जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४२१९/२०१४, दि.२० मार्च, २०१४ नुसार श्री दिलीप त्र्यंबकराव उगले यांना प्रशासकीय अधिकारी या पदावर तात्कालिक आधारावर (on Ad-hoc Basis promotion) पदोन्नतीने नेमणूक देण्यात आलेली होती.

तसेच तात्कालीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशान्वये (जा.नं.एसएसटीएस/वशी/वशी-१/९३८/२०१५, दिनांक ३० मे, २०१५ रोजीचे) श्री अशोक रभाजी औटी, यांचेकडे प्र. प्रशासकीय अधिकारी या पदाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. त्यापैकी श्री सुभाष नारायण गर्कल, प्रशासकीय अधिकारी हे दिनांक ३० जुन, २०१५ रोजी व श्री उत्तम पंढरीनाथ गोंदकर, प्र. प्रशासकीय अधिकारी हे दिनांक ३१ मे, २०१८ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत.

**अ-८) आता,** श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी हे दिनांक ३१ मे, २०२० रोजी व श्री अशोक रंभाजी औटी, प्र. प्रशासकीय अधिकारी हे दिनांक ३० जुन, २०२० रोजी सेवानिवृत्त होत आहे. त्यानुसार श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी व श्री अशोक रभाजी औटी, प्र. प्रशासकीय अधिकारी हे सेवानिवृत्त झालेनंतर संस्थान आस्थापनेवर श्री दिलीप त्र्यंबकराव उगले, प्र. प्रशासकीय अधिकारी व डॉ आकाश किसवे, प्रशासकीय अधिकारी (प्रतिनियुक्ती) असे एकूण दोनच प्रशासकीय अधिकारी कार्यरत राहतील. संस्थान आस्थापनेवरील ०५ प्रशासकीय अधिकारी पदांपैकी ०३ प्रशासकीय अधिकारी पदे रिक्त राहणार आहेत.

तसेच, संस्थानकडे प्रतिनियुक्तीवर असलेले अधिकारी श्री रविंद्र सतिष घुले, कार्यकारी अभियंता यांची बदली महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग आदेश क्रमांकःपीओजी-टीएफएस-१११८/ प्र.क्र.२२५/ सेवा-१, दि.१७ डिसेंबर, २०१८ ने सार्वजनिक बांधकाम (अदिवासी) विभाग, कळवण येथे झालेने कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग या रिक्त पदावर जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/२८१३/२०१८, दि.१९ डिसेंबर, २०१८ रोजीचे आदेशान्वये, प्रशासकीय कामकाजाचे सोईसाठी पुढील आदेश होईपावेतो कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग या पदाचा अतिरिक्त कार्यभार तसेच

कार्यकारी अभियंता यांचेकडे पर्यवेक्षणासाठी देण्यात आलेले बांधकाम विभाग, विद्युत विभाग, पाणी पुरवठा विभाग व मेकॅनिकल विभागाचे तुर्त कामकाज श्री रघुनाथ भागा आहेर, उपकार्यकारी अभियंता यांचेकडे सोपविणेत आलेले आहे. सध्या श्री आहेर हे प्र. कार्यकारी अभियंता या पदाचा अतिरिक्त कार्यभार पहात आहेत.

**ब)** मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांची प्रशासकीय अधिकारी या पदावर नियुक्ती करणेबाबतचा स्वतंत्र प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर करणेत आलेला आहे.

**क) तसेच,** प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेबाबत खालील कायम कर्मचारी यांनी अर्ज केलेले आहेत.

| **अ.क्र.** | **कर्मचा-याचे नांव** | **मुळ पदनाम** | **सध्याचे पदनाम, विभागाचे नांव** | **अर्ज आवक नं./ दिनांक** |
|---|---|---|---|---|
| १ | श्री रघुनाथ भागा आहेर | उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग | प्र.कार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग | ५७२३/२६.६.२०१५ |
| २ | श्री विजय गणपतराव रोहमारे | विद्युत अभियंता | उपकार्यकारी अभियंता (विद्युत) | १०३२८/१.५.२०२० |
| ३ | श्री साहेबराव पांडुरंग लंके | वित्त व्यवस्थापक | प्र.लेखाधिकारी, लेखाशाखा | ३९३/८.५.२०२० |
| ४ | श्री कैलास सोनाजी खराडे | वरिष्ठ लेखापाल | प्र.लेखाधिकारी, लेखाशाखा | २७३/२७.४.२०२० |
| ५ | श्री रविंद्र बाळासाहेब नवले | एच.आर.मॅनेजर | एच.आर.मॅनेजर, रूग्णालये | ६०१/१९.५.२०२० |
| ६ | श्री अनिल बाळकृष्ण भणगे | कृषी अधिकारी | कृषी अधिकारी, बगीचा विभाग | ७५६/२६.५.२०२० |
| ७ | श्री राजेंद्र सोपानराव जगताप | विद्युत पर्यवेक्षक | प्र.विभाग प्रमुख, पाणीपुरवठा विभाग | ७६६/२७.५.२०२० |
| ८ | श्री विनोद गोवर्धन कोते | ज्युनिअर ईडीपी मॅनेजर | ज्युनि.ईडीपी मॅनेजर, श्री साईबाबा हॉस्पीटल | ८५३/३०.५.२०२० |
| ९ | श्री राजतिलक दत्तात्रय बागवे | वरिष्ठ लिपीक | प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग व | ६६३/२१.५.२०२० |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | अतिरिक्त कार्यभार प्र.अधिक्षक, शताब्दी कक्ष | |
| १० | श्री प्रमोद पंढरीनाथ पुरकर | वरिष्ठ लिपीक | प्र.वरिष्ठ लेखापाल, लेखाशाखा | ६१८/२०.५.२०२० |
| ११ | श्री प्रकाश दादा क्षीरसागर | वरिष्ठ लिपीक | प्र.अधिक्षक, वाहन विभाग | ६५२/२२.५.२०२० |
| १२ | श्री नवनाथ भाऊसाहेब कोते | वरिष्ठ लिपीक | प्र.अधिक्षक, सभाकामकाज विभाग | ८५४/३०.५.२०२० |
| १३ | श्री अविनाश विनायक कुलकर्णी | वरिष्ठ लिपीक | प्र.अधिक्षक, खरेदी विभाग व अतिरिक्त कार्यभार प्र.अधिक्षक, भांडार विभाग. | ४८६/१४.५.२०२० |

प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी केलेल्या कर्मचा-यांची तपशिलवार माहिती **परिशिष्ठ अ** (सर्वसाधारण सेवेची माहिती), **परिशिष्ठ ब** (गोपनीय अहवाल), **परिशिष्ठ क** (गैरशिस्तवर्तन/शिक्षा इ. बाबतचा तपशिल) व **परिशिष्ठ ड** (संवर्गनिहाय सेवाजेष्ठता यादी) म्हणुन सोबत जोडलेली आहे. त्यांचे अवलोकन होणेस विनंती.

**ड) तसेच** परिच्छेद (अ-४) नुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे सेवाप्रवेश नियम, सुधारीत विभागनिहाय आकृतीबंध, पदोन्नतीचे पदे, पदोन्नती साखळी, बिंदुनामावली याबाबतचे कामे प्रलंबित असल्याने, मा.शासनाकडुन अद्याप मंजुरी न मिळाल्याने व मंजुर नियमातील प्रमोशन/सरळ सेवा प्रमाण (Ratio) निश्चित न झालेने आरक्षणाबाबत संस्थानमध्ये सुस्पष्ठ नियमावली नाही. त्यामुळे पदोन्नती कशी द्यावी याबाबत संभ्रम निर्माण झालेला आहे. उपरोक्त आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम अंतिम करणेकामी श्री त्र्यंबक अंबादास खैरे, ॲड.डॉ.मधुकर दगडु गिरी, श्री बाळासाहेब बापुराव भंडारकवठे व श्री अशोक विठ्ठलराव शिंदे, सेवानिवृत्त शासन अधिकारी यांचे कार्यगटाची समिती नियुक्त करण्यात आलेली आहे. नियुक्त केलेल्या समितीचे सुधारित आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम इ. आस्थापना विषयक कामकाज सुरू आहे.

संस्थानचे दैनदिन कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने कार्यरत अधिकारी यांच्यापैकी सक्षम अधिकारी यांना अतिरिक्त प्रभार (पदोन्नती नव्हे) देऊन किंवा Ad-hoc पध्दतीने पदोन्नती देणेबाबतचा प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३१०** **यावर सविस्तर चर्चा झाली, समितीस अवगत करण्यात आले की, संस्थान आस्थापनेवर अधिकारी/कर्मचारी नेमणूका करणेबाबत सेवाप्रवेश नियम व इतर अनुषंगीक आस्थापनाविषयक बाबी प्रलंबीत आहेत. तसेच सुधारीत आकृतीबंध तयार करण्याचे काम सुरु आहे. अशा परिस्थीतीत पदोन्नतीची साखळी व पदोन्नतीसाठी निम्नपद (Feeder cadre) सेवाजेष्ठता यादी व पात्र कर्मचाऱ्यांची माहिती तसेच याबाबत आजचे सभेमधील विषय क्र.९ मधील संस्थानचे सुधारीत आकृतीबंध व इतर आस्थापनाविषयक कामकाजासाठी नेमण्यात आलेल्या समितीने काय Propose केले आहे. याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.०६** **आय.टी.आय.विभागाकरीता निदेशक यांना मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ, औरंगाबाद व मा.उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार सातव्या वेतनआयोगाची फरकाची रक्कम आदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** **विषयाची पुर्वपीठीका:- अ)** श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था शिर्डी (आय टी आय) कडील श्री. रा. ज्ञ. चौधरी, गटनिदेशक व श्री.दा.नि.जांभुळकर, गटनिदेशक यांनी दि.०३/१०/२०१६, दि.०९/०५/२०१७ व दि.२६/०७/२०१८ रोजीचे अर्जान्वये दि.२६ ऑगस्ट, २०१३ व दि.१७ जुलै, २०१८ चे शासन निर्णयानुसार आम्हाला गटनिदेशक पदासाठीचे ग्रेड वेतन ४६०० ऐवजी ४८०० असे सन २००६ पासुन मंजूर केलेले आहे. तरी, वरील शासन निर्णयानुसार बदल केलेले ग्रेडवेतन रु. ४८०० सन २००८ ला आम्हाला १२ वर्ष पूर्ण झाले असून आश्वसित प्रगती योजनेचा पहीला लाभ मिळालेला आहे. तेव्हा पासुन वाढीव ग्रेड वेतन व एकल पदाचा लाभ मिळणेस विंनती केलेली होती.

मा. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन निर्णय क्र. वेपुर-१२१२/ प्र.क्र.३१/सेवा-९ दि. ११/०२/२०१३

रोजीचे वेतन त्रुटी निवारण समितीचे शिफारशींची अमलबजावणी बाबतचा आदेश, मा. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन पूरकपत्र क्रमांक वेपुर-१२१२/प्र.क्र.३१/ सेवा-९, दि. २६ ऑगस्ट, २०१३ व मा. वित्त विभाग, महाराष्ट्र शासन शुध्दीपत्रक क्रमांक वेपुर-१२१२/ प्र.क्र.३१/सेवा-९ दि. १७ जुलै, २०१८ रोजीचे शुध्दीपत्रकानुसार तसेच दि. १७/०६/२०१३ रोजीचे आयटीआय विभागाकडील आदेशानुसार श्री. रा. ज्ञ. चौधरी, गटनिदेशक व श्री. दा. नि. जांभुळकर, गटनिदेशक यांना अनुक्रमे दि.१९/०९/२००८ व दि. २४/०९/२००८ पासून ९३००-३४८०० ग्रेड वेतन ४८०० ही वरिष्ठ वेतनश्रेणी व निवड श्रेणी मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसार करुन त्यानुसार देय्य रक्कम आदा करणेस / अतिप्रदान झालेली रक्कम समान ३० हप्त्यांमध्ये संबंधितांचे मासिक वेतनातुन वसुल करण्यात यावी, असा जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३०६०/ २०१८ दि. १०/०१/२०१९ अन्वये आदेश पारित झालेला आहे.

**ब)** सामान्य प्रशासन विभागाचे दिनांक १८/०८/२०१८ रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसार श्री. चौधरी व श्री. जांभुळकर गटनिदेशक यांना वरिष्ठ वेतनश्रेणी मंजूर करण्यास हरकत नसावी. मात्र सर्वच शिक्षकिय पदांना सुधारीत आश्वासित प्रगती योजना लागू नाही. तर त्यांनी वरिष्ठ वेतनश्रेणी / निवडश्रेणी प्रकरण व पद परत्वे लागु आहे. यापुर्वी श्री. चौधरी व श्री. जांभुळकर यांचेप्रमाणे इतरही शिक्षकांना सुधारीत आश्वसित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय केला असल्यास त्याबाबतचा आढावा घेणेबाबत निर्देशीत करण्यात आलेले आहे.

त्यास अनुसरुन त्याबाबतचा आढावा घेतला असता, आयटीआय विभागाकडील प्राचार्य, गटनिदेशक व निदेशक यांना कालबध्द पदोन्नती, आश्वासित प्रगती योजना व सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देण्यात आलेले आहेत. तसेच सदरचे लाभ देतांना त्यांची वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (१) ए नुसार करण्यात आलेली आहे. परंतू ती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसार करणे आवश्यक होते.

त्यामुळे आयटीआय विभागाकडील प्राचार्य व निदेशक यांना ज्या दिनांकापासून कालबध्द पदोन्नती, आश्वासित प्रगती योजना व सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचे लाभ देण्यात आलेले आहेत त्या दिनांकापासून आयटीआय विभागाकडे २४ निदेशक कार्यरत असलेबाबत (सेवा निवृत्त निदेशकासह) दिसत असल्यामुळे २४ निदेशकांपैकी निवड श्रेणीसाठी (२० % प्रमाणे ४.८ म्हणजेच ५ शिक्षकांना) सदर शासन निर्णयातील निदेशकांना निवड श्रेणी देऊन मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसार करुन त्यानुसार देय्य रक्कम देणेस / अतिप्रदान झालेली रक्कम वसुल करणेबाबत जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३०६०/२०१८ दि. १०/०१/२०१९ अन्वये आदेशीत करण्यात आलेले होते.

सदरचे आदेशाचे विरुध्द ०२ गटनिदेशक व २४ निदेशक यांचेपैकी आय. टी. आय. विभागाकडील एकूण १९ निदेशाकांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन याचिका क्र. ४३६६ ते ४३८३ व ५०१४ अन्वये मा. मुख्य कार्यकारी अधिकारी , श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी व प्राचार्य, श्री साईबाबा संस्थान औद्योगिक प्रशिक्षण संस्था यांना प्रतिवादी करुन त्यांचे विरुध्द याचिका दाखल केलेल्या होत्या. सदर याचिकेचा दिनांक १६/०८/२०१९ रोजी सुनावणी होउन निकाल दिलेला आहे. (उपरोक्त संदर्भ क्र. १६ नुसार सादर निकाल सोबत अवलोकनार्थ सादर केलेला आहे.) सदरचे निकालानंतर संबंधित निदेशक यांनी दिनांक १६/०८/२०१९ रोजी दिलेल्या निकालानुसार जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ३०६०/ २०१८ दि.१०/०१/२०१९ रोजीचा आदेश रद्दबातल केलेला आहे. त्यामुळे फेब्रुवारी, २०१९ पासून काढून घेतलेली वेतनवाढ पुर्वलक्षीप्रभावाने व त्यासंबंधित इतर अनुषंगिक लाभ मिळणेबाबतचे एकूण १९ निदेशक यांचेअर्ज प्राचार्य, श्री साईबाबा औद्योगिक प्रशिक्षण संस्था, शिर्डी यांनी एकत्रितरित्या आवक क्र. ८६२४ दि.२८/०८/२०१९ अन्वये इकडील कार्यालयास सदर केलेले होते.

त्यामुळे मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन याचिका क्र. ४३६६ ते ४३८३ व ५०१४ चे निकालाचा अन्वयार्थ व त्यासंबंधीत विश्लेषणावर सविस्तर अभिप्राय मिळणेबाबत जा.न.एसएसएस/ साप्रशा-वशी-१/ २१८९/ २०१९ दि. ०६/०९/२०१९ अन्वये ॲड. नितिन आर. भवर, ॲडव्होकेट औरंगाबाद हायकोर्ट, यांना विनंती करण्यात आलेली होती.

त्यानुसार मा. ॲड. नितिन आर. भवर, ॲडव्होकेट औरंगाबाद हायकोर्ट, यांनी दिनांक २१/०९/२०१९ रोजी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे-

“As you know, the Hon’ble High Court of Judicature at Bombay Bench at

Aurangabad vide common judgement & order dated 16.08/2019 passed in Writ Petition No. 4366/2019 to Writ Petition No. 4283/2019 has quashed & set aside the orders dated 10.01.2019 issued by Shri Saibaba Sansthan Trust directing recovery of excess amount of salary allowances paid to the petitioners therein. Consequently, the orders dated 10.01.2019 issued by Shri Saibaba Sansthan Trust in respect of recovery cannot be effected & implemented and the recovery of excess amount of salary cannot be made. Therfore, in our opinion, the petitioners in Writ Petition No. 4366/2019 to Writ Petition No. 4283/ 2019 shall be paid monthly regular salary from the date of revision of pay fixation & benefit of ACPs."

उपरोक्त अभिप्रायाबाबत दिनांक १९/०९/२०१९ रोजी मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात मा.ॲड.भवर यांनी चर्चा करतांना मा.उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसार करुन आलेल्या वेतननिश्चितीबाबत मा.न्यायालायाचा आक्षेप नसुन त्यांना अतिरिक्त देण्यात आलेले वेतन वसुल न करणेबाबत न्यायालयाने आदेशित केलेले आहे, असे सांगितले आहे.

त्यानुसार मा.उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसार करुन आलेल्या वेतननिश्चितीनुसार दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून देण्यात येऊन त्यानुसार देय्य रक्कम त्यांना आदा करावी लागणार आहे.

संस्थान कायम कर्मचारी यांची दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासून पूर्वलक्षी प्रभावाने वेतन निश्चिती करुन (सेवा निलंबीत / ज्यांचे बाबत काही त्रुटी / अडचणी / कार्यवाही प्रलंबित / चालू आहे/ न्यायप्रविष्ट, अशा कर्मचा-यांचे व्यतिरिक्त) माहे जुलै, २०१९ पासुन सातवा वेतन आयोग लागू करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक ०१/०१/२०१६ ते दिनांक ३०/०६/२०१९ या कालावधीतील फरकाची रक्कमही आदा करण्यात आलेली आहे. तथापि मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे दिनांक १६/०८/२०१९ रोजीचे निर्णयाबाबत मा. ॲड. नितिन आर. भवर, ॲडव्होकेट औरंगाबाद हायकोर्ट यांचे अभिप्राय प्राप्त झालेनंतर स्वतंत्र अलाहिदा प्रशासकीय टिपणी सादर करुन फरक आदा करणेबाबत दिनांक १६/०९/२०१९ रोजीचे टिपणीनुसार मान्यता घेण्यात आलेली आहे.

त्यानुसार ॲड. नितिन आर. भवर, ॲडव्होकेट औरंगाबाद हायकोर्ट यांचे अभिप्रायानुसार मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसार करुन आलेल्या फेरवेतन निश्चितीनुसारचे वेतनानुसार सातव्या वेतन आयोगानुसार दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासूनची देय्य रक्कम (सहाव्या वेतन आयोगानुसार दिलेल्या रक्कमेत कुठलाही बदल न करता), आय. टी. आय. विभागाकडील १९ निदेशक यांना आदा करावी लागणार आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे आदेशानुसार तसेच ॲड. नितिन आर. भवर, ॲडव्होकेट औरंगाबाद हायकोर्ट यांचे अभिप्रायानुसार ज्या १९ निदेशकांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल केली होती त्यांना मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसारचे फेरवेतन निश्चितीनुसार सातव्या वेतन आयोगाचे फरकाची रक्कम दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासूनची देय्य रक्कम (सहाव्या वेतन आयोगानुसार दिलेल्या रक्कमेत कुठलाही बदल न करता) आदा करणेच्या मान्यतेसाठी दिनांक ०१ नोव्हेंबर, २०१८ नुसार टिपणी सादर केली असता, खालील प्रमाणे निर्देशित केलेले आहे.

i) वरील १९ निदेशक यांना सुधारित वेतनसंरचेनुसार कोणती वेतनश्रेणी देय्य होती ते नमूद करावे.

ii) सदर बाबीविषयी गटनिदेशक व निदेशक कोणत्याही वरीष्ट न्यायालयात सदर आदेशाविरुध्द गेले आहेत काय?

iii) सातव्या वेतन आयोगाचे फरकाची रक्कम मिळणेकामी गटनिदेशक व निदेशक यांनी कोणत्याही न्यायालयात दावा दाखल केला आहे काय?

iv) वेतनविषयक व वरील सर्व बाबींचा समावेश करुन प्रस्ताव मुख्य लेखाधिकारी यांचेमार्फत सादर करावा.

वरील चार मुद्दयांवर माहिती (परीपूर्ण) सादर करुन टिपणी फेरसादर करावी.

त्यानुसार वरील मुद्दयांबाबतची माहिती खालीलप्रमाणे-

i) वरील १९ निदेशक यांना फेरवेतन निश्चितीनुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम, २०१९ नुसार देय्य वेतन श्रेणी खालीलप्रमाणे-

| अ.क्र. | निदेशक यांचे नांव | फेर वेतन निश्चितीनुसार सहाव्या वेतन आयोगानुसारची वेतन श्रेणी | महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम २०१९ नुसार देय्य वेतन श्रेणी |
|---|---|---|---|
| ०१ | श्री. नारायण रखमाजी अव्हाड | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४८०० | एस- १७ (४७६००- १५११००) |
| ०२ | श्री. सुभाष सुकदेव चौधरी | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४८०० | एस- १७ (४७६००- १५११००) |
| ०३ | श्री. घनशाम विष्णू राणे | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| ०४ | श्री. भागवत सोपान येवले | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| ०५ | श्री. दिलीपकुमार बाळू चाळके | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| ०६ | श्री. अजय शिवाजीराव पवार | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| ०७ | श्री. प्रशांत रमसिंग परदेशी | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| ०८ | श्री. विकास भास्कर पाटील | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| ०९ | श्री. प्रकाश विठ्ठल शिवशरण | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| १० | श्री. जयवंत कृष्णाराव घाडगे | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| ११ | श्री. उत्तम काळूराम भडांगे | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| १२ | श्री. हर्षद लालचंद जैन | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| १३ | श्री. लक्ष्मण महादेव सुर्यवंशी | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| १४ | श्री. ज्ञानेश्वर खंडू चिखले | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| १५ | श्री. अनिल त्रिंबक फोपळे | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| १६ | श्री. विजय हिरशचंद्र हिरे | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| १७ | श्री. गोरक्ष हरिभाऊ शिंदे | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| १८ | श्री. महेंद्र भिका वाघ | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |
| १९ | श्री. पराग रत्नाकर जोशी | ९३००–३४८०० ग्रेड पे रु. ४४०० | एस- १५ (४१८००- १३२३००) |

ii) मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन याचिका क्र. ४३६६ ते ४३८३ व ५०१४ या याचिकेवर दिनांक १६/०८/२०१९ रोजी सुनावणी होउन खालीलप्रमाणे निकाल दिलेला आहे.

" 8. In Light of the above, the impugned order to the extent of recovery claimed from the petitioners is quashed and set aside.

9. Rule is accordingly made absolute in above terms. Writ petition is disposed of. "

तसेच या निकालाबाबत मा. ॲड. नितिन आर. भवर, ॲडव्होकेट औरंगाबाद हायकोर्ट, यांनी दिनांक २१/०९/२०१९ रोजी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे-

"As you know, the Hon'ble High Court of Judicature at Bombay Bench at Aurangabad vide common judgement & order dated 16.08/2019 passed in Writ Petition No. 4366/2019 to Writ Petition No. 4283/2019 has quashed & set aside the orders dated 10.01.2019 issued by Shri Saibaba Sansthan Trust directing recovery of excess amount of salary allowances paid to the petitioners therein. Consequently, the orders dated 10.01.2019 issued by Shri Saibaba Sansthan Trust in respect of recovery cannot be effected & implemented and the recovery of excess amount of salary cannot be made. Therfore, in our opinion, the petitioners in Writ Petition No. 4366/2019 to Writ Petition No. 4283/ 2019 shall be paid monthly regular salary from the date of revision of pay fixation & benefit of ACPs."

iii) मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे दिनांक १६/०८/२०१९ रोजीचे निकालानुसार व मा. ॲड. नितिन आर, भवर, ॲडव्होकेट औरंगाबाद हायकोर्ट, यांचे दिनांक २१/०९/२०१९ रोजीचे अभिप्रायानुसार मा. न्यायालयाचे निकालाचे अंमलबजावणी करुन त्यानुसार सातव्या वेतन आयोगाचे फरकाची

रक्कम काढणेबाबतची कार्यवाही चालू असतांना सदरचे निकालाचे अंमलबजावणीबाबत व सातव्या वेतन आयोगाचे फरकाची रक्कम मिळणेबाबत उपरोक्त नमूद निदेशक यांनी पुन्हाः मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे रिट पिटीशन याचिका क्र. ३६४७५, ३६४७६, ३६४७८, ३६४८०, ३६४८१, ३६४८३, ३६४८५, ३६४८७, ३६४८९, ३६४९१, ३६४९३, ३६४९६, ३६४९८, ३६५००, ३६५०२,३६५०४, ३६५०६, ३६५०८ व ३६५१०/ २०१९ नुसार याचिका दाखल केलेल्या आहेत.

यावर मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचा दिनांक १४/०१/२०२० रोजीचा निकाल पुढील प्रमाणे आहे.

1. The learned counsel for the petitioners submits that petitioners have given representation for grant of benefit as per 7th pay Commission.

2. Mr. Khedkar, learned counsel for the respondents submits that the respondents have already forwarded the committee appointed by this Court. The three member committee is manning the affairs of the trust.

3. In the light of that, the committee of respondent no. 1 may if it is autorised to take decision, take decision in accordance with law and as may be permissible on the proposals forwarded to it for grant of benefits as per the 7th pay commission, expeditiously and preferably within a period of six (06) months.

4. Writ petitions are accordingly disposed of. No. costs.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे याचिका कर्त्यांना 7 व्या वेतन आयोगाची फरक देणेकामी ०६ महिन्याच्या आंत देण्याबाबत आदेशित केले आहे.

दिनांक १०/०१/२०२० रोजीच्या टिपणीवर मुख्य लेखाधिकारी यांनी पुढील प्रमाणे शेरा दिलेला आहे.

“दिनांक–०१/०१/२०१६ पासून वेतन आयोगाचा फरक अदा करतांना टिपणीतील प्रस्तावीत प्रमाणे ६ व्या वेतन आयोगाप्रमाणे देय रक्कम घेतल्यास अप्रत्यक्षपणे recovery होणार आहे. त्यामुळे मा.उच्च न्यायालयाचा आदेशाचा भंग होणार आहे किंवा कसे? याबाबत ॲड. भवर यांचे स्पष्ट अभिप्राय घ्यावेत असे मत आहे. ”

मुख्यलेखाधिकारी यांचे निर्देशानुसार जा.नं.एसएसएस/साप्रशा/आस्था/४४६०/२०२० दिनांक ०८ फेब्रुवारी, २०२० नुसार ॲड. नितीन आर. भवर यांना लेखी पत्र देऊन त्यांचा अभिप्राय मागविण्यात आला होता. दिनांक – १३ फेब्रुवारी, २०२० रोजीच्या ॲड. नितीन आर. भवर यांनी पुढीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

“With reference to the subject cited above, I have to state that, I have gone through the Writ Petition No.4366/2019 to Writ petition No. 4283/2019 and Writ petition No. 5014/2019, the order dated 14/01/2020, passed by the Hon’ble High Court of Judicature at Bombay Bench at Aurangabad and other relevant documents etc. and carefully and on understanding the same, I giving my legal opinion as follows-

As you know that, 19 employees / Instructors, who are petitioners in the above mentioned Writ Petitions, are being paid Salary as per 7th pay Commission in accordance with the provisions contained in Rules 11(2) the Maharashtra Civil Services (pay) Rules, 1981 and the order dated 10/01/2019 i.e. July 2019. The 7th pay Commission is applicable to the employees / instructors serving in Industrial Training Institutes run by Shri Saibaba Sansthan Trust are required to be paid the amount of difference for the period from 01/01/2016 to 31/01/2019 in accordance with the provisions contained in Rule 11(2) the Maharashtra Civil Services (pay) Rules, 1981.”

सद्यस्थिती क) तरी, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे आदेशानुसार, ॲड. नितिन आर. भवर, ॲडव्होकेट औरंगाबाद हायकोर्ट यांचे अभिप्राय तसेच मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार ज्या १९ निदेशकांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल केली होती त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसारचे फेरवेतन निश्चितीनुसार सातव्या वेतन आयोगाची दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासूनची देय्य रक्कम आदा करणेस मान्यता मिळणेकामी दिनांक १९/०२/२०२० रोजी टिपणी सादर केली असता मा. मुख्य लेखाधिकारी यांनी खालील

सूचना दिलेल्या आहेत.

१. आय.टी.आय. विभागातील गटनिदेशक यांची वरिष्ठश्रेणी / निवडश्रेणी लागू करतांना महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११ (१) (अ) नुसार वेतननिश्चिती करण्यात आलेली होती.

२. सदर वेतननिश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११(२) नुसार करणे आवश्यक होते.

३. त्यानुसार सुधारीत वेतननिश्चिती करुन तसे आदेश आस्थापना विभागाने दि. १०/०१/२०१९ रोजी निर्गमित केले.

४. सदर आदेशाविरुध्द आय.टी.आय. गटनिदेशक मा. उच्च न्यायालयात गेले. मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार निदेशकांकडून वसूलपात्र रक्कम वसूल करु नये असे निर्देशित केले आहे.

५. त्यामुळे ७ व्या वेतन आयोगाची वेतननिश्चिती करुन (महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ मधील नियम ११(२) नुसार फेरवेतननिश्चितीचे अनुषंगाने ) त्यांना दि. ०१/०१/२०१६ पासून फरक अदा करावयाचा आहे.

६. मात्र फरक अदा करताना अप्रत्यक्षपणे पुर्वी जादा दिलेल्या १ वेतनवाढीच्या अतिप्रदानाची वसूली होणार आहे. मात्र मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार वसूली करणे अभिप्रेत नाही.

७. ॲड. नितीन भवर यांचे अभिप्रयात या होणा-या वसूलीबाबत कोठेही स्पष्टता नाही.

८. सर्वप्रथम या गटनिदेशकांची दि. ०१/०१/२०१६ ते दि.१०/०१/२०१९ या कालावधीतील ६ व्या वेतन आयोगानुसार अतिप्रदान रक्कम परिगणित करावी त्यानंतर ७ व्या वेतन आयोगानुसार देय, प्रत्यक्ष दिलेली रक्कम यानुसार दि. १०/०१/२०१९ फरक परिगणित करुन त्यात ०१/०१/२०१६ ते १०/०१/२०१९ या कालावधीतील अतिप्रदानाची रक्कम समाविष्ठ करुन फरक आदा करावा असे मत आहे. त्यामुळे मा. उच्च न्यायालयाच्या आदेशाचे पालन होईल.

उपरोक्त मुख्य लेखाधिकारी यांनी दिलेल्या अभिप्रायावर, मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी, अतिप्रदान रक्कम किती होते याचे Calculations करावे व सविस्तर टिपणी सादर करावी, असे निर्देश दिलेले आहेत. त्यास अनुसरुन मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचा आदेश व सदर आदेशास अनुसरुन ॲड. नितीन भवर, यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार

१. मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेले १९ निदेशकांना जा.नं. एसएसएस/साप्रशा/आस्था/३०६०/२०१९ दि. १०/०१/२०२० रोजीचे आदेशातील परिशिष्टातील दिनांकानुसार सोबतचे परिशिष्ट-१ मधील तक्ता ‘अ’ नुसार सहाव्या वेतन आयोगानुसार एकूण रुपये-३४,६१,७३६/- मात्र इतकी रक्कम अतिप्रदान झालेली आहे. तसेच परिशिष्टातील तक्ता ‘ब’ नुसार मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल न केलेले ७ निदेशकांना सहाव्या वेतन आयोगानुसार एकूण रु. १४,३४,५०९/- इतकी रक्कम अतिप्रदान झालेली आहे. त्यानुसार परिशिष्ट-१ मधील तक्ता ‘अ’ व ‘ब’ मिळून एकूण रु.४८,९६,२४५/- इतकी रक्कम अतिप्रदान झालेली आहे. (सोबत परिशिष्ठ-१ अवलोकनार्थ सादर केले आहे.)

२. दिनांक-०१ जानेवारी, २०१६ ते दिनांक ३० जुन, २०१९ या कालावधीतील सातव्यावेतन आयोगानुसार मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल केलेले १९ निदेशकांना सातव्या वेतन आयोगापोटी देय्य रक्कम परिशिष्ट-२ मधील तक्ता ‘अ’ नुसार महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसारचे फेरवेतन निश्चितीनुसार एकूण रुपये-६४,८१,९१६/- मात्र इतकी रक्कम देय्य आहे. तसेच तक्ता ‘ब’ नुसार मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल न केलेले ७ निदेशकांना सातव्या वेतन आयोगापोटी महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसारचे फेरवेतन निश्चितीनुसार एकूण रु.१७,३५,६२०/- इतकी रक्कम देय्य आहे. त्यानुसार परिशिष्ट-२ मधील तक्ता ‘अ’ व ‘ब’ मिळून एकूण रु. ८२,१७,५३६/- इतकी रक्कम देय्य आहे. (सोबत परिशिष्ठ-२ अवलोकनार्थ सादर केले आहे.)

तरी, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद यांचे आदेशानुसार, ॲड.नितिन आर. भवर, ॲडव्होकेट औरंगाबाद हायकोर्ट यांचे अभिप्राय तसेच मा. उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे शासन निर्णयानुसार ज्या १९ निदेशकांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे याचिका दाखल केली होती त्यांची वेतन निश्चिती महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम १९८१ चे नियम ११ (२) नुसारचे फेरवेतन निश्चितीनुसार सातव्या वेतन आयोगाची दिनांक ०१ जानेवारी, २०१६ पासूनची देय्य रक्कम आदा करणेस मान्यता मिळणेकामी विषयांकित प्रस्ताव मा. तदर्थ समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

अथवा

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने, मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथे अपिल (याचिका) दाखल करावी किंवा कसे यावर निर्णय होणेकामी मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३११** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आय.टी.आय.विभागाकरीता निदेशक यांची प्रस्तावात नमुद केल्यानुसार अति प्रदानाची वसुली त्यांना सातव्या वेतन आयोगाच्या (दि.०१.०१.२०१६ पासून देय होणाऱ्या) थकबाकीच्या रकमेतुन वसुल न करणेबाबतच्या मा.उच्च न्यायालयाचे निर्णयाविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात अपिल दाखल करण्यास तसेच त्या अनुषंगाने येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. मात्र याकामी संस्थानमार्फत शक्यतो निशुल्क सेवा देणाऱ्या साईभक्ताची विधीतज्ञ म्हणून नियुक्ती करण्यास प्राधान्य देण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.०७** **श्री दिलीप विठ्ठलराव संगमनेरे, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचे गैरशिस्तवर्तनाबाबत**.

**प्रस्ताव-** A) विषयाची पुर्वपिठका:- श्री.संगमनेरे हे श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये सहा.शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. ते दि.१५.०२.२०२० रोजी कर्तव्यावर होते.दि.१८.०२.२०२० पासुन इ.१२ वी.च्या बोर्ड परिक्षा सुरु होणार असल्याने व सदर परिक्षेचे केंद्र आपल्या महाविद्यालयात असल्याने त्या संदर्भात नियोजन करण्यासाठी दि.१५.०२.२०२० रोजी सकाळी ११.०० वा.कनिष्ठ महाविद्यालयाकडील सर्व सहा.शिक्षकांची सभा आयोजीत करण्यात आलेली होती. त्याबाबत सर्व शिक्षकांना अगोदर कळविणेत आलेले होते. मात्र श्री.संगमनेरे हे सभेच्या नियोजीत वेळेत सभेस हजर न राहता सभा सुरु झालेनंतर १५ मि. ते २० मि.उशिराने सभेस आलेत. श्री.संगमनेरे हे सभेमध्ये आलेत त्यावेळी परिक्षा नियोजनाबाबत चर्चा चालु होती. मात्र ते सभेस उशिराने येवुन मध्येच बोललेत कि,"१२ वी.ची परिक्षा कधीपासुन सुरु होत आहे, मला माहित नाही." मुळात सर्व शिक्षकांना व विद्यार्थ्यांना वेळापत्रकाचे वाटप करण्यात आलेले होते.तसेच सर्व शिक्षकांना परिक्षकाचे कामकाजाचे वेळापत्रक देखील देण्यात आलेले होते. त्यामुळे त्यांचे सारखे जबाबदार शिक्षकाने सदरचे विधान करणे योग्य नव्हते.तसेच त्यांना सभेस उशिरा का आले असे विचारणा केली असता,"मला कुणी सभेचे सांगीतले नाही"असे म्हणाले व सर्व शिक्षक वेळेवर सभेस उपस्थित होते.

सदरची सभा ही इ.१२ वी.च्या परिक्षा संदर्भात असतांना त्यांनी मध्येच गोपनीय अहवालाचा मुद्दा उपस्थित केला कि," गोपनीय अहवाल दोन किंवा तीन व्यक्तीच्या हस्ताक्षरात कसे असतात, गोपनीय अहवाल कोण लिहीतात ती माहिती सर्वासमोर सांगा." अशी अवास्तव मागणी केली. गोपनीय अहवाल लिहितांना त्यावर विभाग प्रमुख व प्रशासकिय अधिकारी असे दोन हस्ताक्षर असतात.मात्र गोपनीय अहवालाबाबत सर्वासमोर बोलणे उचित नसते. तसेच त्यांनी सभेमध्ये मुळ विषय बोलण्यापेक्षा इतर नको ते मुद्दे उपस्थित करुन सभेच्या पर्यायाने प्रशासकिय कामकाजात अडथळा आणला.तसेच पुर्ण सभेच्या कालावधीत ते अत्यंत चिथावणीखोरवर्तन करत होते. तसेच इतर शिक्षकांना प्रशासनाच्या विरुध्द भडकविण्याचा प्रयत्न करत असल्याचे निदर्शनास आले आहे.

श्री.संगमनेरे हे नेहमीच प्रशासनाने घेतलेल्या निर्णयाचे विरोधात वर्तन करत असतात, श्री.संगमनेरे हे इतर शिक्षकांना भडकविणे, चिथावणीखोर वक्तव्य करुन प्रशासन व विभागाकडील वातावरण कलुषित करणे, बेजबाबदारपणाने वागणे असे कृत्य करत असतात. त्यांचे अशा वागण्यामुळे दैनंदिन शालेय व प्रशासकिय कामकाजात मोठया प्रमाणात अडचणी निर्माण झालेल्या आहेत.

त्यांनी उपरोक्त गैरशिस्तवर्तनामुळे दि.१५.०२.२०२० चे सभेत मुळ विषयास बगल देऊन, इतर आवंतर विषयांवर चर्चा होऊ लागलेली होती.त्यामुळे इ.१२ वी.च्या अत्यंत महत्वाच्या बोर्ड परिक्षेच्या नियोजनाकरीता जादा वेळ खर्ची पडला. त्यामुळे इतर शिक्षकांना त्यांचेमुळे प्रशासनाचे विरोधात विथावणी मिळाली.

असे त्यांचे विरुद्ध प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडून कर्मचारी गैरवर्तनाबाबत रिपोर्ट आलेला आहे. त्यांचे सदरचे कृत्य गंभिर गैरशिस्त वर्तनात मोडते.

श्री.संगमनेरे व श्री.अनाप यांना द्यावयाचे कारणे दाखवा नोटीसीबाबत इकडील दि.२६.०२.२०२० रोजीचे टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती. सदरचे टिपणीवर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी,"Call the Personally" असे निर्देश दिलेले होते.

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशास अनुसरुन श्री.वरघुडे,प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना दि.०४.०३.२०२०, दि.१०.०३.२०२०, दि.११.०३.२०२० रोजी

श्री.वरघुडे,प्राचार्य, श्री.संगमनेरे व श्री.अनाप यांना मुख्य कार्यकारी अधिकारी कक्ष येथे सकाळी १०.०० वा. हजर राहणेबाबत दुरध्वनीद्वारे कळविणेत आलेले होते

त्यास अनुसरुन दि.११.०३.२०२० रोजी सकाळी १०.०० वा.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षेत श्री.वरघुडे,प्राचार्य व श्री.अनाप हजर होते व श्री.संगमनेरे हे गैरहजर होते.

दि.२६.०२.२०२० रोजीचे टिपणीवर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी,“ १) अनाप हजर त्यांचे म्हणणे परत घेणे.अनाप यांना किरकोळ शिक्षा का करण्यात येऊ नये अशा आशयाची Show cause Notice काढा.२) संगमनेरे गैरहजर, पुर्वकल्पना न देता गैरहजर.श्री.संगमनेरे यांना निलंबीत का करण्यात येऊ नये अशी नोटीस काढा.”असे निर्देश दिलेले आहेत.

B) श्री.संगमनेरे यांना देणेत आलेली नोटीस व त्यांनी केलेले खुलासे:-

उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत श्री.संगमनेरे यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२८२५/२०२०, दि.१७-०३-२०२० अन्वये लेखी खुलासा मागविणेत आला होता. अ) त्यास अनुसरुन श्री.संगमनेरे यांनी दि.१९-०३-२०२० रोजीचा लेखी खुलासा सादर केला आहे. त्यात त्यांनी,“ उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार मला कारणे दाखवा नोटीस दि.१९.०३.२०२० रोजी प्राप्त झालेली आहे.सदर नोटीस काढण्यासाठी मुख्याध्यापक, श्री साईबाबा कन्या विदया मंदिर व कनिष्ठ महा विद्यालय यांनी जो रिपोर्ट केला आहे त्याची साक्षांकित प्रत मिळावी म्हणजे मला त्या नोटीसीचा खुलासा करता येईल.” असे म्हटलेले आहे.

सदर लेखी खुलाशा प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, यांचेमार्फत पाठविलेला नसुन श्री.संगमनेरे यांनी दि.१९.०३.२०२० रोजीचा अर्ज इकडील आवक विभागास दिलेला आहे.

श्री.संगमनेरे यांनी दि.१९.०३.२०२० रोजीचे विनंती अर्जाबाबत इकडील दि.२१.०३.२०२० रोजीची टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती.सदरचे टिपणीवर,”प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी सादर केलेल्या कर्मचारी गैरवर्तन रिपोर्टमधील सर्व मुद्दे कारणे दाखवा नोटीसीत नमुद आहे.त्यामुळे पुन्हा रिपोर्ट देण्याची आवश्यकता वाटत नाही.” असे निर्देश दिलेले आहे.

ब) तदनंतर श्री.संगमनेरे यांनी दि.२३-०३-२०२० रोजीचा लेखी खुलासा सादर केला आहे. त्यात त्यांनी,“ उपरोक्त संदर्भीय पत्रानुसार मी लेखी मुद्देनिहाय खुलासा खालीलप्रमाणे सादर करतो की,

१) मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात दि.११.०३.२०२० रोजी सकाळी १०.०० वा.हजर राहणेबाबतचा कोणताही निरोप मला मा.मुख्याध्यापक श्री.व्ही.जी.वरघुडे सर यांचेकडुन न मिळाल्यामुळे मी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात उपस्थित राहू शकलो नाही.म्हणून मी प्रथमत: मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांची क्षमा मागतो.

**२)** दि.११.०३.२०२० रोजी माझ्या नातलगाचे धार्मिक कार्य (लग्न समारंभ) (सोबत लग्नपत्रीका) असल्याने मी दि.०९.०३.२०२० रोजी कर्तव्यावर हजर असतांना दि.११.०३.२०२० रोजीचा रजा अर्ज कनिष्ठ महाविद्यालयात कार्यालयातील मा.वरिष्ठ लिपीक यांचेकडे रितसर सादरही केलेला आहे. दि.११.०३.२०२० रोजीच्या माझ्या रजेची मस्टरला नोंदही झालेली आहे. (सोबत रजा अर्जाची झेरॉक्स प्रत).

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर करण्यात आलेल्या दि.२६.०२.२०२० रोजीच्या टिपणीनुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी Call the Personally असे निर्देश दि.०४.०३.२०२०, दि.१०.०३.२०२० नुसार मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात मला दि.११.०३.२०२० रोजी सकाळी १०.०० वा. हजर राहणेबाबत कळविणेस सांगीतले होते. परंतु मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी मला याबाबत कळविले नाही किंवा निरोपही दिला नाही. मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी मला सदरचा अति महत्त्वाचा निरोप दिला नाही.मला सदरचा निरोप मिळाला असता तर मी कोणत्याही परिस्थितीत माझ्या धार्मीक कार्यासाठी न जाता वेळेत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात उपस्थित असतो.

३) शिक्षक सभेस मी उशिरा आलेबाबत:- दि.१५.०२.२०२० रोजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात सकाळी ११.०० वा.शिक्षक सभा आयोजीत करण्यात आली होती.सदरची सभा ही सकाळी ११.१० वा. सुरु झाली.मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी सभेमध्ये इ.१२ वी च्या परिक्षांचे नियमांचे वाचन करुन सभेला सुरुवात केली. त्यामुळे मी सभेस उशिराही आलेलो नाही व मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी मला कोणतीही उशिरा आल्याची विचारणाही केली नाही. त्यांनी परिक्षेचे वेळापत्रक व तक्ता हा सभा संपत आलेनंतर सर्व सहाय्य शिक्षकांना वाटण्यात आला. मी सन मार्च २०१७ मध्ये इ.१२ वीच्या परिक्षेसाठी उपकेंद्र संचालक म्हणून कामही केलेले आहे.परीक्षे संदर्भातील जबाबदारी व कर्तव्याची मला जाणीव आहे.

४)	गोपनीय अहवालाचा मुद्दा उपस्थित केलेबाबत:- इ.१२ वीचे परीक्षेचे कामकाज अंतर्गत मूल्यमापनाचा भाग असल्याने त्या परीक्षेच्या कामाची नोंद गोपनीय अहवाल श्रेणी देताना विचारात घ्यावी लागते. मागील गोपनीय अहवालातील श्रेणी देताना मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांचेकडुन भेदभाव झालेला होता, अशी सभेमध्ये चर्चा झाली.मी स्वंत: गोपनीय अहवालाचा मुद्दा या सभेत उपस्थित केलेला नाही व गोपनीय अहवाल कोण लिहितात, हे सर्वासमोर सांगा असेही मी कदापिही म्हणालो नाही.

५)	इतर सहाय्यक शिक्षकांना प्रशासनाविरुध्द भडकाविल्याबाबत:- श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असणारे सर्व सहाय्यक शिक्षक हे माझ्यापेक्षा ज्येष्ठ व अनुभवी आहे.त्यांचेजवळ उत्तम शैक्षणिक अर्हता आहे.प्रशासनाचे नियम, सेवा शर्ती इ. ची त्यांना चांगली माहिती आहे. तसेच त्यांना चांगले आणि वाईट याचीही जाण असून स्वंत:चे त्यांना मत आहे. त्यामुळे मी सभेतील वातावरण कलुषीत केले, त्यांना भडकाविले, चिथावले असे जे मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी वरिष्ठांना कळविले आहे ते अयोग्य आहे.

६)	बेजबाबदारपणाच्या कृत्याबाबत:- मी वेळोवेळी प्रशासनाने दिलेल्या आदेशाचे जबाबदारीने व काटेकोरपणे पालन करीत आलेलो आहे.गेली २ वर्षापासुन मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी नेमून दिलेली सर्व कामे मी वेळेत व जबाबदारीने पुर्णही केलेली आहेत. त्यामुळे मी कुठेही बेजबाबदारपणे वर्तन केलेले नाही. माझे मागील वर्षाचे सर्व गोपनीय अहवालही चांगले आहेत. माझे मागील वर्षाचे इ.१२ वी या वर्गाचे Book Keeping & Accountancy या विषयाचे निकालही उत्तम लागलेले आहेत. माझे अनेक विद्यार्थी सी.ए., सी.पी.टी. परीक्षेसाठी पात्रही ठरलेले आहेत.

७)	गैरवर्तनाबाबत:-	दि.०३.०३.२०२० रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे यांचे सभेनुसार मी इ.१२ वीच्या Book Keeping & Accountancy या विषयाच्या परीक्षेकरीता नियामक (Moderator) म्हणून कामही करत आहे. माझ्याकडे १८०० ते २००० इतके पेपर मॉडरेट करणेसाठी आलेले आहेत. ते मला पुणे बोर्डात वेळेत सादर करावयाचे आहेत. परीक्षेसंदर्भात असलेले नियम व कर्तव्याची मला पुर्ण जाणीव आहे. सोबत शिक्षक सभेत उपस्थित असलेल्या सहाय्यक शिक्षक/शिक्षिका/शिक्षकेतर यांचा अभिप्राय/मत जोडले आहे.

८)	श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३(१) बाबत:- मी संस्थान सेवेत संपूर्ण प्रामाणिकपणानेच काम केलेले आहे. तसेच संस्थानच्या सेवेशी एकनिष्ठही राहिलेलो आहे व मी संस्थान कर्मचा-याला न शोभणारे कृत्यही केलेले नाही व यापुढेही करणार नाही. त्यामुळे मी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (वर्तणूक) विनियम, २०१३ चे कलम ३(१) चे कोणतेही उल्लंघन या सभेत केलेले नाही. प्रशासनाचा माझ्यामुळे वेळ विनाकारण खर्ची पडला, याबद्दल मी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांची माफी मागतो.मी श्री साईबाबांच्या तत्वांचे पालनही करतो व नेहमी आचरणातही आणतो.

तरी मे.साहेबांनी मी वरिलप्रमाणे केलेल्या खुलाशाचा सहानुभूतीपुर्वक विचार करुन मला या नोटीसीतून मुक्त करावे ही नम्र विनंती आहे." असे म्हटलेले आहे.

श्री.संगमनेरे यांनी दि.२३.०३.२०२० रोजीचा उपरोक्त खुलासा प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, यांचेमार्फत पाठविलेला नसुन, त्यांनी दि.२४.०३.२०२० रोजीचा अर्ज इकडील सामान्य प्रशासन शाखा, आवक विभागास दिलेला आहे.

क)	आता, पुन्हा श्री.संगमनेरे यांनी दि.०७-०४-२०२० रोजीचा लेखी खुलासा सादर केला आहे. त्यात त्यांनी,"उपरोक्त संदर्भीय पत्रानुसा मला मिळालेल्या नोटीसीचा लेखी मुद्देनिहाय खुलासा दि.२३.०३.२०२० रोजी सादरही केलेला आहे. परंतु काही कागदपत्रे तांत्रिक अडचणीमुळे खुलाशा सोबत वेळेत सादर करता आली नाही. ती माहिती सदरच्या पत्राने आपणाकडे सविनय सादर करीत आहे.

मुद्दा क्रं.१:- माझ्या भ्रमणध्वनीवर दि.०४.०३.२०२०, दि.१०.०३.२०२० व दि.११.०३.२०२० रोजीचे जे इनकमिंग कॉल आलेले आहेत, परंतु त्यात मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांनी कोणताही निरोप मला दिलेला नाही, त्याची झेरॉक्स प्रत.

मुद्दा क्रं.२:- माझा रिपोर्ट करण्याचे मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर यांचे कारण म्हणजे मी दि.२२.०७.२०१९ रोजी माहितीच्या अधिकारान्वये श्री.विकास महादेव शिवगजे, सहाय्यक शिक्षक, यांचे विषयी दि.१५.१२.२०१६ व दि.३०.०६.२०१७ रोजी मी व काही सहाय्यक शिक्षकांनी तक्रार केलेली होती. त्या तक्रारीवर सुनावणीही झालेली होती. परंतु मला दि.९ ऑगष्ट २०१९ रोजीचे मिळालेल्या माहिती अधिकाराच्या अहवालात

श्री.विकास महादेव शिवगजे, सहाय्यक शिक्षक यांच्यावर प्रशासनाकडून पुढील कार्यवाही केल्याचे आढळुन येत नाही, ही माहिती मिळाली. सदर माहिती मागविल्याचा राग मनात धरुन श्री.विकास महादेव शिवगजे,सहाय्यक शिक्षक व मा.मुख्याध्यापक श्री.वरघुडे सर या दोघांनी मिळून कट कारस्थान रचुन माझी नियोजनबध्दरित्या वरिष्ठांसमोर रिपोर्ट करुन बदनामी करुन माझेवर अन्याय केलेला आहे.

मे.साहेबांनी माझी वरील माहिती सामान्य प्रशासन शाखा, वशी-शिस्त जा.नं.एसएसएस/वशी-लेखा/२८२५/२०२० दि.१७.०३.२०२० रोजीचे नोटीसीसाठी सदरचे पुरावे लेखी खुलाशासाठी ग्राहय धरून माझेवर झालेला अन्याय दुर करावा, ही विनंती.” असे म्हटलेले आहे.

सदर लेखी खुलाशा प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, यांचेमार्फत पाठविलेला नसुन श्री.संगमनेरे यांनी दि.०७.०४.२०२० रोजीचा अर्ज इकडील आवक विभागास दिलेला आहे.

प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयामध्ये यांना जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/५०/२०२०,दि.१५-०४-२०२० व जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/९१/२०२०,दि.२८-०४-२०२० रोजीचे पत्रासोबत श्री.संगमनेरे यांनी दिलेले दि.२३.०३.२०२० व दि.०७.०४.२०२० रोजीचे खुलासे स्वंयस्पष्ट अभिप्रायासाठी पाठविणेत आलेले होते.

C) प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी त्यांचा स्वंयस्पष्ट अभिप्राय:- त्यास अनुसरुन प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी त्यांचा स्वंयस्पष्ट अभिप्राय दि.०४.०५.२०२० रोजी इकडील कार्यालयास पाठविलेला असुन, त्यात त्यांनी,” (अ) श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, यांनी दि.१५.०२.२०२० रोजी इ.१२ वी बोर्ड परिक्षा नियोजन सभेमध्ये केलेल्या गैरवर्तनाबाबत संदर्भ क्र.०१ अन्वये त्यांचा गैरवर्तन रिपोर्ट केलेला होता. तसेच दि.११.०३.२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे समक्ष हजर राहणेबाबत कळविण्यात आलेले असतांनाही ते हजर झालेले नाही. त्याबाबत त्यांना वशी-शिस्त, सामान्य प्रशासन शाखेमार्फत जा.क्र.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/२८२५/२०२० दि.१७.०३.२०२० अन्वये कारणे दाखवा नोटीस बजावून, सदर नोटीसचा खुलासा मुख्यध्यापकांमार्फत वरिष्ठांकडे सादर करणे अपेक्षित असतांनाही त्यांनी मुख्यध्यापकांमार्फत खुलासा सादर न करता, अ.क्र.०३ अन्वये परस्पर वरिष्ठांकडे खुलासा सादर केलेला आहे. त्याबाबत अ.क्र.०४ चे पत्रान्वये श्री.संगमनेरे यांनी दि.२३.०३.२०२० रोजी सादर केलेल्या खुलाशातील कथनाबाबत मुद्देनिहाय स्वंयस्पष्ट लेखी अभिप्राय प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत सादर करणेबाबत कळविलेले आहे. त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | श्री.संगमनेरे यांनी खुलाशात नमुद केलेला मुद्दा | खुलाशाबाबत स्वंयस्पष्ट अभिप्राय |
|---|---|---|
| ०१. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात दि.११/०३/२०२० रोजी सकाळी १०.०० वाजता हजर राहणेबाबतचा कोणताही निरोप मला मा.मुख्यध्यापक श्री जी.व्ही.वरघुडे सर यांचेकडून न मिळाल्यामुळे मी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात उपस्थित राहू शकलो नाही, म्हणून मी प्रथमतः मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांची क्षमा मागतो. | सामान्य प्रशासन विभागाकडील वशी-शिस्त कक्षाकडून मला दि.०४.०३.२०२० रोजी दुरध्वनीद्वारे कळविण्यात आलेले होते की, मुख्याध्यापक, श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी समक्ष चर्चेसाठी बोलविलेले आहे. मात्र त्याबाबतची दिनांक व वेळ नंतर कळविण्यात येईल. याबाबत सबंधीत शिक्षकांना मी तसेच कनिष्ठ महाविद्यालयाकडील लिपीक यांनी समक्ष सांगितलेले होते.<br>त्यानंतर दि.१०.०३.२०२० रोजी मला पुन्हा कळविण्यात आले की, उद्या दि.११.०३.२०२० रोजी सकाळी १०.०० वा. तुम्ही, श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांच्या कक्षेत हजर राहावे.<br>याबाबत मी लागलीच कनिष्ठ महाविद्यालयाकडील कंत्राटी लिपीक श्री.सचिन कोपरे यांना श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना कळविण्याबाबत सांगितले होते. त्यानुसार कनिष्ठ महाविद्यालयाकडील कंत्राटी लिपीक |

| | | |
|---|---|---|
| | | श्री.सचिन कोपरे यांनी दि.१०.०३.२०२० रोजी त्यांच्या भ्रमणध्वनीद्वारे श्री.संगमनेरे यांना कळविण्याचा प्रयत्न केला असता, त्यांचा फोन लागला नाही. त्यामुळे श्री.कोपरे हे दि.१०.०३.२०२० रोजी रात्रौ.८.३० वा. सुमारास श्री.संगमनेरे यांचे घरी निरोप देण्यासाठी चालले असता, श्री.संगमनेरे सर त्यांच्या मुलीसह कोपरगांव येथील एका बेकरीवर भेटले असता, त्यांना समक्ष भेटून उद्या दि.११.०३.२०२० रोजी सकाळी ०९.३० वा. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात उपस्थित राहणेबाबत कळविलेले होते. मात्र त्यावेळी श्री.संगमनेरे यांनी माझी उद्या सुट्टी आहे, असे सांगितले. याबाबत श्री.कोपरे यांचा लेखी खुलासा घेतलेला आहे.<br>त्यामुळे श्री.संगमनेरे यांचे निरोप न मिळालेबाबतचे म्हणणे हे अत्यंत चुकीचे, खोटे व बिनबुडाचे आहे. ते नेहमीच असे खोटे बोलून, चुकीचे अर्ज करुन, प्रशासनाची दिशाभूल करत असतात. |
| ०२. | दि.११/०३/२०२० रोजी माझ्या नातलगाचे धार्मिक कार्य (लग्न समारंभ) (सोबत लग्नपत्रिका) असल्याने मी दिनांक ०९/०३/२०२० रोजी कर्तव्यावर हजर असतांना दि.११/०३/२०२० रोजीचा रजा अर्ज कनिष्ठ महाविद्यालयात कार्यालयातील मा.वरिष्ठ लिपीक यांचेकडे रितसर सादरही केलेला आहे. दि.११/०३/२०२० रोजीच्या माझ्या रजेची मस्टरला नोंदही झालेली आहे. (सोबत रजा अर्जाची झेरॉक्स प्रत) | सामान्य प्रशासन विभागाकडील वशी-शिस्त कक्षाकडून मला दि.०४.०३.२०२० रोजी दुरध्वनीद्वारे कळविण्यात आलेले होते की, मुख्यध्यापक, श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी समक्ष चर्चेसाठी बोलविलेले आहे. मात्र त्याबाबतची दिनांक व वेळ नंतर कळविण्यात येईल. याबाबत सबंधीत शिक्षकांना मी तसेच कनिष्ठ महाविद्यालयाकडील लिपीक यांनी समक्ष सांगितलेले होते.<br>तरीही श्री.संगमनेरे यांनी दि.०९.०३.२०२० रोजी मला किंवा महाविद्यालयाकडील लिपीक यांना न कळवता परस्पर रजा अर्ज भरुन हजेरी मस्टरमध्ये ठेऊन दिलेला होता. सदर अर्ज मंजुर झाला किंवा नाही, याचा कोणताही विचार न करता, नेहमीप्रमाणे वरिष्ठांचा अपमान करण्याची पंरपरा कायम ठेवत त्यांनी दि.११.०३.२०२० रोजी रजा अर्ज मंजूर नसतानांही परस्पर रजा घेतली.<br>त्यामुळे श्री.संगमनेरे यांनी अर्ज मंजुर नसतांनाही रजा घेतली हेच मुळात गैरवर्तन आहे. तसेच ते नेहमीच अशाप्रकारे वरिष्ठांचा अपमान करत असतात. |
| ०३. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचेसमोर सादर करण्यात आलेल्या दि.२६/०२/२०२० रोजीच्या टिपनीनुसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांनी Call the Personally असे निर्देश दि.०४/०३/२०२०, दि.१०/०३/२०२० नुसार मा.मुख्यध्यापक श्री. वरघुडे सर यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात मला दि.११/०३/२०२० रोजी सकाळी १०.०० वा. हजर राहणेबाबत कळविणेस सांगितले होते. परंतु मा.मुख्यध्यापक श्री. वरघुडे सर यांनी मला याबाबत | याबाबत उपरोक्त अ.क्र.०१ व ०२ मध्ये नमुद केलेले आहे. तसेच त्यांनी या मुद्यामध्ये सर्व चुकीची माहिती नमुद केलेली आहे. कारण त्यांना महाविद्यालयाकडील कंत्राटी लिपीक श्री.कोपरे यांनी आदल्या दिवशीच समक्ष भेटून दि.११.०३.२०२० रोजी सकाळी ०९.३० वा. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात उपस्थित राहणेबाबत कळविलेले होते. त्यामुळे श्री.संगमनेरे हे अत्यंत खोटे व चुकीचे विधान करुन, प्रशासनाची दिशाभूल करत आहेत. |

| | | |
|---|---|---|
| | कळविले नाही किंवा निरोपही दिला नाही. मा.मुख्यध्यापक श्री. वरघुडे सर यांनी मला सदरचा अति महत्वाचा निरोप दिला नाही. मला सदरचा निरोप मिळाला असता तर मी कोणत्याही परिस्थितीत माझ्या धार्मिक कार्यासाठी न जाता वेळेत मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांचे कक्षात उपस्थित असतो. | |
| ०४. | शिक्षक सभेस मी उशिरा आलेबाबत – दि.१५/०२/२०२० रोजी श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात सकाळी ११.०० वाजता शिक्षक सभा आयोजित करण्यात आली होती. सदरची सभा ही सकाळी ११.१० वा.सुरू झाली. मा.मुख्यध्यापक श्री.वरघुडे सर यांनी सभेमध्ये इ.१२ वी च्या परीक्षेच्या नियमांचे वाचन करून सभेला सुरूवात केली. त्यामुळे मी सभेस उशिराही आलेलो नाही व मुख्यध्यापक श्री. वरघुडे सर यांनी मला कोणतीही उशिरा आल्याची विचारणाही केली नाही. त्यांनी परीक्षेचे वेळापत्रक व तक्ता हा सभा संपत आलेनंतर सर्व सहाय्यक शिक्षकांना वाटण्यात आला. मी सन मार्च २०१७ मध्ये इ.१२ वी च्या परीक्षेसाठी उपकेंद्र संचालक म्हणून कामही केलेले आहे. परीक्षेसंदर्भातील जबाबदारी व कर्तव्याची मला जाणीव आहे. | श्री.संगमनेरे हे सकाळी ११.०० वा. चे सभेस ११.२० वा. उपस्थित राहिले. तसेच सभा चालू असतांना विषय चालु असतांना श्री.संगमनेरे यांना उशीरा येण्याचे कारण विचारले असता, त्यांनी "मला कोणीच सभेचे सांगितले नाही" असे उत्तर दिले.<br>तसेच त्यांनी उशीरा येऊन, "१२ वी.ची परिक्षा कधी पासून सुरु होत आहे, मला काही माहिती नाही" मुळात सर्व शिक्षकांना व विद्यार्थ्यांना वेळापत्रकाचे वाटप करण्यात आलेले होते. तसेच सर्व शिक्षकांना त्यांचे परिक्षकाचे कामकाजाचे वेळापत्रकदेखील देण्यात आलेले होते. त्यामुळे श्री.संगमनेरे यांच्या सारख्या जबाबदार शिक्षकाने सदरचे विधान करणे योग्य नव्हते. याबाबत त्यांच्या गैरवर्तन अहवालामध्ये नमुद केलेले आहे. |
| ०५. | गोपनीय अहवालाचा मुद्दा उपस्थित केलेबाबत – इ.१२ वी चे परीक्षेचे कामकाज हे अंतर्गत मूल्यमापनाचा भाग असल्याने त्या परीक्षेच्या कामाची नोंद गोपनीय अहवाल श्रेणी देताना विचारात घ्यावी लागते. मागील गोपनीय अहवालातील श्रेणी देताना मा.मुख्यध्यापक श्री. वरघुडे सर यांचेकडून भेदभाव झालेला होता, अशी सभेमध्ये चर्चा झाली, मी स्वंतः गोपनीय अहवालाचा मुद्दा या सभेत उपस्थित केलेला नाही व गोपनीय अहवाल कोण लिहितात, हे सर्वांसमोर सांगा असेही मी कदापिही म्हणालो नाही. | श्री.संगमनेरे यांनी सदरचा मुद्दा अत्यंत चुकीच्या पद्धतीने लिखित स्वरुपात कळविलेला आहे. सभेमध्ये इ.१२ वी चे परिक्षेचे नियोजनाचे कामकाज सुरु असतांना इतर शिक्षक त्याबाबत बोलत असतांना श्री.अनाप सर व श्री.संगमनेरे सर यांनी मध्येच उठून, गोपनीय अहवाल व्यवस्थित तुमच्याच हातांनी लिहित जा, तुम्ही इतर व्यक्तींकडून गोपनीय अहवाल लिहून घेतात, श्रेणी देतांना भेदभाव करतात, प्रथम या गोष्टींकडे लक्ष द्या मग मिटींगा घ्या, असे बोलून, माझ्यावर आरोप केले. मात्र खुलासा सादर करतांना चर्चा झाली असे लिहिले आहे. वास्तविक पाहता गोपनीय अहवालात सर्व शिक्षकांना "अ" श्रेणी देण्यात आलेली आहे. यात कुठेही भेदभाव नाही. |
| ०६. | इतर सहाय्यक शिक्षकांना प्रशासनाविरूध्द भडकाविल्याबाबत – श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात कार्यरत असणारे सर्व सहाय्यक शिक्षक हे माझ्यापेक्षा ज्येष्ठ व अनुभवी आहेत. त्यांचेजवळ उत्तम शैक्षणिक अर्हताही आहे. प्रशासनाचे नियम, सेवा, शर्ती इ.ची त्यांना चांगली माहिती आहे. तसेच चांगले आणि वाईट याचीही जाण असून स्वंतःचे त्यांना मत आहे. त्यामुळे मी सभेतील वातावरण कलुषीत केले, त्यांना भडकाविले, चिथावले असे जे मा.मुख्यध्यापक श्री. वरघुडे सर यांनी वरिष्ठांना कळविले आहे ते अयोग्य आहे. | श्री. संगमनेरे यांनी सर्व शिक्षकांसमोर अरेरावीने वागून गैरवर्तन केले आणि इतर शिक्षकांना चिथावणी देण्याचे काम केले. |

| | | |
|---|---|---|
| ०७. | बेजबाबदारपणा कृत्याबाबत –<br>मी वेळोवळी प्रशासनाने दिलेल्या आदेशाचे जबाबदारीने व काटेकोरपणे पालन करीत आलेलो आहे. गेली २ वर्षापासून मा.मुख्यध्यापक श्री.वरघुडे सर यांनी नेमून दिलेली सर्व कामे मी वेळेत व जबाबदारीने पुर्णही केलेले आहेत. त्यामुळे मी कुठेही बेजबाबदारपणे वर्तन केलेले नाही. माझे मागील वर्षाचे सर्व गोपनीय अहवालही चांगले आहेत. माझे मागील वर्षाचे इ.१२ वी या वर्गाचे Book Keeping & Accountancy या विषयाचे निकालही उत्तम लागलेले आहेत. माझे अनेक विद्यार्थी सी.ए., सी.पी.टी. परीक्षेसाठी पात्रही ठरलेले आहेत. | त्यांचे अध्यापनाबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार केलेली नसून, त्यांचे वर्तनाबाबत तक्रार करण्यात आलेली आहे. तसेच सदर मुद्यामध्ये श्री.संगमनेरे यांनी सर्व गोपनीय अहवाल चांगले असल्याचे नमुद केलेले आहे, तर अ.क्र.५ चे मुद्यांमध्ये गोपनीय अहवालात भेदभाव होत असल्याची चर्चा झाली असा आरोप करतात, त्यामुळे श्री.संगमनेरे हे स्वंतःच्या खुलाशाबाबत साशंक आहेत, असे दिसून येते तसेच त्यांनी अत्यंत खोटा व चुकीचा खुलासा सादर केलेला आहे. |
| ०८. | गैरवर्तनाबाबत-<br>दि.०३/०३/२०२० रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे यांचे सभेनुसार मी इ.१२ वीच्या Book Keeping & Accountancy या विषयाच्या परीक्षेकरीता नियामक (Moderator) म्हणून कामही करत आहे. माझ्याकडे १८०० ते २००० इतके पेपर मॉडरेट करणेसाठी आलेले आहेत. ते मला पुणे बोर्डात वेळेत सादर करावयाचे आहेत, परीक्षेसंदर्भात असलेले नियम व कर्तव्याची मला पुर्ण जाणीव आहे. त्यामुळे मी या सभेत कोणतेही गैरवर्तन व वातावरण कलुषित केलेले नाही. सोबत शिक्षक सभेत उपस्थित असलेल्या सहाय्यक शिक्षक/शिक्षिका/शिक्षकेतर यांचा अभिप्राय/मत जोडले आहे. | त्यांचे अध्यापनाबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार केलेली नसून, त्यांचे वर्तनाबाबत तक्रार करण्यात आलेली आहे.<br>तसेच श्री.संगमनेरे यांनी खुलासा तयार केल्यानंतर सभेमध्ये उपस्थित असलेल्या सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांना अभिप्राय देण्याबाबत विनंती केलेली होती. मात्र श्री.संगमनेरे यांचे खुलाशामधील सर्व मुद्दे चुकीचे व बिनबुडाचे असल्याने सह्या करणारे ०८ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी वगळता इतर २५ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी अभिप्रायावर सह्या केलेल्या नाहीत व हेच ०७ ते ०८ शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी सभेमध्ये वाद घालत होते मात्र त्यांनी सदर वादास चर्चा झाली असे म्हणले आहे.<br>यावरुन श्री.संगमनेरे यांनी सर्व खुलासा चुकीचा व खोटा सादर केल्याचे सिद्ध होते. |
| ०९. | श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी सेवा वर्तणूक विनिमय २०१३ चे कलम ३(१) बाबत<br>मी संस्थान सेवेत संपूर्ण प्रामाणिकपणानेच काम केलेले आहे. तसेच संस्थानच्या सेवेशी एकनिष्ठही राहिलेलो आहे व मी संस्थान कर्मचा-याला न शोभणारे कृत्यही केलेले नाही व यापुढेही करणार नाही. त्यामुळे मी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी सेवा वर्तणूक विनिमय २०१३ चे कलम ३(१) चे कोणतेही उल्लंघन या सभेत केलेले नाही.<br>प्रशासनाचा माझ्यामुळे वेळ विनाकारण खर्ची पडला, याबद्दल मी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी साहेब यांची माफी मागतो. मी श्रीसाईबाबांच्या तत्वांचे पालनही करतो व नेहमी आचरणातही आणतो. | गैरवर्तन अहवालामध्ये श्री.संगमनेरे यांनी केलेल्या गैरवर्तनाबाबत नमुद केलेले आहे. तसेच त्यांनी सादर केलेला खुलासा अत्यंत खोटा, चुकीचा व दिशाभूल करणारा असल्याचे दिसून येते.<br>तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात हजर राहणेबाबत समक्ष निरोप मिळालेला असतांनाही वरिष्ठांना काहीही न कळविता गैरहजर राहणे सदरची बाब अत्यंत गंभीर स्वरुपाचे गैरवर्तन आहे.<br>सदरचे वर्तन श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था,शिर्डी सेवा वर्तणूक विनिमय २०१३ चे कलम ३(१) चे उल्लंघन केलेले आहे, असे ठाम मत आहे. |

**(ब)** श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे यांनी सदर प्रकरणी दि.०७.४.२०२० रोजी पुन्हा खुलासा सादर केलेला असून, जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/वशी-शिस्त/९१/२०२० दि.२८ एप्रिल, २०२० अन्वये सदर लेखी खुलाशाबाबत मुद्देनिहाय स्वंयस्पष्ट लेखी अभिप्राय प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत सादर करणेबाबत कळविलेले आहे, त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे –

| अ.क्र. | श्री.संगमनेरे यांनी खुलाशात नमुद केलेला मुद्दा | खुलाशाबाबत स्वंयस्पष्ट अभिप्राय |
|---|---|---|
| ०१. | माझ्या भ्रमणध्वनीवर दि.०४.०३.२०२०, दि.१०.०३.२०२० व दि.११.०३.२०२० रोजीचे जे इनकमिंग कॉले आलेले आहेत, त्यात मा.मुख्यध्यापक श्री.वरघुडे सर यांनी कोणताही निरोप मला दिलेला नाही. त्याची झेरॉक्स प्रत सोबत सादर केलेली आहे. | सामान्य प्रशासन विभागाकडील वशी-शिस्त कक्षाकडून मला दि.०४.०३.२०२० रोजी दुरध्वनीद्वारे कळविण्यात आलेले होते की, मुख्यध्यापक, श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांनी समक्ष चर्चेसाठी बोलविलेले आहे. मात्र त्याबाबतची दिनांक व वेळ नंतर कळविण्यात येईल. याबाबत सबंधीत शिक्षकांना मी तसेच कनिष्ठ महाविद्यालयाकडील लिपीक यांनी समक्ष सांगितलेले होते.<br>त्यानंतर दि.१०.०३.२०२० रोजी मला पुन्हा कळविण्यात आले की, उद्या दि.११.०३.२०२० रोजी सकाळी १०.०० वा. तुम्ही, श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांच्या कक्षेत हजर राहावे.<br>याबाबत मी लागलीच कनिष्ठ महाविद्यालयाकडील कंत्राटी लिपीक श्री.सचिन कोपरे यांना श्री.अनाप व श्री.संगमनेरे यांना कळविण्याबाबत सांगितले होते. त्यानुसार कनिष्ठ महाविद्यालयाकडील कंत्राटी लिपीक श्री.सचिन कोपरे यांनी दि.१०.०३.२०२० रोजी त्यांच्या भ्रमणध्वनीद्वारे श्री.संगमनेरे यांना कळविण्याचा प्रयत्न केला असता, त्यांचा फोन लागला नाही. त्यामुळे श्री.कोपरे हे दि.१०.०३.२०२० रोजी रात्रौ.८.३० वा. सुमारास श्री.संगमनेरे यांचे घरी निरोप देण्यासाठी चालले असता, श्री.संगमनेरे सर त्यांचा मुलीसह कोपरगांव येथील एका बेकरीवर भेटले असता, त्यांना समक्ष भेटून उद्या दि.११.०३.२०२० रोजी सकाळी ०९.३० वा. मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात उपस्थित राहणेबाबत कळविलेले होते. मात्र त्यावेळी श्री.संगमनेरे यांनी माझी उद्या सुट्टी आहे, असे सांगितले. याबाबत श्री.कोपरे यांचा लेखी खुलासा घेतलेला आहे.<br>त्यामुळे श्री.संगमनेरे यांचे निरोप न मिळालेबाबतचे म्हणणे हे अत्यंत चुकीचे, खोटे व बिनबुडाचे आहे. ते नेहमीच असे खोटे बोलून, चुकीचे अर्ज करुन, प्रशासनाची दिशाभूल करत असतात. |
| ०२. | माझा रिपोर्ट करण्याचे मा.मुख्यध्यापक श्री.वरघुडे सर यांचे कारण म्हणजे मी दि.२२.०७.२०१९ रोजी माहितीच्या अधिकारान्वये श्री.विकास महादेव शिवगजे, सहा.शिक्षक यांचे विषयी दि.१५.१२.२०१६ व दि.३०.०६.२०१७ रोजी मी व काही सहाय्यक शिक्षकांनी तक्रार केलेली होती. त्या तक्रारीवर सुनावणीही झालेली होती. परंतू मला दि.०९ ऑगस्ट, २०१९ रोजीचे मिळालेल्या माहिती अधिकाराच्या अहवालात श्री.विकास महादेव शिवगजे, सहाय्यक शिक्षक यांच्यावर प्रशासनाकडून पुढील कार्यवाही | सदरचा मुद्दा दि.१५.०२.२०२० राजीचे सभेतील गैरवर्तनाबाबत नसुन, श्री.शिवगजे सर यांच्याबाबत आहे. त्या प्रकरणाची संस्थानचे प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत चौकशी होऊन, सदरचे प्रकरण सन २०१७ मध्येच संपलेले आहे. मात्र श्री.संगमनेरे हे केवळ दिशाभूल करायची म्हणून जुने प्रकरणातील कागदपत्रे देऊन, मुळ विषयाला व त्यांनी केलेल्या गैरवर्तनाच्या मुद्यास बगल देण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. |

| | | |
|---|---|---|
| | केल्याचे आढळून येत नाही, ही माहिती मिळाली. सदर माहिती मागविल्याचा राग मनात धरुन श्री.विकास महादेव शिवगजे सहा.शिक्षक व मुख्यध्यापक श्री.वरघुडे सर या दोघांनी मिळून कट कारस्थान रचुन माझी नियोजनबद्धरित्या वरिष्ठांसमोर रिपोर्ट करुन बदनामी करुन माझेवर अन्याय केलेला आहे. | |

उपरोक्त परिच्छेद अ मधील तक्त्यातील अ.क्र.१ ते ९ व परिच्छेद ब मधील तक्त्यातील अ.क्र.१ व २ चे अवलोकन करता,

१. श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे, सहा.शिक्षक श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालय यांनी त्यांचे खुलाशामध्ये नमुद केलेली माहिती अत्यंत चुकीची, खोटी व बिनबुडाची आहे. तसेच मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांचे कक्षात उपस्थित राहणेबाबत आदल्या दिवशी महाविद्यालयाकडील कंत्राटी लिपीकांमार्फत समक्ष निरोप देऊनही त्यांनी सदरचा निरोप गंभीरतेने न घेता, नेहमीप्रमाणे वरिष्ठांचा अपमान करुन, प्रशासनाच्या निरोपास केराची टोपली दाखविली, सदरची बाब अत्यंत गंभीर गैरवर्तनामध्ये येते.

२. तसेच मुख्यध्यापक अथवा लिपीक यांना न विचारता रजा अर्ज भरुन, परस्पर हजेरी मस्टरमध्ये ठेऊन दिला तसेच मुख्यध्यापक अथवा लिपीक यांना न कळविता रजा अर्ज मंजुर नसतांनाही परस्पर रजा घेतली, सदरची बाब गैरवर्तनामध्ये येते.

३. श्री.संगमनेरे यांनी जुने अर्ज, कागदपत्रे सादर करुन मुळ विषयास बगल देण्याचा प्रयत्न केला आहे. श्री.संगमनेरे यांचे विरुदध गैरवर्तन रिपोर्ट केला असता, त्यांनी दोन वेळेस परस्पर खुलासा सामान्य प्रशासन शाखा, आवक विभागास सादर केले, तसेच आता माहितीचे अधिकार कायदांतर्गत सदर प्रकरणाची माहिती मागविलेली असून, सदर माहिती न्यायालयीन कामासाठी आवश्यक असल्याचे नमुद केलेले आहे. म्हणजेच श्री.संगमनेरे यांच्या विरोधात काही बोलले अथवा वरिष्ठांना कळविल्यास ते विविध प्रकारे वरिष्ठांवर, प्रशासनावर दबाव आणण्याचा प्रयत्न करतात, ही बाब अतिशय गंभीर असून, त्यांचे वर्तन अत्यंत हीन व क्लेषदायक आहे.

४. श्री.संगमनेरे यांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसचा खुलासा मुख्यध्यापकांमार्फत सादर करणेबाबत आदेशीत करण्यात आलेले असतांनाही त्यांनी मा.मुख्य कार्यकारी अधिकारी महोदय यांच्या आदेशाचा अवमान करुन, सदर नोटीसचा खुलासा दोनवेळेस परस्पर सामान्य प्रशासन शाखा, आवक विभागाकडे सादर केलेला आहे.

५. तसेच जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/३११९/२०१४ दि.०२ ऑक्टो, २०१४ चे परिपत्रकाचा देखील अवमान केलेला आहे. यावरुन श्री.संगमनेरे हे नेहमीच अशा पद्धतीने वरिष्ठांच्या अथवा प्रशासनाच्या आदेशांचा अवमान करत असल्याचे निर्देशनास येत आहे. ”असे म्हटलेले आहे.

श्री.संगमनेरे यांचे दोन्ही खुलाशाबाबत प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी सादर केलेला स्वंयस्पष्ट अभिप्राय सबंधीत प्रशासकिय अधिकारी यांचे मार्फत सादर केलेला असुन त्यांनी त्यावर स्वाक्षरी केलेली आहे.

श्री.दिलीप संगमनेरे, यांची संस्थान सेवेत दि.१७.०९.२००८ रोजी नियुक्ती करण्यात आलेली असून त्यांना यापुर्वी गैरशिस्तवर्तनाबाबत एकही शिक्षा करणेत आलेली नाही.

गैरवर्तनात दोषी असलेल्या कर्मचाऱ्यांस श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि आपिल) विनियम,२०१३ प्रकरण ३ कलम ५ अन्वये किरकोळ दंडात्मक कारवाया अंतर्गत

(१) ठपका ठेवणे,
(२) पदोन्नती रोखणे,
(३) त्याने हयगय,किंवा आदेश भंग या कारणामुळे संस्थानाचे आर्थिक नुकसान केले असल्यास ते त्यांच्या वेतनातून वसूल करणे.
(४) वेतनावाढी रोखुन धरणे,
(५) विनिर्दिष्ट कालावधीसाठी वेतनाच्या समयश्रेणीतील खालच्या टप्प्यात घट करणे आणि अशा घटीच्या कालावधीत संस्थानाच्या कर्मचाऱ्याला वेतनवाढ मिळेल किंवा कसे आणि असा कालावधी समाप्त झाल्यानंतर त्याच्या वेतनवाढी लांबणीवर टाकण्यावर अशा घटीचा परिणाम होईल किंवा नाही या संबंधी पुढील निर्देश देणे,

(६) समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवेच्या खालच्या टप्प्यात घट करणे,सर्वसामान्यपणे याचा अर्थ संस्थानाच्या कर्मचाऱ्याच्या समयश्रेणीतील वेतन श्रेणी पद किंवा सेवा यामधील पदोन्नतीवरील प्रतिबंध अ सा होतो,तेथून त्याच्या स्थानात घट होईल तसेच संस्थानाच्या कर्मचाऱ्याची समयश्रेणीतील वेतन श्रेणी,पद किंवा सेवेत ज्या स्थानातून आणि सेवाज्येष्ठतेतुन घट झाली त्या स्थानात किंवा सेवाज्येष्ठतेत पुनर्स्थापना कोणत्या अटीवर होइल यासंबंधी पुढील निर्देश दिली जातील किंवा नाही.

मोठया दंडात्मक कारवाया अंतर्गत

(७) सक्तीची सेवा निवृत्ती,

(८) सेवेतून काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे,

मात्र कोणतेही अधिकृत काम करण्यासाठी प्रेरणा किंवा बक्षिस म्हणून कायदेशीर मोबदल्याव्यतिरिक्त संस्थानाच्या कर्मचाऱ्याने कोणत्याही व्यक्तीकडून अर्थीक लाभ स्विकार केल्याचा आरोप सिध्द झाला तर खंड (७) किंवा (८) मध्ये नमुद केलेली दंडात्मक कारवाई लादली जाऊ शकते.

वरील शिक्षेपैकी एक शिक्षा देणेची तरतूद आहे.

D) श्री.संगमनेरे यांचेबाबत वेळोवळी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेल्या टिपण्या.

१) श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे,सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना वरील संदर्भ क्रं.०२ अन्वये वरिष्ठांचे स्वाक्षरीने कारणे दाखवा नोटीस काढण्यात आलेली असुन त्यांनी लेखी खुलासा सादर करावयास पाहिजे होता. परंतु त्यांनी प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी त्यांचेबाबत केलेल्या कर्मचारी गैरवर्तन रिपोर्ट मागणी दि.१९.०३.२०२० रोजीचे अर्जान्वये केलेली आहे.तरी श्री.संगमनेरे यांचेबद्दल प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी केलेल्या कर्मचारी गैरवर्तन रिपोर्टची छायांकित प्रत श्री.संगमनेरे यांना द्यावी किंवा कसे याबाबत आदेश होणेस विनंती आहे. याबाबतची टिपणी दि.२१.०३.२०२० रोजी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती.

श्री.संगमनेरे यांनी दि.१९.०३.२०२० रोजीचे विनंती अर्जाबाबत इकडील दि.२१.०३.२०२० रोजीची टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती.सदरचे टिपणीवर वरिष्ठांनी,"प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी सादर केलेल्या कर्मचारी गैरवर्तन रिपोर्टमधील सर्व मुद्दे कारणे दाखवा नोटीसीत नमुद आहे.त्यामुळे पुन्हा रिपोर्ट देण्याची आवश्यकता वाटत नाही." असे निर्देश दिलेले आहे.

**२)** तदनंतर श्री.संगमनेरे यांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसीचा खुलासा प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेमार्फत सादर करावयाचे नोटीसीत स्पष्ट निर्देश असतांनी त्यांनी दि.२३.०३.२०२० रोजीचा लेखी खुलासा सामान्य प्रशासन शाखा, आवक विभागास दिलेला आहे.

जा.नं.एसएसएस/साप्रशा/वशी-शिस्त/५०/२०२०,दि.१५-०४-२०२० रोजीचे पत्रान्वये श्री.संगमनेरे यांनी दिलेला दि.०७.०४.२०२० रोजीचा लेखी खुलासा स्पष्ट अभिप्रायाकरीता पाठविणेत आलेला आहे.

**३)** आता पुन्हा, श्री.संगमनेरे यांना देण्यात आलेल्या कारणे दाखवा नोटीसीचा खुलासा प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेमार्फत सादर करावयाचे नोटीसीत स्पष्ट निर्देश असतांनी देखील त्यांनी दि.०७.०४.२०२० रोजीचा लेखी खुलासा सामान्य प्रशासन शाखा, आवक विभागास दिलेला आहे. श्री.संगमनेरे हे वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचा वारंवार अवमान करत आहेत. उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत श्री.संगमनेरे यांना फक्त एकच कारणे दाखवा नोटीस काढण्यात आलेली आहे, परंतु त्यांनी आतापर्यंत नोटीसीचे खुलासे प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेमार्फत सादर न करता, उपरोक्त अ.नं.१ ते ३ प्रमाणे अर्ज/खुलासे सामान्य प्रशासन शाखा,आवक विभागास सादर केलेले आहेत. हे त्यांनी वरील आवक विभागा दिलेल्या अ.नं.१ ते ३ चे अर्ज/खुलासे यावरुन निदर्शनास येत आहे.

**४)** श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे,सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी दि.२३.०३.२०२० व दि.०७.०४.२०२० रोजी इकडील आवक विभागास दिलेला लेखी खुलासा उपरोक्त संदर्भ क्रं.६,८ रोजीचे पत्रासोबत प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांचेकडे स्वयंस्पष्ट अभिप्रायाकरीता पाठविणेत आलेले होते.

त्यास अनुसरुन प्राचार्य, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी दि.०४.०५.२०२० रोजीचा स्वयंस्पष्ट अभिप्राय सादर केलेला आहे.त्यात त्यांनी, श्री.संगमनेरे यांनी सादर केलेला खुलासा सर्व चुकिचा व खोटा सादर केल्याचे सिध्द केलेले आहे.श्री.संगमनेरे यांना मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात हजर राहणेबाबत श्री.सचिन एस.कोपरे, कंत्राटी कुशल कर्मचारी यांनी त्यांना दि.११.०३.२०२० रोजी हजर राहणेबाबत समक्ष भेट घेवुन निरोप दिलेला होता परंतु श्री.संगमनेरे हे मला सांगीतले नाही हे म्हणणे खोटे व

प्रशासनाची दिशाभुल करणारे आहे.त्याबाबत श्री.संगमनेरे यांना कळविणेत आलेले होते. तसे श्री.कोपरे यांनी दि.२८.०४.२०२० रोजीचे लेखी पत्र दिलेले आहे. प्रशासनाची दिशाभुल करावयाची म्हणून जुने प्रकरणातील कागदपत्रे देऊन, मुळ विषयाला व त्यांनी केलेल्या गैरवर्तनाच्या मुद्यास बगल देण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसुन येत आहे.असे प्राचार्य यांचे स्वयंस्पष्ट अभिप्रायात नमुद आहे.

श्री.संगमनेरे हे मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षात समक्ष भेटण्याचा निरोप मिळुनही उपस्थित न राहता खुलाशात खोटे विधान करुन प्रशासनाची दिशाभुल करत आहेत.

सबब, श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांना श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ नुसार श्री.संगमनेरे, यांना गैरशिस्त वर्तनाबाबत करावयाचे शिक्षेबाबत इकडील दि.०७.०५.२०२० रोजीची टिपणी वरिष्ठांकडे सादर करणेत आलेली होती. सदरचे टिपणीवर उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी," 'अ'प्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, (शिर्डी) सेवा (शिस्त आणि अपिल) विनियम २०१३ चे प्रकरण ३ मधील कलम ५ (१) अन्वये कार्यवाहीस हरकत नाही." असे निर्देश दिलेले होते. त्यास मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांची मान्यता मिळालेली होती.

श्री.संगमनेरे यांना करावयाचे शिक्षेबाबत दि.१८.०५.२०२० रोजी सादर करणेत आलेल्या आदेशाचे मसुदा मान्यतेचे वेळेस मा. वरिष्ठांसमक्ष झालेल्या चर्चेनुसार श्री.संगमनेरे यांना सेवा निलंबीत करणेत येवुन, विभागीय चौकशी करणेत यावी याबाबतचा प्रस्ताव निर्णयास्तव समिती समोर सादर करावा, असे निर्देश मिळालेले आहेत.

श्री.दिलीप विठ्ठलराव संगमनेरे, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय,शिर्डी यांना उपरोक्त गैरशिस्तवर्तनाबाबत संस्थान सेवेतून "सेवा निलंबीत" करुन, त्यांची विभागीय खाते चौकशी करता येईल. तरी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे समोर निर्णयासृतव सादर.

**निर्णय क्र.३१२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री दिलीप विठ्ठलराव संगमनेरे, सहा.शिक्षक, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय यांनी केलेले गैरशिस्तवर्तन व त्याबाबत प्रशासनाने वेळोवेळी केलेली कार्यवाही याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc)समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.०८** **मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार श्री.विजय गणपत रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांचा प्रशासकीय अधिकारी पदावर नेमणूक करणेबाबतचा अर्ज.**

**प्रस्ताव-** **अ) विषयाची पुर्वपिठीका -**

**अ-१)** मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.०७/०८/२००९ रोजीचे आदेशान्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या आस्थापनेवरील पदांचे आकृतीबंधास काही अटी शर्तीसह मान्यता दिलेली असुन त्यात खालीलप्रमाणे अटी-शर्ती नमुद करण्यात आलेल्या आहेत -

**अट-शर्त** क्र.१ - समितीने पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करावेत व त्यास शासन मान्यता घ्यावी. तसेच सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना सेवाप्रवेश नियमांचे काटेकोर पालन करणे आवश्यक राहील.

क्र.२ - सेवाप्रवेश नियमांमध्ये प्रत्येक पदांची शैक्षणिक पात्रता, जबाबदारी व कर्तव्य ढोबळ मानाने निश्चित करण्यात यावे. सेवाप्रवेश नियमांमध्ये पदोन्नतीची साखळी याबाबत स्पष्टपणे उल्लेख असावा.

क्र.३ - सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदांची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी.

क्र.४- सेवा प्रवेश नियमांमध्ये वेतनश्रेणीचा उल्लेख असावा.

क्र.५- आकृतीबंधातील मंजुर पदांवर काम करणा-या कर्मचा-यांना शासनाप्रमाणे निवृत्तीवेतन लागू असणार नाही.

क्र.६- समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पद भरती करता येणार नाही.

क्र.७ – समितीला कोणत्याही पदाचे पदनाम अथवा वेतनश्रेणी शासनाच्या पुर्व मान्यतेशिवाय बदलता येणार नाही.

क्र.८- समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरून व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

क्र.९- आस्थापनेवरील खर्च सिमीत करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतीनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतुद ठेवावी.

क्र.१०- तांत्रिक पदे नव्याने भरतांना त्याच क्षेत्रातील तज्ञांचा निवड प्रक्रियेत समावेश असेल याची दक्षता घ्यावी.

क्र.११- आकृतीबंधातील पदांवर नविन कर्मचा-यांची नियमित पदावर नियुक्ती झाल्यानंतर सदर कर्मचा-यांचा परिविक्षाधीन कालावधी एक वर्षाचा असावा व त्याचे वेतन वेतनश्रेणीतील सुरूवातीच्या टप्प्यावर निश्चित करावे.

**अ-२)** तसेच, मा.विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दि.२८/१०/२०१३ रोजीचे निर्णय व जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४४६०/२०१४, दि.२७/१२/२०१४ रोजीचा आदेशान्वये, संस्थान अधिनियम २००४ मधील तरतुदीस अनुसरून दि.०१/०१/२०१५ पासून शासनाने मान्यता दिलेले विनियम संस्थानला लागू करण्यात आलेले आहे. लागू केलेल्या सर्व साधारण सेवा अटी विनियम, २०१३ मधील प्रकरण ४ - नियुक्त्या, परिवीक्षा, सेवा समाप्ती आणि नियत वयमान मधील कलम १२ मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

(१) समिती आदेशाव्दारा विविध गटातील आणि प्रवर्गातील सेवा प्रवेशाचे धोरण आणि पध्दत घालुन देईल आणि उमेदवाराने भरावयाचा अर्ज नमुना किंवा नमुने आणि अशा अर्जांना जोडावयाची प्रमाणपत्रे आणि प्रमाणलेख विहित करेल.

(२) संस्थानाचे नियुक्ती प्राधिकारी संस्थानाच्या सेवेत सेवाप्रवेश आयोजित करताना वेळोवेळी महाराष्ट्र शासनाने अनुसूचीत जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, अपंग व्यक्ती, माजी सैनिक, या प्रवर्गातील उमेदवारांच्या किंवा शासनाने विहित केलेल्या इतर प्रवर्गातील उमेदवारांच्या शासकीय सेवा प्रवर्गाशी निगडीत वेळोवेळी पारित केलेल्या निर्देशांचे पालन करतील.

**अ-३)** तसेच, दि.२८ ऑक्टोबर, २०१३ च्या शासन निर्णयात नमुद केलेप्रमाणे श्री साईबाबा संस्थानचे आस्थापनेवरील विविध संवर्ग, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नती इत्यादीबाबत छाननी करून श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांच्या आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या नियुक्ती व पदोन्नतीच्या विनियमाचे प्रारूप पदांचा तपशिलांच्या परिशिष्टासह शासनास तातडीने सादर करण्यात यावे, असे निर्देश देण्यात आले आहेत.

संस्थानने विभागनिहाय व पदनिहाय सेवाप्रवेश नियम तयार करुन त्यास मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक १२/०६/२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४९३ अन्वये मान्यता घेऊन, सदर सेवाप्रवेश नियम (Recruitment Rules) परिशिष्ठासह जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७०/२०१४, दि.२६/०६/२०१४ रोजीचे प्रस्तावाअन्वये मा.प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांचेकडे मान्यतेसाठी सादर करण्यात आले होते.

तथापी, जा.नं.एसएसएस/वशी-०१/१४७०/२०१४, दि.२६/०६/२०१४ रोजीचे प्रस्तावावर मा.विधी व न्याय विभाग यांनी पत्र क्र.सासंवि २०१५/५१९/प्र.क्र.३२/का.१६, दि.३० जुन, २०१५ अन्वये, लेखी पत्र पाठविले असुन सदर पत्रान्वये शासनाने संस्थान सेवाप्रवेश नियमांना पुर्वप्रसिध्दी देणे आवश्यक असुन सादर करणेत आलेले सेवा प्रवेश नियम पुर्व प्रसिध्द करुन, हरकती मागविणेत येऊन योग्य त्या सुधारणा करुन पुन्हा सादर करणेत यावेत, असे कळविले आहे.

उपरोक्त अटी-शर्तीस अनुसरून प्रारूप सेवाप्रवेश नियम मा.व्यवस्थापन समिती दि.२७/०७/२०१५ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२२३ नुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२०२५/२०१५, दि.२७/०८/२०१५ चे परिपत्रकान्वये पूर्व प्रसिध्द करुन हरकती मागविण्यात आलेल्या होत्या. याकामी प्राप्त झालेल्या काही हरकतींवर मा.वरिष्ठ अधिकारी यांचे समक्ष सुनावणी घेऊन त्या फेटाळण्यात आल्या किंवा अंशतः मंजुर करणेत आल्या. सदरचा प्रस्ताव सन २०१४ पासुन प्रलंबित आहे.

**अ-४)** प्रलंबित सेवाप्रवेश नियम तसेच इतर आस्थापनाविषयक कामे करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६ फेब्रुवारी, २०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.१६५ अन्वये श्री त्र्यंबक अंबादास खैरे, ॲड.डॉ.मधुकर दगडु गिरी, श्री बाळासाहेब बापुराव भंडारकवठे व श्री अशोक विठ्ठलराव शिंदे, सेवानिवृत्त शासन अधिकारी यांचे कार्यगटाची नियुक्ती करण्यात आलेली आहे. या कार्यगटाने कामकाज सुरू केलेले असुन सदरचे कामकाज पुर्ण झालेनंतर शासनाचे मान्यतेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येईल.

**अ-५)** मा. शासनाचे मान्यतेसाठी दि.२६ जुन, २०१४ रोजी सादर करणेत आलेल्या **प्रारूप सेवाप्रवेश नियमांमध्ये** सर्व साधारणपणे “प्रशासकीय अधिकारी” पदासाठी खालीलप्रमाणे शैक्षणिक अर्हता व पात्रता नमुद/प्रस्तावित करणेत आलेली होती.

**विभाग - सामान्य प्रशासन विभाग**

| **Designation**<br>**पदनाम** | **Pay scale**<br>**वेतनश्रेणी** | **Total Post**<br>**एकुण पदसंख्या** | **Qualification**<br>**पात्रता** | |
|---|---|---|---|---|
| | | | **By Nomination** | **By Promotion** |
| Administrative Officer<br>प्रशासकीय अधिकारी | (६ व्या वेतनआयोगानुसार)<br>15600-39100<br>Grade Pay 5400<br>(७ व्या वेतनआयोगानुसार)<br>S-20<br>(56100-177500) | 05<br>(दि.7/8/2009 चे मंजूर आकृतीबंधानुसार) | On Deputation from Government of Maharashtra | 1) Graduate from any Government recognized University;<br>2) MS-CIT or Government prescribed equivalent Computer Operating Course;<br>3) Experience minimum 5 years in Superintendent OR Law Officer OR Labour Officer OR Accounts Officer in Sansthan. |

मा. शासनाचे मान्यतेसाठी सादर करणेत आलेल्या **प्रारूप सेवाप्रवेश नियमांमध्ये** सरळसेवा व पदोन्नतीने पदे भरण्याचे प्रमाण ५०:५० असे प्रस्तावित करणेत आलेले होते.

**अ-६) यापुर्वी,** संस्थान आस्थापनेवरील प्रशासकीय अधिकारी या रिक्त पदांचे भरतीबाबत मा.व्यवस्थापन समितीचे दि.१८/०७/२०१२ रोजीच्या सभेमध्ये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

“संस्थानचा दिवसेंदिवस वाढता व्याप व नवीन संगणकीय माहिती तंत्रज्ञानाचा वापर इत्यादी विचारात घेता सध्या रिक्त असणा-या प्रशासकीय अधिकारी या पदांच्या ५०% पदांवर शासनाकडुन महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांचेमार्फत निवड करण्यात आलेल्या तहसिलदार संवर्गातील व अन्य संवर्गातील अधिका-यांना प्रतिनियुक्तीवर घेण्यात यावे व उर्वरित ५०% पदे संस्थान सेवेतील कर्मचा-यांमधुन पदोन्नतीने घेणेत यावे आणि एक प्रशासकीय अधिकारी पद तांत्रिक दृष्टया संस्थानचे कामाचे स्वरूप पहाता संस्थानने ठरविलेल्या आवश्यक शैक्षणिक पात्रता व कामाचा अनुभव असलेल्या संवर्गातील घेणेबाबत प्रस्ताव सादर करावा. ”

**अ-७)** मा. त्रिसदस्यीय समितीचे दिनांक १५ मार्च, २०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक २११ नुसार “ महाराष्ट्र शासनाकडून दि.०७/०८/२००९ रोजी मंजूर होऊन आलेल्या संस्थानच्या कर्मचारी आकृतीबंधानुसार ०५ प्रशासकीय अधिका-यांची पदे मंजुर असून, त्यापैकी ०१ पद भरलेले असून इतर ०४ पदे रिक्त आहेत. यामधील ०२ पदांवर शासनाकडून योग्य व लायक अधिकारी प्रतिनियुक्तीने प्रशासकीय अधिकारी या पदावर घेणेबाबत पत्रव्यवहार चालू आहे. त्यामुळे ०२ पदांवर सेवाजेष्ठता व शैक्षणिक पात्रतेनुसार श्री. सुर्यभान विठ्ठलराव गमे व श्री सुभाष नारायण गर्कल यांना प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नतीने नेमणूक देण्यात यावी. तसेच उर्वरित ०२ पदांवार श्री. उत्तम पंढरीनाथ गोंदकर व श्री. दिलीप त्र्यंबक उगले यांना शासनाकडून योग्य व लायक अधिकारी प्रतिनियुक्तीने उपलब्ध होईपर्यंत (अॅडव्हॉक नेमणूक) या अटीवर प्रशासकीय अधिकारी या पदावर सेवाजेष्ठता व शैक्षणिक पात्रतेनुसार पदोन्नतीने नेमणूक देण्यात यावी. त्याच बरोबर त्यांना सदर पदाचे लागु असलेले वेतन बॅण्ड, ग्रेड पे व अनुज्ञेय असणारे भत्ते देण्यात यावे, असे ठरले.”

त्यानुसार, जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४२१६/२०१४, दि.२० मार्च, २०१४ नुसार श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, यांना व जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४२१७/२०१४, दि.२० मार्च, २०१४ नुसार श्री सुभाष नारायण गर्कल यांना प्रशासकीय अधिकारी या पदावर कार्यात्मक पदोन्नती देण्यात आलेली होती. तसेच जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/आस्था/४२१८/२०१४, दि.२० मार्च, २०१४ नुसार श्री उत्तम पंढरीनाथ गोंदकर यांना व जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/४२१९/२०१४, दि.२० मार्च, २०१४ नुसार श्री दिलीप त्र्यंबकराव उगले यांना प्रशासकीय अधिकारी या पदावर तात्कालिक आधारावर (on Ad-hoc Basis promotion) पदोन्नतीने नेमणूक देण्यात आलेली होती. तसेच तात्कालीन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे आदेशान्वये

(जा.नं.एसएसटीएस/वशी/वशी-१/९३८/२०१५, दिनांक ३० मे, २०१५ रोजीचे) श्री अशोक रभाजी औटी, यांचेकडे प्र. प्रशासकीय अधिकारी या पदाचा कार्यभार सोपविण्यात आलेला आहे. त्यापैकी श्री सुभाष नारायण गर्कल, प्रशासकीय अधिकारी हे दिनांक ३० जुन, २०१५ रोजी व श्री उत्तम पंढरीनाथ गोंदकर, प्र. प्रशासकीय अधिकारी हे दिनांक ३१ मे, २०१८ रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत.

**अ-८)** **आता,** श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी हे दिनांक ३१ मे, २०२० रोजी व श्री अशोक रंभाजी औटी, प्र. प्रशासकीय अधिकारी हे दिनांक ३० जुन, २०२० रोजी सेवानिवृत्त होत आहे. त्यानुसार श्री सुर्यभान विठ्ठलराव गमे, प्रशासकीय अधिकारी व श्री अशोक रभाजी औटी, प्र. प्रशासकीय अधिकारी हे सेवानिवृत्त झालेनंतर संस्थान आस्थापनेवर श्री दिलीप त्र्यंबकराव उगले, प्र. प्रशासकीय अधिकारी व डॉ आकाश किसवे, प्रशासकीय अधिकारी (प्रतिनियुक्ती) असे एकूण दोनच प्रशासकीय अधिकारी कार्यरत राहतील. संस्थान आस्थापनेवरील ०५ प्रशासकीय अधिकारी पदांपैकी ०३ प्रशासकीय अधिकारी पदे रिक्त राहणार आहेत.

**ब) मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे आदेशानुसार श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांची प्रशासकीय अधिकारी या पदावर नियुक्ती करणेबाबत-**

**ब-१)** मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, यांचा आदेश-

श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, येथील कोर्टात प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी रिट पीटीशन नं. ४०१८/२०१९ दाखल केलेले होते. त्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाचे दि.११ मार्च, २०२० व दि.१८ मार्च, २०२० रोजी निकालपत्र/आदेश प्राप्त झालेले आहे.

मा.उच्च न्यायालयाचा निकाल व श्री रोहमारे यांनी मा.उच्च न्यायालयात केलेली मागणी यांचा तक्ता खालीलप्रमाणे-

| अ. क्र. | श्री रोहमारे यांनी मा.उच्च न्यायालयात केलेली मागणी (Prayer clause) | मा.उच्च न्यायालय यांचा दि.११ मार्च, २०२० रोजीचा आदेश | मा.उच्च न्यायालय यांचा दि.१८ मार्च, २०२० रोजीचा सुधारित आदेश |
|---|---|---|---|
| **A** | By way of Writ of Mandamus or any other writ or order, the impugned order dated 19/12/2018 (EXH. A-13) issued by the Respondent no.3 may kindly be quashed and set aside | 7. In the light of the statement made by the learned advocate for the Sansthan, it is not necessary to go into debate of promotion. The designation of the petitioner and the respondent No. 4 appears to be a Deputy Executive Engineer.<br>8. As only additional charge is given to supervise the work, we need not entertain the petition as far as said order is concerned and the clarification is given that the respondent No. 4 is not an additional Administrative Officer<br>9.The another Contention of the petitioner is that, the respondent No.4 is writing confidential reports of the petitioners, but the confidential reports may be written by the administrative officer. The confidential reports cannot be written by the person holding co-ordinate post.<br>10. Mr. Kale, the learned advocate for the respondent No. 3/ sansthan submits that, the administrative officer would write the confidential reports of the petitioner. | - |

| | | | |
|---|---|---|---|
| **B** | By way of Writ of Mandamus or any other Writ or Order, it may please be declared that the Petitioner is senior to the Respondent no.4 (in view of earlier Service Experience of the Petitioner after acquiring qualification) while considering the claim of the petitioner on the post of Administrative Officer . | 11. As far as prayer clause " B ''is concerned, the respondent Nos. 2 and 3 may take decision upon the representation of the petitioner on its own merits, in accordance with law, expeditiously and preferably within a period of three (03) months from today . | 4. In light of that, in para No .11 of the order dated 11th March, 2020 instead of prayer clause (B) the same be substituted as prayer clause (D). |
| **C** | By way of Writ of Mandamus or any other Writ or Order, the Respondent Sansthan may please be directed to consider the claim of the Petitioner for his promotion to the post of Administrative Officer (Technical).<br>Or in the alternative<br>By way of Writ of Mandamus or any other Writ or Order, the Respondent Sansthan may please be directed to consider the claim of the Petitioner for his Promotion to the post of Administrative Officer. | We cannot consider prayer clause C in view of the orders passed in writ petition filed by the petitioner earlier. The review filed by the petitioner is also dismissed. | - |
| **D** | By way of Writ of Mandamus or any other Writ or Order, direct the Respondents to consider the representation of the Petitioner submitted on 5/11/2015 as early as possible preferably within the period of 15 days from the date of the order of this Hon' ble Court. | - | As far as prayer clause "D'' is concerned, the respondent Nos 2 and 3 may take decision upon the representation of the petitioner on its own merits, in accordance with law, expeditiously and preferably within a period of three (03) months from today. |
| **E** | By way of Writ of Mandamus or any other Writ or Order, direct the Respondents to pay additional charge pay benefits | - | - |

| | | | |
|---|---|---|---|
| | [i.e. 5% of Basic + Grade pay] for 32 years (being HoD of Electrical Department) and for 8 years (being HoD of Water supply department) and for 27 years (being HoD of Mechanical Department) and for 14 years (being HoD of Sound System and CCTV department). | | |
| **F** | Pending hearing and final disposal of this Writ Petition, the impugned order dated 19/12/2018 **(EXH. A-13)** asking the Respondent no.4 to take charge of the post of Executive Engineer in the Respondent no.2 Sansthan, may kindly be stayed. | - | - |
| **G** | Any other suitable relief to which the Petitioner is entitled, in the facts and circumstances of the matter, to may please be issued in favour of the petitioner, in the interest of justice and obliged. | - | - |

उपरोक्त तक्त्यातील मा.उच्च न्यायालयाचे आदेशाचे अवलोकन करता, दि.११ मार्च २०२० मधील मुद्दा क्र.११ व दि.१८ मार्च, २०२० मधील मुद्दा क्र.०४ मध्ये नमुद केलेप्रमाणे, श्री रोहमारे यांच्या प्रशासकीय अधिकारी पदी नेमणुक होणेकामीचा दि.०५.११.२०१५ रोजीचा अर्जावर तात्काळ तीन महिन्याच्या आत गुणवत्तेनुसार व नियमानुसार संस्थानने निर्णय घ्यावा, असे मा.उच्च न्यायालयाने आदेशात म्हंटले आहे. सोबत, श्री.रोहमारे यांचा दि.०५.११.२०१५ रोजीचा प्रशासकीय अधिकारी म्हणुन नेमणुक होणेबाबतचा अर्ज अवलोकनार्थ सादर केला आहे.

उपरोक्त श्री रोहमारे यांचे दाव्याचे अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाबाबत लेखी अभिप्राय वजा मार्गदर्शन मिळणेकामी संस्थानचे मा.उच्च न्यायालयातील कामकाज पहाणारे विधीतज्ञ (वकील) ॲड.नितीन भवर पा. यांना दि.१३ एप्रिल, २०२० रोजीचे पत्र देणेत आलेले आहे. तथापी सध्या कोव्हीड-१९ चे प्रादुर्भावामुळे सर्वत्र लॉकडाऊन असल्याने त्यांचा अभिप्राय प्राप्त होऊ शकलेला नाही.

**ब- २) श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांचा संस्थान सेवेतील तपशील खालीलप्रमाणे-**

| **कर्मचा-यांचे नांव** | **जात** | **नियुक्ती दिनांक** | **नियुक्ती चे पदनाम** | **सध्याचे पदनाम व वेतनश्रेणी** | **शैक्षणिक पात्रता** | **अनुभव** |
|---|---|---|---|---|---|---|
| श्री विजय गणपतराव रोहमारे | हिंदु - कुणबी | १-७-१९८६ | विद्युत अभियंता | उपकार्यकारी अभियंता (विद्युत) ०६ व्या वेतन आयोगानुसार १५६०० - ३९१०० | डिप्लोमा इन इलेक्ट्रीकल इंजिनिअरींग -प्रथम श्रेणी, बी.ए. (यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ, नाशिक), एमएससीआयटी, कॅम्प्युटर कन्सेप्टस कोर्स, | १. दि.०१.०७.१९८६ रोजी विद्युत अभियंता पदी नेमणुक.<br>२. दि.२६.०४.२०१३ रोजीच्या आदेशान्वये विद्युत अभियंता पद उपकार्यकारी अभियंता असे करण्यात आले. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | ग्रेड पे ५४०० + ६०० | इलेक्टीकल सुपरवायझर कोर्स. [D.E.E.1$^{ST}$ Class, MS-CIT, B.A.(Y.C.M.O.U), Electrical supervisory Course, Computer Concepts course] | ३. साधारणतः ३३ वर्ष सेवाकालावधीमध्ये श्री रोहमारे यांनी पाणीपुरवठा, ध्वनीक्षेपण, सीसीटीव्ही, दुरध्वनी, मेकॅनिकल विभाग यांचेकडील कामकाज ही पाहिलेले आहे. |
| | जन्म दिनांक - २३-९-१९६१ | **सेवानिवृत्ती दिनांक-** ३०-०९-२०२१ | | ०७ व्या वेतन आयोगानुसार S-21 (57100-180800) | | |

**ब-३) श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांचे गोपनीय अहवालबाबत माहिती खालीलप्रमाणे-**

| वर्ष | २००९-१० | २०१०-११ | २०११-१२ | २०१२-१३ | २०१३-१४ | २०१४-१५ | २०१५-१६ | २०१६-१७ | २०१७-१८ | २०१८-१९ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ग्रेड | **A** | **A+** | **A+** | **A+** | **A** | **A** | **A+** | **A+** | **A+** | **A+** |

**ब-४) श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांचेवर सेवाकालावधीत झालेल्या कार्यालयीन कारवाईचा तपशिल-**

| **अ.क्र.** | **कारवाईचा तपशिल** |
|---|---|
| १ | जा.नं.वशी-१० ए/१०६६८/१९८७, दि.२६/०६/१९८७ अन्वये गैरशिस्त वर्तनाबाबत चुका न होणेबाबत दक्षता घ्यावी. |
| २ | जा.नं.वशी-७ए/२५०७/१९९३, दि.०३/०३/१९९३ रोजीचे आदेशान्वये गैरशिस्त वर्तनाबाबत नुकसान भरपाई म्हणुन रक्कम रू.६०००/- मात्र पगारातुन वसुल करण्यात आली. |
| ३ | जा.नं.वशी-७ए/९७५/२००२, दि.२३/०४/२००२ रोजीचे आदेशान्वये दि.२३/०४/२००२ पासुन ०३ महिने सक्तीचे रजेवर पाठविणेत आले. |
| ४ | जा.नं.वशी-७ए/२१५६/२००५, दि.१६/०९/२००५ अन्वये गैरशिस्त वर्तनाबाबत सुचना देण्यात आली. |
| ५ | जा.नं.वशी-७ए/३६६४/२०१०, दि.३०/०६/२०१० अन्वये फिंगर प्रिन्ट पंचिग वेळेत करावे अशी सुचना देण्यात आली. |
| ६ | जा.नं.वशी-७ए/३५२३/२०१४, दि.२७/१०/२०१४ अन्वये गैरशिस्त वर्तनाबाबत सक्त ताकीद देण्यात आली. |
| ७ | जा.नं.वशी-७ए/४०४७/२०१६, दि.२६/०१/२०१६ रोजीच्या पत्रान्वये गैरशिस्त वर्तनाबाबत समज देण्यात आली. |
| ८ | जा.नं.वशी-७ए/१४१४/२०१६, दि.१३/०७/२०१६ रोजीच्या पत्रान्वये गैरशिस्त वर्तनाबाबत समज देण्यात आली. |
| ९ | जा.नं.वशी-७ए/४७७९/२०१८, दि.१५/०३/२०१८ रोजीच्या पत्रान्वये गैरशिस्त वर्तनाबाबत लेखी समज देण्यात आली. |

**क)** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे सेवाप्रवेश नियम, सुधारीत विभागनिहाय आकृतीबंध, पदोन्नतीचे पदे, पदोन्नती साखळी, बिंदुनामावली याबाबतचे कामे प्रलंबित असल्याने, मा. शासनाकडुन अद्याप मंजुरी न मिळाल्याने व मंजुर नियमातील प्रमोशन/सरळ सेवा प्रमाण (Ratio) निश्चित न झालेने आरक्षणाबाबत संस्थानमध्ये सुस्पष्ठ नियमावली नाही. म्हणुन संस्थानचे प्रशासकीय कामकाजाच्या सोईच्या दृष्टीने तात्पुरत्या स्वरुपात (on Ad-hoc Basis) संस्थान आस्थापनेवरील सेवाजेष्ठ अधिकारी यांची गुणवत्ता व पात्रतेनुसार प्रभारी प्रशासकीय अधिकारी म्हणून नेमूणक करावी लागणार आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई, खंडपीठ औरगांबाद यांच्या आदेशानुसार, श्री रोहमारे यांचा गोपनीय अहवाल लिहिणेबाबत निर्णय होणेस व प्रशासकीय अधिकारी पदी नेमणुक होणेकामीचा दि.०५.११.२०१५ रोजीचा अर्जावर तात्काळ तीन महिन्याच्या आत गुणवत्तेनुसार व नियमानुसार निर्णय घ्यावा लागणार असल्याने उपरोक्त अ, ब व क चे अवलोकन होऊन श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांना प्रशासकीय अधिकारी म्हणुन नेमणुक देणेबाबतचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे विचारार्थ/निर्णायार्थ सविनय सादर .

**निर्णय क्र.३१३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री विजय गणपतराव रोहमारे, उपकार्यकारी अभियंता (विद्युत) यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई, औरंगाबाद खंडपीठ, येथील कोर्टात प्रशासकीय अधिकारी या पदावर पदोन्नती मिळणेकामी रिट पीटीशन नं.४०१८/२०१९ दाखल केलेले होते. त्यासंदर्भात मा.उच्च न्यायालयाचे दि.११ मार्च, २०२० व दि.१८ मार्च, २०२० रोजी निकालपत्र/आदेश प्राप्त झालेले असुन सदरचा विषय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर विलंबाने का सादर केला? याबाबत संबधीत श्री.गमे यांना नोटीस देऊन खुलासा मागविण्यात यावा व तोपर्यंत त्यांचे सेवा निवृत्तीची देयके थांबवून ठेवावे, असे ठरले. तसेच प्रस्तुत प्रकरणी निर्णय घेणेसाठी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करुन तीन महिन्याची मुदत वाढवुन मागणेबाबत कार्यवाही करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.०९** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे सुधारीत आकृतीबंध व इतर आस्थापनाविषयक कामकाजासाठी नेमण्यात आलेल्या सेवानिवृत्त शासन अधिकारी यांचे कार्यगटास मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **विषयाची पूर्वपिठीका-**

**(अ)** मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २८ ऑक्टोबर, २०१३ व दिनांक ३० जानेवारी, २०१४ चे पत्रान्वये, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवरील पदांचे कर्मचारी आकृतीबंधास अनुसरुन,संस्थानचे आस्थापनेवरील विविध संवर्ग, त्यांची शैक्षणिक पात्रता, नियुक्ती, वेतनश्रेणी व पदोन्नती इत्यादीबाबत छाननी करुन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांचे आस्थापनेवरील कर्मचा-यांच्या नियुक्ती व पदोन्नतीच्या विनियमाचे प्रारुप पदांच्या तपशिलांच्या परिशिष्टासह शासनास तातडीने सादर करणेबाबत कळविलेले होते.

त्यानुसार तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे **दिनांक १२ जून, २०१४** रोजीचे सभेतील **निर्णय क्रमांक ४९३** अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे आस्थापनेवारील कर्मचा-यांचे सेवाप्रवेश नियम - विनियम मध्ये प्रस्तावित दुरुस्त्या करणेत येऊन, सदर सेवाप्रवेश नियमाचा प्रस्ताव परिशिष्टांसह मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस मान्यतेसाठी सादर करणेत यावा, असा निर्णय पारित करणेत आला.

उपरोक्त निर्णयानुसार संस्थानचे विविध विभागातील पदांबाबत आवश्यक ते बदल करुन तसेच सेवाप्रवेश नियमांमध्ये दुरुस्त्या करणेत येऊन प्रारुप सेवा प्रवेश नियमांचा प्रस्ताव परिशिष्टांसह मा. प्रधान सचिव, विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र क्रमांक १४७०/ २०१४, दिनांक २६ जून, २०१४ अन्वये, सादर करणेत आला होता.

उपरोक्त दिनांक २६ जून, २०१४ रोजीचे सादर करणेत आलेल्या प्रस्तावाबाबत, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील पत्र दिनांक ३० जून, २०१५ नुसार, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम,२००४ च्या कलम २५(३) मधील तरतुदीनुसार सदर अधिनियमांतर्गत लागू करण्यात आलेल्या नियमांना पुर्व प्रसिद्धी देणे आवश्यक असुन त्याप्रमाणे प्रस्तुत प्रकरणी सदर नियमांना पुर्वप्रसिद्धी देण्यात आली आहे किंवा कसे हे स्पष्ट करावे, असे कळविले.

मा. शासनाचे उपरोक्त दिनांक ३० जून, २०१५ रोजीचे पत्रानुसार कार्यवाही करुन सेवाप्रवेश नियमाचा अंतिम मसुदा सादर करणेत येईल, असे सामान्य प्रशासन विभागाकडील पत्र दिनांक ३१ जुलै, २०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे.

संस्थान आस्थापनेवरील कर्मचा-यांनी त्यांचे सेवाप्रवेश अंतिम न झाल्यामुळे त्यांच्या नियुक्ती व पदोन्नतीत अनियमितता होत असल्याच्या अनेक तक्रारी संस्थान प्रशासनास व शासनाकडे प्राप्त झालेल्या आहेत. त्यामुळे सेवाप्रवेश नियम अंतिम करणे आवश्यक आहे. शासनाकडून या संदर्भात वारंवार पत्रव्यवहार करुनही सेवाप्रवेश नियम तयार करुन त्यांना पुर्वप्रसिध्दी देवुन त्याचे प्रारुप अद्यापही शासनास सादर करणे प्रलंबित आहेत.

**(ब)** तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६.०२.२०१९ रोजीचे सभेत निर्णय क्र.१६५ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी चे कर्मचा-यांचा सुधारीत आकृतीबंध व सेवाप्रवेश नियम एक महिन्यात करणेकामी या क्षेत्रातील सेवानिवृत्त शासकीय अधिकारी/कर्मचारी यांची मानधनावर नेमणूक करणेस व याकामी येणा-या अनुषंगीक खर्चास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयानुसार, सामान्य प्रशासन विभागाकडील दिनांक ११ जून, २०१९ व दिनांक १३ जून, २०१९ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये, संस्थान आस्थापनेवरील विविध विभागांचे सुधारित आकृतीबंध आणि सेवाप्रवेश नियमांचे प्रारुप तयार करुन त्यास अंतिम स्वरुप देणे, मा. शासनाने सुधारित आकृतीबंध व सेवाप्रवेश नियमांस मान्यता दिलेनंतर बिंदू नामावली तयार करुन अद्यायवत करणे आदि अनुषंगिक आस्थापनाविषयक सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचारी यांची नामिका सुची / कार्यगट तयार करणेकामी महाराष्ट्रातील प्रमुख वर्तमान पत्रातुन संस्थानचे अधिकृत संकेत स्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, दिनांक ०५ जुलै, २०१९ अखेर अर्ज मागविणेत आलेले होते.

सदर जाहिरातीत नमूद केलेनुसार दिनांक ०५ जुलै, २०१९ अखेर एकूण ३६१ अर्ज प्राप्त झालेले होते. सदर प्राप्त झालेल्या अर्जांची सर्वंकष तपासणी प्रशासकीय स्तरावर करणेकामी मा. वरिष्ठ अधिका-यांची उपसमिती गठीत करणेत येऊन, प्राप्त अर्जांमधून उचित व योग्य असलेल्या एकूण १७ सेवानिवृत्त शासकीय अधिकारी / कर्मचा-यांच्या दिनांक ०९ ऑगष्ट, २०१९ रोजी थेट मुलाखती घेण्यात येऊन ०४ अधिकारी / कर्मचारी यांची आस्थापना विषयक कामकाजासाठी व ०१ अधिकारी यांची जमीन व महसूल विषयक तसेच भूसंपादन विषयक कामकाज करणेकामी मालमत्ता विभागाकडे नेमणूक करण्यात आलेली आहे. त्यानुसारखालील पाच अधिकारी / कर्मचारी यांना प्रथमतः ०३ (तीन) महिन्यांकरीता नियुक्ती आदेश देण्यात आलेले होते. त्यानुसार ते **दिनांक ०३ सप्टेंबर, २०१९** पासून रुजू झालेले आहेत.

तक्ता क्र. ०१

| अ.क्र. | निवड करण्यात आलेल्या अधिकारी / कर्मचारी यांचे नांव व पत्ता |
|---|---|
| ०१ | श्री. त्र्यंबक अंबादास खैरे, पंचवटी, नाशिक |
| ०२ | अ‍ॅड. डॉ. मधुकर दगडू गिरी, लातूर |
| ०३ | श्री. बाळासाहेब बापूराव भंडारकवठे, हडपसर, पुणे |
| ०४ | श्री. अशोक विठ्ठलराव शिंदे, वडगांव बुद्रूक, पुणे |
| ०५ | श्री. सुरेश सुधाकर भालेराव, कर्मवीरनगर, कोपरगांव |

**(क)** मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०९ ऑगष्ट, २०१९ रोजीचे सभेत उपरोक्त तक्त्यातील अ.क्र. ०१ ते ०४ अधिकारी यांची संस्थान आस्थापनेवरील विविध विभागांचे सुधारित आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम, बिंदूनामावली यासह इतर अनुषंगिक आस्थापना विषयक कामकाजासाठी सेवा करार पध्दतीने प्रथमतः ०३ महिन्यांकरीता नियुक्ती करणेत येऊन, या कालावधीत विषयांकित कामकाज पूर्ण करुन घेणेत यावे. तथापि, सदर कालावधीत कामकाज पूर्ण न झालेस, या कालावधीत करणेत आलेल्या कामकाजाचा आढावा घेऊन, त्यांना मुदतवाढ देणेबाबत विहित पध्दतीने यथावकाश निर्णय घेणेत यावा, असे ठरलेले होते.

दिनांक ०९ ऑगष्ट, २०१९ रोजीचे इतिवृत्तातील कलम ०७ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे-

परिशिष्ट अ मधील अ.नं. ०१ ते ०५ यांची विषयांकित कामकाजासाठी प्रथमतः ०३ महिन्यांकारीता नियुक्ती करणेतयेऊन, या कालावधीत विषयांकित कामकाज पूर्ण करुन घेणेत यावे. तथापि, सदर कालावधीत कामकाज पूर्ण न झालेस, या कालावधीत करणेत आलेल्या कामकाजाचा आढावा घेऊन, त्यांना मुदतवाढ देणेबाबत विहित पध्दतीने यथावकाश निर्णय घेणेत यावा. त्यानुसार संबंधित कार्यगटाचा कार्यवृत्तांत अहवाल मा. तदर्थ समितीचे **दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२० रोजीचे सभेत सादर करण्यात आलेला होता, त्यावर निर्णय क्र. ५९ खालीलप्रमाणे झालेला आहे.**

“यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सुधारित आकृतीबंध, सेवाप्रवेश नियम, पदोन्नतीची साखळी, कार्यपध्दती एकल पदे तसेच आरक्षण नियमानुसार बिंदु नामावलीचे प्रस्ताव तयार करणेकामी नेमणूक करण्यात आलेले सेवानिवृत्त शासकीय कर्मचारी १) श्री. त्र्यंबक अंबादास खैरे २) अ‍ॅड. डॉ. मधुकर दगडू गिरी ३) श्री. बाळासाहेब बापूराव भांडारकवठे ४) श्री. अशोक विठ्ठलराव शिंदे यांना आस्थापना विषयक कामकाजासाठी दिनांक ०३ डिसेंबर, २०१९ पासून पुढील ०६ महिन्यांकरीता आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देणेस मान्यता देण्यात आली.

संस्थानचे जमीन, महसूल व भूसंपादन विषयक कामकाज करणेकामी सेवानिवृत्त नायब तहसिलदार श्री. सुरेश सुधाकर भालेराव यांना सामान्य प्रशासन, महाराष्ट्र शासन, निर्णय क्र. संकिर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३

दि. १७/१२/२०१६ नुसार मानधन देण्यात येऊन दिनांक ०५ डिसेंबर, २०१९ पासून पुढील ०६ महिन्यांकरीता आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली.

तसेच सदर सेवानिवृत्त कर्मचा-यांना केलेल्या कामाचा त्रैमासिक अहवाल मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले."

त्यानुसार १) श्री. त्र्यंबक अंबादास खैरे २) अॅड. डॉ. मधुकर दगडू गिरी ३) श्री. बाळासाहेब बापूराव भांडारकवठे ४) श्री. अशोक विठ्ठलराव शिंदे यांना आस्थापना विषयक कामकाजासाठी दिनांक ०३ डिसेंबर, २०१९ पासून पुढील ०६ महिन्यांकरीता आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देणेत आली होती. तसेच श्री. सुरेश सुधाकर भालेराव यांना सामान्य प्रशासन, महाराष्ट्र शासन, निर्णय क्र. संकिर्ण -२७१५/प्र.क्र.१००/१३ दि. १७/१२/२०१६ नुसार मानधन देण्यात येऊन दिनांक ०५ डिसेंबर, २०१९ पासून पुढील ०६ महिन्यांकरीता आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात आली होती.

आस्थापना विषयक कामकाजासाठी नेमलेल्या कार्यगटाने एकूण ४० विभागांचे आकृतीबंध प्रारुप मसुदा तयार करुन इकडील विभागास सदर केलेले आहेत.

**तक्ता क्र. ०२ (अ)**

| **अ.क्र.** | **विभागाचे नांव** | **अ.क्र.** | **विभागाचे नांव** |
|---|---|---|---|
| ०१ | व्दारावती भक्त निवासस्थान विभाग | ०२ | श्री साईबाबा भक्त निवासस्थान विभाग |
| ०३ | अभिलेख कक्ष | ०४ | ध्वनीक्षेपण आणि दूरध्वनी विभाग |
| ०५ | प्रसादालय विभाग | ०६ | लाडू व बर्फी प्रसाद विभाग |
| ०७ | मालमत्त विभाग | ०८ | साईप्रसाद निवासस्थान विभाग |
| ०९ | बगीचा विभाग | १० | विधी विभाग |
| ११ | सभा कामकाज विभाग | १२ | जनसंपर्क विभाग |
| १३ | कॅन्टीन विभाग | १४ | साईआश्रम धर्मशाळा विभाग |
| १५ | साईआश्रम भक्तनिवासस्थान विभाग | १६ | अग्निशमन विभाग |
| १७ | आरोग्य विभाग | १८ | बांधकाम विभाग |
| १९ | मुंबई विभाग | २० | यांत्रिकी विभाग |
| २१ | प्रकाशने विभाग | २२ | संरक्षण विभाग |
| २३ | विद्युत विभाग | २४ | वाहन विभाग |
| २५ | माहिती व तंत्रज्ञान विभाग | | |

**तक्ता क्र. ०२ (ब)**

| **अ.क्र.** | **विभागाचे नांव** | **अ.क्र.** | **विभागाचे नांव** |
|---|---|---|---|
| ०१ | खरेदी विभाग | ०२ | भांडार विभाग |
| ०३ | औद्योगिक प्रशिक्षण संस्था | ०४ | पाणी पुरवठा विभाग |
| ०५ | कन्या विद्या मंदिर | ०६ | कनिष्ठ महाविद्यालय |
| ०७ | सामान्य प्रशासन विभाग | ०८ | मंदिर विभाग |
| ०९ | लेखा विभाग | १० | साई नॉलेज पार्क |
| ११ | श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल | १२ | सीसीटीव्ही नियंत्रण कक्ष |
| १३ | वरिष्ठ महाविद्यालय | १४ | श्री. साईबाबा सुपरस्पेशालिटी हॉस्पीटल |
| १५ | श्री साईनाथ रुग्णालय | १६ | कामगार विभाग |

उपरोक्त पैकी तक्ता ०२ (अ) हा दि. ०३ सप्टेंबर, २०१९ ते दि. ०२ डिसेंबर, २०१९ या कालावधीत २५ विभागांचा व ०२ (ब) हा दिनांक ०३ डिसेंबर, २०१९ ते दिनांक २७ जानेवारी, २०२० अखेर १६ विभागांचा आकृतीबंध प्रारुप मसुदा तयार करुन सामान्य प्रशासन विभागाकडे सादर केलेला आहे. तसेच दिनांक २२/०५/२०२० रोजीचे पत्रान्वये कार्यगटाने संस्थानमधील विविध संवर्गाचे सेवाप्रवेश नियम तयार करण्याचे कामास सुरवात केलेली असून सदरचे काम प्रगती पथावर आहे. सध्यस्थितीत राज्यात तसेच देशात कोवीड-१९ या रोगाचा प्रादुर्भाव वाढलेला असल्याने प्रचलित कार्यपध्दती प्रमाणे शिर्डी येथे येऊन कामाबाबतचा अहवाल देणे शक्य होत नाही. तसेच संदर्भीय नियुक्ती पत्रातील अट क्र. १७ मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यगटाचे सोईनुसार

सेवा प्रवेश नियमांचे अनुषंगिक कामकाज, कार्यगटातील सदस्यांनी संबंधितांचे स्वस्थळी (work from home) पूर्ण करीत आहेत. ही बाब कार्यगटाने दिनांक १०/०४/२०२० च्या पत्रान्वये प्रशासनास विदीत केलेली आहे. दिनांक २०/०५/२०२० पावेतो कार्यगटाने २०८ संवर्गांचे सेवाप्रवेश नियम तयार केलेले असून उर्वरीत संवर्गाचे सेवा प्रवेश नियम तयार करण्याचे काम प्रगती पथावर आहे. या बाबींचा विचार करतां सदर कार्यगटास मुदतवाढ द्यावी, असे मत आहे.

**आता, संबंधीत कार्यगटाने दिनांक २२/०५/२०२० रोजीचे विनंती पत्रान्वये सुधारीत आकृतीबंध तयार करणे, सेवा प्रवेश नियम तयार करणे, बिंदू नामावली नोंदवही तयार करणे यासह इतर अनुषंगिक आस्थापना विषयक कामकाजासाठी दि. १२/०३/२०२० च्या आदेशान्वयेदि. ०३/१२/२०१९ पासून सहा महिन्यांची मुदतवाढ दिलेली आहे. तथापि अद्यापही कार्यगटास नेमून दिलेले काम पूर्ण झालेले नाही. यास्तव राहिलेले कामे पूर्ण करण्याकरिता कार्यगटास दि. ०३/०६/२०२० पासून पुढील ०६ महिन्यांची मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे**.

**(ड)** तसेच दिनांक०९ ऑगष्ट, २०१९ रोजीचे इतिवृत्तातील कलम ०८ मध्ये पुढीलप्रमाणे नमूद करणेत आलेले आहे- “उपरोक्त परिशिष्ट अ मध्ये अ.नं. ०५ श्री. सुरेश सुधाकर भालेराव, कोपरगांव यांना मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक ०४ जुलै, २०१९ रोजीचे सभेतील निर्णयानुसार, संस्थानचे जमीन व महसूल विषयक तसेच भूसंपादन विषयक कामकाज करणेकामी प्रथमतः०१ वर्षासाठी एकत्रित मानधनावर नियुक्त करणेत यावे.”

त्यानुसार श्री. सुरेश भालेराव, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांना मालमत्ता विभागाकडे जमिन महसूल व भूसंपादन विषयक अनुषंगिक कामे करण्यासाठी प्रथमतः तीन महिन्यांकरीत मानधनावर नेमणूक करण्यात आली आहे. त्यानुसार ते दिनांक ०५ सप्टेंबर,२०१९ पासून रुजू झालेले आहेत. त्यांनी सदरचे कालावधीत केलेल्या कामविषयीचा अहवाल उपरोक्त संदर्भ क्र. १० नुसार सादरकेलेले आहे. तथापि त्यांची दिनांक ०४ डिसेंबर, २०१९ रोजी त्यांना प्रथमतः तीन महिन्यांचे मानधन तत्वारील नेमणकीचे कालावधीचीमुदत संपुष्टात येत आहे. तसेच उर्वरित कामांसाठी त्यांना मुदतवाढ मिळणेसाठी दिनांक २०/११/२०१९ रोजीचे अर्जान्वये विनंती केलेली होती.

त्यास, अनुसरुन मुदतवाढीबाबतचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे दिनांक ०६ फेब्रुवारी, २०२० रोजीचे सभेपुढे सादर करण्यात आलेला होता. त्यावर दि. ०६/०२/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५९ नुसार जा.क्र.एसएसएस/ साप्रशा/ आस्था/ ४८६४/२०२० दि. १२/०३/२०२० रोजीचे आदेशान्वये सदर नियुक्तीस दिनांक ०५ डिसेंबर, २०१९ पासून पुढील सहा महिन्यांकरीता आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यात आली होती. त्याची मुदत दिनांक ०६/०६/२०२०रोजी संपत असल्याने दिनांक १८/०५/२०२० रोजीचे पत्र / अहवालानुसार श्री. सुरेश सुधाकर भालेराव, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांनी ते करत असलेली कामे प्रगतीपथावर आहेत. सदरचे कामाचा विचार करुन त्यांना पुनश्चः मदुतवाढ मिळणेबाबत विनंती केलेली आहे.

त्यानुसार जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/१८२/२०२० दि.२३/०५/२०२० रोजीचे पत्रान्वये श्री. सुरेश सुधाकर भालेराव, सेवानिवृत्त नायब तहसिलदार यांना मालमत्ता कक्षाकडील दैनंदिन कार्यालयीन कामकाजाचे दृष्टीने मुदतवाढ देणेत यावीकिंवा कसे? याबाबत मालमत्ता विभागाचा स्वयंस्पष्ट अभिप्राय सामान्य प्रशासन विभागास तातडीने देण्याबाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार मालमत्ता विभागाने जा.नं.एसएसएसटी/ मालमत्ता/ १८८/ २०२० दि. २८/०५/२०२० रोजीचे पत्रानुसार खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

“ श्री. सुरेश सुधाकर भालेराव, सेवानिवृत्त नायब तहसिलदार, तां. सल्लागार मालमत्ता विभाग यांचेमार्फत १) संस्थानचे मालमत्ता / मिळकत रजिस्टर तयार करणे. २) संस्थान जमीनींचे ७/१२ उतारे अद्ययावत करणे. ३) मालमत्ता विभागाकडील जमीन व महसूल विषयक व तदनुषंगाने भविष्यात येणारी कामे, नविन जमीन खरेदीकामी कागदपत्रांची पुर्तता करणेकामी सहाय्य करणे, कागदपत्रांमध्ये काही तांत्रिक अडचणी असल्यास त्या निराकारण करणे व महसुल विभागाशी संपर्क साधून त्या सोडविणे, त्यांचे निराकरण करणे, इ. कामे चालू आहेत. उपरोक्तकामी जमीन महसुल बाबींबाबत सखोल ज्ञान असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची आवश्यकता असल्याने श्री. सुरेश सुधाकर भालेराव यांना आहे त्याच अटी शर्तीवर पुढील मुदतवाढ देणेस हरकत नाही, असे नम्र मत आहे.”

मालमत्ता विभागाने दिलेल्या उपरोक्त अभिप्रायास अनुसरुन, श्री. सुरेश सुधाकर भालेराव, सेवा निवृत्त नायब तहसिलदार यांना मालमत्ता व भूसंपादन कामकाज विषयक कामांसाठी सुदतवाढ देता येईल, असे मत आहे.

उपरोक्त परिच्छेद “अ” ते “ड” मध्ये नमूद केलेल्या वस्तुस्थितीदर्शक विवेचनास अनुसरुन,

(१) तक्ता क्र. ०१ मधील अ.नं. ०१ ते ०४ मध्ये नमूद केलेले सेवानिवृत्त शासकीय अधिकारी अनुक्रमे
१) श्री. त्र्यंबक अंबादास खैरे २) अॅड. डॉ. मधुकर दगडू गिरी ३) श्री. बाळासाहेब बापूराव भांडारकवठे
४) श्री. अशोक विठ्ठलराव शिंदे यांना आस्थापना विषयक कामकाजासाठी दिनांक ०३ जुन, २०२० पासून. पुढील ०३ महिन्यांकरीता आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

तक्ता क्र. ०१ मधील अ.नं. ०५ मध्ये नमूद केलेले सेवानिवृत्त शासकीय अधिकारी श्री. सुरेश सुधाकर भालेराव यांना दिनांक ०५ जुन, २०२० पासून पुढील ०६ महिन्यांकरीता आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३१४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीचे सुधारीत आकृतीबंध व इतर आस्थापनाविषयक कामकाजासाठी नेमण्यात आलेल्या सेवानिवृत्त शासन अधिकारी १) श्री.त्र्यंबक अंबादास खैरे २) अॅड.डॉ.मधुकर दगडू गिरी ३) श्री.बाळासाहेब बापूराव भांडारकवठे ४) श्री.अशोक विठ्ठलराव शिंदे यांना आस्थापना विषयक कामकाजासाठी दिनांक ०३ जुन, २०२० पासून पुढील ०१ महिन्यांकरीता आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यास तसेच सेवानिवृत्त शासकीय अधिकारी श्री. सुरेश सुधाकर भालेराव यांना मालमत्ता व भूसंपादन कामकाज विषयक कामांसाठी दिनांक ०५ जुन, २०२० पासून पुढील ०३ महिन्यांकरीता आहे त्याच अटी शर्तीवर मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. मात्र मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सबंधीतांनी केलेल्या कामकाजाचा आढावा घेऊन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.१०** **संस्थानचे आस्थापनेवरील "कार्यकारी अभियंता" या स्थायी पदावर मा.महाराष्ट्र शासनाकडील या पदाचे समकक्ष संवर्गातील शासकीय अधिकाऱ्याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती होणेकामी प्रस्ताव सादर करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** **(अ)** श्री साईंचे समाधी दर्शनासाठी शिर्डी येथे येणारे साईभक्तांचे गर्दीत दिवसेंदिवस लक्षणीय वाढ होत आहे. साईभक्तांना मुलभूत सेवा सुविधा, जसे दर्शन, निवास, प्रसाद, वैद्यकिय सुविधा विनासायास व विनाविलंब उपलब्ध व्हाव्यात म्हणून संस्थान आस्थापनेवर सामान्य प्रशासन, लेखा, मंदिर, निवासस्थाने, प्रसादालय, बांधकाम, विद्युत असे एकमेकांशी कामकाजात पूरक असे विविध ४० विभाग कार्यरत आहेत. या विभागांचे दैनंदिन कामकाजाचे प्रभावी नियंत्रण व्हावे, कामकाजात सातत्य राहून सेवा-सुविधा उपलब्ध करुन देणेसाठी मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी त्यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००९/४३३/(३७/०९)/का.१६, दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ चे शासन निर्णयान्वये, संस्थानाचे कर्मचारी आकृतीबंधास काही अटी-शर्तीस अधिन राहून मान्यता मान्यता दिलेली आहे.यामध्ये विविध तांत्रिक– अतांत्रिक विभागांचा समावेश आहे.

दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ रोजीचे आकृतीबंधाचे शासन निर्णयात अट व शर्त क्रमांक ०९ मध्ये "..आस्थापनेवरील खर्च सिमित करण्यासाठी राज्य शासनाच्या अधिका-यांची आकृतीबंधामध्ये निश्चित पदांवर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्याची तरतूद ठेवावी " तसेच "..शक्यतो संस्थानच्या मंजूर आकृतीबंधातील अधिकतम अधिकारी शासनाकडून प्रतिनियुक्तीवर घ्यावेत " असे ही नमुद करणेत आलेले आहे.

या मंजूर आकृतीबंधातील कार्यकारी अभियंता (०६ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० + ग्रेड पे ६६००) या संवर्गातील रिक्त स्थायी पदावर सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र.टीएफएस-१११७/प्र.क्र.९५(७)/सेवा-१, दि.२६ मे, २०१७ अन्वये, श्री. रविंद्र सतीश घुले, कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद(सा.बां.) विभाग क्रमांक-२, रत्नागिरी यांची श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सव कालावधीत संस्थान आस्थापनेवर 'कार्यकारी अभियंता'या पदावर प्रतिनियुक्तीने नियुक्ती करण्यात येऊन, ते सेवेत रुजू झालेले होते.

तद्-नंतर सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील आदेश क्र. पीओजी – टीएफएस - १११८ / प्र.क्र.२२५/ सेवा-१, दिनांक १७ डिसेंबर, २०१८ अन्वये, श्री. घुले यांची कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (अदिवासी) विभाग, कळवण, नाशिक येथे विनंतीनुसार बदली करणेत आलेने, त्यांना संस्थान सेवेतून दिनांक १९ डिसेंबर, २०१८ रोजी कार्यमुक्त करणेत आलेले होते आणि त्यांचेऐवजी श्री. राजेंद्र

पुंडलीक मोने (वाणी), (सहाय्यक संशोधन अधिकारी, महामार्ग संशोधन विभाग, नाशिक) यांची प्रतिनियुक्तीने नियुक्ती करणेत आलेली होती, तथापि श्री. मोने (वाणी) हे संस्थान सेवेत रुजू झालेले नाहीत.

त्यामुळे, संस्थान आस्थापनेवरील रिक्त झालेल्या 'कार्यकारी अभियंता'या स्थायी पदाचा संस्थानाचे प्रशासकीय कामकाजाचे सोयीचे दृष्टीने, तात्पुरता प्रभारी कार्यभार श्री.रघुनाथ भागा आहेर, उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग यांचेकडेस दिनांक १९ डिसेंबर, २०१८ पासून सोपविणेत आलेला आहे. सध्या श्री. आहेर यांचेकडेस पर्यवेक्षणासाठी बांधकाम, पाणीपुरवठा, विद्युत व मेकॅनिकल हे विभाग देणेत आलेले आहेत.

**(ब)** उपरोक्त परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील शासन निर्णय क्रमांक सासंवि-२००९/४३३/(३७/०९)/का.१६, दिनांक ०७ ऑगष्ट, २००९ अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी च्या आस्थापनेवरील पदांचा काही अटी-शर्तीस अधिन राहून आकृतीबंध मंजूर करणेत आलेला आहे. या आकृतीबंधानुसार संस्थान आस्थापनेवरील विविध विभागांसाठी एकूण ४८३८ पदांना मंजूरी दिलेली असून, यामध्ये २९२० कायम कर्मचारी पदे + १९१८ कंत्राटी कर्मचारी पदांना मंजुरी देणेत आलेली आहे.

मा. शासनाने संस्थानाचे आकृतीबंधास काही अटी-शर्तीस अधिन राहून मान्यता दिलेली आहे. तसेच या शासन निर्णयात, मुख्य कार्यकारी अधिकारी, उप मुख्य कार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व सुरक्षा अधिकारी ही पदे सध्या राज्य शासनाकडून प्रतिनियुक्तीने भरणेत येतात. तसेच शक्यतो संस्थानचे मंजूर आकृतीबंधातील अधिकतम अधिकारी शासनाकडून प्रतिनियुक्तीने घ्यावेत, असे स्पष्टपणे नमूद केलेले आहे.
उपरोक्त मंजूर आकृतीबंधामध्ये **बांधकाम विभागाचे आकृतीबंधात 'कार्यकारी अभियंता - ०१ पद'** हे ०५ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी रुपये १०६५०-१५८५० म्हणजेच ०६ व्या वेतनआयोगातील वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० + ग्रेड पे ६६०० मध्ये नमूद करण्यात आलेले आहे. तसेच संस्थान सेवेतील प्रवेशासाठी तयार करावयाचे **प्रस्तावीत सेवाप्रवेश नियमात बांधकाम विभागाकडील 'कार्यकारी अभियंता - ०१ पद' या पदासाठी By Nomination या रकान्यात On Deputation from Government असे नमूद करणेत आलेले आहे.**

सदरहू प्रस्तावित सेवाप्रवेश नियम दिनांक २५ जून, २०१४ रोजी मा. शासनाकडे सादर करणेत आलेले होते, परंतु सदरचे प्रस्तावित सेवाप्रवेश नियम पूर्वप्रसिध्द करुन, संस्थान मधील कायम कार्यरत असणा-या कर्मचा-यांचे हरकती बोलावून अंतिम करणेबाबत मा. शासनाकडून कळविणेत आलेले आहे, त्यानुसार सेवाप्रवेश नियमांचा मसुदा अंतिम करणेचे काम सुरु आहे.

**(क)** विषयांकित प्रस्तावाचे अनुषंगाने विवेचन असे की, सध्या संस्थान व्यवस्थापनामार्फत साईभक्तांना मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध होणे कामी खालील प्रमाणे विविध विकास प्रकल्पांचे कामकाज सुरु आहे –

०१. श्री साईबाबा मंदिर शिर्डी दर्शन रांग इमारत बांधकाम - अपेक्षित खर्च रू. १०९.५० कोटी.
०२. नविन शैक्षणिक संकुलाची उभारणी करणे-अपेक्षित खर्च रू. २१८ कोटी.
०३. साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीच्या खोल्यांचे नुतनीकरण करणे -अपेक्षित खर्च रू.१३.०८ कोटी.
०४. श्री साईनाथ रूग्णालय इमारतींवर वाढीव तिस-या मजल्याचे बांधकाम करणे- अपेक्षित खर्च रू.३.९९ कोटी.
०५. श्री साई आश्रम भक्तनिवास येथील खोल्यांचे रंगकाम व दुरूस्तीचे काम करणे- अपेक्षित खर्च रू.४.८३ कोटी.
०६. घनकचरा प्रक्रिया प्रकल्प - अपेक्षित खर्च रू.०४.३५ कोटी खर्च अपेक्षित.
०७. साई नॉलेज पार्क उभारणे- अपेक्षित खर्च रु.१६६.३९ कोटी.
०८. लाडु व बुंदी प्रसाद प्रोसेसिंग युनिट उभारणे –अपेक्षित खर्च रू.२९.७३ कोटी.
०९. शिर्डी नगरपंचायत हद्दीतील रस्तांचे भूसंपादन करणे, ते विकसित करणे.
१०. निळवंडे धरण पाणी पुरवठा योजना कार्यान्वीत करणे.

उपरोक्तपैकी काही विकास प्रकल्पांचे कामकाज प्रगतीपथावर असून, काही विकास प्रकल्प नजिकचे काळात कार्यान्वीत होणार आहेत.

सध्या संस्थान आस्थापनेवरील 'कार्यकारी अभियंता' हे स्थायी पद रिक्त असून, या पदाचा अतिरिक्त कार्यभार / प्रभार संस्थान आस्थापनेवर कार्यरत असणारे उपकार्यकारी अभियंता (बांधकाम) यांचेकडेस सोपविणेत आलेला आहे. 'कार्यकारी अभियंता' हे तांत्रिक व प्रशासकीय पद असल्याने या पदावर कार्यरत असणारे अधिकारी यांचेकडेस दैनंदिन कामकाजाचे नियंत्रण व पर्यवेक्षणासाठी संस्थान आस्थापनेवरील बांधकाम, विद्युत, पाणीपुरवठा व मेकॅनिकल विभाग इत्यादी तांत्रिक विभाग देणेत आलेले आहेत.

वर नमुद केलेले विकास प्रकल्प संस्थान व्यवस्थापनाचे महत्वाकांक्षी प्रकल्प असून, ते वेळेत पूर्ण होणे गरजेचे आहे. याकरीता संस्थान आस्थापनेवरील 'कार्यकारी अभियंता' या रिक्त स्थायी पदावर मा. शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील ०६ वेतन आयोगातील वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० + ग्रेड पे ६६०० (म्हणजेच ०७ व्या वेतन आयोगातील पे मॅट्रीक्स (एस-२३) या वेतनस्तरातील रुपये ६७७००-२०८७०० या वेतनश्रेणीतील) या संवर्गातील समकक्ष व सक्षम शासकीय अधिका-याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती होणे गरजेचे आहे.

उपरोक्त परिच्छेदांत नमुद केलेल्या बाबींचा विचार करतां, संस्थान आस्थापनेवरील 'कार्यकारी अभियंता' या स्थायी पदावर मा. शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील " कार्यकारी अभियंता " (०६ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१०० + ग्रेड पे ६६००) या संवर्गातील समकक्ष व समक्ष अधिका-याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती होणेकामी मा. विधी व न्याय विभाग आणि मा. सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस प्रस्ताव सादर करणेकामी, मा. तदर्थ समितीची मान्यता मिळालेनंतर, संस्थान आस्थापनेवरील " कार्यकारी अभियंता " या स्थायी पदावर मा. शासनाकडून संबंधीत पदाचे समकक्ष व सक्षम शासकीय अधिका-याची प्रतिनियुक्तीने नेमणूक होणेकामी प्रस्ताव सादर करता येईल, असे मत आहे.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेकामी मा. तदर्थ समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.३१५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान आस्थापनेवरील 'कार्यकारी अभियंता' या स्थायी पदावर शासनाचे सार्वजनिक बांधकाम विभागाकडील "कार्यकारी अभियंता" (०६ व्या वेतन आयोगातील वेतनश्रेणी रुपये १५६००-३९१००+ग्रेड पे ६६००) या संवर्गातील समकक्ष व समक्ष अधिका-याची प्रतिनियुक्तीने नियुक्ती होणेकामी मा.विधी व न्याय विभाग आणि सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडे प्रस्ताव सादर करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग)**

---

**विषय नं.११** **श्री साईबाबा समाधी मंदिर, श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पिटल तसेच साई प्रसादालय येथे बदलत्या काळानुरुप व आवश्यकतेनुसार बदल करणेबाबतचे श्री.कैलास बापु कोते व इतर शिर्डी ग्रामस्थ यांचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** उपरोक्त विषयान्वये, श्री. कैलास बापू कोते व इतर शिर्डी ग्रामस्थ यांनी दि.२३/०५/२०२० रोजीचे पत्राने बदलत्या काळानुसार श्री साईबाबांचे समाधी मंदिर येथील दर्शनबारी, साईबाबा संस्थानचे प्रसादालय, श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पीटल येथे भविष्यातील गरजेनुसार आणि साईभक्तांच्या सुलभतेसाठी काही आवश्यक बदल अत्यंत गरजेचे असलेबाबत कळविले आहे. त्यास अनुसरुन संदर्भीय पत्रात खालील बाबी नमूद आहे.

| अ.नं. | विषय | तपशिल |
|---|---|---|
| ०१ | साईबाबा समाधी मंदिर येथे एस्कॅलेटर (Escalator) बसविणेबाबत. | श्री साईबाबा समाधी मंदिरात साईभक्तांना सुलभतेने दर्शन मिळावे यासाठी साई मंदिरामध्ये एस्कॅलेटरची (Escalator) व्यवस्था करणे गरजेचे वाटते. एस्कॅलेटरला साईबाबांच्या समाधीच्या दोन्ही बाजुंनी नंदीपासून सुरुवात होईल आणि त्याचा शेवट समाधीच्या मागील दरवाजाजवळ होईल. नंदीजवळ एस्कॅलेटरला सुरुवात होण्यापुर्वी ५ फुट अगोदरच साईभक्तांना पाय धुण्यासाठी वाहत्या पाण्याची व्यवस्था करणेत यावी. पाय धुऊन साईभक्त एस्कॅलेटर चढला की धीम्या गतीने साईसमाधीकडे आपोआप पुढे सरकेल, तो एस्कॅलेटरने दर्शनासाठी जात असतांना हात जोडून साईबाबांमध्ये एकरुप होत दर्शनात रममाण होईल. समाधीजवळ पोहोचल्यावर नेहमी समाधीला असणारी काच नसल्याने काही क्षण या साईभक्ताला पादुकांना समाधीला हात लावून मनोभावे दर्शनाचा लाभ घेता येईल. या दरम्यान या साईभक्ताला सुरक्षारक्षक कोणत्याही प्रकारे लोटू शकणार नाही. साधारण नंदीपासून ते समाधी दर्शन घेऊन बाहेर पडेपर्यंत एक ते दीड मिनिट साईबाबांमध्ये एकरुप होता येईल. |
| ०२ | साईबाबा समाधी मंदिरात सॅटीन रुमाल आणि तत्सम प्रकारच्या वस्तु नेण्यास बंदी करावी. | श्री साईबाबा समाधी मंदिरात यापुढे कायमस्वरुपी सॅटिन रुमाल व तत्सम प्रकारच्या वस्तु नेण्यास बंदी करावी. जेणेकरुन पॉलिसीवाल्यांकडून सातत्याने याच गोष्टींच्या माध्यमातुन होणारी साईभक्तांची लूट थांबेल. |
| ०३ | साईबाबा मंदिरात व्हीआयपी आणि गावकरी यांचे ब्रेक दर्शनाचे नियोजन करणेबाबत. | श्री साईबाबा मंदिरात दर्शनासाठी अनेक व्हीआयपी, आमदार, खासदार, मंत्री, सेलिब्रिटी, गावकरी, अधिकारी, डोनेशन देणारे असंख्य साईभक्त या सर्वांचा सकाळी मंदिर उघडल्यापासून ते रात्री मंदिर बंद होईपर्यंत व्हीआयपी दर्शनासाठी ओघ सुरु असतो. त्याचा गैरफायदा साईबाबा संस्थानचे काही सुरक्षारक्षक काही गावकरी जे पास न काढता अथवा पास विकुन साईभक्तांना फसविण्याचे काम करत असतात. या प्रकाराला आळा बसावा म्हणून साईमंदिरात यापुढे व्हीआयपी, आमदार, खासदार, मंत्री, सेलिब्रिटी, गावकरी, अधिकारी, डोनेशन देणारे असंख्य साईभक्त यांचेसाठी दिवसभरात २ वेळा प्रत्येकी १ तासासाठी ब्रेकदर्शनाचे नियोजन करावे, जेणेकरुन या सर्वांना सुलभतेने दर्शन घेता येईल. या सर्वांचा योग्य तो मानपान |

| | | |
|---|---|---|
| | | देखील ठेवला जाईल आणि डोनेशन करणारांचा आदर सत्कार करता येईल. या वागणुकीमुळे डोनेशन देणा-या भक्तांची संख्या देखील वाढेल. यासाठी अंदाजे सकाळी ८ ते ९ वाजता, दुपारी ३ ते ४ वाजता, सायंकाळी ७ ते ८ वाजता अशा दर्शनाच्या २ वेळा निश्चीत कराव्यात. याकाळात नंदिपासून पाठीमागेच दर्शनरांग बंद राहील. दरम्यान या सर्व व्हीआयपी, आमदार, खासदार, मंत्री, सेलिब्रिटी, गावकरी, अधिकारी, डोनेशन देणारे असंख्य साईभक्त या सर्वांना नंदीपासून दर्शनासाठी प्रवेश देता येईल. या ठिकाणी साईबाबा संस्थानच्या अधिका-यांना व्हीआयपींचे सुलभतेने व्हीआयपी दर्शन होण्यासाठी लक्ष केंद्रीत करता येईल. या १ तासाच्या दर्शनाच्या स्लॉटमुळे कुणालाही बोगस दर्शन घेता येणार नाही आणि कदाचित कुणी असे करण्याचा प्रयत्न केला तर त्यावर कडक कारवाई केली जाईल. या ब्रेक दर्शनाच्या वेळेत शिर्डी ग्रामस्थांची ५ जणांची कमिटी केली तर बोगस दर्शन घेणारांवर देखील यामुळे नियंत्रण राहील. |
| ०४ | साईभक्तांना टाईम दर्शनाचे टोकन देणेबाबत... | साईभक्तांनी दर्शनासाठी अगोदर ऑनलाईन बुकींग करावी, व या साईभक्ताला शिर्डीत आल्यावर संस्थानचे दर्शनाचे टोकन द्यावे. टोकन मिळाल्यावरच साईभक्तांच्या दर्शनाची वेळ निश्चीत करता येईल. या साईभक्तांना साईंच्या दर्शनासाठी एक दिवस अगोदर शिर्डीत यावे लागेल मगच त्यांना दुस-या दिवसाचे टाईम दर्शनाचे टोकन मिळेल, म्हणजेच तिरुपती बालाजीच्या धर्तीवर एक दिवस अगोदर शिर्डीम मुक्काम करणे बंधनकारक राहील. |
| ०५ | साईभक्तांना तुपातील लाडू ऐवजी तेलातील बुंदीचा अथवा इतर प्रसाद देणेबाबत. | साईभक्तांना देण्यात येणारा लाडूचा प्रसाद बंद करण्यात यावा कारण यातील तुपाच्या खरेदी निमित्ताने सातत्याने होणारा भ्रष्टाचार हा चर्चेचा विषय ठरतो. परिणामी जागतिक पातळीवर शिर्डी व साईबाबा संस्थानचे नाव खराब होत असते. तूप खरेदीत यापुर्वी देखील भरपूर वेळेस भ्रष्टाचाराचे आरोप झालेले आहेत. साईभक्तांना प्रसाद रुपाने गाईच्या तुपातील लाडू ऐवजी तेलातील बुंदीचे पाकीट प्रसाद म्हणून वितरीत करण्यात यावेत किंवा लाडू ऐवजी प्रसाद रुपात दुसरे काय देता येईल यावर पर्याय सुचवावा. कारण सध्या देण्यात येणारा लाडूचा प्रसाद साधे २ दिवस देखील टिकत नाही आणि यामुळे श्री साईबाबांची शिर्डी व साईबाबा संस्थान यांची बदनामी होत असेल तर नव्याने देण्यात येणारा प्रसाद कमीत कमी ७/८ दिवस तरी टिकेल यासाठी विचार होणे अत्यंत गरजेचे आहे. |
| ०६ | प्रसादालय येथील मोफत भोजन सशुल्क करणेबाबत. | प्रसादालयातील जेवण मोफत देण्याऐवजी सर्वसामान्य सर्वांना प्रती व्यक्ती ५० रुपये आणि व्हीआयपींना प्रति व्यक्ती १०० रुपये असा दर आकारण्यात यावा. या साईभक्तांना देण्यात येणा-या जेवणाची क्वालिटी सुधारावी आणि त्यांना स्वादिष्ट जेवण देखील दिले जावे. या निमित्ताने साईबाबा संस्थानच्या तिजोरीत देखील मोठी भर पडेल. |
| ०७ | साईबाबा संस्थानच्या साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील रुग्णसेवेबाबत. | साईबाबा संस्थानच्या हॉस्पीटल्स मध्ये रुग्णांना देण्यात येणारी मोफत वैद्यकीय सेवा बंद करावी. त्याऐवजी पैसे आकारुन रुग्णांना चांगली व दर्जेदार वैद्यकीय सेवा उपलब्ध करुन द्यावी. ज्या रुग्णांना शासकीय योजनेतून वैद्यकीय सेवेचा लाभ घ्यायचा असेल अशा रुग्णांनी संबंधित योजनेतून तो मोफत घेण्यास काही हरकत नाही. |
| ०८ | साईबाबा संस्थानचे विविध भक्तनिवास येथील निवासाचे दर वाढविणेबाबत. | द्वारावती भक्तनिवास, ५०० रुम भक्तनिवास या भक्तनिवासातील साईभक्तांच्या निवासाचे दर वाढवावेत. साईआश्रम मधील फेज १ आणि २ जे साईभक्तांना निवासासाठी मोफत देण्यात येते त्या ठिकाणी सुध्दा दर आकारणी करावी, जेणेकरुन साईबाबांच्या गंगाजळीत भर पडेल. |
| ०९ | साईबाबा संस्थानचे साईभक्तांच्या मनोरंजनासाठी विविध प्रकल्प सुरु करणेबाबत. | साईबाबा संस्थानचे साईभक्तांच्या मनोरंजनासाठी लेझर फाऊन्टन, म्यझियम, बर्ड सेन्चुरी, मेडिटेशन हॉल, डिस्नेलॅंड आणि वेगवेगळे विषय बीओटी तत्वावर द्यावेत. त्यामुळे शिर्डीत दर्शनासाठी येणा-या साईभक्तांचा येण्याचा ओघही वाढेल आणि साईभक्तांच्या मनोरंजनाची देखील व्यवस्था होईल. |
| १० | साईबाबा मंदिर येथील सायरन अन्यत्र बसविणेबाबत. | साईबाबा मंदिरावर असणारा सायरन आरतीच्या वेळी वाजवला जातो. साईभक्त व ग्रामस्थांच्या श्रेध्देय भक्तीचा विचार करत हा सायरन साईबाबा समाधी मंदिर परिसरातच परंतु अन्यत्र बसविला जावा. |
| ११ | कुठलीही ऑनलाईन बुकींग न करता थेट शिर्डीत दर्शनासाठी येणा-या भक्तांच्या दर्शनाविषयी. | शिर्डी येथे साईबाबांच्या दर्शनासाठी सर्वच ठरतील भक्त दर्शनासाठी येत असतात. यात गोर गरीब अथवा अशिक्षितांचे प्रमाण देखील मोठे आहे. अशा ऑनलाईन बुकींग न करता थेट शिर्डीत दर्शनासाठी येणा-या साईभक्तांच्या दर्शनाची व्यवस्था करणेबाबत निर्णय घेणे आवश्यक आहे. |
| १२ | शिर्डीतील मुळगावकरी यांना विशिष्ट दर्शनपास देणेबाबत. | शिर्डी शहरातील साईबाबा हयात असताना जे कुटूंब त्या काळापासुन शिर्डी येथे वास्तव्य करत आहेत अशा सर्व जाती धर्मांच्या कुटूंबाना शोधुन त्यांचे बाबत सखोल माहिती घेऊन अशा ख-या गावक-यांनाच विशिष्ट असे गावकरी पास देण्यात यावेत. |
| १३ | शिर्डी शहरातील मनोजकुमार रोड (जुना पिंपळवाडी रोड) वाहतुकीसाठी खुला करणेबाबत. | शिर्डी शहरातून साईमंदिरा जवळून जाणारा जुना पिंपळवाडी रोड अर्थात मनोजकुमार रोड साईभक्त व ग्रामस्थांच्या सुलभतेसाठी वाहतुकीसाठी खुला करण्यात यावा. |
| १४ | विश्वस्तांच्या नातेवाईकांना देण्यात येणारी व्हीआयपी आरती / दर्शन पास सशुल्क करणेबाबत. | साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीच्या विश्वस्त मंडळातील विश्वतांच्या नातेवाईकांना येथील जनसंपर्क कार्यालय विनाशुल्क मोफत व्हीआयपी आरती अथवा दर्शन देत असते. विश्वस्तांना मोफत देण्यात येणारे साईबाबांचे व्हीआयपी आरती दर्शन त्वरीत सशुल्क करण्यात यावे. |
| १५ | साईबाबांच्या गंगाजळीतील शिल्लक रक्कम आणि सोनेचांदी जाहीर करु नये याबाबत. | श्री साईबाबा संस्थानद्वारे वर्षभरात झालेल्या प्रमुख उत्सवानंतर जाहीररित्या साईबाबा संस्थानकडे किती पैसे शिल्लक आहेत अथवा किती जमा झाले याचा लेखाजोखा मिडिया समोर मांडत असते. याची वारंवार जाहीर वाच्यता करणे सयुक्तीक वाटत नाही तरी साईबाबा संस्थान यांनी अशा प्रकारे आपल्याकडे किती शिल्लक आहे हे बाहेर जाहीर करु नये. |

उपरोक्त अ.नं १ ते १५ याप्रमाणे श्री. कैलास बापू कोते व इतर शिर्डी ग्रामस्थ यांनी वरील प्रमाणे बदल सुचविले असून, त्याबाबत विचार होऊन सुचविलेले बदल प्रत्यक्षात राबवावेत अशी विनंती केली आहे.

सोबत, समस्त शिर्डी ग्रामस्थ यांनी दि.२३/०५/२०२० रोजी दिलेल्या अर्जाची छायांकीत प्रत अवलोकनार्थ जोडली आहे.

तरी, उपरोक्त प्रस्ताव अवलोकनार्थ व यथायोग्य निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३१६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा समाधी मंदिर, श्री साईबाबा व साईनाथ हॉस्पिटल तसेच साई प्रसादालय येथे बदलत्या काळानुरुप व आवश्यकतेनुसार बदल करणेबाबत श्री.कैलास बापु कोते व इतर शिर्डी ग्रामस्थ यांनी अर्जात नमुद केलेल्या बाबींबाबत प्रशासकीय स्तरावर मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी अभ्यास करुन सविस्तर अहवाल मा.तदर्थ समितीचे सभेपुढे सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही- सामान्य प्रशासन विभाग/ सर्व विभाग)**

---

**विषय नं.१२** **साईनगर कर्मचारी वसाहत इमारतीचे परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे कामाचे ठेकेदार जगताप इनफ्राव्हेंचर्स इंडिया प्रा.लि.कोल्हार यांचे पहिले व अंतिम देयक रु.१२,०७,३३८/-मात्र मंजुर करणेस व उर्वरीत शिल्लक देय रुपये ४,३७,४९०/-मात्र आदा करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियम कलम २१(१) अन्वये, समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये, मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतूद आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णयः-

१. मा.व्यवस्थापन समिती दि.०२/०५/२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.२९५ अन्वये, यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर कर्मचारी वसाहत इमारतीचे परिसरातील अंदाजे ५६५ मीटर लांबीचे रस्ते डांबरीकरण करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेस व त्यासाठी येणारे रक्कम रु.१२,८३,२८०/- मात्रचे खर्चास मान्यता देणेत आली.

२. मा.व्यवस्थापन समिती दि.०९/०९/२०१९ रोजीचे उपसमिती सभेतील निर्णय क्र.५ अन्वये, प्रस्तुत प्रकरणी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील निम्नतम निविदाधारक जगताप इन्फ्राव्हेंचर्स इंडिया प्रा. लि., कोल्हार हे आजचे स्थानिक उपसमिती सभेसमारे चर्चेसाठी उपस्थित होते. उपसमितीने त्यांचेशी ई-निविदेत नमुद दर रक्कम रु.१२,९८,५५२/- कमी करणेबाबत चर्चा केली असता त्यांनी निविदेची अंदाजपत्रकीय रक्कम रु.१२,८३,२८०/- मात्र या दरामध्ये सदरचे काम करण्याचे मान्य केले.

यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर कर्मचारी वसाहत इमारतीचे परिसरातील रस्ते डांबरीकरण करणेकामी निम्नतम निविदाधारक जगताप इन्फ्राव्हेंचर्स इंडिया प्रा.लि., कोल्हार यांनी चर्चेअंती देऊ केलेले रक्कम रु.१२,८३,२८०/- मात्र अंतिम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.

प्रस्तावना- साईनगर कर्मचारी वसाहतीचे परिसरातील रस्ते डांबरीकरण करण्याचे काम ठेकेदार जगताप इन्फ्राव्हेंचर्स इंडिया प्रा.लि., कोल्हार यांनी दि.२१/१२/२०१९ रोजी विहीत वेळेत पूर्ण केले असून, ठेकेदार यांनी सदर कामाचे रु.१३,०१,८०९/- मात्रचे पहिले व अंतीम बील सादर केले आहे. सदर बिलाची सविस्तर तपासणी इकडील विभागामार्फत करणेत आली असून, प्रत्यक्ष झालेल्या कामानूसार व मोजमापानुसार ठेकेदार यांना एकूण रक्कम रू.१२,०७,३३८/- मात्र इतकी रक्कम देय होत आहे. सदर कामाचा व अंतीम बीलाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| ०१. | कामाचे नाव | साईनगर कर्मचारी वसाहतीचे परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे. |
| ०२. | ठेकेदाराचे नाव | जगताप इन्फ्राव्हेंचर्स इंडिया प्रा. लि., कोल्हार. |
| ०३. | कार्यादेश क्रमांक व दिनांक | जा.क्र.एसएसएसटी/बांधकाम/३०७९/२०१९. दि.११/११/२०१९. |
| ०४. | मंजूर निविदा रक्कम | रु.१२,८३,२८०/- |
| ०५. | काम बहाल करणेबाबत मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय व दिनांक | निर्णय क्र.०५, दि.०९/०९/२०१९. |
| ०६. | पहिले व अंतीम बिलानुसार झालेल्या | रु.१२,०७,३३८/-. |

| | | |
|---|---|---|
| | कामाची एकूण रक्कम | |
| ०७. | यापुर्वी अदा केलेली रक्कम (ॲडव्हान्स) | रु.७,६९,८४८/-. |
| ०८. | उर्वरीत शिल्लक देय रक्कम | रू.४,३७,४९०/-. |
| ०९. | मंजूर निविदा रकमेपेक्षा कमी अथवा जास्त झालेला खर्च | रु.७५,९४२ /- कमी (६.२९ % कमी). |
| १०. | करारनाम्यानुसार काम पूर्ण करण्याची मूदत | ०२ महिने. (दि.२५/११/१९ ते दि.२४/०१/२०२०) |
| ११. | प्रत्यक्ष काम पूर्ण झाल्याची दिनांक | दि.२१/१२/२०१९ |

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.४४९ अन्वये प्रत्येक कामाचे अंतीम बील अदा करणेपूर्वी पुर्ण झालेल्या कामाची प्रशासकीय अधिकारी यांचेमार्फत पाहणी करणेत यावी, असे ठरले आहे. त्यानुसार आदेश क्र.१९४२/२०१९ दि.१२/१२/२०१९ अन्वये प्रशासकीय अधिकारी श्री.एस.व्ही.गमे यांनी दि.२१/०५/२०२० रोजी सदरहू कामाची समक्ष पाहणी केली आहे.

विभागाचा अभिप्राय- ठेकेदार जगताप इन्फ्राव्हेंचर्स इंडिया प्रा.लि., कोल्हार यांनी दि.२१/१२/२०१९ अखेर विहीत मुदतीत व मानकांनुसार सदरचे काम पूर्ण केलेले आहे. ठेकेदार यांनी दि.२६/०२/२०२० रोजीच्या पत्रान्वये एकूण रु.१३,०१,८०९/- मात्र इतक्या रकमेचे पहिले व अंतीम देयक सादर केले आहे. ठेकेदार यांना प्रत्यक्ष झालेल्या कामाचे मोजमापानुसार अंतीम बिलापोटी एकूण रक्कम रु.१२,०७,३३८/- मात्र इतकी रक्कम देय होत असून त्यामधून ॲडव्हॉन्स रक्कम रु.७,६९,८४८/- वजा जाता निव्वळ रक्कम रु.४,३७,४९०/- देय होत आहे.

प्रस्ताव- तरी ठेकेदार जगताप इन्फ्राव्हेंचर्स इंडिया प्रा.लि., कोल्हार यांना साईनगर कर्मचारी वसाहतीचे परिसरातील रस्ते डांबरीकरण कामाचे पहिले व अंतिम देयक एकूण रक्कम रु.१२,०७,३३८/- मात्र मंजूर करणेस व उर्वरीत शिल्लक देय रु.४,३७,४९०/- मात्र अदा करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३१७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनगर कर्मचारी वसाहत इमारतीचे परिसरातील रस्ते डांबरीकरण करणे कामाचे एकुण बिलाची रक्कम रु.१२,०७,३३८/-मात्र मंजूर करण्यात येऊन त्यापैकी उर्वरीत शिल्लक देय रक्कम रु.४,३७,४९०/- मात्र संबधीत कामाचे ठेकेदार जगताप इनफ्राव्हेंचर्स इंडिया प्रा.लि.कोल्हार यांना आदा करणेस मान्यता देण्यात आली. तथापी उर्वरीत रक्कम अदा करण्यापुर्वी सदरचे काम टेंडर प्रक्रियेनुसार पुर्ण झालेबाबत प्रशासकीय अधिकारी व उप कार्यकारी अभियंता यांचेकडून लेखी दाखला (certificate) घेण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१३** **कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी दर्शनाकरीता बंद करणेत आलेले श्रींचे समाधी मंदिर भक्तांचे दर्शनासाठी खुले करावयाचे झाल्यास त्यापुर्वी करावयाचे नियोजन व उपाय योजनाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतूद:- अधिनियमाचे कलम २१(१) अन्वये समितीकडून विश्वस्त व्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल, अशी तरतूद आहे. तसेच अधिनियमाच्या पोट कलम (१) च्या खंड (ग) अन्वये भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे, भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्या प्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दीष्टये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

प्रस्तावना- कोरोना विषाणूचा होणारा प्रादुर्भाव रोखण्यासाठी दि.१७/०३/२०२० रोजी दुपारी ०३:०० वाजेपासून समाधी मंदिर साईभक्तांच्या दर्शनार्थ बंद करणेत आलेले आहे. दि.०६/०५/२०२० रोजी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली त्यांचे कक्षात झालेल्या मिटींगमध्ये श्रींचे समाधी मंदिर भक्तांचे दर्शनासाठी खुले करावयाचे झाल्यास याबाबत काय नियोजन/उपाययोजना करता येईल याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. सदर चर्चेचे अनुषंगाने मंदिर विभागाने पत्र दि.१०/०५/२०२० अन्वये खालील ठिकाणी

दर्शनाकरीता येणा-या साईभक्तांमध्ये सोशल डिस्टन्स ठेऊन चौकोनांची आखणी व त्याची एकत्रित संख्या निश्चित करुन तपशिल मागविलेला आहे.

श्री साईबाबा समाधी मंदिर दर्शनाकरीता खुले करावयाचे झाल्यास सोशल डिस्टन्सींगच्या नियमांचे पालन होण्यासाठी प्रत्येकी १.५० मीटर अंतरावर साईभक्तांना उभे केल्यास खालीलप्रमाणे भक्तसंख्या होईल.

| अ.नं. | तपशिल | १.५ मीटर अंतराने भक्तसंख्या |
|---|---|---|
| दर्शनरांग ते समाधी मंदिर या अंतरातील भक्तसंख्या | | |
| ०१ | पिंपळवाडी रस्त्यावरील गेट नं. ०२ चे पश्चिम बाजूकडील दर्शनरांग<br>गेट नं. ०२ ते स्कॅनर मशिन | ०८ x ६४= ५१२<br>०१ x २०= २० |
| ०२ | पिंपळवाडी रस्त्यावरील गेट नं. ०२ चे पुर्व बाजूकडील दर्शनरांग<br>गेट नं. ०२ ते स्कॅनर मशिन | ०८ x ३८= ३०४<br>०१ x २०= २० |
| ०३ | शांतिनिवास तळमजला हॉल<br>४९.६४०मी X ९.४८०मी – ०६ लाईन –<br>३६.३९०मी X ६.३१०मी – ०४ लाईन -<br>शांतिनिवास ते भक्तनिवास पॅसेज – ०१ लाईन – | <br>३२ x ६ = १९२<br>२३ x ४= ९२<br>०१ x ०६ = ६ |
| ०४ | शांतिनिवास पहिला मजला हॉल<br>४९.६४०मी X ९.४८०मी – ०६ लाईन –<br>३६.३९०मी X ६.३१०मी – ०४ लाईन -<br>शांतिनिवास ते भक्तनिवास पॅसेज – ०१ लाईन – | <br>३२ x ६ = १९२<br>२३ x ४= ९२<br>०१ x ०६ = ६ |
| ०५ | भक्तनिवास तळमजला हॉल - ३७.१५मी X १३.२१मी – ०९ लाईन – | २१ x०९= १८९ |
| ०६ | भक्तनिवास पहिला मजला हॉल - ३७.१५मी X १३.२१मी – ०९ लाईन – | २१ x०९= १८९ |
| ०७ | भक्तनिवास ते भुयारी मार्गाने समाधी मंदिर - लांबी – ६८ मीटर - ०१ लाईन - | ०१ x ४५= ४५ |
| ०८ | भुयारी मार्ग ते समाधी मंदिर - ०१ लाईन – २५ मीटर | ०१ x१७= १७ |
| ०९ | नंदी ते साई समाधी - २०.३०मी X ६.३९मी – ०४ लाईन – | ०४ x१७= ६८ |
| | भक्तसंख्या - | १९४४ |
| समाधी मंदिर परिसरातील इतर मंदिरे व महत्वाची ठिकाणे | | |
| ०१ | व्दारकामाई मंदिर | ३३ |
| ०२ | चावडी | २६ |
| ०३ | हनुमान मंदिर | १५ |
| ०४ | श्रीसाईसत्यव्रत पुजा हॉल | ४० |
| ०५ | अभिषेक पुजा | ३० |
| ०६ | ध्यान मंदिर | ४० |
| ०७ | पारायण कक्ष | ३० |
| ०८ | श्रींचे म्युझीयम हॉल | ३० |
| ०९ | शनिमंदिर, गणपती मंदिर, महादेव मंदिर | १२ |
| | ब) भक्तसंख्या - | **२६५** |
| | अ)+ ब) एकूण भक्तसंख्या - | **२२००** |

याबाबतचा सविस्तर तपशिल दर्शविणारे सादरीकरण या प्रस्तावासोबत अवलोकनार्थ सादर करण्यात येत आहे. वर नमूद एकूण भक्तसंख्या २२०० पैकी मार्बल पृष्ठभागावरील सुमारे १३०० चौकोन हे फ्लोअर मार्किंग टेपमध्ये करता येतील. उर्वरीत ३०० चौकोन हे कॉक्रीट पृष्ठभागावर येत असल्याने ते पेंटव्दारे मार्किंग करणे आवश्यक आहे. त्यासाठी अपेक्षित खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | तपशिल | नग | रक्कम (रु.) |
|---|---|---|---|
| ०१ | फ्लोअर मार्किंग स्टीकर टेपव्दारे मार्किंग करणे. (प्रत्येकी १.५० मीटर अंतरावर ०२ फुटx ०२ फुट या मापाचे चौकोन अथवा गोल आखणे टेप रुंदी - २”) | १३०० | ३९,०००.०० |
| ०२ | ऑईलपेंट अथवा डॅम्प प्रुफ पेंटमध्ये मार्किंग करणे. (प्रत्येकी १.५० मीटर अंतरावर ०२ फुटx ०२ फुट या मापाचे चौकोन अथवा गोल आखणे पट्टा रुंदी - २”) | ९०० | ९,०००.०० |
| ०३ | फ्लोअर मार्किंग टेप ॲप्लीकेटर मशिन | ०१ | १०,०००.०० |
| | एकूण रक्कम - | | ५८,०००.०० |
| | **पूर्णांकित रक्कम -** | | **६०,०००.००** |

मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने वर नमूद फ्लोअर मार्किंग टेप, पेंटींग मटेरीअल व फ्लोअर मार्किंग टेप ॲप्लीकेटर मशिन विहीत पध्दतीने कोटेशन्स मागवून खरेदी करणेत येत आहे.

प्रस्ताव- तरी कोविड १९ चा प्रादुर्भाव रोखणेसाठी दर्शनाकरीता बंद करणेत आलेले श्रींचे समाधी मंदिर भक्तांचे दर्शनासाठी खुले करावयाचे झाल्यास त्यापुर्वी करावयाचे नियोजन व उपाययोजनेबाबत सोबत जोडलेल्या सादरीकरणाचे अवलोकन होऊन त्यानुसार श्रींचे समाधी मंदिर भक्तांचे दर्शनासाठी खुले करण्यापुर्वी वर दर्शविलेल्या ठिकाणी सोशल डिस्टन्सींगच्या नियमांचे पालन होणेकामी चौकोनी अथवा गोल आकारात मार्किंग करणेस मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३१८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कोव्हीड १९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी दर्शनाकरीता बंद करणेत आलेले श्रींचे समाधी मंदिर भक्तांचे दर्शनासाठी खुले करावयाचे झाल्यास त्यापुर्वी करावयाचे नियोजन व उपाय योजनाबाबत उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करणेस मनुष्यबळाचे व्यवस्थापन व याबाबत शासनाने वेळोवेळी दिलेले निर्देश विचारात घेऊन तत्वत: मान्यता देण्यात आली.**

**तसेच यासंबधी करण्यात आलेले नियोजन व उपाययोजना यांची मा.समिती सदस्य यांनी प्रत्यक्ष पाहणी करुन आवश्यकतेनुसार सुधारणा/बदल सुचवावेत, असे ठरले.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**विषय नं.१४** **आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये केलेल्या गुंतवणूकीचा अहवाल व आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये कमाल व्याजदर देणाऱ्या राष्ट्रीयकृत बॅंकामध्ये १ वर्षाच्या मुदत ठेवीच्या स्वरुपात गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम २००४ कलम २०(३) अन्वये विश्वस्तव्यवस्था निधीच्या मालकीचा सर्व पैसा व इतर मौल्यवान वस्तू केवळ राष्ट्रीयीकृत बॅंकेत किंवा बॅंकांमध्ये ठेव म्हणून ठेवण्यात येतील किंवा जमा करण्यात येतील किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम २ च्या खंड (१२) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सार्वजनिक रोख्यांमध्ये गुंतविण्यात येतील,अशी तरतूद आहे.

मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.९५२, दि.०६.११.२०१४ अन्वये बचत खाते असलेल्या राष्ट्रीयीकृत बॅंकांची आर्थिक स्थिती विचारात घेऊन, त्यांचेकडून व्याजदर मागवून, जास्तीत जास्त व्याजदर देणा-या बॅंकांकडे टप्प्याटप्प्याने गुंतवणूक करण्यास मा. मुख्यकार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेऊन गुंतवणूक करावी व त्याचा वार्षिक अहवाल आर्थिक वर्षाच्या शेवटी मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर सादर करण्यात यावा, असा निर्णय संमत झाला आहे.

त्यास अनुसरुन राष्ट्रीयीकृत बॅंकांची आर्थिक स्थिती पाहून केलेल्या गुंतवणुकींची मुदतपूर्ती झाल्यानंतर, उपलब्ध होणारा निधी व त्यावेळी बचत खात्यामध्ये दैनंदिन खर्च वजा जाता उपलब्ध होणारा निधी, यांची विहित पद्धतीने संस्थानचे बचत खाते असलेल्या राष्ट्रीयीकृत बॅंकांमध्ये मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने गुंतवणूक करण्यात आली आहे.

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात, म्हणजेच दि.३१ मार्च २०२० अखेर केलेल्या गुंतवणूकीचा अहवाल पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | बॅंकेचे नांव | दि.३१ मार्च २०१९ अखेर असलेली गुंतवणूक |
|---|---|---|
| १ | आंध्रा बॅंक, शिर्डी | २,१०,०१,९२,०००/- |
| २ | बॅंक ऑफ बरोडा, शिर्डी | ९२,००,००,०००/- |

| | | |
|---|---|---|
| ३ | कॅनरा बँक, शिर्डी | ३,७४,५०,००,०००/- |
| ४ | सेंट्रल बँक ऑफ इंडिया, शिर्डी | १९,४४,९८५/- |
| ५ | कॉर्पोरेशन बँक, शिर्डी | ६८,९९,९९,९९८/- |
| ६ | इंडियन बँक, शिर्डी | ६३,००,००,०००/- |
| ७ | ओरियंटल बँक ऑफ कॉमर्स, शिर्डी | ३,८१,००,००,०००/- |
| ८ | पंजाब नॅशनल बँक, शिर्डी | २,७५,००,००,०००/- |
| ९ | स्टेट बँक ऑफ इंडिया, शिर्डी | १,२०,१७,००,०००/- |
| १० | सिंडिकेट बँक, शिर्डी | २,३३,००,००,०००/- |
| ११ | युनियन बँक ऑफ इंडिया, शिर्डी | ३,२४,०७,००,०००/- |
| १२ | विजया बँक, शिर्डी | १,०१,००,००,०००/- |
| | एकूण | **२२,४२,९५,३६,९८३/-** |

उपरोक्त तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये संस्थानचे बचत खाते असलेल्या राष्ट्रीयीकृत बँकांकडून व्याजदर मागवून उच्चतम दराने दि.३१ मार्च २०२० अखेर एकूण रक्कम रु.२२,४२,९५,३६,९८३/- मात्र ची गुंतवणूक करण्यात आलेली आहे.

आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये केलेल्या गुंतवणूकीचा वार्षिक अहवाल व आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये मुदतपूर्ती होणा-या व बचत खात्यात दैनंदिन खर्च वजा जाता, गुंतवणुकीसाठी उपलब्ध होणा-या रकमेची, विहित पद्धतीने मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने राष्ट्रीयीकृत बँकांकडून वेळोवेळी तुलनात्मक व्याजदर मागवून जी बँक जास्तीत जास्त व्याजदर देईल, त्या बँकेत गुंतवणूक करण्यास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सविनय सादर

**निर्णय क्र.३१९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, आर्थिक वर्ष २०१९-२० मध्ये केलेल्या गुंतवणूक अहवालाचे अवलोकन करण्यात येऊन आर्थिक वर्ष २०२०-२१ मध्ये मुदतपूर्ती होणा-या व बचत खात्यात दैनंदिन खर्च वजा जाता, गुंतवणुकीसाठी उपलब्ध होणा-या रकमेची, विहित पद्धतीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने राष्ट्रीयीकृत बँकाकडून वेळोवेळी तुलनात्मक व्याजदर मागवून जी राष्ट्रीयकृत बँक जास्तीत जास्त व्याजदर देईल, त्या बँकेत गुंतवणूक करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-लेखाशाखा)**

---

**विषय नं.१५** **माहे डिसेंबर-२०१९ व जानेवारी-२०२० जमा खर्च तक्त्याची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** लेखाशाखा विभागामार्फत दरमहा संस्थानला सर्व मार्गाने जमा होणा-या व संस्थानकडून खर्च होणा-या रकमांचा जमा-खर्च तक्ता तयार करण्यात येतो. सदर जमा व खर्चाच्या आकडेवारीचा तक्ता मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात येत असतो.

त्या अनुषंगाने माहे डिसेंबर-२०१९ व जानेवारी-२०२० या कालावधीतील मासिक जमा-खर्चाचे तक्ते तयार करण्यात आले असून ते मा.तदर्थ समितीचे सभेसमोर नोंद घेणेसाठी सादर करणे आवश्यक आहे. जमा-खर्चाचा तपशिल खालीलप्रमाणे -

| अ.नं. | महिना | जमा | खर्च |
|---|---|---|---|
| ०१ | डिसेंबर-२०१९ | ५५,६७,११,७८७/- | ३४,४१,३९,१४९/- |
| ०२ | जानेवारी-२०२० | ७४,२१,७४,५९४/- | २९,८८,५१,५६८/- |

तरी लेखापुस्तकाप्रमाणे माहे डिसेंबर-२०१९ व जानेवारी-२०२० या कालावधीतील जमा खर्चाची नोंद घेण्यासाठी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर.

**निर्णय क्र.३२०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहे डिसेंबर-२०१९ व जानेवारी-२०२० जमा खर्च तक्त्याचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.१६** **करनिर्धारणअंती आयकर विभागाला देय असलेल्या आयकरापोटी आयकर विवरणपत्राप्रमाणे संस्थानला मिळणारी रिफंड रक्कम वर्ग करणेबाबत.**

**प्रस्ताव-** आयकर विभागाने ई-मेलद्वारे आयकर विवरणपत्रात संस्थानला देय असलेली आयकर करकपात रक्कम आयकर विभागाला देय असलेल्या आयकरापोटी वळविणेबाबत कळविले आहे. करनिर्धारण वर्ष २०१३-१४ पासून आयकर विभागाने फेर करनिर्धारणे करण्याचे धोरण अवलंबून साधारणतः संस्थानला दक्षिणा पेटीत प्राप्त होणारी देणगी निनावी देणगी गृहीत धरुन त्यावर आयकर आकारणी सुरु केली आहे. अशाप्रकारे करनिर्धारण व फेर करनिर्धारण करण्यात येऊन संस्थानला आयकर आकारणी सुरु केली आहे. तथापि, सदर करनिर्धारणांविरुद्ध मा.उच्च न्यायालयाकडे अपील दाखल करण्यात आले होते. करनिर्धारण वर्ष २०१५-१६ व २०१३-१४ चे आयकर विभागीय अपील एकत्रित सुनावणी होऊन आयकर निश्चित होईपर्यंत आयकर भरणा करण्यास मा.सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिला आहे. तसेच करनिर्धारण वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ चे करनिर्धारण अधिकारी यांनी करनिर्धारण करुन संस्थानला कर आकारणी केली आहे. तसेच संस्थानच्या गुंतवणूका, डिपॉझीट यावर मिळणा-या व्याजातून काही बँकांनी मुळातून करकपात सूट दाखला असतांनाही मुळातून करकपात (TDS) केली आहे. सदर कर वार्षिक विवरणपत्रामध्ये संस्थानला रिफंड दर्शविला जातो व करनिर्धारणाअंती संस्थानला व्याजासह परत मिळतो. तथापि, नव्याने करनिर्धारण करण्यात येऊन संस्थानला कर आकारणी करण्यात आली आहे. अशाप्रकारे वर्षनिहाय आकारण्यात आलेली आयकर रक्कम व आयकर विवरणपत्रानुसार संस्थानला मिळणारी रिफंड रक्कम खालीलप्रमाणे आहे.

| **Income Tax Payable to Income Tax Department** | | | **Income Tax Refund to Sansthan** | |
|---|---|---|---|---|
| Assessment Year | Demand Raised Date | Tax Amount Rs. | Assessment Year | Refund Amount |
| 2013-14 | 19.03.2019 | 128,78,96,580/- | 2013-14 | 27,55,490/- |
| 2015-16 | 20.02.2018 | 122,04,61,840/- | 2015-16 | 1,28,38,047/- |
| 2016-17 | 31.03.2018 | 128,20,08,190/- | 2016-17 | 2,02,38,940/- |
| 2017-18 | 30.12.2019 | 58,45,81,700/- | 2017-18 | 2,47,68,139/- |
| **Total Tax :-** | | **437,49,48,310/-** | **Total Refund :-** | **6,06,00,616/-** |

आयकर विभागाकडून अशाप्रकारे आलेल्या प्रस्तावाचा ई-मेल संस्थान कर सल्लागारांना पाठविण्यात आला आहे. यावर सीए आर.आर. मुनी ॲण्ड कं., मुंबई व सीए व्ही.के. बेसवाल ॲण्ड कं., मुंबई यांनी खालीलप्रमाणे कळविले आहे.

१) करनिर्धारण वर्ष २०१३-१४ व २०१५-१६ करिता आयकर अपील सुनावणीमध्ये देय आयकर निश्चित केला जाईल तोपर्यंत मा.सर्वोच्च न्यायालयाचा स्थगिती आदेश आहे. त्यामुळे या दोन वर्षांपोटी रिफंड मिळणारी रक्कम देय करापोटी वर्ग करता येणार नाही.

२) करनिर्धारण वर्ष २०१६-१७ व २०१७-१८ पोटी आयकर निर्धारण अधिकारी यांनी निर्धारीत केलेली आयकर रक्कम रु.१२८,२०,०८,१९०/- व रु.५८,४५,८१,७००/- यापोटी संस्थानला रिफंड दर्शविलेली रक्कम रु.२,०२,३८,९४०/- व रु.२,४७,६८,१३९/- वळवून घेण्यास सुचविता येईल.

३) अंतिम करनिर्धारणाअंती जर संस्थानला कर लागला नाही तर वळवून घेतलेली रिफंड रक्कम व्याजासह संस्थानला परत मिळेल व संस्थानला आयकर देय झाला तर उर्वरीत रक्कम विहीत पद्धतीने भरता येईल.

सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३२१** **करनिर्धारणअंती आयकर विभागाला देय असलेल्या आयकरापोटी आयकर विवरणपत्राप्रमाणे संस्थानला मिळणारी रिफंड रक्कम वर्ग करणेबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समितीची चक्रीय पध्दतीने मान्यता घेण्यात आलेली असल्याने सदरचा विषय मागे घेण्यात आला.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.१७** **पंडीत दिनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद यांचे रामचंद्र नाईक विद्यालय सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकामासाठी आर्थिक सहाय्य देण्याच्या प्रस्तावावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** पंडीत दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद यांचे रामचंद्र नाईक विद्यालय सिडको, औरंगाबाद यांनी इमारत बांधकाम रु. १.२३ कोटी व शालेय साहित्य घेण्यासाठी रु. ४८.००लक्ष असे एकूण रक्कम रु १.७१

कोटीची मागणी त्यांचे पत्र जा.क्रं. पं.दी.ऊ.शि.सं/२०१७-२०१८/११ दिनांक १९.०४.२०१७ नुसार केली होती त्याचा थोडक्यात तपशील खालीलप्रमाणे

अ. इमारत बांधकाम खर्च :-

| अ.न. | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | इमारत बांधकाम खर्च | रु. २,२२,००,०००/- |
| २ | इमारत बांधकाम निधीतून केलेला खर्च | रु. ९९,००,०००/- |
| ३ | उर्वरीत बांधकामसाठी लागणारी एकूण रक्कम | **रु. १,२३,००,०००/-** |

ब. शालेय साहित्य खरेदीसाठी लागणारा खर्च :-

| अ.न. | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांसाठी नवीन ६०० बाके | रु. १५,००,०००/- |
| २ | क्रिडा साहित्य | रु. १०,००,०००/- |
| ३ | ग्रंथालय | रु. ३,००,०००/- |
| ४ | सुसज्ज प्रयोगशाळा | रु. ५,००,०००/- |
| ५ | संगणक, लॅब व फर्निचर | रु. १५,००,०००/- |
| ६ | एकूण | **४८,००,०००/-** |
| एकूण | **अ + ब रु. १,२३,००,०००+४८,००,०००/-** | **१,७१,००,०००/-** |

अशी एकूण रक्कम रु.१.७१कोटी मात्र मिळणेबाबत विनंती श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डी यांना केली होती. त्यावर मा. व्यवस्थापन समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:- दि.०८.९.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७५३ अन्वये चर्चा होऊन असे ठरले की, श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवास दि. ०१ आक्टोंबर पासून प्रारंभ होत आहे. मा. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखालील कृती आराखडा समितीने दि. ३१.०३.२०१७ रोजी या महोत्सवासाठी एकूण रु. ३०२३ कोटी मात्रच्या कृती आराखडयास मान्यता दिलेली आहे. परंतु सदरहू निधी अद्याप प्राप्त नाही. या महोत्सवामध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे व साईभक्तांना पायाभुत सोयीसुविधा पुरविणेकामी संस्थानचा मोठया प्रमाणात खर्च होणार असून संस्थानला निधीची कमतरता भासू शकते. अशा पार्श्वभुमीवर पंडीत दिनदयाल उपाध्याय यांचे शिक्षण संस्थेस इमारत बांधकाम व शालेय साहित्यासाठी रु. १.७१ कोटी मात्र आर्थिक सहाय्य करणे उचित होणार नाही. सबब समाधी शताब्दी महोत्सवाची सांगता होईपर्यंत सदरहू विषय स्थगित ठेवण्यात यावा.असा निर्णय झालेला आहे.

संस्थेने सादर केलेला नविन प्रस्ताव:- आता पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद यांनी दि.०५.०६.२०१८ रोजी रक्कम रु. २.२६ कोटी मात्र अनुदानासाठी फेर प्रस्ताव सादर केला असून, मा. श्री चंद्रशेखर कदम, उपाध्यक्ष, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर करणेबाबत निर्देश दिलेले होते. त्यानुसार प्रस्ताव व्यवस्थापन समितीपुढे सादर करण्यात आला होता.

पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, औरंगाबाद या संस्थेच्या रामचंद्र नाईक विद्यालय, स्पंदन नगर सिडको एन – ४ (दक्षिण) औरंगाबाद येथील शाळेच्या इमारतीचे बांधकाम पुर्ण करण्यासाठी व शालेय साहित्य खरेदी करून शाळा सर्व सुविधायुक्त करण्यासाठी निधीची मागणी श्री साईबाबा संस्थान विश्वस्थव्यवस्था, शिर्डी यांचेकडे केलेली आहे. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे-

अ. इमारत बांधकाम खर्च :-

| अ.न. | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | इमारत बांधकाम खर्च शासन मंजूरीनुसार | रु. २,५५,००,०००/- |
| २ | इमारत बांधकाम निधीतून केलेला खर्च | रु. ९९,००,०००/- |
| ३ | उर्वरीत बांधकामसाठी लागणारी एकूण रक्कम | रु. १,५६,००,०००/- |

ब. शालेय साहित्य खरेदीसाठी लागणारा खर्च :-

| अ.न. | विवरण | रक्कम |
|---|---|---|
| १ | विद्यार्थ्यांसाठी नवीन ६०० बाके | रु. १८,००,०००/- |
| २ | क्रिडा साहित्य | रु. १२,००,०००/- |
| ३ | ग्रंथालय सर्व साहित्यासह | रु. ७,००,०००/- |
| ४ | सुसज्ज प्रयोगशाळा साहित्यासह | रु. ८,००,०००/- |
| ५ | संगणक, लॅब व फर्निचर | रु. २५,००,०००/- |
| ६ | एकूण | **७०,००,०००/-** |

क. मागणी :-

| | | |
|---|---|---|
| एकूण | अ + ब रु. १,५६,००,०००+७०,००,०००/- | २,२६,००,०००/- |

| | |
|---|---|
| एकूण प्रकल्प खर्च अ + ब | रु.२,५५,००,०००+७०,००,००० = ३,२५,००,०००/- |

अशी मागणी केली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:- उपरोक्त नव्याने प्राप्त झालेला प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. ३०.०६.२०१८ रोजीचे सभेत सादर केला असता, त्यावर निर्णय क्रं. ४१८ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, पंडीत दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकामासाठी रु. १.५६ कोटी व शालेय साहित्यासाठी रक्कम रु. ७० लक्ष अशी एकूण रु. २.२६ कोटी आर्थिक सहाय्य देणेबाबतचा प्रस्ताव मान्य केल्यास इतरही खाजगी संस्था अशाप्रकारे आर्थिक सहाय्य मिळणेबाबत मागणी करतील. यास्तव सदरचा प्रस्ताव स्थगीत ठेवण्यात आला.

मात्र छाननी समितीचे दि. ०६.१०.२०१८ रोजी यावर आयत्या वेळी चर्चा करण्यात येऊन निर्णय क्रं. ४६ अन्वये चर्चा होऊन खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आला.

मा. छाननी समितीचा निर्णय:- पंडित दिनदयाळ उपाध्याय शिक्षण संस्था सिडको, औरंगाबाद यांचे रामचंद्र नाईक विद्यालय, सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकाम व शालेय साहित्यासाठी रक्कम रु.२,२६,००,०००/- आर्थिक सहाय्य मागणीचा नव्याने प्राप्त प्रस्ताव चर्चेला घेण्यात आला. व्यवस्थापन समितीच्या दि.३०.०६.२०१८ रोजीच्या सभेतील निर्णय क्र.४१८ याचेही अवलोकन करण्यात आले.
छाननी समिती सभासदांचे एकमताने असे मत झाले की, संबधीत शिक्षण संस्थान निरपेक्षपणे शैक्षणिक वातावरणात योग्य वाढ व्हावी व राष्ट्रीय विचारसरणीचा प्रसार विद्यार्थ्यांमध्ये प्रतिबिंबीत व्हावा या दिशेने कार्य करीत आहे.

दि.०५.०६.२०१८ रोजी संस्थेने शाळेच्या इमारत बांधकाम व साहित्यासाठी म्हणून रकमेची मागणी केली आहे. सर्वांसाठी गुणात्मक शिक्षण हा संकल्प संस्थेचा दिसत असुन समाजातील सामान्य घटकांसाठी दर्जेदार शिक्षणव्यवस्था निर्माण करण्यासाठी संस्था प्रयत्न करीत आहे. संस्थेला दि.२६.०३.२०१५ औरंगाबाद महानगर पालीका यांनी शाळेकरीता बांधकाम परवानगी दिली आहे.
वरील संस्थेच्या नोंदणी पुस्तकाचे विवरण पाहता संस्थेचे उद्देश व व्यवस्थापन यांची सांगड संस्थेच्या ताळेबंदात दिसुन येते. म्हणून छाननी समितीने एकमताने वरील संस्थेस मागणीप्रमाणे रक्कम रु.२.२६ कोटी रक्कम देण्याचे प्रस्तावास सहमती दर्शविली आहे. सदरील प्रस्ताव व्यवस्थापन समितीचे सभेत ठेवण्यात यावा व शासनाकडे पाठविणेत यावा. संस्थेचा प्रस्ताव मंजूर झाल्यानंतर संबधीत संस्थेला साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवथा, शिर्डी यांचेमार्फत आर्थिक मदत झालेबाबतचा इमारतीच्या एका बाजुस श्री साईबाबा संस्थान यांचेमार्फत आर्थिक सहाय्य असा उल्लेख करावा लागेल. संस्थेच्या प्रवेशव्दार/दर्शनीभागावर साईबाबांचे ३x४ फुट आकाराचे फोटो लावणे क्रमप्राप्त होईल. असे ठरले.

उपरोक्त प्रस्तावास छाननी समितीचे निर्णयाप्रमाणे व्यवस्थापन समितीचे सभेसमारे प्रस्ताव सादर केला असता, मा. व्यवस्थापन समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय :-

दि. १३.१२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७३० अन्वये सविस्तर चर्चा होऊन पंडीत दिनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद या संस्थेची व ते चालवित असलेल्या शाळेची सविस्तर माहिती

घ्यावी, सदर संस्था देणगी घेते काय? विद्यार्थ्यांकडून फी घेतली जाते काय, या संस्थेमार्फत कोणकोणते सामाजिक उपक्रम राबविले जातात, लाभार्थी कोणत्या आर्थिक स्तरातील आहेत, याबाबत सविस्तर माहिती घेऊन फेरप्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावा, असे ठरले.

मा. व्यवस्थापन समितीचे निर्णय नुसार जा. न.एसएसएसटी/वशी-लेखा-अनुदान/४६५७/२०१८ दि. २२.१२.२०१८ अन्वये माहिती मागविली असता पंडीत दिनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद यांनी जा.क्र./पंदीउशिसं/२०१८-१९ दि. २६.१२.२०१८ रोजी खालीलप्रमाणे माहिती सादर केली आहे.

| अ.न | माहिती | तपशील |
|---|---|---|
| १ | पंडीत दिनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था सिडको, औरंगाबाद या संस्थेची व ते चालवित असलेल्या शाळेची सविस्तर माहिती द्यावी. | पंडित दीनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था सिडको, औरंगाबाद या संस्थेची व ते चालवत असलेल्या शाळांची यादी सदर प्रस्तावात नमूद आहे. सदर संस्थेचे मुख्यालय, औरंगाबाद येथे असून संस्था एकूण ३० शाळा, कॉलेजेस व वस्तीगृह चालवत आहे. |
| २ | सदर संस्था देणगी घेते का? | समाजातील दानशून व सेवाभावी संस्थाकडून देगणी घेतली जाते. |
| ३ | विद्यार्थ्यांकडून किती फी घेतली जाते? | रामचंद्र नाईक विद्यालय हे जून १९९६ पासून सुरू झालेले असून सध्या १००टक्के अनुदानित आहे त्यामुळे नियमानुसार विद्यार्थ्यांकडून कोणत्याही प्रकारची फी घेतली जात नाही. |
| ४ | संस्थेमार्फत कोणकोणते सामाजिक उपक्रम राबविले जातात? | संस्थेचे उद्देश हे शैक्षणीक व सामाजिक स्वरुपाचे आहेत. संस्थेने समाजातील सर्व स्तरातील मुलां-मुलींसाठी पुर्व प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक, उच्च शिक्षण कला, विज्ञान, वाणिज्य, योग-प्राणायाम, शारीरिक शिक्षण, संगणक, व्यवसाय शिक्षण, अध्यापनाचे शिक्षण व प्रशिक्षण इ. |
| ५ | लाभार्थी कोणत्या आर्थिक स्तरातील आहेत? | संस्थेच्या शाळा  व महाविद्यालय प्रामुख्याने ग्रामीण भागात आहेत. संस्था आर्थिक दुर्बल घटकाच्या वस्तीतील कामगारांची, गरीबांची, मागासवर्गीयांच्या विद्यार्थ्यांसाठी गुणवत्ता प्रधान शिक्षण प्रदान करीत आहे. |
| ६ | संस्थेने (शाळेला/विद्यालयाला) नविन इमारत किंवा असलेल्या इमारतीत सुधारणा आवश्यक असल्याबाबत संस्थेच्या अध्यक्ष/ सचिव यांचे प्रमाणपत्र. | शाळेच्या वरील दोन मजल्याचे काम अपूर्ण आहे. प्रमाणपत्र सादर केले आहे. |
| ७ | संस्थेने उपसंचालक, शिक्षण विभाग यांना अगोदर सादर केलेल्या जमा खर्चाचा तपशील. | जमा खर्चाचा हिशोब जोडला आहे मात्र शिक्षण विभाग अशा प्रकारची माहिती मागत नाही. |
| ८ | आर्थिक वर्ष सन २०१७-१८ या वर्षाचा लेखापरिक्षण अहवालाची प्रत. | सादर केला आहे. |
| ९ | संस्थेला शासनाकडून अनुदान मिळते किंवा नाही याबाबतचे प्रमाणपत्र. | संस्थेला शासनाकडून केवळ वेतन दिले जाते. इतर कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही. |
| १० | संस्थेच्या मालमत्तेविषयी किंमतीसह यादी, याबाबत धर्मादाय आयुक्त यांचेकडील नोंदवहीचा साक्षांकित उतारा इ. | मा. धर्मादाय आयुक्त कार्यालय औरंगाबाद यांच्याकडील नोंदवही साक्षांकित प्रत जोडली आहे. |

उपरोक्त प्रमाणे माहिती संस्थेने सादर केली होती. त्यावर संस्थानने मा. व्यवस्थापन समितीचे सभेसमोर प्रस्ताव सादर करतांना खालीलप्रमाणे अभिप्राय दिलेला होता.

विभागाचा अभिप्राय :-

१) मा. व्यवस्थापन समितीने ज्या कारणास्तव दि. ०८.०९.२०१७ च्या सभेतील निर्णय क्रं. ७५३ नुसार प्रस्ताव अमान्य केलेला आहे, त्या बाबींची उद्दीष्ठ पुर्ती अद्याप झालेली नाही. अशातच या संस्थेला मदत केल्यास ही बाब संयुक्तीक होणार नाही असे वाटते.

२) संस्थेने यापूर्वी दिनांक १९.०४.२०१७ च्या प्रस्तावानुसार रु. १.७१ कोटीची मागणी केली होती आता मात्र सुधारीत मागणी रु. २.२६ कोटी केलेली आहे.

३)     संस्थचे एक महाविद्यालय, सहा कनिष्ठ महाविद्यालय, नऊ माध्यमिक विद्यालय, चार प्राथमिक व उच्च प्राथमिक विद्यालय, चार पुर्व प्राथमिक विद्यालय, दोन आश्रम शाळा, दोन वस्तीगृह आहेत. संस्थेच्या अनेक शाखा आहेत. प्रस्तावात नमूद माहितीनुसार सदरची शिक्षणसंस्था मोठी व सक्षम दिसते.

४)     अनुदान मागणी ज्या विद्यालयाच्या इमारतीसाठी केली आहे ती शाळा औरंगाबाद शहरात आहे. एकंदरीत शहरात शिक्षणाची सोय उपलब्ध करून देणा-या अनेक अनुदानित व विना अनुदानित शैक्षणीक संस्था कार्यरत आहेत.

५)     अशाप्रकारे शैक्षणीक क्षेत्रात काम करणा-या अनेक शिक्षण संस्था कार्यरत असून त्याही अशाच प्रकारची मागणी करतील, त्यामुळे अनुदान देणे उचित होणार नाही.

उपरोक्त प्रमाणे प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०८.०१.२०१९ रोजी सादर केला असता निर्णय क्रं. ८ अन्वये झालेला निर्णयाचे इविवृत्त दि. ३०.०१.२०१९ रोजीचे सभेत कायम करतांना निर्णय क्रं. ३९ अन्वये खालीलप्रमाणे वाचण्यात यावे असा निर्णय झाला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय:- मा.उच्च न्यायालय, मुंबई औरंगाबाद येथे संस्थानशी सबंधीत जनहित याचिकेवरील दि. ३०.०१.२०१९ रोजी सुनावणीच्या वेळी सदर याचिका प्रलंबीत असतांना संस्थान व्यवस्थापनाने केवळ दैनंदीन कामकाजाशी संबधीत बाबींवर खर्च करावा, संस्थान व्यतिरिक्त अन्य संस्था अथवा शासकीय विभाग यांना निधी देण्याबाबत निर्णय घेऊ नये, असे निर्देश मा. उच्च न्यायालयाने दिलेले असल्याचे संस्थानचे वकील ॲड. नितीन भवर यांनी दुरध्वनीद्वारे आजचे सभेमध्ये कळविले आहे.

मा.उच्च न्यायालयाचे सदर निर्देशास अनुसरून आजचे सभेत सदरचा निर्णय कायम करतांना मा. उच्च न्यायालयाचे पुढील आदेश होईपर्यंत सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात यावा असे ठरले.

मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने जनहित याचिका क्रं. ८६/२०१८ च्या सुनावणी दरम्यान दि. ३०.०१.२०१९ रोजी संस्थानने इतर संस्था व ट्रस्ट यांना करावयाच्या अनुदान वितरणासंदर्भांत खालीलप्रमाणे आदेश पारित केलेला आहे.

मा. उच्च न्यायालयाचे आदेश:- “Shri Saibaba Sansthan Trust’ shall not disburse an amount of the Trust for other purposes than routine expense”

प्रस्ताव:- मा.व्यवस्थापन समितीने दि. ३०.०१.२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं. ३९ नुसार सदरचा विषय मा.उच्च न्यायालयाचे आदेश होईपावेतो स्थगीत ठेवलेला आहे मात्र मा. उच्च न्यायालयाने अनुदान वितरणासंदर्भांत दि. ३०.०१.२०१९ रोजी खालीलप्रमाणे आदेश दिले आहेत.

“Shri Saibaba Sansthan Trust’ shall not disburse an amount of the Trust for other purposes than routine expense”

त्यानंतर मा.उच्च न्यायालयाने पुढील कोणतेही आदेश दिलेले नाहीत. त्यामुळे सदर अनुदान मागणी प्रस्ताव नामंजूर करून नस्तीबंद करणेबाबत निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३२२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानने इतर संस्था व ट्रस्ट यांना करावयाच्या अनुदान वितरणासंदर्भांत मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी पुढील कोणतेही आदेश दिलेले नसल्याने पंडीत दिनदयाल उपाध्याय शिक्षण संस्था, सिडको, औरंगाबाद यांचे रामचंद्र नाईक विद्यालय सिडको, औरंगाबाद यांना इमारत बांधकामासाठी आर्थिक सहाय्य देण्याचा प्रस्ताव पूर्णत: नामंजुर करण्यात येऊन सदरचे प्रकरण नस्तीबध्द करण्यात यावे, याबाबत मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे प्रतिज्ञापत्र सादर करण्यात यावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- लेखाशाखा/विधी विभाग)**

---

**विषय नं.१८** **शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणाऱ्या परिसरातील दैनंदिन स्वच्छता विषयक साफसफाईची कामे ठोक पध्दतीने करणेसाठी शिर्डी नगरपंचायतीस रक्कम रु.४२,५१,५९९/-बाबत शिर्डी ग्रामस्थांचे निवेदनावर निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** पुर्वपिठीका:- शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचे दि.०६.०२.२०१७ रोजीचे पत्र इकडील कार्यालयास प्राप्त झाले असून, सदर पत्रामध्ये त्यांनी श्री साईबाबा संस्थानने शिर्डी शहरातील विविध देवदेवतांची मंदीरे ताब्यात घेण्याच्या बदल्यात संपूर्ण शिर्डी शहराच्या स्वच्छतेसाठी रु. २५ लाख मात्र प्रति महिना शिर्डी नगरपालिकेला कायमस्वरुपी द्यावेत. शिर्डी शहराचे जसे नागरीकरण वाढेल तशी या पैशात संस्थानने वाढ करावी, अशी मागणी, सौ. योगिता

अभय शेळके पाटील, अध्यक्षा, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी व विश्वस्त, श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांनी केलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:- दि.२५.०२.२०१७ रोजी झालेल्या मा. व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय क्रं. १५७ अन्वये सविस्तर चर्चा होऊन, शिर्डी शहरामध्ये श्रीं चे दर्शनासाठी देश विदेशातून साईभक्त येत असतात.यामुळे शिर्डी शहर स्वच्छ असायला हवे. परंतु शिर्डी नगरपंचायतीकडे निधीची कमतरता असल्यामुळे ते संस्थानच्या मदतीशिवाय काम करू शकत नाही. याकरिता उपरोक्त प्रस्तावास तत्वतः मान्यता देण्यात आली.

परंतु शिर्डी शहराचे स्वच्छतेकरिता त्यांनी केलेल्या खर्चाची रक्कम खुपच जास्त आहे. याकरिता संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी तसेच शिर्डी नगरपंचायतीचे मुख्याधिकारी व इतर अधिकारी यांची मिळून समिती गठीत करण्यात यावी. या समितीने शिर्डी शहराचे स्वच्छतेसाठी प्रत्यक्ष येणारा खर्च निश्चीत करावा व त्याबाबतचा परिपूर्ण अभ्यास करून फेरप्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.

उपरोक्त ठरावाचे अनुषंगाने, दि. ०५.०५.२०१७ रोजी मुख्यकार्यकारी अधिकारी यांचे कक्षात बैठक झाली. त्या बैठकीस संस्थानचे मुख्यकार्यकारी अधिकारी,श्रीमती रुबल अग्रवाल, डॉ. संदीप आहेर, उपकार्यकारी अधिकारी, श्री बाबासाहेब घोरपडे, मुख्यलेखाधिकारी, श्री दिलीप उगले, प्रशासकीय अधिकारी, श्री आर बी आहेर, उपकार्यकारी अभियंता, बांधकाम विभाग, श्री अशोक वाळूंज, प्र. कामगार व विधी अधिकारी, श्री संजय गायकवाड प्र. अधिक्षक, आरोग्य विभाग, श्री सुधाकर कुलकर्णी, लिपीक आरोग्य विभाग तसेच शिर्डी नगरपंचायतीचे मा. सौ. योगिता शेळके, नगराध्यक्षा, श्री अभय शेळके, श्री देसले श्री भागवत शेज्वळ बैठकीस हजर होते. सदर बैठकीमध्ये शिर्डी शहर स्वच्छतेसाठी नगरपंचायतीने मागणी केलेल्या रु. २५ लाख मात्रच्या प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कक्षातील संयुक्त बैठकीतील निर्णय:- शिर्डी नगरपंचायत यांचेमार्फत शहरातील कचरा गोळा करणे, वर्गीकरण करणे, स्वच्छता करणे इ. साठी निविदा प्रक्रिया राबविण्यात येत आहे. सदर निविदा उघडल्यानंतर येणारे दर स्विकारून, निविदाधारकाला कार्यारंभ आदेश देणेबाबत नगरपंचायतीचा ठराव नगरपंचायतीने संस्थानला द्यावा. सदर निविदा प्रक्रियेनुसार येणारे दर किंवा नगरपंचायतीने मागणी केलेली रक्कम रु. २५/- लाख मात्र यापैकी जी रक्कम कमी असेल ती प्रतिमाह अनुदान म्हणून देणेबाबत व्यवस्थापन समितीकडे शिफारस करणेबाबत निर्णय झाला तसेच मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांनी संस्थानकडून स्वच्छतेसाठी देण्यात आलेल्या अनुदानाचा विनीयोग त्याच कामासाठी करण्यात आलेबाबतचे उपयोगिता प्रमाणपत्र संस्थानला प्रत्येक महिन्याच्या ५ तारखेला द्यावे, असे ठरले.

शिर्डी नगरपंचायतीने नव्याने सादर केलेला प्रस्ताव:- शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांचा दि.०३.११.२०१७ रोजी प्रस्ताव प्राप्त झाला असून, त्यात नगरपंचायतीने शिर्डी नगरपंचयात ही ‘क’ वर्ग नगरपंचायत असून शहराची लोकसंख्या अंदाजे ४५००० इतकी आहे. श्री साईबाबांच्या दर्शनाकरिता दररोज येणा-या साईभक्तांची संख्या ५० ते ७५ हजार तर उत्सवकाळात साईभक्तांची संख्या २ ते ३ लाख होते. त्यामुळे शहरात वर्षभर येणा-या साईभक्तांकडून तसेच शहरातील नागरिकांकडून देखील मोठया प्रमाणावर कचरा होत असतो.

इतर नगरपरिषदांच्या तुलनेत शिर्डी शहरात स्वच्छतेबाबत विशेष प्रयत्न होणे आवश्यक आहे. व त्यासाठी विशेष यंत्रणा लावणे देखील गरजेचे आहे. यापूर्वी शिर्डी नगरपंचयातीद्वारे तसे प्रयत्न करण्यात आलेले नव्हते. साईभक्तांना व शहरातील नागरीकांना येथे होणा-या अस्वच्छतेचा त्रास होऊ नये, यासाठी, शिर्डी नगरपंचायतीद्वारे स्वच्छताविषयक कामाची व्याप्ती मोठया प्रमाणावर वाढवून व यासाठी मनुष्यबळ व आवश्यक यंत्रणा बंधनकारक करून, शिर्डी शहर स्वच्छतेबाबत शिर्डी नगरपंचातीने हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छताविषयक साफसफाईची सर्व कामे ठोक पद्धतीने करणेसाठी दैनीक लोकमत या वर्तमानपत्रात दि. २६.०९.२०१७ रोजी, तसेच फेर ई – निविदा प्रसिद्ध करण्यात होती.

त्यानुसार शिर्डी नगरपंचायतीकडे एकूण तीन ई- निविदा धारकाच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यांचे दर खालीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | कामाचा तपशील | संतगाडगे बाबा महाराज बेरोजगार संस्था, गुलाबनगर, दापोडी, पुणे | मे. गुरूजी इन्फास्ट्रक्चर प्रा. लि. मिरा भाईंदर, जि. ठाणे | मे. बी. व्ही. जी. इंडिया लि. बी.व्ही. जी. हाऊस, प्रिमीयर प्लाझा, जुना मुंबई-पुणे रोड, चिंचवड, पुणे |
|---|---|---|---|---|
| ०१ | शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीनविषयक साफसफाईची सर्व कामे प्रती महा ठोक पद्धतीने करणे | रु. ६०,७५,७५१/- प्रतिमहा | रु. ६५,६५,६६५/- प्रतिमहा | रु. ४२,५१,५९९/- प्रतिमहा |

उपरोक्त तक्त्यांचे अवलोकन केले असता मे. बी. व्ही. जी. इंडिया लि. बी.व्ही. जी. हाऊस, प्रिमीयर प्लाझा, जुना मुंबई-पुणे रोड, चिंचवड, पुणे यांचे दर न्युनतम आलेले आहेत. असे त्यांचे प्रस्तावात नमूद केले आहे.

मागणी:- तरी शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छता विषयक साफसफाईची सर्व कामे ठोक पद्धतीने करणेसाठी न्युनतम दराची निवीदातील रकमेप्रमाणे रक्कम रु.४२,५१,५९९/- प्रतिमहा पुढील ५ वर्षाकरिता संस्थानकडून नगरपंचायतीस मिळावी. अशी विनंती शिर्डी नगरपंचायतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडे केलेली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:- सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. १४.११.२०१७ रोजीचे सभेत निर्णयार्थ सादर केला असता निर्णय क्र. ९५२ अन्वये खालील प्रमाणे निर्णय झालेला आहे.

उपरोक्त विषयावर चर्चा करण्यासाठी आजचे सभेसमोर शिर्डी नगरपंचायतीचे नगरसेवक, अधिकारी व बी. व्ही. जी. इंडिया लि. पुणे या कंपनीचे प्रतिनिधींना बोलविण्यात आले होते. सभेने शिर्डी नगरपंचायतीने राबविलेली ई- निवीदा प्रक्रिया व टेंडर डॉक्युमेंटचे अवलोकन केले. त्यामध्ये घंटागाडी व कर्मचा-यांची संख्या जास्त आढळून आली. परंतु सुपर्ण शिर्डी शहर स्वच्छतेच्या दृष्ट्रीने त्याची आवश्यकता असलेबाबत नगरसेवक व बी. व्ही. जी. इंडिया लि. पुणे या कंपनीचे प्रतिनिधींनी सभेस कळविले. यावर यापुर्वीच्या ठरावानुसार शिर्डी नगरपंचायतीस शिर्डी शहर स्वच्छतेसाठी प्रतिमहा रु. २५ लाख मात्र अनुदान देण्याचे ठरलेले आहे, परंतु ई-निवीदा प्रक्रियेमध्ये रु.४२,५१,५९९/- मात्र निम्नतम दर प्राप्त झालेले आहेत, याकरिता शिर्डी नगरपंचायतीचे नगरसेवक, अधिकारी व बी. व्ही. जी. इंडिया लि. पुणे या कंपनीचे प्रतिनिधींनी एकत्रित चर्चा करून यामधील काही बाबी कमी करून, दर कमी करणेचा प्रयत्न करावा, अशा सूचना अध्यक्ष महोदय यांनी दिल्या. परंतु त्यांचे चर्चेअंती दर कमी होऊ शकले नाही. काही बाबी कमी केल्यास स्वच्छतेच्या कामावर त्याचा परिणाम होईल,अशी विनंती नगरसेवकांनी केली.

यावर सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छता विषयक साफसफाईचे कामे करणेसाठी शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना प्रति महा रु.३५,००,०००/-मात्र अनुदान देण्यात यावे व ही रक्कम प्रत्येक महिन्यास त्यांना आदा करणेसाठी प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच उर्वरीत रक्कम शिर्डी नगरपंचायतीने ठेकेदारास आदा करावी. तसेच याबाबत करावयाच्या करारनाम्यातील अटि/शर्ती निश्चित करणेत याव्यात व सदर प्रस्तावास छाननी समितीच्या पुर्व परावनगीने महाराष्ट्र शासनाची मान्यता घेण्यात येऊन, त्यानंतर सदर रक्कम दरमहा अदा करणेस सुरवात करावी असे ठरले.

मा. छाननी समितीचा निर्णय:- सदरचा प्रस्ताव दि. २८.१२.२०१७ रोजीच्या मा. छाननी समिती समोर सादर केला असता निर्णय क्र.१९ अन्वये सविस्तर चर्चा करणेत आली. मा.उच्च न्यायालयाच्या जनहित याचिका क्रमांक १०२/ २०१६ व इतर याचिका यांमध्ये मा.उच्च न्यायालयाने दिनांक २९.११.२०१७ रोजीच्या निकालाच्या अनुषंगाने चर्चा होऊन, व्यवस्थापन समितीचा कार्यकाळ विचारात घेऊन, संबंधीत ठेकेदार मे.बी.व्ही.जी. इंडिया लि., पुणे यांचे बरोबरच्या करार दिनांक ०१.१२.२०१७ पासुन ११ महिन्यांसाठी नगरपंचायतीने करावा, असे नगरपंचायतीस कळविणेत यावे. व्यवस्थापन समितीने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे दरमहा रु.३५ लाख मात्र अनुदान नगरपंचायतीस देणेचे मान्य करणेत आले. संबंधीत ठेकेदार यांना सदर टेंडरची सर्व माहिती घेऊन, छाननी समितीच्या पुढील बैठकीत नगरपंचायतीमार्फत बोलविणेत यावे. पुढील बैठकीत ठेकेदार यांचेबरोबर स्वच्छतेच्या ठेक्याबाबत चर्चेअंती होणाऱ्या निर्णयानुसार प्रस्ताव शासनाकडे मंजुरीसाठी पाठविणेत यावा, असे ठरले.

शिर्डी नगरपंचायत यांचे पत्र:- शिर्डी नगरपंचायतीचे जा. क्रं. नप/ टे-८/७२/२०१८ दि. ०८.०१.२०१८ अन्वये शिर्डी नगरपंचयातीने जुने मक्तेदार कामाचा तपशील व मासिक खर्च व बी.व्ही.जी. यांचे कामाचा तौलनीक तक्ता सादर केला होता.

शिर्डी नगरपंचायतीने सादर केलेल्या तौलनीक तक्त्याचे अवलोकन होऊन, प्रस्ताव मा. छाननी समितीचे निर्णयार्थ फेरसादर केला असता मा. छाननी समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

मा. छाननी समितीचा निर्णय :- सदरचा प्रस्ताव दि. १९.०१.२०१८ रोजीच्या मा. छाननी समिती समोर फेर सादर केला असता निर्णय क्र.२४ अन्वये सविस्तर चर्चा होऊन असे ठरले की, व्यवस्थापन समितीने दिनांक २५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १५७ अन्वये रु.२५ लक्ष व दिनांक १४.११.२०१७ रोजीच्या सभेतील निर्णयानुसार रु. ३५ लक्ष तत्वतः मंजूर केलेले आहेत. नगरपंचायतीच्या दि. ०८.०१.२०१८ रोजीचे पत्राद्वारे आलेले विवरण पाहता, त्यामध्ये बरीच तफावत दिसून आली. याबाबत बी. व्ही. जी. इंडिया लि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री गायकवाड यांनी दरातील वाढीव फरक कमी करण्यास असमर्थता दर्शवली. त्यांचे असे म्हणणे पडले की, त्यांच्या कंपनीतर्फे देण्यात आलेल्या शर्ती व अटी नगरपंचायतीने मान्य केलेल्या आहेत व त्यात संस्थानचा कोठेही उल्लेख नाही. त्यामुळे निविदा रक्कम कमी करणे अशक्य आहे. छाननी समितीमध्ये सविस्तर चर्चा होऊन, वाढीव कामाचा तपशील व त्यातील त्रुटी यांचे अवलोकन केल्यानंतर शिर्डी संस्थानतर्फे या कार्यासाठी दरमहा रु.३० लक्ष मात्र रक्कम ५ वर्षासाठी देण्यात यावी. या ठरावास शासनाची मान्यता घेण्यात यावी. असा निर्णय झाला आहे.

तरी मा. व्यवस्थापन समितीचे दि. १४.११.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.९५२ अन्वये शिर्डी शहर स्वच्छतेसाठी रु.३५ लक्ष प्रतिमहा देणेबाबत संमती दिलेली आहे. मात्र दि. १९.०१.२०१८ रोजीच्या छाननी समितीचे सभेतील निर्णय क्र.२४ अन्वये रक्कम रु.३० लक्ष प्रतिमहा याप्रमाणे ५ वर्षासाठी देणेबाबत निर्णय झालेला आहे. त्यानुसार शिर्डी शहर स्वच्छतेसाठी उपरोक्तप्रमाणे निधी मंजुरीच्या प्रस्तावास विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेणे कामी जा. न. एसएसएसटी/वशी-लेखा-अनुदान/५७०६/२०१८ दि. २५ जानेवारी २०१८ रोजी प्रस्ताव सादर केला होता.

शासन निर्णय:- दि.२५ जानेवारी २०१८ च्या शासनास पाठविलेल्या प्रस्तावास अनुसरून खालीलप्रमाणे शासन निर्णय क्र. सासवि.-१०१८/१७९/प्र.क्र.२०/का.१६ दि. ०७ एप्रिल २०१८ पारीत झालेला आहे.

**१**) श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१ (२) (दोन) मधील तरतुदीनुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था येथील छाननी समितीने मान्यता दिलेप्रमाणे शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दीअंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदिन स्वच्छताविषयक साफ सफाईची कामे ठोक पद्धतीने करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दरमहा रु. ३० लक्ष इतका निधी पुढील ५ वर्षासाठी अनुदान स्वरुपात उपलब्ध करून देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

**२**) सदर निधीचा विनीयोग हा केवळ शिर्डी शहराच्या दैनंदिन स्वच्छताविषयक कामकाजासाठी करणे बंधनकारक असून याबाबत शिर्डी नगरपंचायतीने श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था यांना त्रैमासिक उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

उपरोक्त अटिंचे अधिन राहून, दि.१४.११.२०१७ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयाप्रमाणे शिर्डी नगरपंचायत यांचेशी अटि/शर्ती नुसार करारनामा करणेत आला आहे. तसेच शिर्डी नगरपंचायत शिर्डी यांना नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छताविषयक साफसफाईची कामे ठोक पद्धतीने करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांचेकडून अर्थसहाय्य देणेबाबतचा शासन निर्णय पारित झालेला असल्याने, शिर्डी नगरपंचायत यांना प्रतिमहा रक्कम रु. ३० लाख मात्र निधी ५ वर्षासाठी देणेबाबत कार्यवाही चालू करण्यात आलेली आहे. त्यानुसार शिर्डी नगरपंचायतीस माहे एप्रिल पासून रु. ३०.०० लक्ष प्रतिमहिना प्रमाणे अनुदान देण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली.

पुनःप्रस्ताव:- शिर्डी नगरपंचायतीचा दि. २८.०४.२०१८ ला प्रस्ताव प्राप्त झाला असून त्यात शिर्डी नगरपंचायतीने प्रति महिना ४२.५१ लक्ष रुपये निधी नव्याने प्रस्ताव सादर केला आहे. तसेच मा.सौ. योगिता अभय शेळकेपाटील, सदस्या तथा नगराध्यक्षा,शिर्डी नगरपंचायत यांनी मा.अध्यक्ष महोदय व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना दि.०२.०५.२०१८ रोजी दिलेल्या पत्रान्वये शिर्डी नगरपंचायतीच्या विविध विकास कामांचे

प्रस्तावापैकी शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दीअंतर्गत येणा-या दैनंदिन स्वच्छताविषय साफ सफाईची कामा संदर्भात घनकचरा व्यवस्थापनबाबत पुढील प्रमाणे मागणी केलेली आहे.

| अ.न. | तपशील | प्रस्तावाचे स्वरूप |
|---|---|---|
| १ | घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शिर्डी नगरपंचायतीस प्रती महिना ४२.५१ लक्ष संपर्ण रक्कम १ डिसेंबर २०१७ पासून मंजूर करणेबाबत | घनकचरा व्यवस्थापना अंतर्गत शिर्डी नगरपंचायतीने प्रतिमहीना ४२.५१ लक्ष रुपये निधी मिळविण्यासाठी प्रस्ताव सादर केला होता. तथापि श्री साईबाबा संस्थान यांनी प्रति महिना ३०.०० इतका निधी मंजूर केला आहे. तथापि प्रती महिना ४२.५१ लक्ष रक्कम १ डिसेंबर २०१७ पासून पुढील ५ वर्षासाठी मंजूर होणेसाठी शिर्डी नगरपंचायतीने नव्याने प्रस्ताव सादर केला आहे. त्यास व्यवस्थापन समिती व छाननी समितीची मान्यता मिळावी. |

व्यवस्थापन समिती व छाननी समितीचे शिफारशीसह शासनाकडे मान्यतेसाठी पाठविणेस विनंती केली आहे.

मा. व्यवस्थापन समितीचा निर्णय:- सदरचा प्रस्ताव मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०२.०५.२०१८ रोजीचे सभेत सविस्तर चर्चा होऊन, निर्णय क्र.३३९ अन्वये शिर्डी नगरपंचायतीच्या मागणीवर खालील प्रमाणे निर्णय घेण्यात आले.

घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत शिर्डी नगरपंचायतीस प्रती महिना रक्कम रु.३५ लक्ष निधी दि. १ डिसेंबर, २०१७ पासून देण्यात यावा, असे ठरले त्यास छाननी समितीची मान्यता घेऊन शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावा. तथापि नगरपंचायतीची मागणी ४२.५१ लक्ष प्रति महिना याचीही माहिती शासनाकडे पाठवावी असा निर्णय झालेला आहे.

मा. छाननी समितीचा निर्णय:- दि.२२.०५.२०१८ रोजीचे मा. छाननी समितीचे निर्णय क्रं. ३४ अन्वये वरील विषयावर सखोल चर्चा झाली, शिर्डी नगरपंचायतीचे दि. ०६.०२.२०१७ चे पत्र, व्यवस्थापन समितीचे दि. २५.०२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १५७, शिर्डी नगरपंचायतीचा दि. ०३. ११.२०१७ रोजीचा प्रस्ताव व विभागाचा अभिप्राय, व्यवस्थापन समितीचा अगोदरचा निर्णय, छाननी समितीचे दि. १९.०१.२०१८ रोजीचे बैठकीतील निर्णय व शासन निर्णय दि. ०७.०४.२०१८ या बाबींवर विचार होऊन, पुढील प्रमाणे मत मांडण्यात आले.

छाननी समिती सदस्य श्री सुरेश हावरे व श्री चंद्रशेखर कदम यांनी असे सुचविले की, दि.२८.०४.२०१८ रोजीचा शिर्डी नगरपंचायत यांचा सुधारीत प्रस्ताव व मा. व्यवस्थापन समितीचे दि. ०२.०५.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३३९ अन्वये विशेष म्हणजे शिर्डी संस्थानचे व नगरपंचायतीचे हद्दीत येणारे भाविक व शासनाचे स्वच्छतेबाबतचे निकष व धोरण लक्षात घेता शिर्डी नगरपंचायतीस स्वच्छतेपोटी प्रती महिना रक्कम रु. ३५ लक्ष निधी दि. ०१.१२.२०१७ पासून देण्यात यावा.

छाननी समितीचे अध्यक्ष न्या. चांदीवाल यांनी असे सुचविले की, स्वच्छता करण्या-या ठेकेदार कंपनीने खर्चाचा, कर्मचा-यांचा, मशिनरी, औषध फवारणी इत्यादी चा व्यापक विचार करता शिर्डी नगरपंचायतीस अनुदान म्हणून देण्यात येणारी दरमहा ३० लक्ष रक्कम योग्य आहे. व या रकमेव्यतिरिक्त जास्तीचा खर्च अपेक्षीत नाही. याबाबी शासनाच्याही निदर्शनास आल्या असून त्यानुसार शासनाने दि. ०७.०४.२०१८ रोजी छाननी समितीने ३५ लक्ष ऐवजी ३० लक्ष दरमहा देण्याचा जो निर्णय घेतला आहे. तो मंजूर केला आहे. अशा परिस्थितीत पुन्हा कोणतेही सबळ कारण नसतांना दरमहा ३० लक्ष ऐवजी ३५ लक्ष करणे अयोग्य आहे. परंतु रु. ३० लक्ष दि. ०१.१२.२०१७ पासून देण्यास सहमत आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता निर्णय क्रं.३४ शासनाचे निर्णयासाठी व मान्यतेसाठी पाठविणेत यावा.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०२.०५.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३३९ अन्वये व मा. छाननी समिती दि. २२.०५.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३४ अन्वये जा.न.एसएसएसटी/वशी/लेखा-अनदुान/ ९५६/२०१८ दि. २५ मे २०१८ अन्वये फेरप्रस्ताव सादर करण्यात आला होता.

सदर फेरप्रस्तावाच्या अनुषंगाने विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्रं. सासवि.-१०१८/ १७९/ प्र.क्र.२०/का.१६ दि.०७ एप्रिल २०१८ मध्ये शासन शुध्दीपत्रक क्रं. सासंवि-१०१८/१७९/प्र.क्र.२०/का.१६ दि. २२.११.२०१८ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झाला आहे.

शासन शुध्दीपत्रक:- “श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ मधील कलम २१(२) (दोन) मधील तरतुदीनुसार शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दीअंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छता

विषयक साफ सफाईची कामे ठोक पद्धतीने करण्यासाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी यांच्याकडून शिर्डी नगरपंचायत, शिर्डी यांना दि. ०१.१२.२०१८ पासून दरमहा रु.४२,५१,५९९/- इतका निधी पुढील पाच वर्षासाठी अनुदान स्वरुपात उपलब्ध करून देण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.”

प्रस्ताव:-

१) मा. व्यवस्थापन समितीचे दि.०२.०५.२०१८ रोजीचे सभेत निर्णय क्र.३३९ अन्वये शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दीअंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छता विषयक साफ सफाईची कामे ठोक पद्धतीने करण्यासाठी प्रतिमहा रक्कम रु.३५ लक्ष निधी दि. १ डिसेंबर, २०१७ पासून देणेबाबत निर्णय झालेला आहे.

२) छाननी समितीचे दि.२२.०५.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ३४ अन्वये रक्कम रु. ३०.०० लक्ष दि.०१.१२.२०१७ पासून देण्यास मंजूरी दिलेली आहे.

३) विधी व न्याय विभागाचा शासन निर्णय क्र. सासवि.-१०१८/१७९/प्र.क्र.२०/का.१६ दि. ०७ एप्रिल २०१८ व शासन शुध्दीपत्रक क्रं. सासंवि-१०१८/१७९/प्र.क्र.२०/का.१६ दि. २२.११.२०१८ नुसार शिर्डी नगरपंचायतीच्या हद्दीअंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छता विषयक साफ सफाईची कामे ठोक पद्धतीने करण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस दि. ०१.१२.२०१७ पासून पुढील ०५ वर्षासाठी अनुदान स्वरुपात उपलब्ध करून देण्यास मान्यता दिलेली आहे.

४) शिर्डी नगरपंचायतीस दि.०१.१२.२०१७ पासून रु.३०.०० लक्ष प्रतिमहा याप्रमाणे माहे. ३०.१०.२०१८ पर्यंत रु.३,३०,००,०००/- वितरीत करण्यात आलेले आहे. आता दि.२२.११.२०१८ च्या शासन शुद्धीपत्रकानुसार रु.४२,५१,५९९/- अदा करण्यास मान्यता मिळाल्याने रु.४२,५१,५९९/-(-)३०,००,०००/- प्रमाणे रु.१२,५१,५९९/- प्रतिमहा याप्रमाणे दि.३०.१०.२०१८ पर्यंत फरकाची रक्कम रु.१,३७,६७,५८९/- (अक्षरी रुपये एक कोटी, सदतीस लाख सदुसष्ट हजार, पाचशे एकोनव्वद मात्र) अदा केलेले आहे. या बाबी मा.व्यवस्थापन समितीच्या निदर्शनास आणून देण्यात आल्या त्यानुसार मा. व्यवस्थापन समितीने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील निर्णय:- मा.व्यवस्थापन समितीचे दि. १३.१२.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. ७३४ सदर अनुदानाचा विनीयोग योग्य पद्धतीने होत आहे किंवा नाही, नगरपंचायतीने काढलेल्या निविदेतील अटी शर्ती प्रमाणे व कामाच्या व्याप्तीप्रमाणे (Scope Of Work) कार्यवाही ठेकेदाराकडून केली जाते किंवा नाही, तसेच शहरात होणा-या स्वच्छतेबाबत नागरिकांचे अभिप्राय घेणेसाठी संस्थानच्या प्रशासकीय अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली आवश्यक कर्मचा-यांसह एक समिती स्थापन करण्यात यावी या समितीने सदर कामाचे दरमहा परिक्षण करावे व त्याबाबतचा सविस्तर अहवाल प्रत्येक तिमाहीस व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करावा. असा निर्णय झाला आहे.

पहाणी समिती स्थापना:- शिर्डी नगरपंचायतीस डिसेंबर २०१७ पासून रक्कम रु. ४२,५१,५९९/- मात्र दैनंदीन स्वच्छतेसाठी आदा करण्यात येणा-या अनुदानाचा विनीयोग योग्य पद्धतीने होत आहे किंवा नाही, नगरपंचायतीने काढलेल्या निविदेतील अटी शर्ती प्रमाणे व कामाच्या व्याप्तीप्रमाणे (Scope Of Work) कार्यवाही ठेकेदाराकडून केली जाते किंवा नाही, तसेच शहरात होणा-या स्वच्छतेबाबत नागरिकांचे अभिप्राय घेणेसाठी संस्थानच्या प्र. प्रशासकीय अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली असून त्यांचे अनुदान वितरणाबाबत मासिक अहवाल प्राप्त झालेनंतरच शिर्डी नगरपंचायतीस अनुदान वितरीत करण्यात येत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था शिर्डीकडून शिर्डी नगरपंचायतीस माहे डिसेंबर २०१७ ते एप्रिल २०२० पर्यंतचे दरमहा रु. ४२,५१,५९९/- मात्र आदा करण्यात आले असून त्यांचेकडून डिसेंबर २०१७ ते मार्च २०२० अखेर उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाले असून, नगरपंचायतीने स्वच्छता करण्या-या कंपनीने कामात दिरंगाई बाबत वेळोवेळी केलेला दंडाची रक्कम रु. २३,१६,३६१ (अक्षरी रुपये तेवीस लक्ष सोळा हजार तीनशे एकसष्ट मात्र) संस्थानला परत केली आहे.

शिर्डी ग्रामस्थांचे दि. २५.०५.२०२० रोजीचे पत्र:- शिर्डी नगरपंचायतीने श्री साईबाबा संस्थानला अनेक वेळेस विनंती करून शिर्डी शहराच्या स्वच्छतेसाठी साईबाबा संस्थानकडे दरमहा रु.४२,५१,५९९/- पाच वर्षासाठी मंजूर केले आहेत. साधारण गेल्या अडीच ते तीन वर्षापासून श्री साईबाबा संस्थान नियमितपणे दरमहा ठरलेली रक्कम शिर्डी नगरपंचायतकडे वर्ग करत आहे. साधारण गेल्या अडीच ते तीन वर्षापासून शिर्डी नगरपंचायतने स्वच्छतेचा ठेका बी. व्ही. जी. कंपनी पुणे यांना ५ वर्षासाठी दिलेला आहे. दरमहा मिळत असलेले रु. ४२,५१,५९९/- कसे खर्च होणार याचा तपशील शिर्डी नगरपंचायतीन सबंधीत ठेकेदार व श्री साईबाबा

संस्थानला सादर केलेला आहे. त्या तपशीलात उदाहरण म्हणून कर्मचा-यांना दरमहा रुपये १४,७२०/- इतका पगार मिळायला हवा होता. प्रत्यक्षात मात्र तसे न करता बीव्हीजी कंपनी कर्मचा-यांना त्यांच्या खात्यामध्ये रु.९०००/- च्या आसपास रक्कम जमा करत आहे. व उरलेली रक्कम शिर्डी नगर पंचायत स्वतःच्या खिशात घालत आहे. अशा प्रकारे सर्वच १५७ स्वच्छता कर्मचा-यांच्या पगारात अफरातफर केली जात आहे. असे सुप्ष्टपणे दिसते.

यापूर्वी शिर्डी नगरपंचायतीच्या मा.सदस्यांनी व नागरिकांनी देखील प्रत्यक्ष , लेखी अथवा तोंडी स्वरुपात अनेक वेळेस शिर्डी नगरपंचायतीच्या मुख्याधिका-यांकडे वारंवार तक्रार करून देखील याबाबत काहीही खुलासा केलेला नाही. ही रक्कम श्री साईबाबांच्या झोळीतील असल्याने त्याचा कुणी गैरवापर अफरातफर करत असेल तर निश्चित कार्यवाही झाली पाहीजे. अशी आपणांस विनंती आहे. आपण या संदर्भांत चौकशी समितीची नेमणूक करावी. व या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करून शिर्डी नगरपंचायतीकडून सदरची रक्कम वसूल करून सबंधीत कर्मचा-यांचे हक्काची रक्कम त्यांच्या खात्यात जमा करावी. किंवा साईबाबा संस्थान यांना परत करावी. जो पर्यंत ही रक्कम जमा होत नाही तोपर्यंत श्री साईबाबा संस्थानने शिर्डी नगरपालिकेला दरमहा मंजूर केलेले रुपये ४२,५१,५९९/- त्वरीत देणे थांबवावे. स्वच्छता कर्मचा-यांचे दरमहा ठेवलेले पगार जर त्यांना मिळत नसेल आणि शिर्डी नगरपंचायत जर हे पैसे खिशात घालत असेल तर ही बाब गंभीर असून याबाबत गांभीर्याने पाऊल उचलावेत ही अपेक्षा.

दि.१६.०३.२०२० पासून देशभरात कोरोना या विषाणूजन्य आजाराच्या संसर्गामुळे देशभर लॉकडाऊन सुरू आहे. तेव्हापासून दिवसाकाठी येणा-या सरासरी लाखभर भक्तांना साईबाबा मंदीर दर्शनासाठी बंद आहे. आणि ते कधी सुरू होईल याची शाश्वती नाही. शिर्डी शहरात दर्शनासाठी साईभक्त नसल्याने आणि व्यवसायिकांचे व्यवसाय देखील १००% बंद आहेत, परिणामी शहरात कचरा होण्याचा प्रश्नच येत नाही. सध्या शहर साफसफाईचे कुठलेच काम होत नाही. त्यामुळे याकाळात साईबाबा संस्थानने दिलेले पैसे परत करावेत आणि भविष्यात जोपर्यंत लॉकडाऊन उघडत नाही आणी साफसफाईला पुर्ण क्षमतेने सुरवात होत नाही तोपर्यंत साईबाबा संस्थानचे पैसे स्विकारू नयेत असे पत्रात नमूद केले आहे.

प्रस्ताव:- शिर्डी नगरपंचायत हद्दी अंतर्गत येणा-या परिसरातील दैनंदीन स्वच्छताविषयक साफसफाईची कामे ठोक पद्धतीने करण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीस रक्कम रु.४२,५१,५९९/- बाबत शिर्डी ग्रामस्थांचे निवेदनावर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३२३** **आजचे सभेत शिर्डी ग्रामस्थांचे निवेदनावर सांगोपांग चर्चा करण्यात आली. COVID -19 विषाणूच्या प्रार्दुभावाच्या पार्श्वभुमीवर दि.१७ मार्च,२०२० पासून श्री साई मंदिर भाविकांच्या दर्शनासाठी बंद करण्यात आलेले आहे. त्यामुळे भाविकांचे येणे बंद झाले आहे, असे समितीस समक्ष दाखवुन देण्यात आले. तसेच समितीच्या असेही निदर्शनास आणून देण्यात आले की, शिर्डी शहरातील दुकाने, हॉटेल्स, हार-फुले प्रसादाची छोटी मोठी दुकाने व इतर सर्व वाणिज्यीक उपक्रम बंद आहेत. सद्यस्थितीत ग्रामस्थांनी दिलेल्या निवेदनाचा विचार करता समितीचे असे लक्षात आले की, शिर्डी नगरपंचायतीस दरमहा रु.४२,५१,५९९/- स्वच्छतेसाठी देत असतांना सदर रकमेचा विनियोग योग्य पध्दतीने होतो किंवा नाही, तसेच साफसफाई होते किंवा नाही, या सर्व देखरेखीसाठी कुठलीही उपाययोजना केलेली नाही.**

**वरील परिस्थितीत शिर्डी नगरपंचायतीस सदर दरमहा रक्कम रु.४२,५१,५९९/-देणे अव्यवहार्य आहे. तथापी माहे मार्च-२०२० व एप्रिल-२०२०चे दरमहा रु.४२,५१,५९९/-मात्र रक्कम अनुक्रमे दि.२०.०४.२०२० व दि.१२.०५.२०२० रोजी शिर्डी नगरपंचायत यांना यापुर्वीच आदा केली असल्याने दि.०१.०५.२०२० पासून शिर्डी नगरपंचायतीस देणे बंद करावे. शिर्डी नगरपंचायतीस पैसे देण्याबाबत समिती पुढील निर्णय योग्य वेळी घेईल.**

**शिर्डी ग्रामस्थांचे निवेदनाचा विचार करता जेव्हा शिर्डी संस्थानने इतकी मोठी रक्कम नगरपंचायत शिर्डी यांना दिली आहे तेव्हा पासून या रकमेचा विनियोग कशा पध्दतीने केला गेला, स्वच्छता कुठे व कशी केली गेली, त्याची देखरेख कशी केली गेली, व त्यासाठी किती कर्मचारी लावले गेले इत्यादी बाबी शिर्डी नगरपंचायतीकडून स्पष्ट करुन घेणे गरजेचे आहे. करीता मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांना शिर्डी साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी याबाबत तपशिलवार पत्र देऊन वरील तपशिल व बाबी स्प्ष्ट करणारा अहवाल मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांचेकडून त्वरीत मागवावा. वरील अहवाल साधारणत: १५ दिवसात येईल अशी विनंती मुख्याधिकारी, शिर्डी नगरपंचायत यांना करण्यात यावी. सदरचा अहवाल व अभिप्राय मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर ठेवण्यात यावा, जेणे करुन याबाबत पुढील विचार करता येईल.**

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.१९** **संस्थान व रुग्णालय विभागाचा मालमत्ता विमा पॉलीसी व श्री साईभक्तांचा अपघाती विमा पॉलीसीचे नुतनीकरणासाठी राष्ट्रीयकृत विमा कंपन्याकडून प्राप्त झालेल्या न्युनतम दराप्रमाणे कार्यादेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्‍वस्तव्यवस्था, शिर्डी यांचे मालमत्तेचे विमा संरक्षण व रुग्णालय मालमत्ता विमा, तसेच श्री साईभक्तांचा अपघाती व घातपाती विमा संरक्षण मिळणेसाठी संस्थानकडून दरवर्षी राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांकडून दरपत्रके मागवून त्यातील न्युनतम दरांची दरपत्रक स्विकारुन विमा संरक्षण घेतले जाते.

(अ) संस्थान मालमत्ता विमा- संस्थान मालमत्तेच्या विमा पॉलीसीची मुदत दि. ०९ जुलै, २०२० रोजी संपत असुन, पुढील एक वर्ष कालावधीकरीता, (दि.१० जुलै २०२० ते दि. ०९ जुलै २०२१) संस्थान मालमत्तेच्या विम्याचे नुतनीकरण करणे गरजेचे आहे. नुतनीकरण करण्यात येणा-या विमा पॉलीसीचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| Sr. No. | Particulars | Insured Sum (in Crore) |
|---|---|---|
| 1 | Cash in Transit Insurance | 3.11 |
| 2 | Fidelity Guarantee Insurance | 5.30 |
| 3 | Burglary & Housebreaking Policy | 255.85 |
| 4 | Cash in Safe, Drawers | 0.60 |
| 5 | Comprehensive Fire Policy (Including STFI, Terrorism & Earthquake Cover) | 524.74 |
| | **Total -** | **789.60** |
| 6 | Group Insurance Under Provisions of Workmen Compensation Act, 1923 Monthly staff salary is Rs.5.85 Crores. | (Approx 2017 Personnel) |

**(ब) रुग्णालये विभाग मालमत्ता विमा-** रुग्णालये विभाग मालमत्ता विमा पॉलीसीची मुदत दि. १० जुलै, २०२० रोजी संपत असुन, पुढील एक वर्ष कालावधीकरीता, (दि.११ जुलै, २०२० ते दि.१० जुलै, २०२१) रुग्णालये मालमत्ताच्या विम्याचे नुतनीकरण करणे गरजेचे आहे. नुतनीकरण करण्यात येणा-या विमा पॉलीसीचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| Sr. No. | Particulars | Insured Sum (in Crore) |
|---|---|---|
| 1 | Cash in Transit Insurance | 00.11 |
| 2 | Fidelity Guarantee Insurance | 00.65 |
| 3 | Burglary & Housebreaking Policy | 90.70 |
| 4 | Cash in Safe, Drawers | 00.27 |
| 5 | Comprehensive Fire Policy (Including STFI, Terrorism & Earthquake Cover) | 104.00 |
| | **Total-** | **195.73** |
| 6 | Group Insurance Under Provisions of Workmen Compensation Act,1923 Monthly staff salary is Rs.2.65 Crores. | (Approx 550 Personnel) |

**(क) श्री साईभक्तांचा अपघात विमा-** श्री साईभक्तांचा अपघात विमा पॉलीसीची मुदत दि. ११ ऑगष्ट, २०२० रोजी संपत असुन,पुढील एक वर्ष कालावधीकरीता,( दि. १२ ऑगष्ट, २०२० ते दि. ११ ऑगष्ट, २०२१) श्री साईभक्त अपघाती/घातपाती विमा पॉलीसी नुतनीकरण करणे गरजेचे आहे. नुतनीकरण करण्यात येणा-या विमा पॉलीसीचा तपशिल पुढीलप्रमाणे.

| Sr.No | Perticulars | Approx Insured Value (Rs) |
|---|---|---|
| 1 | For Death only (25 Devotee) 25 Devotee x Rs.5,00,000/- | 1,25,00,000/- |
| 2 | For Loss of two limbs 25 Devotee x Rs.5,00,000/- | 1,25,00,000/- |
| 3 | For Loss of one limb 25 Devotee x Rs.2,50,000/- | 62,50,000/- |
| 4 | For Accidental Hospitalisation 25 Devotee x Rs.25,000/- | 6,25,000/- |
| | **Approx Insured Value (Rs)Total -** | **3,18,75,000/-** |

त्याअनुषंगाने, संस्थान मालमत्ता विमा दि.१० जुलै,२०२० ते दि.०९ जुलै,२०२१ अखेर व रुग्णालय मालमत्ता विमा दि.११ जुलै,२०२० ते दि.१० जुलै,२०२१ अखेर, तसेच श्री साईभक्त अपघाती/घातपाती विमा पॉलीसी दि. १२ ऑगष्ट, २०२० ते दि. ११ ऑगष्ट, २०२१ अखेर नुतनीकरणाच्या प्रस्तावास, दि. ३० एप्रिल, २०२० रोजीची मंजुर टिपणी अन्वये मान्यता मिळाली आहे. मिळालेल्या मान्यतेनुसार संस्थानने फक्त राष्ट्रीयकृत विमा कंपन्यांना जा.क्र.एसएसएस / वशी / लेखा / १४१,१४२ व १४३/२०१९ दि.३० एप्रिल, २०२० चे पत्रान्वये, त्यांचे न्युन्नतम दरपत्रके बंद लिफाफ्यामध्ये दि.१५ मे,२०२० अखेर संस्थानला पाठविणेबाबत कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन, चारही राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांनी त्यांचे न्युनत्तम दर सिलबंद लिफाफ्यामध्ये संस्थानला सादर केलेले होते. सादर केलेली दरपत्रकांची सिलबंद पाकीटे दि.२० मे,२०२० रोजी झालेल्या मा. खरेदी समितीच्या सभेमध्ये उघडण्यात आली आहेत.

राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता तयार करण्यात आला असुन, त्याचा तपशिल पुढीलप्रमाणे-

| **अ.नं** | **राष्ट्रीयीकृत विमा कंपनी** | **संस्थान मालमत्ता विमा** | **रुग्णालय मालमत्ता विमा** | **श्री साईभक्त अपघात विमा** |
|---|---|---|---|---|
| १. | नॅशनल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | ३८,४५,१४५/- | १५,७५,१८६/- | ५,६१,०००/- |
| २. | युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं. लि, शिर्डी | **३६,६३,९६१/-** | १५,७८,०००/- | ५,५५,०००/- |
| ३. | दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | ३७,५०,०००/- | **१४,५०,०००/-** | **५,११,०००/-** |
| ४. | दि. न्यु इंडिया एश्योरन्स कं.लि, श्रीरामपुर | ३६,८१,०००/- | १४,७५,०००/- | ५,२१,०००/- |

उपरोक्तप्रमाणे, संस्थान व रुग्णालये मालमत्तेसाठी तसेच श्री साईभक्त अपघाती विमासाठी राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांनी दर सादर केले होते, त्यातील न्युनतम दर धारकांचा तक्ता पुढील प्रमाणे-

| **अ.नं** | **तपशिल** | **राष्ट्रीयीकृत विमा कंपनी** | **न्युन्नतम प्रिमियम दर रुपये** (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|
| १. | संस्थान मालमत्ता विमा | युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं. लि, शिर्डी | ३६,६३,९६१/- |
| २. | रुग्णालये मालमत्ता विमा | दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | १४,५०,०००/- |
| ३. | श्री साईभक्त अपघात विमा | दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | ५,११,०००/- |

वरील तक्त्यातील अ.नं.०१ ते ०३ या राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांचे दर संस्थान मालमत्ता विमा दि.१० जुलै,२०२० ते दि.०९ जुलै,२०२१ अखेर व रुग्णालय मालमत्ता विमा दि.११ जुलै,२०२० ते दि.१० जुलै,२०२१ अखेर, तसेच श्री साईभक्त अपघाती/घातपाती विमा पॉलीसी दि. १२ ऑगष्ट, २०२० ते दि. ११ ऑगष्ट, २०२१ अखेर नुतनीकरणासाठी न्युनतम असल्याने, त्यांना मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सो., यांचे तोंडी निर्देशानुसार दि. २६ मे, २०२० रोजी दुपारी ०२.०० वा. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी सो., यांचे कक्षात चर्चा / वाटा-घाटीस बोलविणेत आले होते. सदर चर्चा / वाटा-घाटीअंती त्यांनी पत्राव्दारे खालीलप्रमाणे सुधारित दर देऊ केलेले आहे.

| **अ.नं** | **तपशिल** | **राष्ट्रीयीकृत विमा कंपनी** | **न्युन्नतम प्रिमियम दर रुपये** (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|
| १. | संस्थान मालमत्ता विमा | युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं. लि, शिर्डी | ३६,२५,०००/- |
| २. | रुग्णालये मालमत्ता विमा | दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | १४,००,०००/- |
| ३. | श्री साईभक्त अपघात विमा | दि. ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | ५,११,०००/- |

तरी वरील तक्त्यातील अ.नं.०१ ते ०३ या राष्ट्रीयीकृत विमा कंपन्यांचे दर, संस्थान मालमत्ता विमा दि.१० जुलै,२०२० ते दि.०९ जुलै,२०२१ अखेर व रुग्णालय मालमत्ता विमा दि.११ जुलै,२०२० ते दि.१० जुलै,२०२१ अखेर, तसेच श्री साईभक्त अपघाती/घातपाती विमा पॉलीसी दि. १२ ऑगष्ट, २०२० ते दि. ११

ऑगष्ट, २०२१ अखेर नुतनीकरणासाठी निम्मतम दर स्विकारुन संबंधीत राष्ट्रीयकृत विमा कंपनीस कार्यादेश देणेस व याकामी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३२४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालमत्ता विमा दि.१० जुलै,२०२० ते दि.०९ जुलै,२०२१ अखेर व रुग्णालय मालमत्ता विमा दि.११ जुलै,२०२० ते दि.१० जुलै,२०२१ अखेर, तसेच श्री साईभक्त अपघाती/घातपाती विमा पॉलीसी दि.१२ ऑगष्ट,२०२० ते दि.११ ऑगष्ट,२०२१ अखेर नुतनीकरणासाठी खालील प्रमाणे राष्ट्रीयकृत विमा कंपन्याचे निम्नतम दर स्विकारणेत येऊन त्यांना कार्यादेश देण्यास मान्यता देण्यात आली.**

| अ. नं | तपशिल | राष्ट्रीयीकृत विमा कंपनी | न्युन्नतम प्रिमियम दर रुपये (सर्व करांसहित) |
|---|---|---|---|
| १. | संस्थान मालमत्ता विमा | युनायटेड इंडिया इंन्शुरन्स कं. लि, शिर्डी | ३६,२५,०००/- |
| २. | रुग्णालये मालमत्ता विमा | दि.ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | १४,००,०००/- |
| ३. | श्री साईभक्त अपघात विमा | दि.ओरीएंटल इंन्शुरन्स कं. लि, कोपरगांव | ५,११,०००/- |

**(कार्यवाही- लेखाशाखा)**

---

**विषय नं.२०** **दि महाराष्ट्र अॅग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि.मुंबई यांना श्री साईबाबा संस्थान ट्रस्ट,शिर्डीचे परिसरात नोगा ब्रॅण्ड फुड प्रॉडक्टस विक्री केंद्राकरीता वापरास दिलेल्या जागेच्या वापरास मुदतवाढ मिळणेबाबत**.

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे दि.२६/०७/२०१९ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.३९३ नुसार मा.विभागीय व्यवस्थापक,दि महाराष्ट्र अॅग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,मुंबई विभागीय कार्यालय,देवळाली नाका, नाशिक यांना संस्थान मालकीचे शिर्डी येथील साईआश्रम भक्तनिवासस्थान-१ येथील स्वागतकक्षाचे लगत दक्षिणेकडील गाळा नं.४ आकारमान सुमारे १५IIx१० फूट असलेला गाळा दि.०१/०७/२०१९ ते दि.३०/०५/२०२० या ११ महिन्यांचे कालावधीसाठी दरमहा भाडे रक्कम रु.३,७९२/- व विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर भाडेतत्वाने वापरास देण्यास व त्याप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेस मान्यता देण्यात आलेली आहे.

उक्त गाळा वापराची मुदत दि.३०/०५/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याकारणाने पुढील दि.०१/०६/२०२० ते दि.३०/०४/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठीची मुदत वाढवून मिळणेकामी मा.विभागीय व्यवस्थापक,दि महाराष्ट्र अॅग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,मुंबई विभागीय कार्यालय,नाशिक यांनी त्यांचेकडील दि.२९/०४/२०२० रोजीचे ई-मेलद्वारे व त्यासोबतचे पत्र क्रं.विकाना/ नोगा / २०१९-२०/२४८० दि.२३/०३/२०२० अन्वये इकडेस विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- मा.विभागीय व्यवस्थापक,दि महाराष्ट्र अॅग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड,मुंबई विभागीय कार्यालय, नाशिक यांचे उपरोक्त विनंती पत्राप्रमाणे त्यांना वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील जमीन स.नं.१०८ पै.चे क्षेत्रामधील साईआश्रम भक्तनिवासस्थान-१ येथील स्वागतकक्षाचे लगत दक्षिणेकडील गाळा नं.४ आकारमान सुमारे १५IIx१० फूट असलेला गाळा दि.०१/०६/२०२० ते दि.३०/०४/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी यापूर्वीच्या भाडेदरात १०% वाढ करुन म्हणजेच रु.३,७९२/-+१०% रु.३७९/-असे एकूण दरमहा भाडे रक्कम रु.४,१७१/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर भाडेतत्वाने वापरास मुदतवाढ देता येईल व त्याप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेता येईल.

प्रस्ताव- मा.विभागीय व्यवस्थापक,महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या.मुंबई विभागीय कार्यालय,नाशिक यांना वापरास दिलेल्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचे मालकीचे मौजे शिर्डी येथील जमीन स.नं.१०८ पै.चे क्षेत्रामधील साईआश्रम भक्तनिवासस्थान-१ येथील स्वागतकक्षाचे लगत दक्षिणेकडील गाळा नं.४ आकारमान सुमारे १५IIx१० फूट असलेला गाळा दि.०१/०६/२०२० ते

दि.३०/०४/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी यापूर्वीच्या भाडेदरात १०% वाढ करुन म्हणजेच रु.३,७९२/-+१०% रु.३७९/-असे एकूण दरमहा भाडे रक्कम रु.४,१७१/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर भाडेतत्वाने वापरास मुदतवाढ देणेच्या व त्याप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३२५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थान मालकीचे मौजे शिर्डी येथील जमीन स.नं.१०८ पै.चे क्षेत्रामधील साईआश्रम भक्तनिवासस्थान-१ येथील स्वागतकक्षाचे लगत दक्षिणेकडील गाळा नं.४ आकारमान सुमारे १५IIx१० फूट असलेला गाळा मा.विभागीय व्यवस्थापक,महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्या.मुंबई विभागीय कार्यालय,नाशिक यांना नोगा ब्रॅण्ड फुड प्रॉडक्टस विक्री करीता मागील भाडेदरात १०% वाढ करुन म्हणजेच रु.३,७९२/-+१०%रु.३७९/-असे एकूण दरमहा भाडे रक्कम रु.४,१७१/- व मीटर रिडींगप्रमाणे विद्युत बील वेगळे आकारुन पूर्वीचेच अटी व शर्तीवर दि.०१/०६/२०२० ते दि.३०/०४/२०२१ या ११ महिन्यांचे कालावधीसाठी भाडेतत्वाने वापरास देण्यास मान्यता देण्यात आली. तसेच त्याप्रमाणे लिव्ह अॅण्ड लायसन्स करारनामा करुन घेण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२१** **श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेल्या १२ कियॉस्क/गाळे यांचे मुदतवाढीबाबत**.

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,(शिर्डी) अधिनियम २००४ चे कलम १७(३) मध्ये विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता राज्य शासनाच्या लेखी पूर्वमंजूरीने असेल त्याखेरीज समितीकडून एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही, विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्य संक्रमित करण्यात येणार नाही,अशी तरतूद आहे.

प्रस्तावना- यापूर्वी मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील जा.नं. श्रीसासंएक्रेसो/५७/२०१९ दि.१५/०६/२०१९ अन्वये संस्थेस साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी संस्थानचे साईआश्रम भाग-१ परिसरात ४, साईआश्रम भाग-२ परिसरात -१, साईप्रसादालय परिसरात-१, द्वारावती निवासस्थान पसिरात-२, साईबाबा भक्तनिवासस्थान परिसरात-१, साईउद्यान परिसरात-२ व साईप्रसाद निवासस्थान परिसरात-१ असे एकूण १२ कियॉस्क/गाळे दिलेले असून सदर कियॉस्क/गाळे यांची मुदत दि.०६/०९/२०१९ रोजी पूर्ण होत असून संस्थेस साईभक्तांचे सेवेसाठी व सोयीसाठी सदर कियॉस्क/गाळे हे पुढील ११ महिन्यांसाठी चालविण्यास परवानगी मिळावी असेबाबत संस्थानकडे विनंती केलेली आहे.

तदनुषंगाने "साईभक्तांना संस्थान परिसरात सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी १२ कियॉस्क/गाळयांचे जागा वापरास पूर्वीचेच अटी व शर्तीवर म्हणजेच मागील मुदतवाढ कालावधीचे मासिक भाडे रकमेत १०% वाढ करुन (रु.४,८३१/- मध्ये १०% वाढ रु.४८३/- = रु.५,३१४/-) रक्कम रु.५३१४/- (अक्षरी रु.पाच हजार तीनशे चौदा मात्र) प्रति कियॉस्क/गाळेचे मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन व त्याप्रमाणे करारनामा करुन उक्त सोसायटीस पुढील ११ महिने कालावधीसाठी म्हणजेच दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०८/२०२० या कालावधीसाठी जागा वापरास मुदतवाढ देणेच्या निर्णयार्थचा प्रस्ताव संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीचे सभेपूढे सादर करणेत आला.

त्यात निर्णय क्रं.३९४ प्रमाणे "श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेले १२ कियॉस्क/गाळे जागा वापरास पुर्वीचेच अटी व शर्तीवर मागील मासिक भाडे रकमेत १०% वाढ करुन (रु.४,८३१/- मध्ये १०% वाढ रु.४८३/-= रु.५,३१४/-) रक्कम रु.५,३१४/- मात्र प्रति कियॉस्क/गाळा मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० या सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास व त्याप्रमाणे करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.

सदर १२ कियॉस्क/गाळयांमध्ये विक्री करण्यात येणा-या वस्तु साईभक्तांना माफक दरात उपलब्ध करुन देणेबाबतच्या अटी करारनाम्यामध्ये टाकण्यात याव्यात. साईभक्तांना विक्री करण्यात येणारे साहित्य व वस्तु यांचा दर्जा व किंमत तपासणीकामी उपमुख्य कार्यकारी अधिकारी,मुख्य लेखाधिकारी व संबंधीत विभागाचे प्रशासकीय अधिकारी यांची समिती नेमण्यात येऊन पाहणी करण्यात यावी,तसेच सदरचे व्यवसाय संस्थानमार्फत ना-नफा-ना-

तोटा या तत्वावर चालविता येतील काय? याबाबत पडताळणी करुन सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा,असे ठरले.”

उक्त निर्णयातील पूर्वार्धात नमुद केलेप्रमाणे सदर सोसायटीकडून उक्त कियॉस्क/गाळे वापराबाबतचे दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० या ६ महिने कालावधीसाठीचा करारनामा दि.१५/११/२०१९ रोजी करुन घेण्यात आलेला आहे.

तसेच उपरोक्त निर्णयाच्या उत्तरार्धात नमूद केलेप्रमाणे सदर १२ कियॉस्क/गाळयांमध्ये विक्री करण्यात येणा-या वस्तु साईभक्तांना माफक दरात उपलब्ध करुन देणेबाबतच्या अटी करारनाम्यात टाकण्यात आलेल्या आहेत. तसेच साईभक्तांना विक्री करण्यात येणारे साहित्य व वस्तु यांचा दर्जा व किंमत तपासणीकामी संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी,मुख्य लेखाधिकारी व संबंधीत विभागाचे प्रशासकीय अधिकारी यांची समिती नेमण्यात येऊन पाहणी करण्यात आलेली असून सदरचे व्यवसाय संस्थानमार्फत ना-नफा-ना-तोटा या तत्वावर चालविता येतील किंवा कसे? याबाबतची पडताळणी संस्थानचे मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी,मा.मुख्य लेखाधिकारी व मा.प्रशासकीय अधिकारी यांनी करुन,त्याबाबतचा दि.१८/०३/२०२० रोजीचा खालीलप्रमाणे सविस्तर अहवाल सादर केलेला आहे.

-अहवाल -

विषय - श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी स्टॉल तपासणी अहवाल.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२६/०७/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३९४ खालीलप्रमाणे –

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेले १२ कियॉस्क/गाळे जागा वापरास पूर्वीचेच अटी व शर्तीवर मागील भाडे रकमेत १०%वाढ करुन (रु.४,८३१/- मध्ये १०% वाढ रु.४८३/- = रु.५,३१४/-) रक्कम रु.५,३१४/- मात्र प्रति कियॉस्क/गाळा मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०७/०९/२०१९ ते दि.०७/०३/२०२० या सहा महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास व त्याप्रमाणे करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.

सदर १२ कियॉस्क/गाळयांमध्ये विक्री करण्यात येणा-या वस्तू साईभक्तांना माफक दरात उपलब्ध करुन देणेबाबतच्या अटी करारनाम्यामध्ये टाकण्यात याव्यात. साईभक्तांना विक्री करण्यात येणारे साहित्य व वस्तू यांचा दर्जा व किंमत तपासणीकामी उपमुख्य कार्यकारी अधिकारी,मुख्य लेखाधिकारी व संबंधीत विभागाचे प्रशासकीय अधिकारी यांची समिती नेमण्यात येऊन पाहणी करण्यात यावी. तसेच सदरचे व्यवसाय ना-नफा-ना-तोटा या तत्वावर चालविता येती काय? बाबत पडताळणी करुन सविस्तर प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात यावा,असे ठरले.

त्यानुसार दि.०२/०३/२०२० ते दि.०४/०३/२०२० या कालावधीत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि.शिर्डी यांचेकडील १२ कियॉस्क/गाळे यांची पडताळणी करुन खालीलप्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डीचे मान्यतेने श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत संस्थान परिसरात मासिक भाडेतत्वावर श्री साईभक्तांचे सेवेसाठी व सोईसाठी थंडपेय स्टॉल,प्रसाद व नॉव्हेल्टी विभाग,जनरल स्टोअर इ. तसेच श्री साईभक्तांचे सेवेसाठी मोफत पादत्राणे विभाग तसेच मोफत बॅग क्लोकरुम चालविले जातात. तर समाधी मंदिर परिसरात सुरक्षेच्या कारणास्तव मोबाईल/कॅमेरा क्लोकरुम चालविले जातात.

सदरचे व्यवसायातून मिळणारे उत्पन्नामधून संस्थानचे कर्मचारी तथा संस्थेचे सभासद व कर्मचारी यांना त्यांच्या आर्थिक गरजा भागविण्यासाठी कमीत कमी दराने कर्जपुरवठा केला जातो. तसेच सोसायटीमार्फत सभासदांना दिपावली निमित्त भेट वस्तू त्याचप्रमाणे सभासदांना प्रासंगिक अनुदान,लग्न अनुदान याप्रमाणे सभासदांचे हिताचे व फायद्याचे दृष्टिने विविध योजना राबविल्या जातात.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत संस्थान परिसरात विविध ठिकाणी सध्या एकूण ३९ स्टॉल चालविले जात असून त्यांचा तपशिल खालीलप्रमाणे

| अ.नं. | व्यवसायाचे नाव | स्टॉलची संख्या |
|---|---|---|
| १ | दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व प्रसाद विक्री तसेच जनरल स्टोअर | ०५ |
| २ | नॉव्हेल्टी स्टोअर व क्लोकरुम | ०३ |
| ३ | प्रसाद व थंडपेय विक्री स्टोअर | ०१ |
| ४ | शालेय साहित्य अल्पदराने विक्री | ०३ |

| | | |
|---|---|---|
| ५ | मोबाईल कॅमेरा क्लोकरुम | ०६ |
| ६ | थंडपेय स्टॉल | ०८ |
| ७ | प्रसाद स्टोअर | ०५ |
| ८ | जनरल स्टोअर | ०१ |
| ९ | क्लोकरुम (मोफत सुविधा) | ०४ |
| १० | पादत्राणेगृह (मोफत सुविधा) | ०३ |
| | | ३९ |

सदरचे हे स्टॉल संस्थानचे सर्व भक्तनिवासस्थाने व मंदिर परिसरात असून श्री साईभक्तांचे सोईसाठी व सेवेसाठी दुध, दुग्धजन्य पदार्थ,थंडपेय व पेढा,शॉल तसेच साईबाबांचे फोटो,सौंदर्य प्रसाधनांची (साबण, कंगवे, टुथपेस्ट, ब्रश, पावडर) इ. विक्री योग्य ते शुल्क घेवून केली जाते.

मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी श्री.रविंद्र ठाकरे तसेच मुख्य लेखाधिकारी श्री.बाबासाहेब घोरपडे व प्रशासकीय अधिकारी डॉ.आकाश किसवे यांनी सदरचे स्टॉलची पाहणी केली असता स्टॉलमधून भक्तांना दिल्या जाणा-या वस्तू हया दर्जेदार असून त्यांची विक्रीही वाजवी दरात केली जाते,असे निदर्शनास आले आहे. या ठिकाणी विकल्या जाणा-या वस्तू व त्यांची किंमत यांची यादी सोबत माहितीस्तव जोडली आहे.

तसेच सदर कियॉस्क संस्थानचे ना-नफा-ना-तोटा तत्वावर चालविता येणे शक्त आहे काय? याबाबत पडताळणी करण्यात आली.

१) संस्थानमधील सर्व भक्तनिवासामधील हाऊस किपींगचे कामेही आऊटसोर्स केलेली आहेत,

२) सध्यस्थितीत सोसायटीमार्फत विक्री करण्यात येणा-या पदार्थांचे दर्जाबाबत कोणतीही तक्रार संस्थानकडे नाही,

३) सदर कियॉस्क संस्थानने चालविण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करावे लागेल तसेच सदर कियॉस्कमध्ये विक्रीसाठी ठेवावयाचा माल खरेदीसाठी स्वतंत्र कार्यवाही करावी लागेल,

४) सोसायटी विकत असलेल्या पदार्थामध्ये प्रसाद,थंडपेय,दुग्धजन्य पदार्थ यांचा समावेश असून त्यांचा वापराचा कालावधी अत्यंत कमी असतो. त्याबाबत संस्थानला दक्षता घ्यावी लागेल,

५) सोसायटीमार्फत क्लोकरुम,पादत्राणेगृह इ. सेवा विनाशुल्क पुरविले जातात.त्यामुळे संस्थानचे मनुष्यबळ वाचते. तसेच उत्सव कालावधीत संस्थानच्या मागणीनुसार अतिरिक्त क्लोकरुम/पादत्राणगृह उपलब्ध करुन देतात.

या सर्व बाबींचा विचार करता सदर कियॉस्क सध्या चालू आहेत त्याचप्रमाणे संस्थान कामगार सोसायटीमार्फत चालू ठेवावेत,असे वाटते,असे बाबतचा अहवाल सादर केलेला आहे.

सदर अहवाल अवलोकनार्थ यासोबत सादर केलेला आहे.

दरम्यानचे काळात मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचेकडील पत्र जा.क्रं.श्रीसासंएक्रेसो/१९२/२०१९ दि.१४/१२/२०१९ अन्वये उक्त १२ कियॉस्क/गाळे यांची वापराची मुदत दि.०७/०३/२०२० रोजी संपुष्टात येत असलेने सदर वापराची मुदत पुढील ११ महिन्यांसाठी वाढवून मिळणेकामी विनंती केलेली आहे.

विभागाचा अभिप्राय- उपरोक्त निर्णय क्रं.३९४ मधील उत्तरार्धात नमूद केलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी व मा.प्रशासकीय अधिकारी यांनी सादर केलेला उपरोक्त दि.१८/०३/२०२० रोजीचा संयुक्त अहवालाचे अवलोकन केले असता त्यात त्यांनी

१) संस्थानमधील सर्व भक्तनिवासामधील हाऊस किपींगचे कामेही आऊटसोर्स केलेली आहेत,

२) सध्यस्थितीत सोसायटीमार्फत विक्री करण्यात येणा-या पदार्थांचे दर्जाबाबत कोणतीही तक्रार संस्थानकडे नाही,

३) सदर कियॉस्क संस्थानने चालविण्यासाठी अतिरिक्त मनुष्यबळ उपलब्ध करावे लागेल तसेच सदर कियॉस्कमध्ये विक्रीसाठी ठेवावयाचा माल खरेदीसाठी स्वतंत्र कार्यवाही करावी लागेल,

४) सोसायटी विकत असलेल्या पदार्थामध्ये प्रसाद,थंडपेय,दुग्धजन्य पदार्थ यांचा समावेश असून त्यांचा वापराचा कालावधी अत्यंत कमी असतो. त्याबाबत संस्थानला दक्षता घ्यावी लागेल,

५) सोसायटीमार्फत क्लोकरुम,पादत्राणेगृह इ. सेवा विनाशुल्क पुरविले जातात.त्यामुळे संस्थानचे मनुष्यबळ वाचते. तसेच उत्सव कालावधीत संस्थानच्या मागणीनुसार अतिरिक्त क्लोकरुम/पादत्राणगृह उपलब्ध

करुन देतात. या सर्व बाबींचा विचार करता सदर कियॉस्क सध्या चालू आहेत त्याचप्रमाणे संस्थान कामगार सोसायटीमार्फत चालू ठेवावेत,असे वाटते, अशा प्रकारचे अभिप्राय दिलेले आहेत.

त्यामुळे सदरचे व्यवसाय संस्थानमार्फत ना-नफा-ना-तोटा या तत्वावर चालविता येणार नाहीत. परिणामी साईभक्तांच्या सोयीसाठी उक्त व्यवसाय श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचेमार्फत पूर्वीप्रमाणेच चालू ठेवणे उचित होईल. यास्तव मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचे उपरोक्त दि.१४/१२/२०१९ रोजीच्या पत्रात नमुद केलेल्या विनंतीचे अनुषंगाने साईभक्तांना संस्थान परिसरात सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी १२ कियॉस्क/गाळयांचे जागा वापरास पूर्वीचेच अटी व शर्तीवर म्हणजेच मागील मुदतवाढ कालावधीचे मासिक भाडे रकमेत १०% वाढ करुन (रु.५,३१४/- मध्ये १०% वाढ रु.५३१/-=रु.५,८४५/-) रक्कम रु.५,८४५/- (अक्षरी रु.पाच हजार आठशे पंचेचाळीस मात्र) प्रति कियॉस्क/गाळेचे मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन व पूर्वीप्रमाणेच करारनामा करुन उक्त सोसायटीस पुढील ११ महिने कालावधीसाठी म्हणजेच दि.०८/०३/२०२० ते दि.०७/०२/२०२१ या ११ महिने कालावधीसाठी जागा वापरास मुदतवाढ देता येईल.

प्रस्ताव- मा.चेअरमन,श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी त्यांचे उपरोक्त दि.१४/१२/२०१९ रोजीच्या पत्रात नमुद केलेल्या विनंतीचे अनुषंगाने साईभक्तांना संस्थान परिसरात सेवा-सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी १२ कियॉस्क/गाळयांचे जागा वापरास पूर्वीचेच अटी व शर्तीवर म्हणजेच मागील मुदतवाढ कालावधीचे मासिक भाडे रकमेत १०% वाढ करुन (रु.५,३१४/- मध्ये १०% वाढ रु.५३१/-=रु.५,८४५/-) रक्कम रु.५,८४५/- (अक्षरी रु.पाच हजार आठशे पंचेचाळीस मात्र) प्रति कियॉस्क/गाळेचे मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन व पूर्वीप्रमाणेच करारनामा करुन उक्त सोसायटीस पुढील ११ महिने कालावधीसाठी म्हणजेच दि.०८/०३/२०२० ते दि.०७/०२/२०२१ या ११ महिने कालावधीसाठी जागा वापरास मुदतवाढ मिळणेच्या व पूर्वीप्रमाणेच करारनामा करुन घेणेच्या निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३२६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडीट को-ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांना चालविणेस दिलेले १२ कियॉस्क/गाळे जागा वापरास पूर्वीचेच अटी व शर्तीवर मागील भाडे रकमेत १०% वाढ करुन (रु.५,३१४/- मध्ये १०% वाढ रु.५३१/-=रु.५,८४५/-) रक्कम रु.५,८४५/- (अक्षरी रु.पाच हजार आठशे पंचेचाळीस मात्र) प्रति कियॉस्क/गाळेचे मासिक भाडे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन तसेच विद्युत बील मीटर रिडींगप्रमाणे वेगळे आकारुन दि.०८/०३/२०२० ते दि.०७/०२/२०२१ या ११ महिने कालावधीसाठी मुदतवाढ देण्यास व त्याप्रमाणे करारनामा करुन घेण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२२** **महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत,पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा, ता.राहाता येथील शेती महामंडळाची जमीन संस्थानला कायम खरेदी मिळणेकामीचा सुधारीत प्रस्ताव सादर करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियमातील तरतूद– श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४ मधील कलम १७(२)(ट) विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविणेच्या प्रयोजनासाठी तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दिष्टे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील,असे नमूद आहे.

प्रस्तावना -

पूर्वपिठीका- संस्थानचे मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८/०२/२००९ रोजीच्या सभेत महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या लक्ष्मीवाडी मळया अंतर्गत येणा-या जमीनी विविध कारणांसाठी संस्थानने घेणेबाबतचा निर्णय क्रं.१६५ झालेला आहे. त्या अनुषंगाने मा.कार्यकारी संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांना इकडील जा.नं.एसएसएसटी/भूसंपादन/२१२६/२००९ दि.२०/०२/२००९ अन्वये खालील गावांचे त्यांचेपुढे दर्शविलेले क्षेत्र संस्थानला खरेदी देणेबाबत प्रस्ताव सादर करण्यात आलेला होता.

| अ.नं. | गावाचे नाव | क्षेत्र हे.आर |
|---|---|---|
| १ | निमगाव-को-हाळे | ६३.०९ |
| २ | कनकुरी | ०६.६५ |
| ३ | शिर्डी | ११.८२ |

| | | |
|---|---|---|
| ४ | निमगाव-को-हाळे (जी.आर.बी.वाडी) | ०५.९५ |
| ५ | साकुरी | १३.८२ |
| ६ | सावळविहीर बु. | ७५.७० |
| ७ | सावळविहीर खु. | ३३.६७ |
| ८ | चांदेकसारे/सोनेवाडी | १५३.७३ |
| | **एकूण** | **३६४.४३** |

उपरोक्त मागणी केलेल्या क्षेत्राबाबत शेती महामंडळाचे स्थानिक अधिकारी यांचेकडेस समक्ष चौकशी केली असता व सदर क्षेत्राचा ताळमेळ घेतला असता त्यापैकी काही गावातील काही क्षेत्र शेती महामंडळाने शासनामार्फत खंडकरी शेतक-यांना वाटप केलेले असलेचे व काही क्षेत्र वाटप करावयाचे प्रस्तावित असलेचे त्यांनी सांगितले. त्यामुळे प्रस्तुत प्रकरणी खाली नमूद केलेल्या गावांचे त्यांचेपूढे दाखविलेले क्षेत्र संस्थानला कायमस्वरुपी खरेदी करणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडेस सादर करणेकामी व त्याची प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,महाराष्ट्र शासन,मुंबई यांचेकडेस सादर करणेकामीच्या निर्णयार्थ प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.०९/१०/२०१६ रोजीच्या सभेत सादर करण्यात आला. त्यात निर्णय क्रं.७४५ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

यावर सविस्तर चर्चा होऊन प्रस्तावात नमूद केलेप्रमाणे निमगाव-को-हाळे,शिर्डी,साकुरी,सावळविहीर बु., सावळविहीर खु. व चांदेकसारे/सोनेवाडी येथील शेती महामंडळाची ३०१.८४ हेक्टर जमीन दुय्यम निबंधक यांनी कळविलेल्या रु.३६९,२८,९०,५३०/- मात्र मुल्यांकनाप्रमाणे खरेदी करणेस मान्यता देण्यात आली व तसा प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत,पुणे व मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,महाराष्ट्र शासन,मुंबई यांचेकडे सादर करणेत यावा,असे ठरले.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे सुधारीत प्रस्तावात खालील जमीनी दर्शविण्यात आलेल्या होत्या.

| **अ.नं.** | **गावाचे नाव** | **क्षेत्र हे.आर** |
|---|---|---|
| १ | निमगाव-को-हाळे | ७१.०५ |
| २ | शिर्डी | ११.६२ |
| ३ | साकुरी | १३.८२ |
| ४ | सावळविहीर बु. | ७५.६१ |
| ५ | सावळविहीर खु. | ३३.६७ |
| ६ | चांदेकसारे/सोनेवाडी | ९६.०७ |
| | **एकूण** | **३०१.८४** |

उपरोक्त निर्णय क्रं.७४५ प्रमाणे उपरोक्त जमीनी संस्थानला कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/३८९८/२०१६ दि.२४/१०/२०१६ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडे सादर करणेत आला व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय, मुंबई यांचेकडे सादर करणेत आलेला होता.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीच्या सभेत खालीलप्रमाणेच्या सुधारीत प्रस्तावास मान्यता देणेत आलेली आहे.

सुधारीत प्रस्ताव- वरील जमीनींची संस्थानचे मा.अध्यक्ष व मा.कार्यकारी अधिकारी यांनी दि.२८/०३/२०१७ रोजी समक्ष पाहणी केली असता त्यापैकी खालील नमूद केलेल्या जमीनी या संस्थानच्या जमीनीचे लगत असून सन २०१७-१८ हे श्रीं चे समाधी शताब्दी वर्ष असल्याने या कालावधीत साईभक्तांच्या गर्दीत मोठया प्रमाणात वाढ होण्याची शक्यता असलेने त्यासाठीचे नियोजन करणे, साईभक्तांना अन्न,निवारा,वैद्किय सेवा या मुलभूत सोयी-सुविधा विनासायास,विनाविलंब उपलब्ध व्हाव्यात तसेच साईभक्तांचे मनोरंजनासाठी सांस्कृतिक केंद्र उभारणे,उद्यानांची उभारणी करणे,वाहनतळ व्यवस्था करणे व प्रसादालयाचे विस्तारीकरण करणे यासाठी सदर जमीनींची संस्थानला तातडीने खरेदी करणे आवश्यक असलेचे मत झालेले आहे.

त्यासाठी खालील नमूद केलेल्या गावांचे त्यांचेपुढे दर्शविलेले क्षेत्र संस्थानला तातडीने कायम खरेदीने मिळणेकामी सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्या.पुणे यांचेकडेस सादर करता येईल.

| **अ.नं.** | **गावाचे नाव** | **क्षेत्र हे.आर** |
|---|---|---|
| १ | निमगाव-को-हाळे | ४०.७३ |
| २ | शिर्डी | ११.६२ |
| | **एकूण** | **५२.३५** |

उपरोक्त क्षेत्र संस्थानला खालील विविध कारणांसाठी आवश्यक असलेबाबत प्रस्तावात नमूद करता येईल.

**१)** उपरोक्तपैकी मौजे निमगाव को-हाळे येथील गट नं.८५ या जमीनीलगत संस्थानचे प्रसादालय आहे. त्या प्रसादालयात लाडू निर्मिती व्यवस्था आहे. लाडू निर्मितीसाठी १) विभाग प्रमुखकार्यालय २) स्टोअर ३) ऑनलाईल चक्की ४) पुरुष स्वच्छतागृह,स्त्री स्वच्छतागृह ५) एल.पी.जी.शेगडया त्याठिकाणी फलाईंग पॅन असतात. ६) बुंदी सुकविणे.७) बुंदीपासून लाडू तयार करणे. ८) लाडू सुकविणे ९) मेंटेनन्स रुम १०) कर्मचा-यांचे कपडे बदलण्याची जागा ११) कंट्रोल कॅबिन सुपरवायझर कार्यालय १२) वॉशिंग प्लॅन्ट तसेच एल.पी.जी.गॅससाठी स्वतंत्र गोडावून इ.साठी किमान ०.३० आर जागा लागते. १३) लायटींग रुम १४) पार्कींग इ.साठी संस्थानला उक्त सर्वे नं.८५ मधील पुरेशा जागेची आवश्यकता आहे व उर्वरित क्षेत्रात

**२)** साईभक्तांना जास्तीत जास्त निवासस्थाने उपलब्ध करुन देणे.

**३)** तात्पुरत्या स्वरुपाच्या निवासव्यवस्थेसह कॅम्पिंग ग्राऊंड.

**४)** पालखी तळ.

**५)** वाहनतळ व कॅम्पिंग ग्राऊंड इ.साठी सदर क्षेत्राची संस्थानला आवश्यकता आहे.

तसेच उपरोक्त मौजे निमगाव-को-हाळे व शिर्डी येथील जमीनींच्या किंमतीबाबतची माहीती मा.दुय्यम निबंधक,राहाता यांचेकडून प्राप्त करुन घेतली असून त्याप्रमाणे उपरोक्त जमीनींची एकूण किंमत रक्कम रु.१५७,२४,४३,०००/- (अक्षरी रु.एकशे सत्तावन्न कोटी चोवीस लाख त्रेचाळीस हजार मात्र) इतकी होत आहे. उपरोक्त गावांचे त्यांचेपुढे दर्शविलेले क्षेत्र संस्थानला तातडीने कायम खरेदी मिळणेकामी सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचेकडेस सादर करणेकामी मान्यता मिळणेसाठीचा प्रस्ताव व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई यांना सादर करणेच्या मान्यतेसाठी आणि उक्त जमीनींचे मा.दुय्यम निबंधक,राहाता यांनी कळविलेल्या मुल्यांकनाप्रमाणे खरेदी करणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला.

त्यात निर्णय क्रं.३२४ प्रमाणे "महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी कायम खरेदी करणेकामीचा सुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडेस सादर करणेत येवून त्याची प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई यांना देणेस व सदरहू जमीन मा.दुय्यम निबंधक,राहाता यांनी कळविलेल्या मुल्यांकनाप्रमाणे खरेदी करणेस मान्यता देण्यात आलेली आहे."

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णयाचे अनुषंगाने महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाचे लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील खालील नमूद केलेप्रमाणे मौजे निमगाव-को-हाळे येथील ४०.७३ हेक्टर व मौजे शिर्डी येथील ११.६२ हेक्टर असे एकूण ५२.३५ हेक्टर इतके क्षेत्र श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेसाठी कायमस्वरुपी खरेदी मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५७७/२०१७ दि.०२/०५/२०१७ अन्वये ई-मेलद्वारे तसेच इकडील जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/७०३/२०१७ दि.०९/०५/२०१७ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडेस सादर करणेत आलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत, पुणे यांनी त्यांचेकडील जा.नं.शे.व्य./श्री सा.सं.वि.शि/ज.मा./लक्ष्मी/१७-१८/१५६ दि.०३/०५/२०१७ अन्वये महाराष्ट्र शेतजमीन (जमीन धारणा कमाल मर्यादा) अधिनियम १९६१ यातील कलम २८-१ अ अ पोट कलम १ अन्वये महामंडळास भोगवटा मुल्यावर देण्यात आली आहे. तसेच कलम (३)-(अ) अन्वये जमीन माजी खंडकरी शेतक-यांना वाटपाचे काम चालू आहे. तथापि, वरील जमीनीपैकी मौजे निमगाव-

को-हाळे व सावळीविहीर येथील जमीनीबाबत काही माजी खंडक-यांनी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ,औरंगाबाद येथे याचिका क्रं.५८८६/२०१४ दाखल करुन दि.०८/०५/२०१४ रोजी जमीन वाटपास अंतरिम स्थगिती आदेश मिळविला आहे. सदर प्रकरणात मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद येथून स्थगिती आदेशाबाबत अंतिम निर्णय लागल्याशिवाय मौजे निमगाव-को-हाळे व शिर्डी येथील जमीन श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना खरेदीने उपलब्ध करुन देणेबाबत पुढील कार्यवाही करता येत नाही,असेबाबत इकडेस कळविलेले आहे.

तद्नुषंगाने श्री साईबाबांच्या समाधीस दि.१८ ऑक्टोबर २०१८ रोजी १०० वर्षे पूर्ण होत आहेत. यानिमित्त श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांचेतर्फे दि.०१ ऑक्टोबर २०१७ ते दि.१८ ऑक्टोबर २०१८ या कालावधीत श्री साईबाबा समाधी वर्ष साजरे केले जाणार आहे. या उत्सवासाठी देश विदेशातील विविध ठिकाणाहून साईभक्त शिर्डी येथे मोठया प्रमाणात येणार आहेत. भविष्यात या उत्सवासाठी होणा-या साईभक्तांच्या गर्दीच्या दृष्टिने समाधी शताब्दी महोत्सव आयोजनासाठी व विविध प्रकल्पांसाठी आणि साईभक्तांना पायाभूत सोयी-सुविधांसाठी संस्थानला संस्थानच्या जमीनींचे अत्यंत लगत असलेली शेती महामंडळाकडील मौजे शिर्डी व निमगाव-को-हाळे हद्दीतील जमीन क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर ची आवश्यकता आहे. यास्तव शेती महामंडळाचे जमीनी संबंधात मे.उच्च न्यायालय,खंडपीठ, औरंगाबाद यांचे कोर्टात श्री.प्रकाश तेजमल खाबीया व इतर विरुध्द महाराष्ट्र शासन व इतर हे रिट पिटीशन नं.५८८६/२०१४ चे दाखल असून त्यात मे.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांनी दिलेला स्थगिती आदेश उठविणेकामी व उपरोक्त जमीनी संस्थानला कायम खरेदी करणेस परवानगी मिळणेकामी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचेकडील रिट पिटीशन नं.५८८६/२०१४ मध्ये सिव्हील अॅप्लीकेशन (इंटरव्हेंशन अर्ज) क्रं.१२५९६/२०१७ चे दाखल करणेत आले.

प्रस्तुत प्रकरणी मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांनी त्यांचेकडील WRIT PETITION NO.5886 OF 2014 WITH CIVIL APPLICATION NO 12596 OF 2017 IN WRIT PETITION 5886 OF 2014 मध्ये दि.०९/१०/२०१७ रोजी खालीलप्रमाणे निर्णय दिलेला आहे.

ORAL ORDER :

Shri Kulkarni, learned Counsel for the petitioners, upon instructions, makes motion for withdrawal of the petition, with a prayer for issuance of direction to the respondent Collector to decide the representation in relation to the allotment of land, which was earlier claimed to have been owned by the petitioners or their ancestors.

2. Liberty is granted to the petitioners to file fresh representation in relation to the land claimed to have been owned by them to the concerned Competent Authority for its allotment. If such representation is made, the same be expeditiously decided by the respondent-Collector or the Competent Authority.

3. With above observations, the petition stands dismissed as withdrawn.

4. In view of dismissal of the petition, pending Civil Application stands disposed of.

मा.उच्च न्यायालय,खंडपीठ,औरंगाबाद यांचे उपरोक्त निर्णयामुळे महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत, पुणे यांच्या लक्ष्मीवाडी मळा येथील संस्थानने कायम खरेदी करुन मिळणेकामी मागणी केलेल्या जमीनींचे संदर्भात वाद संपुष्टात आलेले आहेत. परिणामी स्थगिती आदेश रद्द झालेले आहेत. त्यामुळे मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांचेकडील उपरोक्त पत्र जा.क्रं.शे.व्य./श्री.सा.सं.वि.शि./ज.मा./लक्ष्मी/१७-१८/१५६ दि.०३/०५/२०१७ चे निरर्थक झालेले आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.१४/११/२०१७ रोजी झालेल्या सभेतील विषय नं.१ दि.२३/१०/२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे. यातील **निर्णय क्रं.९१४** अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.

दि.२३/१०/२०१७ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना सभेत पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन सदरहू इतिवृत्त वाचून कायम करत असताना खालीलप्रमाणे दुरुस्त्याकरण्यात आल्या,त्यास मान्यता देण्यात आली.

(३) निर्णय क्रं.९०० - "यावर सविस्तर चर्चा होऊन,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांची लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील जमीन संस्थानला कायमस्वरुपी खरेदी करणेकामी जागेची पाहणी करुन,त्या जागेचे

स्थान,उपयुक्तता,त्यावरील अतिक्रमण याविषयी खात्री करुन सविस्तर फेरप्रस्ताव पुढील सभेसमोर सादर करणेत यावा,असे ठरले.”

याऐवजी खालीलप्रमाणे वाचण्यात यावे.

“यावर सविस्तर चर्चा होऊन,दि.२८/०४/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.३२४ अन्वये महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ, पुणे यांचे ५२.३५ हेक्टर इतके क्षेत्र संस्थान जमीनींच्या अत्यंत लगत असलेने सदरची जमीन संस्थानसाठी खरेदी करणेचे ठरलेले आहे. त्या निर्णयाप्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी.”

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त निर्णयाच्या अनुषंगाने मा.उच्च न्यायालयाकडील रिट पिटीशन नं.५८८६/२०१४ व सिव्हील ॲप्लिकेशन नं.१२५९६/२०१७ मधील दि.०९/१०/२०१७ रोजी निर्गत केलेल्या आदेशाचा संदर्भ देवून मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादीत,पुणे यांना त्यांचेकडेस यापूर्वी इकडील जा.नं. एसएसएसटी/मालमत्ता/७०३/२०१७ दि.०९/०५/२०१७ चे प्रस्तावा अन्वये संस्थानने मागणी केलेली लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील शेती महामंडळाची मौजे निमगाव-को-हाळे येथील ४०.७३ हेक्टर व शिर्डी येथील ११.६२ हेक्टर अशी एकूण ५२.३५ हेक्टर जमीन संस्थानला कायमस्वरुपी खरेदी

मिळणेकामी इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/५३४३/२०१७ दि.०४/०१/२०१८ अन्वये मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचेकडेस पुन:श्च प्रस्ताव सादर करणेत आला व त्याची प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई यांना व मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करणेत आलेली आहे.

उपरोक्त प्रस्तावाचे अनुषंगाने मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ,पुणे यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.शेव्य/श्री.सा.स.वि.शि./लक्ष्मीवाडी/१८-१९/७७७ दि.०३/०८/२०१८ अन्वये इकडेस पत्र सादर केले असून त्यात त्यांनी “सदरचा विषय हा संचालक मंडळाचे मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. यामध्ये संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार श्री साईबाबा संस्थान यांना साईभक्तांच्या विविध प्रयोजनासाठी सदरची जमीन विक्री करणेबाबत The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition,Rehabilitation and Resettlement Act २०१३ अन्वये व शासन निर्णय क्रं.संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ मे २०१५ यातील मार्गदर्शक तत्वांना अधीन राहून मौजे निमगाव-को-हाळे व मौजे शिर्डी येथील गट नंबरच्या क्षेत्राचे मुल्यांकन निश्चित करुन मिळण्यासाठी जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना कळविले होते. तसेच त्यानंतरही दि.०१/०२/२०१८ व दि.२०/०२/२०१८ रोजी पुन्हा त्यांना सदर जमीनीचे मुल्यांकन पाठविण्याबाबत कळविले होते.

याबाबत मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांनी त्यांचेकडील पत्र क्रं.मह/कार्या.जमीन २ब/११०८/२०१८ दि.२०/०५/२०१८ अन्वये या कार्यालयास कळविण्यात आले आहे की शासन निर्णय क्रं.संकीर्ण/०३/२०१५/ प्र.क्र.३४/अ-२ दि.१२ मे २०१५ पाहता सदर शासन निर्णयात जमीन थेट खरेदी पध्दतीने खाजगी वाटाघाटीने सिंचन व इतर प्रकल्पासाठी द्यावयाची असल्यास मोबदला निश्चितीसाठी जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हास्तरीय समितीने मोबदला रक्कम निश्चित करावी असे स्पष्टनमूद केले आहे व त्याची कार्यपध्दती नमूद केली आहे. त्यानुसार The Right to Fair Compensation and Transparency in Land Acquisition, Rehabilitation and Resettlement Act २०१३ अन्वयेशासन निर्णय संकीर्ण ०३/२०१५ प्र.क्र.३४/अ-२ दि.१२/०५/२०१५ व एलक्युएन ०१/२०१७/प्र.क्र.१२ अ-२ दि.२५ जानेवारी २०१७ नुसार खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव संबंधीत खरेदीदार यंत्रणा यांनी जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडे विहीत नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. तरी आपणास विनंती करण्यात येते की, जिल्हाधिकारी,अहमदनगर यांनी सुचित केल्याप्रमाणे श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी यांना महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, लक्ष्मीवाडी मळयातील मौजे निमगाव-को-हाळे व मौजे शिर्डी येथील क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर जमीन मागणीचा प्रस्ताव विहीत नमुन्यामध्ये जिल्हाधिकारी,अहमदनगर यांना पाठविण्यात यावा. सदर जमीनीचे मुल्यांकन निश्चित होवून अहवाल प्राप्त झाल्यानंतर प्रस्ताव शासनास मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.” असेबाबत इकडेस कळविलेले होते.

तदनुषंगाने इकडील पत्र जा.नं.एसएसएसटी/मालमत्ता/२६२९/२०१८ दि.३०/०८/२०१८ रोजीच्या पत्रान्वये मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांना “श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवाच्या तयारीसाठी मा.ना. मुख्यमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दि.०३/०५/२०१७, दि.०६/०७/२०१७ व दि.०१/०२/२०१८ रोजी झालेल्या बैठकीमध्ये महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचे मालकीचे लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता येथील ५२ हेक्टर ३५ आर जमीन संस्थानला कायम खरेदी

मिळणेबाबतच्या विषयावर चर्चा करण्यात आलेली असून दि.०१/०२/२०१८ रोजीच्या बैठकीत मा.ना.मुख्यमंत्री महोदय यांनी संस्थानने मागणी केलेली शेती महामंडळाकडील जमीन क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर इतके शासनाचे मुद्रांक विभागाच्या बाजारमुल्य तक्त्याप्रमाणे मुल्यांकन करण्यात यावे,असेबाबत स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. त्यामुळे उक्त जमीनीचे मुल्यांकन भुमी संपादन अधिनियम २०१३ प्रमाणे व शासन निर्णय क्रं.संकीर्ण-०३/२०१५/प्र.क्र.३४/अ-२ दि.१२/०५/२०१५ रोजीच्या निर्णयातील मार्गदर्शक तत्वांना अधीन राहून शासन परिपत्रक क्रं.एलक्युएन-०१/२०१७/प्र.क्र.१२ /अ-२ दि.२५ जानेवारी २०१७ नुसार खाजगी वाटाघाटीने थेट खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी,अहमदनगर यांचेकडेस विहित नमुन्यात सादर करणेबाबतचा प्रश्न उदभवत नाही.

शेती महामंडळाकडील उपरोक्त क्षेत्र हे हरित विभागात (ग्रीन झोन) समाविष्ट असून भविष्यात संस्थानला सदर क्षेत्राचे रहिवास विभागात (येलो झोन) मध्ये रुपांतर करावे लागणार आहे. त्यासाठी संस्थानला मोठया प्रमाणात अधिमुल्य रक्कम (प्रिमीयम) शासनाला अदा करावे लागणार आहे.

श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी ही धार्मिक संस्था असून धर्मादाय ट्रस्ट आहे. सदर ट्रस्टद्वारे लोकोपयोगी सार्वजनिक उपक्रम राबविले जातात. तरी मा.ना.मुख्यमंत्री महोदय यांनी दिलेल्या निर्देशानुसार संस्थानने मागणी केलेले शेती महामंडळाचे मालकीचे मौजे निमगाव-को-हाळे व मौजे शिर्डी येथील एकूण क्षेत्र ५२ हेक्टर ३५ आर इतके शासनाचे मुद्रांक विभागाच्या बाजारमुल्य दर तक्त्याप्रमाणे कायम खरेदी मिळणेकामी विनंती करणेत आली व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करुन त्यात मा.ना.मुख्यमंत्री महोदय यांनी दि.०१/०२/२०१८ रोजीच्या बैठकीत दिलेल्यानिर्देशानुसार उक्त क्षेत्राचे मुद्रांक विभागाच्या बाजारमुल्य तक्त्याप्रमाणे मुल्यांकन करणेबाबत त्यांचेमार्फत मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांना आदेश होणेकामी विनंती करणेत आली व प्रत मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,महाराष्ट्र शासन,मंत्रालय,मुंबई यांचेकडे सादर करणेत आलेली आहे.

तदनंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.२१/०८/२०१९ रोजीचे सभेतील आयत्या वेळचा विषय नं.२७ निर्णय क्रं.४७४ प्रमाणे शेती महामंडळाची जमीन शासनाचे बाजारमुल्य दरानुसार खरेदी करण्यासाठी पाठपुरावा करणेत यावा,असा निर्णय झालेला आहे. सदर

निर्णयाचे अनुषंगाने इकडील दि.०२/१०/२०१९ रोजीच्या कार्यालयीन टिपणीप्रमाणे मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांना पुन:श्च स्मरणपत्र सादर करणेत आलेले असून प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई व मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांना सादर करणेत आलेली आहे. सदरचा प्रस्ताव अद्याप महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे कार्यालयाकडे प्रलंबित आहे.

तथापि उपरोक्त प्रस्तावातील काही जमीनी खंडकरी शेतकरी यांनी शासनाकडे मागणी केलेल्या असल्याचे समजते. तदनुषंगाने मौजे निमगाव-को-हाळे येथील शेती महामंडळाच्या मालकीच्या संस्थानच्या जमीनीलगत असलेल्या व खंडकरी शेतकरी यांनी मागणी न केलेल्या जमीनींबाबतची माहिती मा.स्थावर व्यवस्थापक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,लक्ष्मीवाडी मळा,ता.राहाता यांचे कार्यालयातून समक्ष प्राप्त करुन घेतली असता त्यात खालील नमुद केलेल्या व संस्थानच्या जमीनींच्या लगत असलेल्या जमीनी खंडकरी शेतकरी यांनी मागणी केल्याचे दिसून येत नाही.

महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे लक्ष्मीवाडी मळा येथील संस्थानला खरेदी मिळणेकामीच्या सुधारीत प्रस्तावातील जमीनी.

| अ.नं. | जमीन मागितली ते गाव | मागणीचे सर्वे नं./गट नं. | क्षेत्र हे.आर | क्षेत्र एकर गुंठे |
|---|---|---|---|---|
| १ | निमगाव-को-हाळे | ८४/२ | ००.७७ | १.३७ |
| २ | निमगाव-को-हाळे | ८५/२ | ०२.१६ | ५.१६ |
| ३ | निमगाव-को-हाळे | ८६ | ०१.६२ | ४.०२ |
| ४ | निमगाव-को-हाळे | ८९ | ०१.८० | ४.२० |
| ५ | निमगाव-को-हाळे | ९०/२ | १०.३६ | २५.३६ |
| ६ | निमगाव-को-हाळे | ९७ | ००.११ | ०.११ |
| ७ | निमगाव-को-हाळे | ९८ | ००.१० | ०.१० |
| ८ | निमगाव-को-हाळे | ९९ | ००.१७ | ०.१७ |
| | **एकूण** | | **१७.०९** | **४२.२९** |

शिर्डी हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे तीर्थस्थळ झालेले आहे. त्यामुळे दिवसेंदिवस साईभक्तांच्या गर्दीत वाढच होत आहे. त्यासाठीचे नियोजन करणे,साईभक्तांना अन्न,निवारा,वैद्यकीय सेवा या मुलभुत सोयी-सुविधा विनासायास,विनाविलंब उपलब्ध व्हाव्यात तसेच साईभक्तांचे मनोरंजनासाठी सांस्कृतिक केंद्र उभारणे, उद्यानांची उभारणी करणे, वाहनतळ व्यवस्था करणे व प्रसादालयाचे विस्तारीकरण करणे इ. तातडीच्या उपाययोजना करणेसाठी संस्थानला संस्थानच्या जमीनीलगत असलेल्या महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील उपरोक्त नमुद केलेल्या जमीनी तातडीने उपलब्ध करणे जरुरीचे झालेले आहे.

सदर जमीनींचे मुल्यांकन मा.दुय्यम निबंधक श्रेणी-१,राहाता यांचेकडून प्राप्त करुन घेतले असून त्यात त्यांनी त्यांचेकडील जा.क्रं.मुल्यांकन/२०२०/१७/२०२० दि.३०/०१/२०२० रोजीच्या पत्रान्वये सदर जमीनींचे सन २०१९-२० चे बाजारमुल्य खालीलप्रमाणे दर्शविलेले आहे.

| अ.नं. | स.नं. | गावाचे नाव | क्षेत्र | दर विभाग क्रं. | सन २०१९-२० चे बाजारमुल्य रुपये |
|---|---|---|---|---|---|
| १ | ८४/२ | निमगाव-को-हाळे | ०० हे. ७७ आर | ११.७ | ३,८३,३८,०००/- |
| २ | ८५/२ | निमगाव-को-हाळे | ०२ हे. १६ आर | ११.४ | ८,३५,२५,०००/- |
| ३ | ८६ | निमगाव-को-हाळे | ०१ हे. ६२ आर | ११.४ | ६,५९,७५,०००/- |
| ४ | ८९ | निमगाव-को-हाळे | ०१ हे. ८० आर | ११.४ | ७,१८,२५,०००/- |
| ५ | ९०/२ | निमगाव-को-हाळे | १० हे. ३६ आर | ११.४ | ३५,००,२५,०००/- |
| ६ | ९७ | निमगाव-को-हाळे | ०० हे. ११ आर | ११.४ | ६७,६०,०००/- |
| ७ | ९८ | निमगाव-को-हाळे | ०० हे. १० आर | ११.४ | ६१,७५,०००/- |
| ८ | ९९ | निमगाव-को-हाळे | ०० हे. १७ आर | ११.४ | १,०२,७०,०००/- |
| | | **एकूण** | **१७ हे. ०९ आर** | | **६३,२८,९३,०००/-** |

विभागाचा अभिप्राय- शिर्डी हे आंतरराष्ट्रीय किर्तीचे तीर्थस्थळ झालेले आहे. त्यामुळे दिवसेंदिवस साईभक्तांच्या गर्दीत वाढच होत आहे. त्यासाठीचे नियोजन करणे,साईभक्तांना अन्न,निवारा,वैद्यकीय सेवा या मुलभुत सोयी-सुविधा विनासायास,विनाविलंब उपलब्ध व्हाव्यात तसेच साईभक्तांचे मनोरंजनासाठी सांस्कृतिक केंद्र उभारणे,उद्यानांची उभारणी करणे,वाहनतळ व्यवस्था करणे व प्रसादालयाचे विस्तारीकरण करणे इ. तातडीच्या उपाययोजना करणेसाठी संस्थानला संस्थानच्या जमीनीलगत असलेल्या महाराष्ट्र

राज्य शेती महामंडळाच्या मौजे निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील उपरोक्त नमुद केलेल्या जमीनी तातडीने उपलब्ध करणे जरुरीचे झालेले आहे.

यास्तव महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे लक्ष्मीवाडी मळ्यातील निमगाव-को-हाळे,ता.राहाता येथील उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या जमीनींचे एकूण क्षेत्र १७.०९ हेक्टर (४२.२९ एकर) इतके संस्थानला मा.दुय्यम निबंधक,राहाता यांनी कळविलेल्या उपरोक्त मुल्यांकनाप्रमाणे कायम खरेदी करुन मिळणेकामीचासुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित, पुणे यांचेकडेस सादर करता येईल व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई आणि मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करता येईल.

प्रस्ताव- महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचे लक्ष्मीवाडी मळ्यातील निमगाव-को-हाळे, ता.राहाता येथील उपरोक्त तक्त्यात दर्शविलेल्या जमीनींचे एकूण क्षेत्र १७.०९ हेक्टर (४२.२९ एकर) इतके संस्थानला नाममात्र दरात किंवा दुय्यम निबंधक, राहाता यांनी कळविलेल्या उपरोक्त मुल्यांकनाप्रमाणे कायम खरेदी करुन मिळणेकामीचासुधारीत प्रस्ताव मा.व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य शेती महामंडळ मर्यादित,पुणे यांचेकडेस सादर करणेच्या व प्रत मा.प्रधान सचिव,महसुल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई आणि मा.प्रधान सचिव,विधी व न्याय विभाग,मंत्रालय,मुंबई यांचेकडेस सादर करणेच्या मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३२७** **सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला. शेती महामंडळाची जमीन संस्थानला खरेदी करावयाची झाल्यास या जमीनीचा उपयोग कोणत्या उपक्रम/योजनेसाठी करणार त्याचे नियोजन मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर सादर करावे, असे ठरले.**

**(कार्यवाही- मालमत्ता विभाग)**

---

**विषय नं.२३** **माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हेरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewall कालबाहय झाल्याने नविन ०२ नग Firewall प्रचलित पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :- कलम १७ (१) भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :- ०१. दि.०७.११.२००९ निर्णय क्र. ७९९
०२. दि.२३.०५.२०१७, निर्णय क्र.४३२
०३. दि.०४.०४.२०१८, निर्णय क्र.२७५
०४. दि.११.०५.२०२०, निर्णय क्र.२६४

प्रास्ताविकः- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०७.११.२००९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७९९ अन्वये माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत साईटेक प्रकल्प उभारणीची कार्यवाही हाती घेण्यात आलेली होती. याकामी प्रचलीत पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबवून प्रकल्प उभारणीसाठी मे.कॉग्नीझंट टेक्नोलॉजी, पुणे यांना कार्यादेश देण्यात आलेला होता. त्यानुसार प्रकल्पाअंतर्गत मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत संस्थानचे विविध विभागांचे मागणीनुसार त्यांचे विभागाकरीता एकुण ३८ संगणकीय प्रणाली विकसीत करुन कार्यान्वीत करणेत आलेल्या आहेत. तसेच, मे.कॉग्नीझंट यांचेमार्फत सदरच्या प्रणाली कार्यान्वीत करणेकरीता आवश्यक असलेले डेटा सेंटर, नेटवर्क, हार्डवेअर, युपीएस व इतर अनुषंगिक सुविधा कार्यान्वीत करणेत आलेल्या आहेत. साईटेक प्रकल्पासाठी करण्यात आलेल्या करारनाम्यानुसार प्रकल्प देखभालीचा मे.कॉग्नीझंट टेक्नोलॉजी, पुणे यांचा कालावधी माहे-एप्रिल-२०१७ अखेर संपुष्टात आलेला आहे.

दरम्यानचे कालावधीमध्ये "साईटेक प्रकल्प-२" अंतर्गत संगणक प्रणालीबाबतची सर्व कार्यवाही तसेच Data Centre, Cloud Based Services, Hardware & Network बाबत सल्ला व व्यवस्थापनबाबतची कार्यवाही मोफत स्वरुपात करुन देण्याचे मे.टाटा सन्स यांचे प्रस्तावास मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२७५ अन्वये मान्यता देण्यात आलेली होती. सदर निर्णयान्वये मे.टाटा सन्स यांनी मागणी केलेप्रमाणे प्रकल्प हस्तांतरीत करणेकामी मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांना पुढील तीन महिन्याकरिता (मे-२०१८ ते जुलै-२०१८) मुदतवाढ देणेत आली होती. त्याचप्रमाणे Hardware करीता मे.टाटा सन्स यांचे सल्ल्यानुसार संस्थानचे प्रचलीत पद्धतीनुसार खरेदी प्रक्रिया राबविणेत यावी, असे निर्देशही सदर निर्णयान्वये देण्यात आलेले आहेत.

उपरोक्त निर्णयान्वये मे.टाटा सन्स यांचेमार्फत मे.टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (मे.टिसीएस) यांनी प्रकल्प हस्तांतरीत करणेची कार्यवाही दि.१५.०४.२०१८ पासून सुरु करुन प्रकल्पाअंतर्गतचे प्रत्यक्ष कार्यवाहीस दि.०१.०९.२०१८ पासून सुरुवात केलेली आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत असलेले हार्डवेअर (सर्व्हर, संगणके, युपीएस व संगणकीय साहित्य) नेटवर्क साहित्य (फायरवाल, स्विचेस, राऊटर्स, नेटवर्क रॅक, लॅन केबल, ऑप्टीक फायबर केबल) इ. सन-२०१०-११ मध्ये मे. कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांचेमार्फत खरेदी करुन कार्यान्वीत केलेले आहेत. प्रकल्प कालावधीकरीता या सर्व प्रणाली व साहित्यांचे व्यवस्थापन, दुरुस्ती/देखभाल याची कार्यवाही करारनाम्याप्रमाणे मे.कॉग्नीझंट टेक्नॉलॉजी, पुणे यांनी केलेली आहे. सद्यस्थितीत सदरचे सर्व साहित्य कालबाह्य झालेले असून उत्पादक कंपनीमार्फत सदर साहित्यांचे दुरुस्ती/देखभालीचा कालावधीही संपुष्टात आलेला आहे.

साईटेक प्रकल्पाअंतर्गत माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे १६ सर्व्हर व नव्याने खरेदी केलेले ११ ब्लेड सर्व्हर कार्यान्वीत आहेत. सदरचे सर्व्हर हे प्रकल्पाअंतर्गतच्या सर्व प्रणाली कार्यान्वीत करणे, संस्थानचे विविध सुविधांचा प्रणालीमार्फत लाभ घेण्या-या साईभक्तांची महत्वाची माहिती (Data) संकलीत करणे, संस्थानअंतर्गत व बाहेरील इंटरनेट व ई-मेल देवाण-घेवाण व्यवस्थापन, User व्यवस्थापन इ. करीता कार्यान्वीत करणेत आलेले आहेत. सर्व्हरवरील माहितीचे सुरक्षिततेच्या दृष्टीने Firewall कार्यान्वीत करणेत आलेला आहे. Firewall चा मुख्य उद्देश सर्व्हरवरील माहिती सुरक्षीत रहावी, सर्व्हरला व्हायरसचा प्रादुर्भाव होऊ नये तसेच माहिती इंटरनेटचे माध्यमातून कोणी चोरु (Hack) करु नये हा आहे. प्रकल्पाअंतर्गत कार्यान्वीत Online.sai.org.in हया वेबसाईटद्वारे जगभरातील साईभक्तांनी विविध सुविधांचे केलेल्या बुकींगचा डेटा Cloud Server वरुन पुढील प्रक्रियेकरीता इंटरनेटद्वारे डेटा सेंटर येथील सर्व्हरवर वेळोवेळी स्टोअर केला जातो. तसेच मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञ प्रकल्पाअंतर्गत प्रणालीबाबतचे कार्यवाहीकरीता इंटरनेटद्वारे सदरचे सर्व्हरला संलग्न

होतात. संस्थानअतंर्गत विविध विभागांना कार्यालयीन कामकाजाकरीता सदरचे सर्व्हरमार्फतच इंटरनेट उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

नमुद केलेप्रमाणे डेटा सेंटर येथे कार्यान्वीत असलेला Firewall हा कालबाहय झालेला असुन उत्पादक कंपनीकडून त्याचे देखभालीचा कालावधीही संपुष्टात आलेला आहे, सबब सदरचे Firewall बाबत वारंवार तांत्रिक अडचणी येत आहेत. दि.०७.०४.२०२० रोजी रात्री ८.०० वा. Firewall काही तांत्रिक अडचणीमुळे बंद पडला होता. Firewall हा restart केलेनंतर पुर्ववत चालू झालेला आहे. याबाबत मे.टिसीएस यांनी दि.०८.०४.२०२० रोजीचे ई-मेलदवारे सदरचा Firewall तातडीने बदलणेबाबत कळविलेले आहे. ई-मेलमध्ये त्यांनी Firewall बाबत वारंवार अडचणी येत आहेत.सबब, प्रणालींबाबतची कार्यवाही करणेस अडचणी येऊ नये तसेच साईभक्तांची महत्वाची माहिती सुरक्षीत राहणेचे दृष्टीने सदरचा Firewall बदलणे अत्यावश्यक असल्याचे कळविलेले आहे. प्रकल्पाअंतर्गत त्यांचेमार्फत सद्यस्थितीत एकुण ४५ तंत्रज्ञ काम करत असून त्यांना अनुषंगिक कार्यवाहीकरीता सर्व्हरला सलंग्न व्हावे लागते. यापुर्वीही सदरचा Firewall बाबत जुन-२०१९, ऑगष्ट-२०१९, ऑक्टोबर-२०१९, फेब्रुवारी-२०२०, व एप्रिल-२०२० मध्ये तांत्रिक अडचणी निर्माण होऊन Firewall बंद पडला होता. सबब, Firewall पुन्हा बंद पडल्यास त्यांचे तंत्रज्ञांना अनुषंगिक कार्यवाही करणे शक्य होणार नाही. Firewall बंद पडल्यास सर्व्हरला व्हायरसचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही तसेच साईभक्तांचे महत्वाची माहितीचे सुरक्षीततेबाबतही अडचण येऊ शकते, असेही ई-मेलमध्ये नमुद केलेले आहे.

संदर्भीय ई-मेलमध्ये नमुद Firewall बदलणेकामी नविन Firewall चे तांत्रिक तपशील, संख्या व अंदाजे खर्च कळविणेबाबत मे.टिसीएस यांना सुचित करणेत आले होते. त्यानुसार मे.टिसीएस यांनी दि.१०.०४.२०२० चे ई-मेलदवारे Palo Alto, Check Point अथवा Fortinet यापैकी कोणत्याही उत्पादक कंपनीचे ०२ नग Firewall खरेदी करणेबाबत अभिप्राय दिलेला आहे. सदरचे Firewall ची अंदाजे किंमत प्रती नग Palo Alto रक्कम रु. २५,००,०००/- व Fortinet रक्कम रु. ४५,००,०००/- सरासरी रक्कम रु ३५,००,०००/- + कर, ०२ नगाकरीता एकुण रक्कम रु. ७०,००,०००/- + कर इतका खर्च अपेक्षीत असल्याचे ई-मेलमध्ये नमुद केलेले आहे.

मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार ०२ नग Firewall संस्थानचे प्रचलीत पद्धतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ७०,००,०००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील विभागाचे दि.०४ मे, २०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये मा.तदर्थ समितीसमोर निर्णयार्थ सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर मा.तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चेअंती निर्णय क्रं.२६४ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

"माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewall कालबाह्या झाल्याचे संबंधीत विभागाने नमुद केले आहे. तथापि सदरचा Firewall Virtual आहे की software based की Hardware based आहे, याबाबत खात्री करावी. आणि जर Firewall Software based असेल तर अनज्ञप्ती (Licences) नुतनीकरण करता येईल काय? याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा."

मा.तदर्थ समितीचे उपरोक्त निर्देशान्वये मे. टीसीएस यांना याबाबतचा अभिप्राय देणेबाबत दि.२९ मे २०२० रोजीचे ई-मेलव्दारे कळविणेत आलेले होते. त्यानुसार मे.टीसीएस यांनी त्यांचे दि.३०.०५.२०२० रोजीचे ई-मेलव्दारे पुढील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

Firewall is a combination of both Hardware and Software.

It helps in the network security by ensuring intrusion prevention, application control, and anti-malware.

Since current firewall is 10 years old,Hardware spare parts will not be available to support the motherboard / firmware, RAM, CPU etc. Software is out dated and cannot be updated with the latest threat prevention / anti-malware protocols.

As the licenses are expired, we cannot modify the rules, cannot get software updates, cannot investigate source of the malware attack, desktop/laptop utilizing maximum network etc.

Also, OEM have announced End of Sale and Support of this product.

Firewall usage in SSST IT landscape and the risks of failure are listed in the attached PPT for quick reference.

मे.टिसीएस यांनी उपरोक्त ई-मेलव्दारे Firewall हे Hardware व Software based आहे. याचा उपयोग प्रणाली व डेटा यांच्या सुरक्षिततेसाठी होतो. सदरचा Firewall दहा वर्ष जुना असल्याने त्याचे spare parts उदा.Moderboard/Firmware, RAM, CPU etc. हे सद्यस्थितीत उपलब्ध होऊ शकत नाहीत. सदर Firewall चे Software हे कालबाह्य झाल्याने सद्यस्थितीत प्रणालींशी सुसंगत होत नाही. सदर Firewall Licences हे कालबाह्य झालेले असल्याने अनुषंगीक कार्यवाही करणेस अडचणी निर्माण होतात. उत्पादक कंपनीनेही सदर Firewall चे Support थांबविला असल्याचे जाहिर केलेले आहे.

उपरोक्त प्रमाणे नविन दोन नग Firewall मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेने प्रचलीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.७०,००,०००/- + कर मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव,मा.तदर्थ समितीचे निर्णय क्रं.२६४ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे मे.टिसीएस यांचेमार्फत प्राप्त झालेल्या अभिप्रायासह प्रस्ताव मान्यतेस्तव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

**मागणी:-** प्रास्ताविकेत नमुद केलेप्रमाणे माहिती तंत्राज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील प्रणाली व माहितीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने जोडणेत आलेला Firewall कालबाहय झालेला असल्याने याबाबत वारंवार अडचणी निर्माण होत आहेत. मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार सर्व्हरवरील प्रणाली व माहितीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने, मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञांना प्रकल्पाअंतर्गत प्रणालीविषयक कार्यवाही करणेस अडचण येऊ नये तसेच संस्थानअंतर्गत व बाहेर ई-मेल देवाण-घेवाण करणेकामी इंटरनेट सुरक्षीतरित्या सुरळीत सुरु राहणे आवश्यक आहे. सबब, मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार ०२ नग Firewall मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेने प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ७०,००,०००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ समितीसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :- तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- माहिती तंत्राज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील प्रणाली व माहितीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने जोडणेत आलेला Firewall कालबाहय झालेला असल्याने याबाबत वारंवार अडचणी निर्माण होत आहेत. मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार सर्व्हरवरील प्रणाली व माहितीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने, मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञांना प्रकल्पाअंतर्गत प्रणालीविषयक कार्यवाही करणेस अडचण येऊ नये तसेच संस्थानअंतर्गत व बाहेर ई-मेल देवाण-घेवाण करणेकामी इंटरनेट सुरक्षीतरित्या सुरळीत सुरु राहणे आवश्यक आहे. सबब, मे.टिसीएस यांचे अभिप्रायानुसार ०२ नग Firewall संस्थानचे प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. ७०,००,०००/- + कर मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील विभागाचे दि. ०४ मे. २०२० रोजीची मंजुर टिपणीअन्वये मा.तदर्थ समितीसमोर सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर मा.तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चेअंती निर्णय क्र.२६४ अन्वये पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

“माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewall कालबाह्या झाल्याचे संबंधीत विभागाने नमुद केले आहे. तथापि सदरचा Firewall Virtual आहे की software based की Hardware based आहे, याबाबत खात्री करावी. आणि जर Firewall Software based असेल तर अनज्ञप्ती (Licences) नुतनीकरण करता येईल काय? याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा.”

मा.तदर्थ समितीचे उपरोक्त निर्देशान्वये मे. टीसीएस यांना याबाबतचा अभिप्राय देणेबाबत दि.२९ मे २०२० रोजीचे ई-मेलव्दारे कळविणेत आलेले होते. त्यानुसार मे.टीसीएस यांनी त्यांचे दि.३०.०५.२०२० रोजीचे ई-मेलव्दारे पुढील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

Firewall is a combination of both Hardware and Software.

It helps in the network security by ensuring intrusion prevention, application control, and anti-malware. Since current firewall is 10 years old, Hardware spare parts will not be available to support the motherboard / firmware, RAM, CPU etc.

Software is out dated and cannot be updated with the latest threat prevention / anti-malware protocols.

As the licenses are expired, we cannot modify the rules, cannot get software updates, cannot investigate source of the malware attack, desktop/laptop utilizing maximum network etc.

Also, OEM have announced End of Sale and Support of this product.

Firewall usage in SSST IT landscape and the risks of failure are listed in the attached PPT for quick reference.

मे.टिसीएस यांचेमार्फत प्राप्त झालेल्या उपरोक्त अभिप्रायानुसार प्रामुख्याने पुढील बाबी निदर्शनास येतात. Firewall हे Hardware व Software based आहे. याचा उपयोग प्रणाली व डेटा यांच्या सुरक्षिततेसाठी होतो. सदरचा Firewall दहा वर्ष जुना असल्याने त्याचे spare parts उदा. Moderboard/ Firmware, RAM, CPU etc. हे सद्य स्थितीत उपलब्ध होऊ शकत नाहीत. सदर Firewall चे Software हे कालबाहय् झाल्याने सद्यस्थितीत प्रणालींशी सुसंगत होत नाही. सदर Firewall Licences हे कालबाह्य झालेले असल्याने अनुषंगीक कार्यवाही करणेस अडचणी निर्माण होतात. उत्पादक कंपनीनेही सदर Firewall चे Support थांबविला असल्याचे जाहिर केलेले आहे.

उपरोक्त प्रमाणे नविन दोन नग Firewall मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे मान्यतेने प्रचलीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.७०,००,०००/- + कर मात्रच्या खर्चास मान्यता मिळणेस्तव, मा.तदर्थ समितीचे निर्णय क्रं.२६४ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशाप्रमाणे मे.टिसीएस यांचेमार्फत प्राप्त झालेल्या अभिप्रायासहचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सविनय सादर.

**निर्णय क्र.३२८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथे कार्यान्वीत सर्व्हेरवरील माहिती व प्रणालीचे सुरक्षीततेच्या दृष्टीने कार्यान्वीत असलेला Firewall कालबाहय झाल्याने नविन ०२ नग Firewall खरेदी करणेकामी सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे पुढील सभेसमोर सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.२४** **श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा DTH (डिश), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- कलम २१ (१) ग नुसार भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य/समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव क्र.:- १.दि.२८.०४.२०१७, निर्णय क्र. ३२२ (१३).
२. दि.११.०५.२०२०, निर्णय क्र. २६१.

प्रास्ताविक:- साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) DTH (डिशटिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी संस्थानचे विहित पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेत आलेली होती. ई-निविदा प्रक्रिये अंतर्गत मा.व्यवस्थापन समितीचे दि.२८.०४.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३२२ (१३) अन्वये, M/sTata Communications Ltd., Mumbai व M/s Associated Broadcasting co. pvt Ltd, Hyderabad यांनी देऊ केलेले पुढील प्रमाणे उच्चत्तम दर स्विकारणेत येऊन त्यांना दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.०५.२०२० या कालावधी करीता याकामी कार्यादेश देणेस मान्यता देणेत आलेले होते.

१. DTH (डिशटिव्ही) M/s Tata Communications यांनी देऊ केलेले Exclusive दर.

| Platform | 1st Year | 2nd Year | 3rd Year | Total |
|---|---|---|---|---|
| DTH | 1,96,00,000 | 1,97,00,000 | 1,98,00,000 | 5,91,00,000 |
| Total- | | | | 5,91,00,000 |

२. इंटरनेट व मोबाईल प्लॅटफॉर्मसाठी M/s Tata Communications यांनी देऊ केलेले Exclusive दर.

| Platform | 1st Year | 2nd Year | 3rd Year | Total |
|---|---|---|---|---|
| Mobile & Internet | 19,00,000 | 21,00,000 | 23,00,000 | 63,00,000 |

**३.** T.V.चॅनलसाठी M/s Tata व M/s Associated Broadcasting यांनी देऊ केलेले Non Exclusive दर.

| Platform | 1st Year | 2nd Year | 3rd Year | Total |
|---|---|---|---|---|
| M/sTata Communications Ltd., Mumbai | 3,00,000 | 4,00,000 | 5,00,000 | 12,00,000 |
| M/s Associated Broadcasting Co Pvt Ltd., | 25,30,000 | 25,30,000 | 25,30,000 | 75,90,000 |
| | | | Total- | 87,00,000 |

उपरोक्त तक्त्याप्रमाणे, M/sTata Communications Ltd., Mumbai व M/sAssociated Broadcasting co. pvt Ltd,Hyderabad यांना जा.नं.एसएसएसटी/आयटी/१०५९ ते १०६१/२०१७ दि.३० मे,२०१७ अन्वये, व जा.नं.एसएसएसटी/आयटी/५६७६/२०१८ दि.२४ जानेवारी, २०१८ अन्वये, तीन वर्षांकरीता (दि.०१.०६.२०१७ ते दि.३१.०५.२०२०) कार्यादेश देणेत आलेले आहेत.

याकामी यापुर्वी प्रत्येक Platform साठी स्वतंत्रपणे प्रकाशीत करणेत आलेल्या ई-निविदेमध्ये निविदाकारांकडून पुढील प्रमाणे दर मागविणेत आलेले होते.

01. DTH Platform- a. Exclusive Rate b. Non Exclusive Rate
02. TV Channel - a. Exclusive Rate b. Non Exclusive Rate
03. Mobile & Internet- a. Exclusive Rate b. Non Exclusive Rate

दरम्यानचे काळात श्रींचे लाईव्ह दर्शन टिव्ही चॅनेलद्वारे प्रक्षेपीत करणेस परवानगी मिळणेबाबत अनेक टिव्ही चॅनेल चालकांनी संस्थानकडे विनंती केलेली आहे. परंतू सदर चॅनेल्सने पुर्ण वेळ लाईव्ह दर्शन ऐवजी ठराविक आरतींचे उदा.काकड आरती इ.चे थेट प्रक्षेपण दाखविणेस परवानगी मागितलेली आहे. परंतू याकामी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रिये अंतर्गत श्रींचे आरतीसाठी दरांची स्वतंत्र मागणी करणेत आलेली नव्हती.

उपरोक्त प्रमाणे याकामी M/s Tata व M/s Associated Broadcasting co. pvt Ltd, Hyderabad यांना देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१.०५.२०२० अखेर संपुष्टात येत असल्याने व सदर सुविधेचा लाभ घेणा-या साईभक्तांच्या संख्येत होणारी लक्षणीय वाढ याचा विचार करता, याकामी विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबवून नविन पुरवठाधारकांची नेमणूक करावी लागणार आहे, असे नम्र मत आहे.

उपरोक्त नमुद केलेप्रमाणे श्रींचे लाईव्ह दर्शन सुविधा उपलब्ध करणेकामी यापुर्वी राबविणेत आलेल्या ई-निविदा प्रक्रियेअंतर्गत प्रत्येक Platform साठी संपुर्ण दर्शनासाठीचे दर मागविणेत आलेले होते. सबब, इतर टिव्ही चॅनेल्सने त्यांचे चॅनेलवर ठराविक आरत्यांचे थेट प्रक्षेपण सदरचे दरामध्ये करणेस असमर्थता दर्शविलेली होती. सबब, प्रस्तावित ई-निविदा प्रक्रिये अंतर्गत प्रत्येक Platform साठी ०१) संपुर्णदर्शन ०२) सर्व आरत्या ०३) काकडआरती ०४) माध्यान्हआरती ०५) धुपारती ०६) शेजारती इ. करीता स्वतंत्र Exclusive व Non-Exclusive दर मागविल्यास संस्थानचे दृष्टीने हितावह होऊन अधिक चॅनेल्स धारकांना सदर निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी होता येईल. तसेच त्यानंतरही काही टिव्ही चॅनेल्सने ठराविक आरत्यांचे थेट प्रक्षेपणाची परवानगी मागीतल्यास सदर दराप्रमाणे त्यांना परवानगी देता येईल.

M/s Tata Communications Ltd., Mumbai व M/s Associated Broadcasting co. pvt Ltd, Hyderabad यांना श्रींचे ऑनलाईन (Live Darshan) सुविधा उपलब्ध करणेकामी देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१ मे,२०२० रोजी संपुष्टात येणार असल्याने याकामी पुढील तीन वर्षांकरीता विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामीचा उपरोक्त प्रमाणेचा प्रस्ताव इकडील विभागाचे दि.२०.०३.२०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये निर्णयार्थ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर मा.तदर्थ समितीचे दि. ११.०५.२०२० रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चेअंती पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत.

"श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) सुविधा DTH (डिशटिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी Exclusive rights व Non-Exclusive rights देणेबाबत अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा."

मा.तदर्थ समितीचे उपरोक्त निर्देशानुसार प्रस्तावीत ई-निविदा प्रक्रिये अंतर्गत श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) सुविधा पुरविणेकामी पुढीलप्रमाणे दर मागविणे प्रस्तावीत आहे.

| **Sr. No.** | **Particular** | **DTH** | | **TV Channel** | | **Mobile & Internet** | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Non-Exclusive | Exclusive | Non-Exclusive | Exclusive | Non-Exclusive | Exclusive |
| 01 | Live Darshan (Temple Open Time) | | | | | | |
| 02 | KakadAarti | | | | | | |
| 03 | Noon Aarti | | | | | | |
| 04 | DhoopAarti | | | | | | |
| 05 | ShejAarti | | | | | | |
| 06 | All (4) Aartis | | | | | | |

उपरोक्तप्रमाणे Exclusive व Non-Exclusive करिता स्वतंत्र दरांची मागणी केल्याने दरांचा तुलनात्मक अभ्यास करुन अर्थिकदृष्ट्या योग्य असलेल्या दराप्रमाणे एक किंवा अनेक पुरवठाधारकांना कार्यादेश देणे शक्य होणार आहे. उदा. Exclusive करिता प्राप्त झालेले उच्चतम दर हे Non-Exclusive करिता प्राप्त झालेल्या सर्व उच्चतम दरांच्या बेरजेपेक्षा जास्त असल्यास Exclusive करिता प्राप्त झालेले उच्चतम दराप्रमाणे कार्यादेश देता येईल. तसेच काहि पुरवठाधारकांनी ठराविक सुविधांसाठीच उदा. फक्त काकड आरती इ. मागणी केल्यास त्यांना सदरची सुविधा उपलब्ध करुन देणेकामी उच्चतम दराप्रमाणे पुरवठा आदेश देणे सोईचे होणार आहे. निविदेमध्ये याबाबत स्पष्ट नमुद करता येईल. सबब, मा.तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० सभेतील निर्णय क्र. २६१ अन्वये निर्देशीत केलेप्रमाणे श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) सुविधा DTH (डिशटिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामी Exclusive rights व Non-Exclusive rights बाबतचे माहितीसहचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्तविकेत नमुद केलेप्रमाणे साईभक्तांना श्रींचेऑनलाईन दर्शन (Live Darshan) DTH (डिशटिव्ही), टिव्हीचॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी M/s Tata Communications Ltd., Mumbai व M/s Associated Broadcasting co. pvt Ltd, Hyderabad यांना देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१ मे,२०२० रोजी संपुष्टात येत आहे.

सबब, सदरची सुविधा पुढील तीन वर्षांकरीता DTH (डिशटिव्ही), टिव्हीचॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी स्वतंत्र ई-निविदा प्रकाशित करुन प्रत्येक Platform साठी ०१) संपुर्ण दर्शन ०२) सर्वआरत्या ०३) काकडआरती ०४) माध्यान्ह आरती ०५) धुपारती ०६) शेजारती इ. करीता स्वतंत्र Exclusive व Non-Exclusive दर प्राप्त करणे करीता विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम/ठराव या नुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- तांत्रिक, प्रशासकीय व आर्थिक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- साईभक्तांना श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) DTH (डिशटिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी M/s Tata Communications Ltd.,Mumbai व M/s Associated Broadcasting co. pvt Ltd, Hyderabad यांना देणेत आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.३१ मे,२०२० रोजी संपुष्टात येत आहे.

सबब, सदरची सुविधा पुढील तीन वर्षांकरीता DTH (डिश), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी स्वतंत्र ई-निविदा प्रकाशित करुन प्रत्येक Platform साठी ०१) संपुर्णदर्शन ०२) सर्वआरत्या ०३) काकडआरती ०४) माध्यान्हआरती ०५) धुपारती ०६) शेजारती इ. करीता स्वतंत्र Exclusive व Non-Exclusive दर प्राप्त करणेकरीता विहीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता

मिळणेकामीचा प्रस्ताव निर्णयार्थ मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर मा.तदर्थ समितीचे दि. ११.०५.२०२० रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चेअंती पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आले आहेत.

"श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) सुविधा DTH (डिशटिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी Exclusive rights व Non-Exclusive rights देणेबाबत अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे ठेवण्यात यावा."

मा.तदर्थ समितीचे उपरोक्त निर्देशानुसार प्रस्तावीत ई-निविदा प्रक्रिये अंतर्गत श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) सुविधा पुरविणेकामी पुढीलप्रमाणे दर मागविणे प्रस्तावीत आहे.

| Sr. No. | Particular | DTH | | TV Channel | | Mobile & Internet | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Non-Exclusive | Exclusive | Non-Exclusive | Exclusive | Non-Exclusive | Exclusive |
| 01 | Live Darshan (Temple Open Time) | | | | | | |
| 02 | KakadAarti | | | | | | |
| 03 | Noon Aarti | | | | | | |
| 04 | DhoopAarti | | | | | | |
| 05 | ShejAarti | | | | | | |
| 06 | All (4) Aartis | | | | | | |

उपरोक्तप्रमाणे Exclusive व Non-Exclusive करिता स्वतंत्र दरांची मागणी केल्याने दरांचा तुलनात्मक अभ्यास करुन अर्थिकदृष्टया योग्य असलेल्या दराप्रमाणे एक किंवा अनेक पुरवठाधारकांना कार्यादेश देणे शक्य होणार आहे. उदा. Exclusive करिता प्राप्त झालेले उच्चतम दर हे Non-Exclusive करिता प्राप्त झालेल्या सर्व उच्चतम दरांच्या बेरजेपेक्षा जास्त असल्यास Exclusive करिता प्राप्त झालेले उच्चतम दराप्रमाणे कार्यादेश देता येईल. तसेच काहि पुरवठाधारकांनी ठराविक सुविधांसाठीच उदा. फक्त काकड आरती इ. मागणी केल्यास त्यांना सदरची सुविधा उपलब्ध करुन देणेकामी उच्चतम दराप्रमाणे पुरवठा आदेश देणे सोईचे होणार आहे. निविदेमध्ये याबाबत स्पष्ट नमुद करता येईल. सबब, मा.तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० सभेतील निर्णय क्र.२६१ अन्वये निर्देशीत केलेप्रमाणे श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live Darshan) सुविधा DTH (डिशटिव्ही), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामी Exclusive rights व Non-Exclusive rights बाबतचे माहितीसहचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर सादर करणेच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३२९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे ऑनलाईन दर्शन (Live) सुविधा DTH (डिश), टिव्ही चॅनेल, मोबाईल व इंटरनेटवर उपलब्ध करुन देणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.२५** **साईटेक प्रकल्पातंर्गत कार्यान्वीत "online.sai.org.in" या वेबसाईटसाठी तसेच संस्थान अंतर्गत Internet वापरासाठी 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी ई-निविदा प्रक्रिया राबविणे व याकामी येणाऱ्या खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:-१७ (१) नुसार भक्तगणांना सोयीव सुविधा उपलब्ध करुन देणे

मा. व्यवस्थापन समितीचाठरावक्रं.: १) दि.२५.०२.२०१७ नि.क्रं. ४८.
२) दि.०८.१२.२०१७ नि. क्रं.१०५१(०२).
३) दि.११.०५.२०२० नि. क्रं. २५८.

प्रास्ताविक:- श्री साईभक्तांना Internet व्दारे रुम बुकींग, आरती/दर्शनपास, अभिषेक/सत्यनारायण कुपन आरक्षण, साईलिला मासिक/भक्तमंडळ सभासद व देणगी इ. सुविधा उपलब्ध करुन देणेकामी साईटेक

प्रकल्पांतर्गत online.sai.org.in ही वेबसाईट विकसीत करुन कार्यान्वीत करणेत आलेली आहे. सदर वेबसाईट व संस्थान अंतर्गत इंटरनेट वापरासाठी 10 Mbps Internet Linkची सुविधा उपलब्ध करणेकामी मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१२.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्रं. १०५१ (०२) अन्वये, M/s. BhartiAirtel Ltdयांना संदर्भ क्रं.०१ अन्वये दोन वर्षे कालावधीकरीता कार्यादेश देणेत आलेला आहे. त्यानुसार त्यांनी सदरची लिंक दि.१४.०३.२०१८ रोजी कार्यान्वीत केलेली असून आजपावेतो सुरळीत चालू आहे. सदर लिंक बरोबरच M/s Swiftmail Comm यांचेमार्फत देणगी स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या 50 Mbps Internet Link चाही वापर सद्यस्थितीत चालू आहे. सदरच्या दोन्ही लिंक Primary व Secondary Link म्हणून कार्यान्वीत करणेत आलेल्या आहेत. काही तांत्रिक अडचणींमुळे Primary Link बंद पडल्यास साईभक्तांना Internet व्दारे उपलब्ध सुविधेचा लाभ घेण्यास अडचण निर्माण होऊ नये, तसेच संस्थानचे कार्यालयीन कामकाजात व्यत्यय येऊ नये, याकरीता Secondary Link वरुन सदरच्या सुविधा उपलब्ध होतात.

M/s. Bharti Airtel Ltd यांनी सदरची लिंक दि.१४.०३.२०१८ रोजी कार्यान्वीत केलेली असल्याने त्यांना याकामी दोन वर्षाकरीता देण्यात आलेल्या कार्यादेशाची मुदत दि.१३.०३.२०२० अखेर संपुष्टात आलेली आहे. सबब, सदरची लिंक उपलब्ध करणेकामी प्रचलित पध्दतीनुसार ई-निविदा राबविणेकामी मागणी करावयाचे Internet Linkची क्षमता व तांत्रिक तपशिलाबाबत मा. व्यवस्थापन समितीचे दि.०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्रं.२७५ यांस अधिन राहून मे. टिसीएस यांना अभिप्राय देणेस कळविणेत आले होते. त्यानुसार मे. टिसीएस यांनी दि.२०.०१.२०२० राजीचे ई-मेलव्दारे सदर लिंकचे जागी नव्याने किमान 50 Mbps क्षमतेचीInternet Linkकार्यान्वीत करणेबाबत अभिप्राय दिलेला होता. सदर ई-मेलसाबत त्यांनी सादर केलेल्या इंटरनेट वापराचे अहवालावरुन सदर लिंकचा पुर्ण क्षमतेने वापर होत असल्याचे निदर्शनास येते.

मे.टिसीएस यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार 50 Mbps Internet Link सुविधेसाठीचे दराबाबत या क्षेत्रातील पुरवठाधारकांकडे ई-मेलव्दारे विचारणा केली असता, पुढीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| **अ.नं** | **पुरवठाधारक** | **वार्षिक दर** | **18%GST** | **एकूण** | **इतर चार्जेस** | **२ वर्षाचे एकूण दर** |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | M/s Vodafone Idea Ltd | ३,२०,००० | ५७,६०० | ३,७७,६०० | १०,००० | ७,६५,२०० |
| ०२ | M/s Gazonindia Ltd | ५,००,००० | ९०,००० | ५,९०,००० | - | ११,८०,००० |
| **सरासरी (दोन वर्षाकरीता येणारा) अंदाजीत खर्च रक्कम रु.-** | | | | | | **९,७२,६००** |

त्यानुसार 50 Mbps Internet Linkउपलब्ध करणेकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.९,७२,६००/- चे खर्चास तसेच याकामी प्रचलित पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव इकडील विभागाचे दि.०३ मार्च, २०२० रोजीचे मंजुर टिपणीअन्वये मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करणेत आला होता. सदरचे प्रस्तावावर मा.तदर्थ समितीचे दि. ११/०५/२०२० रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चेअंती निर्णय क्रं. २५८ अन्वये पुढीप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत.

"साईटेक प्रकल्पांतर्गत कार्यान्वीत "online.sai.org.in" या वेबसाईटसाठी तसेच संस्थान अंतर्गत Internet वापरासाठी 50 Mbps Internet Link उपलब्ध करण्याच्या मागणीसंदर्भात सद्यस्थितीत किती Internet वापरकर्ते (users) आहेत व त्यानुसार किती Mbps ची Internet Link आवश्यक आहे. याचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात येऊन त्यास १५ दिवसाचे आत चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात यावी"

उपरोक्त निर्देशान्वये M/s Bharati Airtel यांचेमार्फत कार्यान्वीत 10 Mbps Internet Link चा उपयोग प्रामुख्याने पुढील बाबींकरीता होतो.

१. संस्थान अंतर्गत १७५ users:- संगणकांवर ई-मेल देवाण-घेवाण व इंटरनेट संदर्भातील अनुषंगिक कार्यवाही करणेकरीता.

२. मे.टिसीएस यांचे ४० तंत्रज्ञ:- साईटेक-०२ प्रकल्पाअंतर्गत अनुषंगिक कार्यवाही करणेकरीता माहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व्हरला Connect होणेकरीता.

३. श्री साईबाबा हॉस्पीटलकडील इंटरनेट लिंक काही कारणास्तव बंद पडल्यास पर्यायी लिंक (Back-up).

४. Online.sai.org.in ह्या वेबसाईटद्वारे साईभक्तांमार्फत होणा-या बुकींगचा डेटा पुढील कार्यवाहीकरीता Cloud Server वरुन माहिती तंत्रज्ञान विभागातील Serverवर घेणेकरीता (Data Synchronization).

५. वेळोवेळी माहिती तंत्रज्ञान विभागातील तंत्रज्ञ तसेच मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञ यांना वेबीनारद्वारे प्रशिक्षण तथा अनुषांगिक कार्यवाहीकरीता.

उपरोक्तप्रमाणे सद्यस्थितीत २१५ users इंटरनेटचा वापर करत आहेत. इंटरनेट वापराबाबतचे रिपोर्टचे अवलोन केले असता, इंटरनेट लिंकची 10 mbpsक्षमता हि अपुरी पडत असल्याचे अनेकवेळेस निदर्शनास येते. सबब, अशावेळी इंटरनेटचा स्पिड कमी होणे, ई-मेलला अॅटॅच असलेल्या फाईल डाऊनलोड न होणे, मे.टिसीएस यांचे तंत्रज्ञांना अनुषंगिक कार्यवाही करणेकरीता अडचणी येणे इ.समस्या उद्भवतात. सबब, सदर अडचणींचे निरसण व भविष्यातील वाढ याचा विचार करता 50 Mbps Internet Linkउपलब्ध करणे आवश्यक आहे, असे नम्र मत आहे.

दि.१२.०५.२०२० रोजी मा.मुख्य कार्यकारी महोदय यांचे कक्षात झालेल्या “साईटेक प्रकल्प-०२” अढावा बैठकीमधील चर्चेदरम्यान मे.टिसीएस यांचे प्रतिनीधी श्री राजीव गुप्ता यांनी Firewall व Internet Link बाबत येणारे अडचणींचे निरसन होणेकामी लवकरात लवकर नविन Firewall कार्यान्वीत करणे व 50 Mbps Internet Link उपलब्ध करणे आवश्यक असल्याचे कळविले होते. यावेळी त्यांना Firewall व Internet Link चा वापर व अडचणीबाबत अहवाल सादर करणेबाबत कळविणेत आले होते. त्यानुसार त्यांनी दि.१६.०५.२०२० ई-मेलद्वारे सादर केलेल्या अहवालामध्ये 10 Mbps Internet Link चा उपयोग हा पुर्ण क्षमतेने होत असून सदरची क्षमता कमी पडत असल्याने शासनाच्या वेबसाईट उघडणेस, संगणकीय प्रणालीसंदर्भातील security patches व अनुषंगिक फाईल download करणेस, ऑनलाईन सर्व्हिसेसचा डेटा लोकल सर्व्हरवर स्टोअर करणेस, संस्थानचे माहिती केंद्र व विमानतळ येथील संगणक प्रणाली सुरळीत चालणेस व त्यांचे तत्रज्ञांना प्रकल्पविषयक कार्यवाही करणेस अडचणी येत असल्याचे कळविलेले आहे.

मा.तदर्थ समितीचे दि.११/०५/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्रं. २५८ अन्वये देण्यात आलेल्या निर्देशानुसार श्री साईभक्तांसाठी कार्यान्वीत असलेल्या online.sai.org.in हया वेबसाईटसाठी तसेच संस्थानचे अंतर्गत Internetवापरासाठी पुढील दोन वर्षाकरीता50 Mbps Internet Linkउपलब्ध करणेकामी विहित पध्दतीनेई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रुपये ९,७२,६००/- (सर्व करसहीत) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी उपरोक्त माहितीसहचा प्रस्तावमा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

मागणी:- प्रास्तविकेत नमुद केलेनुसार सद्यस्थितीत M/s BhartiAirtel Ltd यांचेमार्फत कार्यान्वीत असलेल्या 10 Mbps Internet Linkचा कालावधी दि.१३.०३.२०२० रोजी संपुष्टात आलेला आहे. मे. टिसीएस यांचे अभिप्रायानुसार online.sai.org.in हया वेबसाईटसाठी तसेच संस्थानचे अंतर्गत Internetवापरासाठी नव्याने50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी, विहित पध्दतीनेई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी पुढील दोन वर्षाकरीता येणा-या अंदाजे रक्कम रुपये ९,७२,६००/- (सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामी, मा.तदर्थ समितीचे निर्णय क्र.२५८ नुसार अनुषंगिक माहितीसहचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc)समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:- तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय

विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत:- साईटेक प्रकल्पांतर्गत श्री साईभक्तांसाठी कार्यान्वीत असलेल्या online.sai.org.in हया वेबसाईटसाठी तसेच संस्थानचे अंतर्गत InternetवापरासाठीM/s BhartiAirtel Ltdयांचेमार्फत कार्यान्वीत असलेल्या10 Mbps Internet Linkचा कालावधी दि.१३.०३.२०२० रोजी संपुष्टात आलेला आहे. मे. टिसीएस यांचे अभिप्रायानुसार नव्याने50 Mbps Internet Linkउपलब्ध करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी पुढील दोन वर्षाकरीता येणा-या अंदाजे रक्कम रुपये ९,७२,६००/-(सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीसमोर सादर करणेत आला होता. सदर प्रस्तावावर मा.तदर्थ समितीचे दि. ११.०५.२०२० रोजीचे सभेमध्ये सविस्तर चर्चा होऊन निर्णय क्र. २५८ अन्वये “सद्यस्थितीत किती Internet वापरकर्ते (users) आहेत व त्यानुसार किती Mbps ची Internet Link आवश्यक आहे. याचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव सादर करण्यात येऊन त्यास १५ दिवसाचे

आत चक्रिय पध्दतीने मान्यता घेण्यात यावी” असे निर्देश देणेत आले आहेत. सदर निर्देशानुसारची माहिती पुढीलप्रमाणे

सद्यस्थितीत 10 Mbps Internet Linkचा वापर सस्थनअंतर्गत १७५ users, मे.टिसीएस यांचे ४० तंत्रज्ञ (एकुण २१५) यांचेसाठी, संस्थानचे माहिती केंद्रे, विमानतळ येथील दर्शनपासप्रणाली, ऑनलाईन सर्व्हिसेस चा डेटा क्लाऊड सर्व्हरवरुन माहिती तंत्रज्ञान विभागातील डेटा सेंटर येथील सर्व्हरवर स्थलांतरीत करणे इ. बाबींसाठी होतो. सदर लिंकचे वापराबातचे रिपोर्टचे अवलोकन केले असता लिंकचा वापर हा पुर्ण क्षतमेने होत असल्याचे निदर्शनास येते. अनेक वेळेस सदरची क्षमता अपुरी पडून इंटरनेट वापरणेस अडचणी निर्माण होतात. सबब, इंटरनेट सुरळीत चालू राहणेच्या दृष्टीने तसेच भविष्यातील वाढीव गरज याचा विचार करता 10 Mbps Internet Linkऐवजी 50 Mbps Internet Link उपलब्ध होणे आवश्यक आहे, असे नम्र मत आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता साईटेक प्रकल्पांतर्गत श्री साईभक्तांसाठी कार्यान्वीत असलेल्या online.sai.org.in हया वेबसाईटसाठी तसेच संस्थानचे अंतर्गत Internet वापरासाठी50 Mbps Internet Linkउपलब्ध करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी पुढील दोन वर्षाकरीता येणा-या अंदाजे रक्कम रुपये ९,७२,६००/-(सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीसमोर मान्यतेस्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.३३०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईटेक प्रकल्पातंर्गत कार्यान्वीत “online.sai.org.in” या वेबसाईटसाठी तसेच संस्थान अंतर्गत Internet वापरासाठी 50 Mbps Internet Link उपलब्ध करणेकामी विहित पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी पुढील दोन वर्षाकरीता येणा-या अंदाजे रक्कम रुपये ९,७२,६००/-(सर्व करांसहीत) मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**विषय नं.२६** **संस्थानचा आर्थिक भार कमी करणेसाठी श्री साईभक्तांना वितरीत करण्यात येणाऱ्या मोतीचुर लाडु प्रसाद प्रती पाकीटाचे किंमतीमध्ये रु.२५/-ऐवजी रु.३०/- इतकी वाढ करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद- २१(१) (घ)- सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ (भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्तावित केलेले अध्यादेश व केलेले विनियममधील २१ (१घ) नुसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद आहे.

प्रास्ताविक- श्रीं चे दर्शनासाठी येणा-या साईभक्तांना संस्थानतर्फे श्रीं चा प्रसाद मिळावा या हेतूने मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयान्वये, लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभागामार्फत मोतीचूर लाडू, सुटी बुंदी प्रसाद निर्मिती करण्यात येत आहे.

लाडु व बर्फी प्रसाद निर्मिती विभागाकडुन दैनंदिन ३०,००० ते ३५,००० मोतीचुर लाडु प्रसाद पाकीटे भक्तांना वितरीत करणेत येतात. सदर ५० ग्रॅम वजनाचा ०१ लाडु असे ०३ लाडुचे एक पाकीट (१५० ग्रॅम वजनाचे) तयार करणेकामी सर्व खर्चासह साधारणतः रुपये २३.३३ पैसे इतका खर्च येतो. त्यानुसार सदर वर्ष २०१९-२० (०१ एप्रिल २०१९ ते १७ मार्च २०२०) या कालावधीमध्ये दैनंदिन सरासरी ३३,९८६ लाडु पाकीटे X प्रती पाकीट खर्च रु.२३.३३ = एकुण रु.७,९२,८९३/- इतका खर्च होत आहे,

सन २०१६ मध्ये प्रती लाडु पाकीटाची विक्री किंमत रुपये २०/- इतकी होती, त्यानंतर मा.व्यवस्थापन समितीचे दि.३०/११/२०१६ रोजीचे सभेमधील निर्णय क्र.७८४ अन्वये, प्रती लाडु पाकीट रुपये २५/- अशी निर्धारीत करण्यात आलेली असुन, त्यापासुन प्रतीदिनी रुपये ८,४९,६५०/- इतकी रक्कम संस्थानला प्राप्त झालेली आहे. तसेच वार्षिक सरासरी रक्कम रु.२९,९०,७६,८००/- इतकी संस्थानला प्राप्त झालेली आहे.

प्रस्ताव– कोरोना विषाणु (कोव्हीड -१९) या साथीच्या आजारामुळे श्री साईबाबा संस्थानचे साईबाबा मंदिर दि.१७ मार्च, २०२० रोजीपासुन भक्तांना दर्शनासाठी पुर्णतः बंद करण्यात आलेमुळे श्रींचे दक्षिणापेटीमध्ये जमा होणारी देणगी बंद झालेली आहे. तसेच ऑनलाईन देणगी स्वरुपात मिळणारी देणगीची रक्कम अत्यंत अल्प प्रमाणात जमा होत असुन, त्यामानाने श्री साईबाबा संस्थानचा दैनंदिन होत असलेला खर्च अत्यंत मोठया प्रमाणात होत आहे. याचा ताळमेळ घालण्यासाठी संस्थानचा मोठया प्रमाणात होणारा खर्च काही प्रमाणात कमी करणे आवश्यक असल्याने श्री साईभक्तांना वितरीत करण्यात येत असलेला मोतीचुर लाडु प्रसाद पाकीटाची किंमत रु.२५/- वरुन रु.३०/- केल्यास प्रतीदिनी रु.१,६९,९३०/- इतकी संस्थानच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय:- तरी कोरोना विषाणु (Covid -19) या रोगाच्या प्रादुर्भावामुळे संस्थानचा आर्थिक भार कमी करणेसाठी व संस्थानचे उत्पन्नामध्ये वाढ होणेसाठी श्री साईभक्तांना वितरीत करण्यात येणा-या मोतीचुर लाडु प्रसाद पाकीटाची किंमत रु.२५/- ऐवजी रुपये ३०/- प्रती पाकीट अशी करता येईल.

तरी सदर लाडु प्रसाद पाकिटाच्या किंमतीमध्ये वाढ करणेबाबतचा प्रस्ताव धोरणात्मक असल्याने मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे व नंतर मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांचे कोर्टामध्ये मान्यता मिळणेकामी (C.A) दाखल करणेबाबतचा प्रस्ताव निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३३१** **सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-लाडू व बर्फी प्रसाद निर्मिती विभाग/विधी विभाग)**

---

**विषय नं.२७** **श्री साई प्रसादालयात देण्यात येणारे मोफत प्रसादभोजन सशुल्क करुन, प्रसादभोजनाचे व नाष्टा पाकीटाचे दर निश्चित होणेबाबत**.

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद :- सन-२००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४(भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केले अध्यादेश व केलेले विनीयम मधील २१(१घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे.

प्रस्ताविक :-सध्या कोरोना विषाणूंचा भारतात प्रादुर्भाव होत असल्याने राज्य शासनाने कोरोना विषाणू(कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा-१८९७ दिनांक १३ मार्च-२०२० पासून लागू करुन खंड २,३,४ मधील तरतुदीनूसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्याअन्वये जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हीड-१९ वर नियंत्रण आणण्यासाठी व त्यांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाययोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी घोषीत करण्यात आलेले आहेत.

त्यानूसार श्री साईंचे मंदीरही दि.१७/०३/२०२० रोजीपासून बंद असल्याने भक्त दर्शनाला न आल्याने दक्षिणा पेटयांमध्ये देणगी शुन्य झालेली असून देणगी काऊंटरही बंद आहेत. तसेच ऑनलाईन देणगीवरही मोठया प्रमाणात परिणाम होवून त्यामध्ये अतिशय घट झालेली आहे. त्यामुळे संस्थानचा खर्च भागविणे मुश्किल होत आहे. संस्थानची सर्व व्यवस्था ठप्प (बंद) असली तरी कर्मचा-यांचे पगारव इतर दैनंदीनदुरुस्ती देखभाल,विदयुत खर्च, सुरक्षा यावरील खर्च चालूच आहे. हा सर्व खर्च भरुन काढणेसाठी संस्थानला उत्पन्नाची साधने तयार करणे अनिवार्य झालेले आहे. यातील १) प्रमुख बाब म्हणजे साई प्रसादालयामध्ये देण्यात येणारे मोफत भोजन व २) अल्प दरात देण्यात येणारे नाष्टापाकीटे यांचे दर ना-नफा ना-तोटा या बेसीसवर निश्चित करणे गरजेचे आहे.

संरक्षण विभागाकडील जा.क्रं.एसएसएस/वशि/संरक्षण/१२९/२०२० दि.१२/०५/२०२० नूसार मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षते खाली दि.०६/०५/२०२० रोजी बैठक घेण्यात आलेली होती. सदर बैठकीमध्ये प्रसादालयात अंध/अपंग/बेघर/निराधारव्यक्तींना जेवणाचे मोफत पासेस देण्यात येवून प्रसादालयातील मोफत भोजन अल्पदरात देता येईल काय याबाबत प्रस्ताव तयार करणेबाबत आदेश देण्यात आलेले आहे.
त्यानूसार अ) श्री साई प्रसादालयातसध्या सुरु असलेले मोफत भोजन तसेच ब) श्री साई प्रसादालयामार्फत तयार करणेत येणारे अन्नपाकीटे यांची अल्पदरात विक्री करणेकामी तपशिल खालीलप्रमाणे.

अ) श्री साई प्रसादालयात जनरल हॉलमध्ये भक्तांना सुरु असलेले मोफत प्रसादभोजन बाबत.

मा.व्यवस्थापन समिती दि.०७/११/२००९ चे सभेतील आयत्या वेळेचा विषय क्रं.५५ वरील निर्णय क्रं.९२८ नुसार,दि.०१/०१/२०१० रोजीपासून प्रसादभोजनाचे दर प्रौढ व्यक्तीस रु.१०/- व १० वर्षाखालील मुलास रु.५/- करणेत आलेले होते.

तदनंतर श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी मार्फत साईबाबा समाधी वर्ष (०१ आक्टोबर २०१७ ते १८ ऑक्टोबर २०१८) देणगीदार साईभक्तांचे देणगीतून मोफत अन्नदान वर्ष म्हणून घोषित करणेतआलेले होते. त्यानूसार मा.त्रीसदस्य समिती दि.१४/०६/२०१६ रोजीच्या सभेतील निर्णय क्रं.३४३ अन्वये,"श्रींचे समाधी शताब्दी महोत्सव कालावधीमध्ये नवीन वर्षाची साईभक्तांना भेट देणेसाठी दि.०१ जानेवारी २०१७ पासून प्रायोगिक तत्वावर संपुर्ण दिवस मोफत प्रसादभोजन चालू करणेत यावे. सदरहू योजना प्रथमतः दि.३०/०९/२०१७ पर्यंत सुरु ठेवणेत यावी व या योजनेस भक्तांचा उत्फुर्त प्रतिसाद मिळाल्यास समाधी शताब्दी वर्षानंतरही मोफत प्रसाद भोजन योजना सुरु ठेवण्यात यावी, परंतू या योजनेचा लाभ जनरल भोजन हॉलमध्ये प्रसादभोजन घेणा-या भक्तांनाच राहील. व्ही.आय.पी. व व्ही.आय.पी. प्रसादभोजनासाठी पुर्वीप्रमाणेच शुल्क आकारणेत यावे." असे ठरलेले आहे.

मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०९/२०१७ चे सभेतील निर्णय क्रं.४६५ नूसार, माहे जानेवारी-२०१७ पासून ते सप्टेंबर-२०१७ अखेर पर्यंत मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत जमा होणारी देणगी मागील वर्षाचे तुलनेत मोठया प्रमाणात कमी झालेली असून जेवण घेणा-या भक्तांची संख्या मात्र मागील वर्षाचे तुलनेत मोठया प्रमाणात वाढलेली आहे. म्हणजेच दि.०१ जानेवारी २०१७ पासून प्रायोगिक तत्वावर सुरु करणेत आलेल्या संपुर्ण दिवस मोफत प्रसादभोजन योजनेमध्ये देणगीदार भक्तांचा उत्सफुर्त प्रतिसाद मिळत नाही. ही बाब त्त्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे लक्षात आणून देवून श्री साई प्रसादालयात संपुर्ण दिवस सुरु असलेले मोफत भोजन दि.०१/१०/२०१७ रोजीपासून पुढे चालू ठेवावे किंवा कसे? याबाबतचा प्रस्ताव तत्कालीन मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०९/२०१७ चे सभेत सादर करणेत आलेला होता. त्यानूसार त्यावरील निर्णय क्रं.४६५ नूसार, सदरहु सभेतील निर्णय क्रं.८३४ अन्वयेसमाधी शताब्दी वर्षामध्ये श्री साई प्रसादालयात संपुर्ण दिवस सुरु असलेले मोफत भोजन दि.०१/१०/२०१७ रोजीपासून पुढे चालू ठेवणेस मान्यता देण्यात आलेली होती. त्यानूसार आजतागायत श्री साई प्रसादालयात जनरल हॉलमध्ये भक्तांसाठी निशुल्क मोफत प्रसादभोजन देण्यात येत आहे.

सन २०१७-२०१८, २०१८-२०१९व २०१९-२०२० या तीन वर्षाची मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत जमा देणगी रक्कम व प्रसादभोजन घेणा-या भक्तांची संख्या व प्रति ताटास येणारा खर्च याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| अ. नं. | सन | मोफत प्रसादभोजन संख्या | प्रति ताटास येणारा वार्षिक सरासरी उत्पादन खर्च | प्रति ताटाचे उत्पादन खर्चानूसार होणारी खर्चाची रक्कम (३ x४ ) | मोफत प्रसादभोजन योजनेत जमा देणगी रक्कम तपशिल | प्रसादालयास वार्षिक होणा-या तुटीची रक्कम (५-६) |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | ४ | ५ | **६** | **७** |
| १. | सन २०१७-२०१८ | १,४१,४८,०७७ | रु.२२.८६ पै. | ३२,३४,२५,०४०/- | ५,८७,६४,५४६/- | **२६,४६,६०,४९४/-** |
| २. | सन २०१८-२०१९ | १,५०,३७,९७१ | रु.२१.६४ पै. | ३४,५४,२१,६९२/- | ६,४०,६५,१६९/- | **२६,१३,५६,५२३/-** |
| ३. | सन २०१९-२०२० | १,५३,७४,७७७ | रु.२२.७५ पै. | ३४,९७,७६,१७७/- | ८,०१,५३,२०१/- | **२६,९६,२२,९७६/-** |
| | **एकुण =** | **४,४५,६०,८२५** | | **९९,८६,२२,९०९/-** | **२०,२९,८२,९१६/-** | **७९,५६,३९,९९३/-** |

वरील तक्त्याचा विचार करतासन २०१७-२०१८ , २०१८-२०१९ व २०१९-२०२० या तीन आर्थिक वर्षामध्ये श्री साई प्रसादालयास अंदाजे रु.८५,४४,६५,१४७/- ( अक्षरी रु.पंच्याऐंशी कोटी चौवेचाळीस लाख पासष्ट हजार ऐकशे सत्तेचाळीस मात्र) इतकी तुट (आर्थिक भार) सहन करावी लागली आहे.

सदरहु आर्थिक तुटीचा विचार करता, दिव्यांग/निराधार/गरीब/अंध/अपंग/वयोवृध्द/ ज्येष्ठ नागरीक व्यक्तींना अन्नदान हॉलमध्ये मोफत प्रसादभोजन देण्यात येवून जनरल हॉलमध्ये भक्तांकडून अल्प दरात प्रति व्यक्तीस रु.१०/- प्रमाणे शुल्क आकारल्यास खालीलप्रमाणे तुटीची रक्कम भरुन निघेल असे नम्र मत आहे.

| अ. नं. | सन | प्रसादभोजन संख्या | प्रति ताटास येणारा वार्षिक सरासरी उत्पादन खर्च | प्रति ताटाचे उत्पादन खर्चानूसार होणारी खर्चाची रक्कम (३ x४ ) | प्रति व्यक्तीस रु.१०/- प्रमाणे शुल्क आकारणी केलेस मिळणारी रक्कम (३ x १०/-) | रु.१०/- आकारणी केल्यास वार्षिक होणा-या तुटीची रक्कम (५-६) |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | ४ | ५ | **६** | **७** |
| १. | सन २०१७-२०१८ | १,४१,४८,०७७ | रु.२२.८६ पै. | ३२,३४,२५,०४०/- | १४,१४,८०,७७०/- | **१८,१९,४४,२७०/-** |
| २. | सन २०१८- | १,५०,३७,९७१ | रु.२१.६४ पै. | ३४,५४,२१,६९२/- | १५,०३,७९,७१०/- | **१९,५०,४१,९८२/-** |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २०१९ | | | | | |
| ३. | सन २०१९-२०२० | १,५३,७४,७७७ | रु.२२.७५ पै. | ३४,९७,७६,१७७/- | १५,३७,४७,७७०/- | **१९,६०,२८,४०७/-** |
| | **एकुण =** | **४,४५,६०,८२५** | | **९९,८६,२२,९०९/-** | | **५७,३०,१४,६५९/-** |

वरील दोन्ही तक्त्याचा विचार करता, दिव्यांग/निराधार/गरीब/अंध/अपंग/वयोवृध्द व्यक्तींना अन्नदान हॉलमध्येमोफत प्रसादभोजन देण्यात येवून जनरल हॉलमध्ये प्रसादभोजन घेणा-या भक्तांकडून प्रति प्रौढ व्यक्तीस रु. १०/- प्रमाणे अत्यल्प शुल्क आकारले तरीही संस्थानला वर्षाकाठी अंदाजे रु. १९ कोटी १० लाख पर्यंत आर्थिक तुट सहन करावी लागणार आहे. त्यामुळे जनरल हॉलमध्ये प्रसादभोजन घेणा-या भक्तांना अल्प दरात प्रति प्रौढ व्यक्तीस रु.१०/- व १० वर्षाखालील लहान मुलास मोफत आकारणी करावे असे नम्र मत आहे.

ब) श्री साई प्रसादालयामार्फत तयार करणेत येणारे अन्नपाकीटांबाबत(नाष्टापाकीटे)

मा.व्यवस्थापन समिती दि.१०/११/२०१५ चे सभेतील निर्णय क्रं.४६५ नूसार, नाष्टापाकीटाचे उत्पादन खर्चात मोठया प्रमाणात वाढ व विक्रीकामी सुट्टया नाण्यांची अडचण याचा विचार करता, अन्नपाकीट विक्रीचे दरात रु.१/- मात्रने वाढ करुन माहे डिसेंबर २०१५ पासून रु.५/- करणेत आलेली आहे.

अन्नपाकीटे विक्री रु.४/- हुन रु.५/- करुन जवळपास ५ वर्षे झाली आहे. त्यामुळे आता त्याचे उत्पादन खर्चात मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| **अ. नं.** | **सन** | **अन्नपाकीटे विक्री संख्या** | **सध्यचे दर प्रति अन्नपाकीट रु.५/- प्रमाणे विक्रीतून मिळणारी रक्कम** | **प्रति पाकीटास येणारा वार्षिक सरासरी उत्पादन खर्च** | **प्रति पाकीटाचे उत्पादन खर्चानूसार होणारी रक्कम (३ x४ )** | **प्रसादालयास वार्षिक होणा-या तुटीची रक्कम (६-४)** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | सन २०१७-२०१८ | ३५,३७,३३९ | **१,७६,८६,६९५/-** | रु.१२.३७ पै. | ४,३७,५६,८८३/- | २,६०,७०,१८८/- |
| २. | सन २०१८-२०१९ | ३७,७८,१९५ | **१,८८९०,९७५/-** | रु.१२.६२ पै. | ४,७६,८०,८२१/- | २,८७,८९,८४६/- |
| ३. | सन २०१९-२०२० | ३७,६८,५४३ | **१,८८,४२,७१५/-** | रु.११.३४ पै. | ४,२७,३५,२७८/- | २,३८,९२,५६३/- |
| | **एकुण =** | **१,१०,८४,०७७** | **५,५४,२०,३८५/-** | | **१३,४१,७२,९८२/-** | **७,८७,५२,५९७/-** |

वरील अन्नपाकीटेबाबतचे तक्त्याचा विचार करतासन २०१७-२०१८ , २०१८-२०१९ व २०१९-२०२० या तीन आर्थिक वर्षामध्ये श्री साई प्रसादालयास अंदाजे ७,८७,५२,५९७/- ( अक्षरी रु.सात कोटी सत्याऐंशी लाख बावन्न हजार पाचशे सत्यान्नव मात्र) इतकी तुट (आर्थिक भार) सहन करावी लागली आहे.

सदरहु आर्थिक तुटीचा विचार करता, भक्तांकडून ना-नफा ना-तोटा नूसार प्रति अन्नपाकीटास रु. ५/- प्रमाणे शुल्क आकारल्यास खालीलप्रमाणे तुटीची रक्कम भरुन निघेल असे नम्र मत आहे.

| **अ. नं.** | **सन** | **अन्नपाकीटे विक्री संख्या** | **प्रति अन्नपाकीट रु.५/- प्रमाणे आकारणी केल्यास विक्रीतून मिळणारी रक्कम** | **प्रति पाकीटास येणारा वार्षिक सरासरी उत्पादन खर्च** | **प्रति पाकीटाचे उत्पादन खर्चानूसार होणारी रक्कम (३ x४ )** | **प्रसादालयास वार्षिक होणा-या तुटीची रक्कम (६-४)** |
|---|---|---|---|---|---|---|
| **१** | **२** | **३** | ४ | ५ | ६ | ७ |
| १. | सन २०१७-२०१८ | ३५,३७,३३९ | **१,७६,८६,६९५/-** | रु.१२.३७ पै. | ४,३७,५६,८८३/- | २,६०,७०,१८८/- |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | सन २०१८-२०१९ | ३७,७८,१९५ | **१,८८,९०,९७५/-** | रु.१२.६२ पै. | ४,७६,८०,८२१/- | २,८७,८९,८४६/- |
| ३. | सन २०१९-२०२० | ३७,६८,५४३ | **१,८८,४२,७१५/-** | रु.११.३४ पै. | ४,२७,३५,२७८/- | २,३८,९२,५६३/- |
| | **एकुण =** | **१,१०,८४,०७७** | **५,५४,२०,३८५/-** | | **१३,४१,७२,९८२/-** | **७,८७,५२,५९७/-** |

वरील अन्नपाकीटे बाबतच्या दोन्ही तक्त्याचा विचार करता, भक्तांना प्रति अन्नपाकीटास प्रचलीत दरानूसार अल्प दरात रु.५/- प्रमाणे शुल्क आकारले तरी देखील संस्थानला वर्षाकाठी अंदाजे रु. २ कोटी ६२ लाख पर्यंत आर्थिक तुट सहन करावी लागणार आहे. सदर आर्थिक बाबीचा विचार करता प्रति अन्नपाकीटास प्रचलीत दरानूसार अल्प दरात रु.५/- प्रमाणे विक्री करावे असे नम्र मत आहे.

क) विशेष बैठक व्यवस्था (व्ही.आय.पी.) कक्षातील प्रसादभोजनबाबत:- श्री साई प्रसादालयामार्फत विशेष बैठक व्यवस्था(व्ही.आय.पी) कक्षामध्ये प्रसाद भोजन घेणा-या भक्तांसाठी प्रचलीत पध्दतीन दर शुल्क आकारणी सुरु ठेवणेत यावी.

वरील अ, ब व क चे अवलोकन करता, सन-२०१७, सन-२०१८व सन-२०१९ या तीन वर्षाची प्रसादभोजन खर्चाची रक्कम ही मोठया स्वरुपात आहे. मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत जमा होणारी देणगी ही प्रसादभोजन घेणा-या भक्तांचे संख्येचे तुलनेत अतिशय कमी आहे. म्हणजेच मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत जमा होणारी देणगी मागील वर्षाचे तुलनेत कमी झालेली आहे. म्हणजेचमागील तीन वर्षात अंदाजे रु.७९,५६,३९,९९३/-(अक्षरी रु.एकोण ऐंशी कोटी छपन्न लाख एकोणचाळीस हजार नऊशे त्र्यान्नव मात्र)इतकी तर एका वर्षात सरसरी रु.२६,५२,१३,३३१/- (अक्षरी रु.सहवीस कोटी बावन्न लाख तेरा हजार तीनशे एकतीस मात्र) इतकी तुट (आर्थिक भार) संस्थानला सहन करावा लागलेला आहे.

दि.०१/१०/२०१७ रोजीपासून सुरु असलेले मोफत प्रसादभोजन हे फक्तदिव्यांग/निराधार/ गरीब/ अंध/ अपंग/वयोवृध्द इत्यादींना मोफत देण्यात येवून उर्वरीत भक्तांना जनरल हॉलमध्ये अल्प दरात प्रति प्रौढ व्यक्तीस रु.१०/- व १० वर्षाखालील लहान मुलास मोफत भोजन दिल्यास तरी देखील संस्थानला वर्षाकाठी अंदाजे रु. १९ कोटी ५१ लाख पर्यंत आर्थिक तुट सहन करावी लागणार आहे. त्यामुळे जनरल हॉलमध्ये भक्तांना अल्प दरात प्रति प्रौढ व्यक्तीस रु.१०/- व १० वर्षाखालील लहान मुलास मोफत शुल्क आकारणी करावे असे नम्र मत आहे.

तसेच सन-२०१७, सन-२०१८व सन-२०१९ या तीन वर्षामध्ये १,१०,८४,०७७ अन्नपाकीटांची उत्पादन खर्चाची रक्कम रु.१३,४१,७२,९८२/- इतकी असून विक्रीतून मिळणारी रक्कम रु.५,५४,२०,३८५/- इतकी आहे. म्हणजेच या तीन वर्षामध्ये संस्थानला रक्कम रु.७,८७,५२,५९७/- इतका आर्थिक तुट सहन करावी लागलेली आहे. प्रति अन्नपाकीटास रु.५/- प्रमाणे अत्यल्प शुल्क आकारले तरी देखील संस्थानला वर्षाकाठी अंदाजे रु. २ कोटी ६२ लाख पर्यंत आर्थिक तुट सहन करावी लागणार आहे. सदर आर्थिक बाबीचा विचार करता प्रचलीत अत्यल्प दरानूसार प्रति अन्नपाकीटास रु.५/- प्रमाणे विक्री करावे असे नम्र मत आहे.

त्याचप्रमाणे श्री साई प्रसादालयामार्फत विशेष बैठक व्यवस्था(व्ही.आय.पी) कक्षामध्ये प्रसाद भोजन घेणा-या भक्तांसाठी प्रचलीत पध्दतीन दर शुल्क आकारणी सुरु ठेवणेत यावी.

मागणी:- प्रास्तविकनूसार अ,ब व कचा विचार करता, सध्या कोरोना विषाणूंचा भारतात प्रादुर्भाव होत असल्याने राज्य शासनाने कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा-१८९७ दिनांक १३ मार्च-२०२० पासून लागू करुन खंड २,३,४ मधील तरतुदीनूसार अधिसुचना निर्गमित केलेली आहे. त्यानूसार श्री साईंचे मंदीरही दि.१७/०३/२०२० रोजीपासून बंद असल्याने भक्त दर्शनाला न आल्याने दक्षिणा पेटयांमध्ये देणगी शुन्य झालेली असून देणगी काऊंटरही बंद आहेत. तसेच ऑनलाईन देणगीवरही मोठया प्रमाणात परिणाम होवून त्यामध्ये अतिशय घट झालेली आहे. त्यामुळे संस्थानचा खर्च भागविणे मुश्किल होत आहे.करीता हा सर्व खर्च भरुन काढणेसाठी संस्थानला उत्पन्नाची साधने तयार करणे अनिवार्य झालेले आहे. त्यानूसार वरील अ) प्रमाणे दि.०१/१०/२०१७ रोजीपासून सुरु असलेले मोफत प्रसादभोजन हे फक्तदिव्यांग/निराधार/गरीब/अंध/अपंग/ज्येष्ठ नागरीक इत्यादींना मोफत सुरु ठेवण्यात येवून उर्वरीत भक्तांना अल्प दरात जनरल हॉलमध्ये प्रति प्रौढ व्यक्तीस रु.१०/- व १० वर्षाखालील लहान मुलास मोफत शुल्क आकारणी करण्यात येणे गरजेचे आहे. तसेच ब)प्रमाणे प्रति अन्नपाकीटास प्रचलीत अत्यल्प दर

रु.५/- प्रमाणे शुल्क आकारणी आहे तीच ठेवणे योग्य राहील. तसेचक) श्री साई प्रसादालयामार्फत विशेष बैठक व्यवस्था(व्ही.आय.पी) कक्षामध्ये प्रसाद भोजन घेणा-या भक्तांसाठी प्रचलीत पध्दतीन दर शुल्क आकारणी सुरु ठेवणेत यावी.याबाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ(Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर करणे गरजेचे आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान:- आर्थिक व धोरणात्मक

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- उपरोक्त प्रास्तविकातील अ) मोफत प्रसादभोजन योजनेअंतर्गत जमा होणारी देणगी ही प्रसादभोजन घेणा-या भक्तांचे संख्येचे तुलनेत अतिशय कमी आहे. म्हणजेचमागील तीन वर्षातप्रसादभोजन तयार करणेकामीचा उत्पादन खर्च व मिळणारी देणगी याचा विचार करता या तीन वर्षामध्ये प्रसादालयास अंदाजे रु.७९,५६,३९,९९३/- (अक्षरी रु.एकोण ऐंशी कोटी छपन्न लाख एकोणचाळीस हजार नऊशे त्र्यान्नव मात्र) इतकी तर एका वर्षात सरासरी रु.२६,५२,१३,३३१/- (अक्षरी रु.सहवीस कोटी बावन्न लाख तेरा हजार तीनशे ऐकतीस मात्र) इतकी तुट (आर्थिक भार) संस्थानला सहन करावी लागलेली आहे.

दि.०१/१०/२०१७ रोजीपासून सुरु असलेले मोफत प्रसादभोजन हे फक्त दिव्यांग/निराधार/गरीब/ अंध/ अपंग/वयोवृध्द इत्यादींना सुरु ठेवून जनरल हॉलमध्ये प्रसादभोजन घेणा-या भक्तांसाठी अल्प दरात प्रति प्रौढ व्यक्तीस रु.१०/- व १० वर्षाखालील लहान मुलास मोफत शुल्क आकारणी केली तरी देखील संस्थानला वर्षाकाठी अंदाजे रु.१९ कोटी १० लाख पर्यंत आर्थिक तुट सहन करावी लागणार आहे. त्यामुळे जनरल हॉलमध्ये भक्तांना प्रौढ व्यक्तीस रु.१०/- व १० वर्षाखालील लहान मुलास मोफत शुल्क आकारणी करावी असे नम्र मत आहे.

ब) सन-२०१७, सन-२०१८व सन-२०१९ या तीन वर्षामध्ये १,१०,८४,०७७ अन्नपाकीटांची उत्पादन खर्चाची रक्कम रु.१३,४१,७२,९८२/- इतकी असून विक्रीतून मिळणारी रक्कम रु.५,५४,२०,३८५/- इतकी आहे. म्हणजेच या तीन वर्षामध्ये संस्थानला रक्कम रु.७,८७,५२,५९७/- इतका आर्थिक तुट सहन करावी लागलेली आहे. प्रति अन्नपाकीटास रु.५/- प्रमाणे अत्यल्प शुल्क आकारले तरी देखील संस्थानला वर्षाकाठी अंदाजे रु.२ कोटी ६२ लाख पर्यंत आर्थिक तुट सहन करावी लागणार आहे. करीता सदर बाबीचा विचार करता प्रचलीत अत्यल्प दरानूसार प्रति अन्नपाकीटास रु.५/- प्रमाणे विक्री करणे योग्य राहील. असे नम्र मत आहे.

क) तसेच श्री साई प्रसादालयामार्फत विशेष बैठक व्यवस्था(व्ही.आय.पी) कक्षामध्ये प्रसाद भोजन घेणा-या भक्तांसाठी प्रचलीत पध्दतीन दर शुल्क आकारणी सुरु ठेवणेत यावी. असे नम्र मत आहे.

उपरोक्त अ, ब व क बाबत निर्णय होणेकामी सदरचा प्रस्ताव प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३३२ सदरचा प्रस्ताव अमान्य करण्यात आला.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.२८ श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छता व पेस्ट कंन्ट्रोलचे काम तसेच दररोज १०० वाढपी कामगार आऊटसोर्सींग पध्दतीने पुरविणेकामी विविध वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन ई-निविदा मागविणेबाबत**.

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद:- सन २००४चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.१४(भाग-४) मध्ये महाराष्ट्र विधान मंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रस्थापीत केलेले अध्यादेश व केलेले विनीयम मधील १४ (२ घ) नूसार भक्तांना तसेच भक्तांच्या सोयीसाठी आवश्यकत ते उपाययोजना हाती घेण्याचे तसेच २१ (१घ) नूसार भक्तांना जेवण पुरविणे आणि अन्नछत्र चालविणे याबाबतची तरतुद केलेली आहे.

प्रस्तावना:- श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम तसेच दररोज १०० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने कामावर घेवून प्रसादालयातील कामे करुन घेण्यात येत आहेत. त्यानूसार श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम व दररोज १०० वाढपी कामगार कामास लावणेकामी मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णयानूसार, जा.एसएसएस/वशी/२३४१/२०१९ दि.१४/०९/२०१९ अन्वये,मे.फोकस फॅसिलिटी ॲण्ड सिक्युरिटी सर्व्हीसेस, मुंबई यांना दि.१५/०९/२०१९ ते १४/०९/२०२० या कालावधीकरीता GST वगळून दरमहा कामाची मजूरी रक्कम रु.३४,५०,०००/- (अक्षरी रक्कम रु.चौतीस लाख पन्नास हजार मात्र)याप्रमाणे कामाचे कंत्राट (कार्यादेश) देण्यात आलेला आहे. या कामाची मुदत दि.१४/०९/२०२०रोजी अखेर संपुष्टात येत आहे.

त्यामुळे पुढील एकवर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग/स्वच्छता व पेस्टकंट्रोलचे काम करुन घेणेकामी तसेचसाईबाबा भक्तनिवास्थान (५०० रुम), साईआश्रम भाग-०१ व व्दारावती भक्तनिवासस्थान येथील स्वयंसेवी प्रसादभोजन त्याचप्रमाणे जनरलहॉलमधील प्रसादभोजन वितरीत करणेकामी १०० वाढपी कामगार कामास घेण्यात येवून प्रसादभोजन व्यवस्था करण्यात येते.

करीता श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोल कामासाठी तसेच गर्दीचे प्रमाणात आवश्यकतेनूसार प्रसादभोजन वितरीत करणेकामी दररोज १०० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी तसेच वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणे गरजेचे आहे.

मागणी:- प्रास्तविक नूसार, श्रीसाई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम आऊटसोर्स पध्दतीने करुन घेणेकामी, सध्या ठेकेदारास देण्यात येत असलेल्या प्रती दरमहा रक्कम रु.३४,५०,०००/- + GSTची रक्कम याप्रमाणे मजूरी देण्यात येते. त्यानूसार सन-२०२० चे वार्षिक मजुरीची रक्कम रु.४,१४,००,०००/-+ GSTइतकी होते. सदर रकमेमध्ये अंदाजे १०% वाढ गृहीत धरल्यास पुढील सन २०२०-२०२१या एकवर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.४,५५,४०,०००/- + GST (अक्षरी रक्कम रुपये चार कोटी पंचावन्न लाख चाळीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. करीता सदरचे खर्चास मान्यता मिळणेकामी व पुढील दिनांक १५/०९/२०२० ते १४/०९/२०२१ या एक वर्ष कालावधीसाठी श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोलचे काम तसेच दररोज आवश्यकतेप्रमाणे १०० वाढपी कामगार आऊटसोर्सींग पध्दतीने संस्थानला पुरविणेबाबत संस्थानचे दृष्टीने हितावह असल्याने वर्तमान पत्रात जाहीरात प्रसिध्द करुन नामांकित कंपन्याकडून/ ठेकेदारांकडून नव्याने ई-निविदा मागविणेकामी सदरचे प्रस्तावाबाबत मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेत निर्णय होणे गरजेचे आहे.

संस्थानअधिनियम/ठराव यानूसार अनुमान :- आर्थिक

विभागाचा स्पष्ट अभिप्राय/मत:- श्री साई प्रसादालयातील हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोल तसेच दररोज आवश्यकतेप्रमाणे १०० वाढपी कामगार आऊटसोर्स पध्दतीने पुरविणेकामी सन-२०२०-२०२१ या एक वर्ष कालावधीसाठी अंदाजे रक्कम रु.४,५५,४०,०००/- + GST (अक्षरी रक्कम रुपये चार कोटी पंचावन्न लाख चाळीस हजार मात्र) इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरचे खर्चास मंजूरी मिळणेकामी व मान्यतेतर मा.उच्च न्यायालय, मुंबई यांचे खंडपीठ औरंगाबाद येथे CA दाखल करणेस तसेच मा.उच्च न्यायालयाने मान्यता दिल्यानंतर जनसंपर्क कार्यालयामार्फत वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन ई-निविदा मागविणेस मान्यता मिळणेस सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३३३** **सदरचा विषय स्थगीत ठेवण्यात आला.**

**(कार्यवाही-श्री साई प्रसादालय)**

---

**विषय नं.२९** **श्री साईचरित्र तामिळ पुस्तकातील श्री साईबाबांच्या जन्मस्थळाविषयीच्या मजकुराबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी साठी महाराष्ट्र शासन अधिनियम २००४ मधील कलम क्र.१७ (२) ठ मधील तरतूद.

श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार –प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील"

मा.तदर्थ समितीचे सभेतील निर्णय- मा.तदर्थ समितीचे दि.०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३७.

साठा संपुष्टात आलेली संस्थान प्रकाशित प्रकाशने पुनर्मुद्रण करणेसाठी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया सुचविलेल्या अटी व शर्ती अद्ययावत करून राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू.२,०९,७५,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांची मान्यता घेणेसाठी सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे, असे ठरले.

प्रास्तविकः- मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.१२.२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५३७ नुसार तसेच मा.उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार संस्थान प्रकाशित साठा संपुष्टात आलेल्या पुस्तकांचे पुनर्मुद्रण/छपाई करणेसाठी अंदाजे रक्कम रू.२,०९,७५,०००/- खर्चास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार ई-निविदा प्रक्रीया राबवून दि.०५.०२.२०२० ते दि.१८.०२.२०२० या कालावधीत प्रेसधारकांकडून पुस्तके छपाईकामी दर मागणी करणेत आलेली होती. परंतू दि.१०.०२.२०२० रोजी सदरील पुस्तकाचे प्रि-बीड मिटींगमध्ये तत्कालीन मा.मुख्य

कार्यकारी अधिकारी यांनी संस्थान छपाई करीत असलेल्या साईचरित्रांमध्ये नुकत्याच गाजलेल्या श्री साईबाबांचे जन्मस्थळाविषयी (गांव-पाथरी ) च्या मजकूराबाबत खात्री करावी, असे निर्देश दिलेले होते.
श्री साईबाबांच्या जन्मस्थानाबाबतचा सदर वादग्रस्त मजकूर प्रथम श्री साई सतचरित्र इंग्रजीमधील ७ व्या अध्यायात प्रकाशित करण्यात आलेला होता. तथापि सदर मजकूर नंतर मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयास अधिन राहून श्री साई सतचरित्र इंग्रजी मधून काढून टाकण्यात आला आहे. काढून टाकणेत आलेला इंग्रजी साईचरित्रामधील मजकूर खालीलप्रमाणे आहे.

Note- (1) Mhalsapati, an intimate Shirdi devotee of Baba, who always slept with Him in the Masjid and Chavadi, said that Sai Baba told him that He was a Brahmin of Pathri, and was handed over to a Fakir in his infancy, and when He told this, some men from Pathari had come and Baba was enquiring about some men from that place, vide SaiLeela, 1924, Page 179.(2) Mrs.KashibaiKanitkar, the famous learned women of Poona , says in the experience No.8, published on page 79, SaiLeela, Vol. 11, 1934- " On hearing of Baba's miracles , we were discussing according to our theosophic convention and fashion, whether Sai Baba belonged to Black or White Lodge. When, once I went to Shirdi, I was thinking seriously about this in my mind. As soon as I approached the steps of the Masjid, Baba came to the front and pointing to His chest and staring at me spoke rather vehemently – " This is a Brahmin, pure Brahmin. He has nothing to do with black things. No Mussalman can dare to step in here. He dare not." Again pointing to His chest – " This Brahmin can bring lakhs of men on the white path and take them to their destination. This is a Brahmin's Masjid and I won't allow any black Mohammeden to cast his shadow here."

परंतू वरील मजकूरावरूनच हिंदी व अन्य भाषांमधील काही साई चरित्रांमध्ये त्या त्या भाषेत मजकूराचा अनुवाद करून तो छापण्यात आला आहे.

आता ज्या २६ पुस्तकांची छपाई करावयाची आहे यामध्ये पुढीलप्रमाणे ५ साईचरित्रांचा समावेश आहे.१) श्री साईचरित्र हिंदी, २) श्री साईचरित्र इंग्रजी, ३) श्री साईचरित्र तामिळ ४) श्री साईचरित्र तेलगू, ५) श्री साईचरित्र कन्नड. पैकी तामिळ,तेलगू व कन्नड या इतर राज्यातील भाषा असलेने त्यातील मजकूर तत्कालिन मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसमक्ष संबंधित भाषेच्या जाणकार साईभक्तांकडून वाचन करणेत येऊन याबाबत पूर्ण खात्री केली असता, श्री साईचरित्र तामिळच्या यापुर्वीच्या आवृत्तीत उपरोक्त इंग्रजी मजकूराचे भाषांतर आहे. तसेच गुजराथी साईचरित्रातही इंग्रजी मध्ये असलेल्या वादग्रस्त मजकूराचे भाषांतर आहे.

संस्थानमध्ये उपलब्ध असलेल्या श्री साई चरित्रांच्या आवृत्यांची पडताळणी केली असता सदर मजकूर कुठल्या आवृत्तीमध्ये आला आहे व कुठल्या आवृत्तीपासून तो वगळण्यात आला आहे. तसेच आजतागायत कोणत्या भाषेतील श्री साई सतचरित्रात तो समाविष्ट आहे हे दर्शविणारा तक्ता खालीलप्रमाणे आहे.

| अ.नं. | भाषा | वादग्रस्त मजकूर असलेली आवृत्ती/ प्रकाशन वर्ष | वादग्रस्त मजकूर नसलेली आवृत्ती/ प्रकाशन वर्ष | चालू आवृत्तीतील सध्यस्थिती |
|---|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | १)७ वी / १९७४<br>२) ९ वी / १९८०<br>३) १० वी /१९८२<br>४) १२ वी / १९८६<br>५) १३ वी / १९८७<br>६) १४ वी / १९९०<br>७) १५ वी /१९९१<br>८) १६ वी / १९९६<br>९) १७ वी /१९९८<br>१०) १८ वी / १९९९<br>११) १९ वी /२००१ | १) २३ वी / -<br>२) २४ वी/ -<br>३) २५ वी / -<br>४) २६ वी / -<br>५) २७ वी / २०१८ | नाही. |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | १२) २० वी / २००२<br>१३) २१ वी / २००७<br>१४) २२ वी /२००९ | | |
| २ | हिंदी | १) ६ वी /१९७७<br>२) ७ वी/ १९८०<br>३) ८ वी /१९८३<br>४) ९ वी /१९८७<br>५) १० वी /१९८९<br>६) ११ वी / १९९१<br>७) १२ वी / १९९४<br>८) १३ वी / १९९६<br>९) १४ वी / -<br>१०) १५ वी / १९९९<br>११) १६ वी / २००१<br>१२) १७ वी / २००२<br>१३) १८ वी / २००७ | १) २२ वी /२००८<br>२) २३ वी/ २००९<br>३) २५ वी /२०१२<br>४) २६ वी / २०१३<br>५) २७ वी / २०१५<br>६) २८ वी / २०१८ | नाही |
| ३ | गुजराथी | १) ४ थी / १९७६<br>२) ५ वी / १९८६<br>३) ६ वी / १९८९<br>४) ७ वी / १९९१<br>५) ८ वी /१९९६<br>६) ९ वी / २००३<br>७) ११ वी / २००८<br>८) १२ वी / २०१०<br>९) १३ वी / २०१२<br>१०) - / २०१४<br>११) १५ वी / २०१८ | - | आहे |
| ४ | तामिळ | १) १६ वी / २०११<br>२) १७ वी / २०१२<br>३) १९ वी / २०१४<br>४) २० वी /२०१६<br>५) २१ वी / २०१७<br>६) २२ वी / २०१९ | १) २ री / १९९०<br>२) ४ थी / १९९६<br>३) ९ वी / २००७<br>४) १३ वी / २००८<br>५) १४ वी / २००९ | आहे |

श्री साई सतचरित्र तेलगू व कन्नड यामध्ये सदर वादग्रस्त मजकूर प्रथमपासूनच प्रकाशित केला गेला नसल्याचे आढळते.

विभागाचा अभिप्रायः- मा.व्यवस्थापन समितीचे मान्यतेने श्री साईबाबांच्या जन्मस्थळाविषयीचा वादग्रस्त मजकूर इंग्रजी, हिंदी साईचरित्रातून यापुर्वीच काढून टाकलेला आहे. त्याचप्रमाणे श्री साईचरित्र तामिळ या भाषेतील वादग्रस्त मजकूर काढून टाकता येईल तसेच पुढील छपाईचे वेळी संस्थान प्रकाशित अन्य भाषेतील साई सतचरित्रात ( गुजराथी, बंगाली, आसामी, नेपाळी, मल्याळम, उडिया इ.) सदर मजकूर आढळल्यास तो छपाईच्यावेळी काढून टाकता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्तावः- विभागाच्या अभिप्रायात नमूद केलेप्रमाणे आता छपाई करावयाच्या श्री साईचरित्र तामिळ त्याचप्रमाणे पुढील छपाईचेवेळी संस्थान प्रकाशित अन्य भाषेतील साई सतचरित्रात (गुजराथी, बंगाली, आसामी, नेपाळी, मल्याळम, उडिया इ.) सदर मजकूर आढळल्यास तो छपाईच्यावेळी काढून टाकणेस मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३३४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबांच्या जन्मस्थळाविषयीचा मजकुर सध्या छपाई करावयाच्या श्री साईचरित्र तामिळ या पुस्तकातुन काढून टाकण्यास त्याचप्रमाणे पुढील छपाईचेवेळी संस्थान प्रकाशित अन्य भाषेतील साई सतचरित्रामध्ये सदरचा मजकूर आढळल्यास तो छपाईच्यावेळी काढून टाकण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.३०** **साईलीला व्दैमासिकाचे मुल्य वाढविणे तसेच सभासद वर्गणी फी वाढविणेबाबत**.

**प्रस्ताव-** अधिनियम – श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था अधिनियम २००४ कलम क्र.१७ (२) ठ

" श्री साईबाबांचे जीवन त्यांचे कार्य, त्यांच्या लीला व त्यांची शिकवण याबाबतच्या उपयुक्त माहितीचा प्रचार – प्रसार करील आणि साहित्य ग्रंथालय चालवील व त्याचा विस्तार करील."

मा.व्यवस्थापन समितीचेसभेतील निर्णय-

१) मा.व्यवस्थापन समितीचेदि.२०.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७०७.

प्रस्तावित तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे श्री साईलीला द्वैमासिके, नियतकालिके मराठी व हिंदी-इंग्रजी अंक छपाई करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रीया राबविणेस व त्याकामी येणा-या अंदाजे रक्कम रू.२६,९१,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.

छपाईसाठी वापरण्यात येणारा कागद (आतील पाने) चांगल्या प्रतीचा साधारणपणे ९० जीएसएम चा वापरणेत यावा.

तसेच श्री साईलीला द्वैमासिकामध्ये अध्यात्मिक विषयांचा समावेश मोठया प्रमाणात असावा. श्री साईलीला अंक छपाईबाबतचा विषय सादर करतांना त्यामध्ये मागीलवर्षी छपाई केलेल्या अंकाची संख्या व छपाई खर्च तसेच चालू वर्षीच्या अंकाची छपाई संख्या व खर्चाचा तुलनात्मक तक्त्याचा समावेश करावा, अशा सुचना यावेळी देण्यात आल्या.

प्रास्तविक- मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.११.२०१८ चे सभेतील निर्णय क्र.७०७ नुसार साईलीला छपाईसाठी ९० जीएसएमचा कागद वापरण्यात यावा असे ठरले आहे. तत्पुर्वी सदरहू अंकासाठी ७० जीएसएमचा कागद वापरणेत येत होता.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२०.११.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७०७ नुसार सन-२०१९ चे साईलीला द्वैमासिकासाठी ९० जीएसएमचा कागद वापरण्यात आल्याने सन-२०१८ चे तुलनेत सन-२०१९ चे साईलीला द्वैमासिके दरामध्ये खालील तक्त्यात नमूद केलेप्रमाणे वाढ झालेली दिसून येते.

| **अ.नं.** | **सन-२०१८ साईलीलाद्वैमासिक छपाई ७० जीएसएम तपशिल** | **सन-२०१९ साईलीलाद्वैमासिक छपाई ९० जीएसएम तपशिल** |
|---|---|---|
| ०१ | ४ पाने कव्हर १७० जीएसएम आर्ट पेपर | ४ पाने कव्हर १७० जीएसएम आर्ट पेपर |
| ०२ | ३२ पाने आतील मजकूर – ७० जीएसएम ,LWC Paper | ३२ पाने आतील मजकूर – ९० जीएसएम ,Art Paper |
| ०३ | दर प्रत्येकी - रू.१३.०४ (मराठी ७००० प्रती) | दर प्रत्येकी - रू.१६.०५ (मराठी ७५०० प्रती) |
| ०४ | दर प्रत्येकी- रू.११.६४ (हिंदी-इंग्रजी १५००० प्रती) | दर प्रत्येकी - रू.१८.९५ (हिंदी-इंग्रजी१५५०० प्रती) |
| ०५ | वजन- मराठी-७५.६७० व हिंदी-इंग्रजी- ८३.२५० ग्रॅम | वजन- मराठी- ९५.८०० व हिंदी-इंग्रजी- ९७.७६० ग्रॅम |
| ०६ | १०० पाने (शताब्दी विशेषांक) आतील मजकूर- ७० जीएसएम,LWC Paper | ६४ पाने आतील मजकूर- ९० जीएसएम,Art Paper |
| ०७ | दर प्रत्येकी- रू.२१.७७ (मराठी ७००० प्रती) | दर प्रत्येकी- रू.२७.५० ( मराठी ७५०० प्रती) |
| ०८ | दर प्रत्येकी- रू.२०.१५ (हिंदी-इंग्रजी १५००० प्रती) | दर प्रत्येकी- रू.२५.४८ ( हिंदी-इंग्रजी १५५०० प्रती) |
| ०९ | वजन- मराठी-२०२.३४० व हिंदी-इंग्रजी- २१४.०७० ग्रॅम | वजन- मराठी-१७१.८७० व हिंदी-इंग्रजी- १७१.३३० ग्रॅम |

सन-२०१९ चे साईलीला द्वैमासिके छपाई दरामध्ये उपरोक्त तक्त्यात नमूद केलेप्रमाणे वाढ झाली असल्याकारणाने मा.स्थानिक उपसमितीचे दि.०४.०३.२०१९ रोजीचे सभेमध्ये साईलीला अंकाचे दर्शनी मूल्य निश्चित करणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आला होता. (संस्थानकडून साईलीला अंकाची काऊंटरवरून विक्री केली जात नाही. फक्त साईलीलाचे सभासदांना ती पाठविण्यात येतात.) सदर प्रस्तावावर चर्चा होवून साईलीला अंकाचे ३६ पानांसाठी दर्शनी मूल्य रू.८/- ऐवजी रू.१५/- व दसरा विशेषांक ६८ पानांसाठी दर्शनी मूल्य रू.१५/-

ऐवजी रू.२५/- निश्चित करण्यात यावे अशी चर्चा झालेली होती. तथापि अनावधानाने स्थानिक उपसमितीच्या इतिवृत्तात या बाबीचा उल्लेख करावयाचा राहून गेले असल्याचे दिसते.

विभागाचा अभिप्रायः- संस्थानमार्फत सन-१९२३ पासून साईलीला हे नियतकालिक प्रकाशित केले जाते. सध्या साईलीला मराठी द्वैमासिकासाठी ७,००० व इंग्रजी-हिंदी या द्वैमासिकासाठी १५,५०० सभासद आहेत.

आता सन-२०२० चे साईलीला द्वैमासिके छपाई कामासाठी ई-निविदा मागवून दर निश्चित करणेत आलेले आहेत. त्याची व सन-२०१९ चे छपाई दराची माहिती खालीलप्रमाणे-

| अ.नं. | सन-२०१९ साईलीलाद्वैमासिक छपाई ९० जीएसएम तपशिल | सन-२०२० साईलीलाद्वैमासिक छपाई ९० जीएसएम तपशिल |
|---|---|---|
| ०१ | ४ पाने कव्हर १७० जीएसएम आर्ट पेपर | ४ पाने कव्हर १७० जीएसएम आर्ट पेपर |
| ०२ | ३२ पाने आतील मजकूर – ९० जीएसएम ,Art Paper | ३२ पाने आतील मजकूर – ९० जीएसएम ,Art Paper |
| ०३ | दर प्रत्येकी - रू.१६.०५ (मराठी ७५०० प्रती) | दर प्रत्येकी - रू.१३.२५ (मराठी ७००० प्रती) |
| ०४ | दर प्रत्येकी - रू.१८.९५ (हिंदी-इंग्रजी १५५०० प्रती) | दर प्रत्येकी - रू.१२.०० (हिंदी-इंग्रजी १५५०० प्रती) |
| ०५ | वजन- मराठी- ९५.८०० व हिंदी-इंग्रजी- ९७.७६० ग्रॅम | वजन- अंक येणे बाकी |
| ०६ | ६४ पाने आतील मजकूर- ९० जीएसएम,Art Paper | ६४ पाने आतील मजकूर- ९० जीएसएम,Art Paper |
| ०७ | दर प्रत्येकी- रू.२७.५० ( मराठी ७५०० प्रती) | दर प्रत्येकी- रू.१५.५० ( मराठी ७००० प्रती) |
| ०८ | दर प्रत्येकी- रू.२५.४८ (हिंदी-इंग्रजी १५५०० प्रती) | दर प्रत्येकी- रू.१७.५०(हिंदी-इंग्रजी १५५०० प्रती) |
| ०९ | वजन-मराठी-१७१.८७० व हिंदी-इंग्रजी-१७१.३३० ग्रॅम | वजन- अंक तयार होणे बाकी |

उपरोक्त तक्त्यातील सन-२०२० चे दर विचारात घेता मराठी व हिंदी-इंग्रजीचे वर्षातील एकूण ०६ अंक पाठविणेसाठी खालीलप्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

| अ.नं. | मराठी द्वैमासिक | खर्च | हिंदी-इंग्रजी द्वैमासिक | खर्च |
|---|---|---|---|---|
| १. | नियमित ५ अंक (५ x १३.२५) | ६६.२५ | नियमित ५ अंक (५ x १२.००) | ६०.०० |
| २. | विशेषांक १ अंक (१ x १५.५०) | १५.५० | विशेषांक १ अंक (१ x १७.५०) | १७.५० |
| ३. | पाकीटांचा खर्च (६ x ०.९७) | ५.८२ | पाकीटांचा खर्च (६ x ०.९५) | ५.७० |
| ४. | पोस्टेज खर्च नियमित ५ अंकासाठी प्रत्येकी रू.५/- | २५.०० | पोस्टेज खर्च नियमित ५ अंकासाठी प्रत्येकी रू.५/- | २५.०० |
| ५. | पोस्टेज खर्च विशेषांकासाठी रू.१०/- | १०.०० | पोस्टेज खर्च विशेषांकासाठी रू.१०/- | १०.०० |
| | **एकूण-** | **१२२.५७** | | **११८.२०** |

तरी उपरोक्त तक्त्यात नमूद केलेला प्रत्यक्ष खर्च, पोष्टेज व प्रशासकीय खर्च विचारात घेता साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी द्वैमासिकाचे ३६ पानांसाठी दर्शनी मूल्य रू.८/- ऐवजी रू.१५/- व दसरा विशेषांक ६८ पानांसाठी दर्शनी मूल्य रू.१५ ऐवजी रू.२५/- निश्चित करणेस तसेच वार्षिक सभासद वर्गणी रू.५०/- ऐवजी रू.१२५/- व साईलीला आजीवन सभासद वर्गणी रू.१,०००/- ऐवजी रू.२,५००/- करावी असे नम्र मत आहे.

प्रस्ताव- तरी विभागाचे अभिप्रायमध्ये नमूद केलेप्रमाणे साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी द्वैमासिकाचे ३६ पानांसाठी दर्शनी मूल्य रू.८/- ऐवजी रू.१५/- व दसरा विशेषांक ६८ पानांसाठी दर्शनी मूल्य रू.१५/- ऐवजी रू.२५/- निश्चित करणेस तसेच वार्षिक सभासद वर्गणी रू.५०/- ऐवजी रू.१२५/- व साईलीला आजीवन सभासद वर्गणी फी रू.१,०००/- ऐवजी रू.२,५००/- करणेसाठी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३३५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईलीला मराठी व हिंदी-इंग्रजी द्वैमासिकाचे ३६ पानांसाठी दर्शनी मूल्य रू.८/- ऐवजी रू.१५/- व दसरा विशेषांक ६८ पानांसाठी दर्शनी मूल्य रू.१५/- ऐवजी रू.२५/- निश्चित करण्यास तसेच वार्षिक सभासद वर्गणी रू.५०/- ऐवजी रू.१२५/- व साईलीला आजीवन सभासद वर्गणी फी रू.१,०००/- ऐवजी रू.२,५००/- करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-प्रकाशने विभाग)**

---

**विषय नं.३१** **श्री गुरुपोर्णीमा उत्सव २०२० साजरा करणेस व याकामी येणाऱ्या खर्चाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेबाबत तसेच कलाकार व किर्तनकार कार्यक्रमाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४-

१. अधिनियमाचे कलम १७ मधील पोटकलम(१) अन्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष आदेशास अधिन राहून संस्थान विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तेची व कामकाजाची कार्यक्षमतेने व्यवस्था पाहणे, मंदिरामध्ये रुढी व प्रथेनुसार धार्मिक विधी पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करण्यासाठी आणि पार पाडण्यासाठी योग्य ती व्यवस्था करणे. भक्तगणांना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे आणि या अधिनियमान्वये विश्वस्तव्यवस्थेचा कारभार ज्याप्रयोजनार्थ चालवावयाचा आहे, ती उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी विश्वस्तव्यवस्थेचे उत्पन्न कामी लावणे, ही समितीची कर्तव्ये असतील.

२. अधिनियमाचे कलम २१ मधील पोटकलम१(ग) अन्वये, भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३. कलम २१(१) (ख) रुढी व प्रथांनुसार, मंदिरातील धार्मिक विधी, पूजा-अर्चा, समारंभ व उत्सव आयोजित करणे व पार पाडणे;

४. (ग) भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे;

प्रस्तावना- उपरोक्त अधिनियमातील तरतुदीनुसार व पुर्वापार रुढी परंपरेनुसार संस्थान व्यवस्थापना मार्फत धार्मिक पुजा विधी, उत्सव साजरे केले जात आहेत. यंदाचा श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२० शनिवार, दि.०४.०७.२०२० ते सोमवार, दि.०६.०७.२०२०(आषाढ शु.१४ शके १९४२ ते आषाढ कृ.०१ शके १९४२ ) असा तीन दिवस साजरा करण्यात येणार आहे.

विभागाचा अभिप्राय– सन-२०२० मध्ये साजरा करावयाचे श्री गुरुपौर्णिमा उत्सवासाठी पुढीलप्रमाणे नियोजन करावे लागणार आहे.

| **अ.नं** | **तपशील** | **श्री गुरुपौर्णिमा -२०२० चे उत्सवाचे अनुषंगाने करावयाचे नियोजन//कामे** |
|---|---|---|
| ०१ | उत्सव निमत्रंण पत्रिका व उदीप्रसाद | अधिनियमातील तरतुदीनुसार भक्तमंडळाचे सामान्य, आजीव व आश्रयदाते सभासदांना नेहमीचे प्रथेप्रमाणे निमंत्रणपत्रिका व उदीप्रसाद पाठविणेऐवजी मा. तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२०चे सभेत ठरलेप्रमाणे फक्त उदीप्रसाद पाठविण्याची कार्यवाही केली जाईल. तसेच निर्णयाप्रमाणे भक्तमंडळाचे सभासदांना संस्थानकडे उपलब्ध असलेल्या ई-मेल/SMS व्दारे कार्यक्रमाचे निमंत्रण देण्याची कार्यवाही केली जाईल, तसेच नेहमीप्रमाणे वर्तमानपत्रातून प्रेस नोट (न्यूज ॲटम) प्रसिध्दीस देण्यात येईल. |
| ०२ | **अ) सांस्कृतिक कार्यक्रम** | श्री साईबाबांच्या काळापासूनच शिर्डीत सांस्कृतिक कार्यक्रम होत असल्याचे आढळून येते तथापि कोरोनाचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना म्हणून यावर्षी तीनही दिवसाचे सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात येणार नाहीत. |
| | मुख्य दिवस<br>रविवार, दि.०५/०७/२०२०<br>आषाढ शु १५ शके १९४२ | साईभक्तांसाठी दर्शन सुरू झाल्यास उत्सवाच्या मुख्य दिवशी समाधी मंदीर दर्शनासाठी रात्रभर उघडे ठेवता येईल. |
| | शनिवार, दि.०४/०७/२०२० (सायं. ४ ते ६)<br>रविवार, दि.०५/०७/२०२० (सायं. ४ ते ६)<br>सोमवार, दि.०६/०७/२०२० (सकाळी १० ते १२) | **ब) कीर्तन कार्यक्रम**<br>कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनां म्हणून उत्सवाचे तिन्ही दिवशी संस्थान कर्मचा-यामार्फत कीर्तनाचे आयोजन करता येईल. उत्सव काळात दर्शनलाईन बंद असल्यास कीर्तन कार्यक्रम मंदिरात होईल, दर्शनलाईन सुरु झाल्यास कीर्तन कार्यक्रम समाधी मंदिरासमोरील स्टेजवर आयोजित करता येईल. |
| ०३ | श्री सत्यनारायण पूजा व अभिषेक पूजा | कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनां म्हणून (पुजेसाठी बसणा-या साईभक्तांमध्ये सामाजिक अंतर ठेवणे शक्य होणार नाही) उत्सव काळात मंदिर विभागामार्फत पार पाडल्या जाणा-या श्री साई सत्यव्रत पुजा व अभिषेक पूजा बंद ठेवता येईल. |

| | | |
|---|---|---|
| ०४ | अखंड पारायण व्यवस्था | साईभक्तांसाठी दर्शन सुरु झाल्यास उत्सव काळात दि.०४/०७/२०२० रोजी सकाळी ५.३० वाजता श्री व्दारकामाई मंदिरात श्री साईसच्चरिताचे अखंड पारायणास सुरुवात होईल. दि.०५/०७/२०२० सकाळी ५.०० वाजता त्याची समाप्ती होईल. मा. तदर्थ समितीचे सदस्य पहिले ०५ अध्याय वाचतील व राहिलेले ४८ अध्याय प्रत्येकी एक याप्रमाणे ४८ भक्त वाचतील. इच्छुक भक्तांची नावे दि.०३/०७/२०२० रोजी नोंदविली जातील व त्याच दिवशी सायंकाळी त्यांच्या नावाच्या चिठ्ठया काढून पारायणाकरीता नावे निश्चित केली जातील. पारायणात भाग घेणा-या प्रत्येक भक्तास प्रसाद म्हणून एक श्रीफळ देण्यात येईल. अखंड पारायणाकरीता व्दारकामाई रात्रभर उघडी ठेवण्यात येईल.<br>साईभक्तांसाठी दर्शन सुरु न झाल्यास श्री रामनवमी उत्सवाप्रमाणे संस्थानचे अधिकारी व कर्मचा-यांकडून साई सच्चरिताचे पारायण केले जाईल.<br>श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पोथी, वीणा, प्रतिमा, अध्याय वाचन, रुद्राभिषेक, पाद्यपूजा या कार्यक्रमाकरीता मा.तदर्थ समितीच्या सदस्यांची नावे ठरविणे आहे. याबाबतची टिपणी मा.तदर्थ समितीचे सभेत अलाहिदा स्वतंत्रपणे सादर करण्यात येईल. |
| ०५ | पालखी व रथ मिरवणूक | उत्सवाचे पहिले दिवशी शनिवार,दि.०४/०७/२०२० रोजी रात्रौ ९.१५ वाजता श्रींचे पालखीचे गावातून मिरवणूक व मुख्य दिवशी रविवार, दि.०५/०७/२०२० रोजी रात्रौ ९.१५ वाजता श्रींच्या रथाची गावातून मिरवणूक असते तथापि पालखी व रथ मिरवणूकीबाबत परिस्थितीनुरुप स्थानिक शासकीय अधिका-याशी चर्चा करुन निर्णय घेता येईल . |
| ०६ | विद्युत रोषणाई | श्री गुरुपौर्णिमा उत्सवात विद्युत विभागामार्फत समाधी मंदीर, व्दाराकामाई, श्री चावडी, श्री गुरुस्थान व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात येईल. विद्युत रोषणाईचे कामासाठी येणा-या साईभक्तांची निवास, भोजन, चहा-नाष्टयाची व्यवस्था संस्थानमार्फत दरवर्षी विनामुल्य करण्यात येते. त्याप्रमाणे याही वर्षी विनामुल्य करण्यात येईल. मात्र विद्युत रोषणाईचे सामान आणणे व नेणेकामीचे ट्रक भाडे व जाणे-येण्याचा खर्च देण्यात येतो. या उत्सवातही त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल. ते न आल्यास संस्थानमार्फत विद्युत रोषणाई करण्यात येईल. |
| ०७ | संरक्षण व्यवस्था | उत्सव काळात समाधी मंदिर व मंदिर परिसरात संरक्षण विभागामार्फत बंदोबस्त ठेवण्यात येईल |
| ०८ | प्रसाद-भोजन व्यवस्था | साईभक्तांसाठी श्रींचे दर्शन सुरु झाल्यास उत्सव काळात प्रसादालयात मिष्टान्नासह भक्तांना मोफत प्रसाद भोजन दिले जाते. कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनां म्हणून साईभक्तांमध्ये सामाजिक अंतर ठेवून प्रसाद भोजनाची व्यवस्था करण्यात येईल.तसेचमा. तदर्थ समितीचे सदस्य व त्यांचे कुटुंबिय यांचीही प्रसादभोजनाची व्यवस्था केली जाईल. साईभक्तांमध्ये सामाजिक अंतर ठेवून स्वतंत्र चहा, कॉफी, दूध व बिस्कीटे इत्यादीची कॅन्टीनमध्ये २४ तास सुविधा उपलब्ध करुन देता येईल. लाडू प्रसाद तसेच तीनही दिवस मिष्टान्न प्रसाद सामाजिक अंतर ठेवून साईभक्तांना देण्यात येईल. उत्सव काळात लाडू प्रसाद विक्री सुरु करणेत येईल. याकामी सबंधित विभागाकडुन नियोजन करणेत येईल.<br>सन २०२० चे श्री गुरुपौर्णिमा उत्सवात तिनही दिवसांचे प्रसाद भोजनात मिष्टांन्न पदार्थ देणेसाठी मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्तरावर निश्चिती करता येईल. |
| ०९ | देणगी काऊंटर्स | साईभक्तांसाठी दर्शन सुरु झाल्यास कोरोना विषाणू (कोव्हीड १९) चा प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनां म्हणून साईभक्तांमध्ये सामाजिक अंतर ठेवून नेहमीचे प्रथेप्रमाणे देणगी काऊंटर्स सुरु ठेवण्यात येतील.उत्सव कालावधीत देणगी काऊंटर्सची वेळ सकाळी ५ वा. ते रात्रौ ११ वा. पर्यत करण्यात येईल. |
| १० | जादा कंत्राटी कर्मचारी | आवश्यकता भासल्यास मा. मुख्य कार्यकारी अधिकारीयांचे मान्यतेने जादा कंत्राटीकर्मचारीवर्ग देण्यात येईल. |
| ११ | पालखी व्यवस्था | श्री गुरुपौर्णिमा उत्सवात पुणे तसेच इतर ठिकाणाहून पालख्या येत असतात. उत्सवात येणा-या पालख्या ठेवण्याची व्यवस्था श्री साईबाबा धर्मशाळा येथे करण्यात येते. तथापि |

| | | |
|---|---|---|
| | | यावर्षी कोरोनाचा प्रादुर्भाव असल्याने संरक्षण विभागामार्फत संबंधित पालखी मंडळांना संस्थानचे संरक्षण विभागामार्फत पालखी न आणणेबाबत विनंती करण्यात आली आहे. तसेच संस्थानचे जनसंपर्क विभागामार्फतही याकामी प्रेसनोट प्रसिद्ध करण्यात येत आहे. |
| १२ | पाणीपुरवठा | पाटबंधारे खात्यास उत्सव काळात कॅनॉल चालू ठेवणे बाबत विनंती करण्यात येईल. नियमित पाणीपुरवठा राहिल, याची व्यवस्था करण्यात येईल. |
| १३ | फोटो व्हीडीओ शुटिंगबाबत | उत्सवाचे कार्यक्रमाचे फोटो वव्हीडीओ शुटींगची क्लीप मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने प्रेसला देण्यात येईल. |
| १४ | खर्चाचे अंदाजपत्रक | मा.तदर्थ समितीचे दि.११.०५.२०२० चे सभेत श्री गुरूपौर्णिमा उत्सवाचे रू.४७,०७,५५७/- च्या अंदाजपत्रकास मान्यता मिळणेकामी प्रस्ताव सादर करण्यात आला होता. तथापि सध्याच्या कोरोनाच्या प्रादुर्भावाची सध्यस्थिती विचारात घेता साईभक्तांसाठी दर्शन सुरू होण्याची शक्यता कमी असल्याने सुधारीत अंदाजपत्रक सादर करणेत आले आहे.<br>श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०१९ मध्ये प्रत्यक्ष खर्च रु.३३,६७,५८०.८६ (अक्षरी रुपये तेहतिस लाख, सदुसष्ठ हजार, पाचशे ऐंशी पैसे शहाऐंशी ) मात्र इतका खर्च झाला होता.<br>श्री गुरुपौर्णिमा उत्सव सन-२०२० करीता खालील तपशिलाप्रमाणे अंदाजे रु. **१९,५४,४४४/-** (रु.एकोणावीस लाख चोपन्न हजार चारशे चौरैचाळीस ) मात्र खर्च अपेक्षीत आहे. |

**श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०२० अंदाजपत्रक**

| **अ. क्र** | **खर्च तपशिल** | **श्री गुरुपौर्णिमा उत्सव -२०१९** | | **श्री गुरुपौर्णिमा उत्सव-२०२० अंदाजे खर्च** |
|---|---|---|---|---|
| | | अंदाजे खर्च | प्रत्यक्ष खर्च | |
| १ | मंडप, कमानी, स्टेज,व इतर | ४,९३,००० | ५२३०९५.०६ | २,४३,५४४ |
| २ | मंदिराकडील शिराप्रसाद , दहीहंडी, इतर खर्च | १२,००,००० | ४,४५,५०३.०० | ५५,९०० |
| ३ | भक्तांना मिष्टान्न व फर्निचर भाडे खर्च (श्रम परिहार मजुरीसह) | १०,८५,१३५ | ८,०७,०४६.८० | ५,३५,००० |
| ४ | विदयुत रोषणाई (जनरेटर भाडे, इंधन खर्च ) | १,२०,००० | ७६,६००.०० | १,२०,००० |
| ५ | निमंत्रण पत्रिका, उदीप्रसाद पाठविणेकामी पोष्टेज खर्च (आश्रयदाते विदेशी भक्तांसह ) | १३,९६,००० | १३,५०,७११.०० | १०,००,००० |
| ६ | जादा कर्मचारी स्वयंसेवक(विदयार्थी )मानधन | ४,७२,१०४ | १,४३,४००.०० | - |
| ७ | पालख्याचे ठिकाणी पिण्याची पाण्याची व्यवस्था खर्च (टॅंकर डिझेलसह) | ३,२५,००० | ८४०.०० | - |
| ८ | सीसीटीव्हीसेल - कॅमेरे व सीडी डीव्हीडी खरेदी | ३,६५,००० | - | - |
| ९ | मंदिर व मंदिर परीसर फुलाचे डेकोरेशन | २,५०,००० | - | - |
| १० | वाहन विभाग भाडोत्री क्रेन | १५,००० | २०३८५.०० | - |
| | **एकुण रुपये** | **५७,२१,२३९** | **३३,६७,५८०.८६** | **१९,५४,४४४** |

विभागाचा अभिप्राय– संस्थानमध्ये साज-या होणा-या सर्वच उत्सवांना साईबाबा हयात असल्या पासूनची परंपरा आहे. साहजिकच उत्सव हा संस्थानचा नियमित कार्यक्रमांचा भाग आहे. पर्यायाने त्यासाठी विविध बाबींवर होणारा खर्च हा देखील नियमित खर्चाचा भाग आहे. संस्थान कर्मचा-यांची दरमहाची पगार बिले, विद्युत बिले, इंधन बिले आदी प्रमाणेच सुमारे शंभरपेक्षा अधिक वर्षाची परंपरा असलेल्या उत्सवांसाठी करावा लागणारा खर्च हा संस्थानच्या नियमित खर्चाचाच भाग आहे. सदर खर्चासाठी संस्थानच्या प्रत्येक वर्षीच्या मुळ अंदाजपत्रकात तरतुद केलेली असते व मुळ अंदाजपत्रकास मा. व्यवस्थापन/तदर्थ समिती यांची मान्यता घेतली जाते त्याचप्रमाणे प्रत्येक उत्सवाचे आगोदर त्या त्या उत्सवास लागणा-या अपेक्षित खर्चासही मा.व्यवस्थापन समिती/ तदर्थ समितीची मान्यता घेण्यात येते त्यामुळे अधिनियमातील तरतुदीनुसार उत्सव

आयोजित करणे व तो पार पाडण्याची अंमलबजावणी करावयाची असल्याने उत्सवाच्या नियमीत खर्चास मा. उच्च न्यायालयाची मान्यता घेण्याची आवश्यकता नसावी असे नम्र मत आहे.

सध्या देशात व महाराष्ट्रात कोरोनाचा प्रादुर्भाव चालू असल्याने उत्सव कालावधीतील कोणत्याही कार्यक्रमाबाबत परिस्थितीनुरूप धोरणात्मक अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा.तदर्थ समितीचे वतीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे असावेत असे नम्र मत आहे.

श्री गुरूपौर्णिमा उत्सव २०२० साजरा करणेसाठी व याकामी संस्थानचे विविध विभागांनी उपरोक्तप्रमाणे सादर केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता मिळणेकामी सदरहू विषय मा.तदर्थ समितीचे सभेसमोर सादर करता येईल, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव– तरी खालील अ व ब मुद्यांबाबत निर्णयार्थ सादर.

अ) श्री गुरुपौर्णिमा उत्सव २०२० साजरा करणेकामी वरीलप्रमाणे कार्यवाही करणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रुपये रु. १९,५४,४४४/- (रु.एकोणावीस लाख चोपन्न हजार चारशे चौरेचाळीस ) मात्रचे खर्चास मान्यता मिळणे..

ब) सध्या देशात व महाराष्ट्रात कोरोनाचा प्रादुर्भाव चालू असल्याने उत्सव कालावधीतील कोणत्याही कार्यक्रमाबाबत परिस्थितीनुरूप धोरणात्मक अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार मा.तदर्थ समितीचे वतीने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देणेबाबत.

**निर्णय क्र.३३६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सध्या देशात व महाराष्ट्रात कोरोनाचा प्रादुर्भाव असल्याने दि.०४.०७.२०२० ते दि.०६.०७.२०२० या कालावधीत श्री गुरुपोर्णीमा उत्सव २०२० कोरानो विषाणूच्या वाढत्या प्रार्दुभावाचे संदर्भात शासनाने वेळोवेळी दिलेले निर्देश पाळून तसेच गावातून मिरवणूक न काढता साजरा करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास तत्वत: मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-शताब्दी कक्ष)**

---

**विषय नं.३२** **साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे पाणी वाटप काम करत असलेले २८ कंत्राटी कर्मचाऱ्यांचे खर्चाचे मान्यतेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद - २१(ग) भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. या अधिनियम व तरतुदी नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थेमार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा करण्यात येते.

प्रस्तावीक– दि.०४/०३/२०२० रोजीचे मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे साईभक्तांना पिण्याचे पाणी वाटपासाठी कार्यरत असलेले २८ आऊटसोर्स कंत्राटी कर्मचारी यांचे खर्चा बाबत प्रस्ताव सादर करणेत आला होता. त्यावर निर्णय क्र.१६७ अन्वये सविस्तर चर्चा होऊन सदर पाणीवाटप करत असलेले २८ कंत्राटी कर्मचा-यांचे खर्चा बाबतचा आभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा असे ठरले. त्यास अनुसरुन सविस्तर फेर प्रस्ताव खालील प्रमाणे -

**अ)** संस्थानचे मा.अध्यक्ष महोदय श्री हावरे साहेब यांनी दि.११/१०/२०१६ रोजी मंदिर परिसर व दर्शनलाईन मध्ये राऊंड घेऊन पाहणी केली असता, दर्शनलाईन मध्ये साईभक्तांसाठी पिण्याचे पाणी वाटप व्यवस्था कायमस्वरुपी सुरु करणेबाबत आदेशीत केल्याने, प्रशासनाकडील तत्कालीन वरिष्ठांचे प्राप्त मौखिक सुचनेनुसार इकडील विभागाकडून पाणी वाटपासाठी कंत्राटी कर्मचारी मिळणे बाबत दि.१४/१०/२०१६ व दि.२७/१०/२०१६ अन्वये प्रस्ताव सादर केला असता त्यावरील प्राप्त निर्देशानुसार, सदर मंजुर प्रस्ताव पुढील कार्यवाहीसाठी कामगार विभागाकडे दि.२१/१०/२०१६ व दि.२७/१०/२०१६ रोजी सादर करणेत आला होता.

त्यास अनुसरुन कामगार विभागाने जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/२८८१/२०१६ दि.०९/११/२०१६ अन्वये त्यावेळचे संस्थान मधील ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस यांना संस्थान मध्ये इतर विभागात कार्यरत असलेले त्यावेळचे ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया व स्पिक ॲण्ड स्पॅन सर्व्हिसेस यांचे कडील उपलब्ध असलेल्या कंत्राटी कर्मचा-यांमधून प्रतिदिनी १६ कंत्राटी कर्मचारी साईप्रसाद निवासस्थान विभागास पुरविणे बाबत आदेशीत करण्यात आले होते.

त्यानुसार ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस कॅम्प शिर्डी यांनी प्रसादालय विभागात कार्यरत असलेले ठेकेदार स्पिक ॲण्ड स्पॅन सर्व्हिसेस यांचेकडील १६ कंत्राटी कर्मचारी, ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस कॅम्प शिर्डी यांचे मार्फत साईप्रसाद निवासस्थान विभागास पुरविले व सदर कर्मचा-यांची मासिक हजेरीची नोंद

साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे ठेवून कर्मचा-यांचे दरमहा मासिक वेतनाचे बील मे.जय भवानी एंटरप्रायजेस कॅम्प शिर्डी यांनी आदा केलेले आहे. सदरचा खर्च साईप्रसाद निवासस्थान विभागाचे बजेट (कंत्राटी कर्मचारी खर्च) मधून आदा केलेला आहे.

दर्शनलाईनमध्ये साईभक्तांसाठी खालील ठिकाणी पाणीवाटप व्यवस्था आजतागायत सुरु आहे.

| अ.नं. | पॉईंट | कर्मचारी संख्या व डयुटी वेळ ०६/१४ | कर्मचारी संख्या व डयुटी वेळ १४/२२ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०१ | **शांतीनिवास तळ मजला हॉल स्कॅनर जवळ दोन्ही बाजूने** | ०२ | ०२ | ०४ |
| ०२ | **शांतीनिवास तळमजला हॉल जनरल बाथरुम जवळ** | ०१ | ०१ | ०२ |
| ०३ | **भक्तनिवास तळमजला हॉल जनरल बाथरुम समोर** | ०१ | ०१ | ०२ |
| ०४ | **शांतीनिवास पहिला मजला दोन्ही बाजूच्या जनरल बाथरुम समोर** | ०२ | ०२ | ०४ |
| ०५ | **भक्तनिवास पहिला मजला जनरल बाथरुम समोर व दक्षिण बाजू गेट जवळ** | ०२ | ०२ | ०४ |
| | **एकूण कर्मचारी संख्या -** | ०८ | ०८ | १६ |

ब) तदनंतर, मा.अध्यक्ष महोदय यांनी दिलेल्या सुचनेनुसार मालमत्ता विभागाचे दि.२१/१०/२०१६ चे प्राप्त टिपणीत साईप्रसाद निवासस्थान विभागाने मंदिराचे गेट नं.१,२ व ४ या ठिकाणी संस्थान बांधकाम विभागामार्फत जागा निश्चित करुन तेथे मोफत चप्पल स्टॅंड सुरु करणे बाबत ठरल्याने, त्यासाठी आवश्यक कंत्राटी कर्मचा-यांची कामगार विभागाकडून नेमणूक करुन घेणे बाबत इकडील विभागास आदेशीत केले होते.

त्यानुसार इकडील विभागाचे जा.नं.एसएसएस/वशी-साप्रनि/२९४७/२०१६ दि.१०/११/२०१६ चे पत्राने चप्पल स्टॅंड करीता १२ कंत्राटी कर्मचारी मिळणे बाबत कामगार विभागास पत्राने कळविणेत आले होते.

कामगार विभागाने जा.नं. एसएसएस/वशी-७ए/३०२४/२०१६ दि.१७/११/२०१६ अन्वये त्यावेळचे संस्थान मधील ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस, कॅम्प शिर्डी यांना संस्थान मध्ये इतर विभागात कार्यरत असलेले त्यावेळचे ठेकेदार मे.बी.व्ही.जी.इंडिया व स्पिक ॲण्ड स्पॅन सर्व्हिसेस यांचे कडील उपलब्ध असलेल्या कर्मचा-यांमधून प्रतिदिनी १२ कंत्राटी कर्मचारी साईप्रसाद निवासस्थान विभागास पुरविणे बाबत आदेशीत करण्यात आले होते.

त्यानुसार कामगार विभागाचे आदेशान्वये ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस, कॅम्प शिर्डी यांनी प्रसादालय विभागात कार्यरत असलेले ठेकेदार स्पिक ॲण्ड स्पॅन सर्व्हिसेस यांचेकडील १२ कंत्राटी कर्मचारी, ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस, कॅम्प शिर्डी यांचे मार्फत साईप्रसाद निवासस्थान विभागास चप्पल स्टॅंड व्यवस्थेकामी पुरविले व सदर कर्मचा-यांची मासिक हजेरीची नोंद साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे ठेवून कर्मचा-यांचे दरमहा मासिक वेतनाचे बील मे.जय भवानी एंटरप्रायजेस, कॅम्प शिर्डी यांनी आदा केलेले आहे. सदरचा खर्च साईप्रसाद निवासस्थान विभागाचे बजेट (कंत्राटी कर्मचारी खर्च) मधून आदा केलेला आहे.

क) मालमत्ता विभागाकडील प्रस्तावावर दि.२८/०४/२०१७ रोजीचे मा.व्यवस्थापन समितीचे सभेत निर्णय क्र.३५५ नुसार "पादत्राणे गृह, बॅग, मोबाईल व कॅमेरा लॉकर या सुविधा सोसायटीस पुढील अटीवर चालविणेस देण्यात याव्या. पादत्राणे गृह व बॅग क्लोक रुम या सुविधा सोसायटीने विनामुल्य चालवाव्यात व मोबाईल / कॅमेरा यासाठी प्रति नग रु.०५/- मात्र आकारणेत यावा" असे ठरल्याने, गेट नं.०१ व १६ गुंठे येथे संस्थान मार्फत सुरु असलेले चप्पल स्टॅंड सोसायटीकडे वर्ग केले.

दरम्यानच्या काळात दि.२०/०८/२०१७ व दि.२९/०९/२०१७ रोजी मा.अध्यक्ष महोदय यांनी मंदिर परिसरात घेतलेल्या राऊंड मध्ये मंदिर परिसरात ठिक-ठिकाणी साईभक्तांकरीता पाणीवाटप व्यवस्था सुरु करणे बाबत सुचना दिल्याने, इकडील विभागाकडून दि.०२/०१/२०१८ रोजी प्रस्ताव सादर करुन, चप्पल स्टॅंड कडील

१२ कंत्राटी कर्मचारी मंदिर परिसरात खालील ठिकाणी नव्याने सुरु करण्यात आलेल्या पाणीवाटप पॉईंटवर नेमणेकामी सदर प्रस्तावास मंजुरी देण्यात आल्याने खालील प्रमाणे कार्यवाही सुरु करणेत आली.

| अ.नं. | पॉईंट | कर्मचारी संख्या व डयुटी वेळ ०६/१४ | कर्मचारी संख्या व डयुटी वेळ १४/२२ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ०१ | व्ही.आय.पी.गेट नं.०२ बाहेरुन | ०१ | ०१ | ०२ |
| ०२ | अब्दुलबाबा समाधी जवळ | ०२ | ०२ | ०४ |
| ०३ | गेट नं.०४ समोर आतील बाजू | ०१ | ०१ | ०२ |
| ०४ | १६ गुंठे परिसर | ०१ | ०१ | ०२ |
| ०५ | जुने प्रसादालय बायोमॅट्रीक काऊंटर जवळ | ०१ | ०१ | ०२ |
| | एकूण कर्मचारी संख्या - | ०६ | ०६ | १२ |

वरील अ व क मधील प्रसादालय विभागाकडील एकूण २८ कंत्राटी कर्मचारी त्यावेळचे संस्थान मधील ठेकेदार मे.जय भवानी एंटरप्रायजेस यांचे मार्फत कामगार विभागाचे आदेशाने पुरविणेत येत होते.

कामगार विभागाकडील जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/२५३२/२०१८ दि.२२/११/२०१८ चे आदेशान्वये उपरोक्त २८ कंत्राटी कर्मचारी दि.०१/१२/२०१८ पासून श्री साईप्रसादालय विभागाकडील कार्यरत असलेले ठेकेदार मे.स्पिक ॲण्ड स्पॅन सर्व्हिसेस यांचेकडे वर्ग करण्यात आलेत.

सदर कर्मचा-यांचा मासिक वेतन खर्च प्रसादालय विभागाचे बजेट (कंत्राटी कर्मचारी खर्च) मधून आदा केला जात होता. सदरची कार्यवाही दि.१४/०९/२०१९ पर्यंत व्यवस्थीत चालू होती. संबंधीत ठेकेदार यांनी इकडील विभागास भेट देवून दि.१४/०९/२०१९ रोजी मे. स्पिक ॲण्ड स्पॅन सर्व्हिसेस मुंबई यांच्या कामकाजाची मुदत संपली असल्याने दि.१५/०९/२०१९ पासून साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे पाणीवाटपासाठी कर्मचारी पुरवू शकणार नाही याची माहिती असावी असे समक्ष सांगीतले.

त्यास अनुसरुन मंदिर परिसरात साईभक्तांकरीता पिण्याचे पाण्याची व्यवस्था सुरु राहणेकरीता इकडील विभागाकडून दि.१७/०९/२०१९ रोजी खालील प्रमाणे प्रस्ताव मंजुरीस्तव सादर करण्यात आला होता.

१. उपरोक्त ठिकाणी साईभक्तांच्या पिण्याच्या पाण्याची गैरसोय होऊ नये याकरीता कामगार विभागामार्फत प्रतिदिनी २८ कंत्राटी कर्मचारी तातडीने इकडील विभागास पुरविणेस आदेश होणेस विनंती.

२. उपरोक्त ठिकाणी साईभक्तांची पिण्याची पाण्याची गैरसोय होऊ नये याकरीता कामगार विभागाकडून कर्मचारी मिळणेपर्यंत तूर्त प्रतिदिनी ४० साईसेवक मिळावेत.

३. प्रसादालय विभागाकडून पाणीवाटपासाठी पुरविणेत आलेल्या २८ कंत्राटी कर्मचारी पुर्ववत प्रसादालय विभागाकडील ठेकेदार यांच्याकडे वर्ग करणेस मान्यता घेणेत आली.

वरील प्रमाणे प्रस्तावास दि.१७/०९/२०१९ रोजी मान्यता मिळालेने, सदर प्रस्ताव पुढील कार्यवाहीस्तव कामगार विभागाकडे पाठविण्यात आला.

त्यास अनुसरुन कामगार विभागाने जा.नं.एसएसएस/वशी-०७ए/१७३३/२०१९ दि.३०/१०/२०१९ ने प्रसादालय विभागाकडील नवीन ठेकेदार मे फोकस फॅसेलिटी ॲण्ड सिक्युरीटी सर्व्हिसेस, मुंबई यांना दि.१५/०९/२०१९ पासून साईप्रसाद निवासस्थान विभागास पाणी वाटपासाठी २८ कंत्राटी कर्मचारी पुरविणेत यावेत व त्यांची वेतन बीले मे फोकस फॅसेलिटी ॲण्ड सिक्युरीटी सर्व्हिसेस, मुंबई यांनी तयार करुन, प्र.अधिक्षक, साईप्रसाद निवासस्थान व प्र.अधिक्षक, श्री साईप्रसादालय विभाग यांचे मार्फत लेखाशाखा विभागाकडे पुर्वीचेच प्रचलित पद्धतीने सादर करणे बाबत आदेशीत केले आहे.

सदर आदेशास अनुसरुन ठेकेदार यांनी पाणीवाटप कर्मचा-यांचे दि.१५/०९/२०१९ ते दि.३१/१०/२०१९ अखेर किमान वेतनदराप्रमाणे ॲडव्हांस वेतन आदा केले आहे.

सदर ठेकेदार मे फोकस फॅसेलिटी ॲण्ड सिक्युरीटी सर्व्हीसेस लि, मुंबई यांनी कंत्राटी कर्मचा-यांचे प्रचलित पद्धतीने वेतन आदा करणेस असमर्थता दर्शविली असून त्यांनी संस्थान आवक.नं.१४६२६ दि.१८/१२/२०१९ चे पत्रात प्रसादालयाच्या दराप्रमाणे (अकुशल कामगारांना प्रत्येकी दरमहा रु.१२७५०/-) हा दर श्री साईप्रसादालय हाऊसकिपींग, स्वच्छता व पेस्ट कंट्रोल ई-निवीदेतील BOQ-B व प्रसादालयाकडील

कार्यादेशा नुसार कामगार खर्च (अकुशल कर्मचारी किमान वेतन, गणवेश, सानुग्रह अनुदान, ओळखपत्र, वर्कमॅन कॉम्पनसेशन व प्रा.फंडासह इत्यादि सर्व करासहीत) मंजूर दर आहे याप्रमाणे वेतन मिळणे बाबत पत्रात विनंती केली असून तसा लिखीत स्वरुपात कार्यादेश मिळणे बाबत मागणी केली आहे. त्यामुळे सदर कर्मचा-यांचे माहे नोव्हेंबर २०१९ ते मार्च २०२० अखेर एकूण ०५ महिन्यांचे पगार अद्याप आदा करता आलेले नाही.

विभागाचा स्पष्ट अभिप्राय– वरील सर्व संदर्भांचा विचार करता सदर २८ कंत्राटी कर्मचारी यांचे वेतन सध्या प्रसादालयाकडील ई-निवीदा कालावधी दि.१५/०९/२०१९ ते दि.१४/०९/२०२० अखेर एक वर्ष पर्यंत असल्याने, खालीलप्रमाणे कार्यवाही करता येईल असे मत आहे.

अ) सदर पाणीवाटपकडील २८ कंत्राटी कर्मचारी यांचा साईप्रसादालयाकडील दैनंदिन वाढपी कामासाठी लावण्यात येणा-या कामगारांमध्ये समावेश करण्यात येऊन (प्रसादालय ई-निवीदा अटी-शर्ती ७२ नुसार) प्रसादालयाकडून सदर कामासाठी प्रतिदिनी २८ कंत्राटी कर्मचारी साईप्रसाद निवासस्थान विभागाकडे (प्रसादालय टेंडर कालावधी दि.१५/०९/२०१९ ते दि.१४/०९/२०२० अखेर एक वर्ष कालावधीसाठी) पाणीवाटपासाठी घेता येतील व त्याबाबचा कार्यादेश संबंधीत ठेकेदार यांना प्रसादालय विभागामार्फत देता येईल.

ब) सदर २८ पाणीवाटप कंत्राटी कर्मचा-यांचा नियमित श्री साईप्रसादालयाकडील दरवर्षी निघणा-या ई-टेंडर प्रक्रियेत प्रचलित पद्धतीने समावेश करणेस,

क) दि.०८/०१/२०२० चे प्रस्तावातील निर्देशास अनुसरुन मा.मुख्य लेखाधिकारी यांचा अभिप्राय व प्रसादालयाकडील सन २०१९-२० चे निवीदेतील मंजुर दरानुसार सदर २८ कंत्राटी कर्मचा-यांसाठीचा मासिक वेतन खर्च (एका कर्मचा-याकरीता दरमहा रु.१२,७५०/-) प्रमाणे २८ पाणीवाटप कंत्राटीकर्मचा-यांसाठी दरमहा एकूण रु.३,५७,०००/- प्रमाणे निवीदा कालावधीसाठी (दि.१५/०९/२०१९ ते दि.१४/०९/२०२० अखेर) खालील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

१. दि.१५/०९/२०१९ ते दि.३१/०३/२०२० अखेर जी.एस.टी.सह एकूण खर्च रक्कम रु.२७,५२,२३२/- मात्र होणार असून सदर खर्च साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील कंत्राटी कर्मचारी सन २०१९-२० चे मंजुर अंदाजपत्रकातून करता येईल.

२. दि.०१/०४/२०२० ते दि.१४/०९/२०२० अखेर जी.एस.टी.सह एकूण खर्च रक्कम रु.२३,०२,८८८/- मात्र होणार असून सदर खर्च मान्यतेसाठी सन २०२०-२१ चे साईप्रसाद निवासस्थान विभागाकडील पाणीवाटप कंत्राटी कर्मचारी यांचे अंदाजपत्रकातून करता येईल.

वरील अ.नं. १ मधील रक्कम रु.२७,५२,२३२/- मात्र + अ.नं २ मधील रक्कम रु.२३,०२,८८८/- मात्र अशी एकूण रक्कम रु.५०,५५,१२०/- (अक्षरी – पन्नास लाख, पंच्चावन हजार, एकशे वीस मात्र) खर्चास,

तरी उपरोक्त अ, ब व क प्रमाणे कार्यवाही करणेस व सदर खर्चाला मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.३३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, दि.१७ मार्च,२०२० रोजी मंदिर बंद होण्यापुर्वी सदर कर्मचारी कधीपासुन पाणी वाटपाचे काम करत आहे, किती शिप्टमध्ये पाणी वाटप केले, सदर पाणी वाटप कर्मचारी यांना कधीपासुन वेतन देण्यात आलेले नाही. याबाबतच्या माहितीसह सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करण्यात यावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-साईप्रसाद निवासस्थान विभाग)**

---

**विषय नं.३३** **साईपालखी निवारा येथील 'बी' इमारती मधील रुम्सचा साईभक्तांच्या निवासाकरीता वापर सुरु करणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद - २१(ग) नुसार भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धार्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे. या अधिनियम व तरतुदी नुसार श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्थे मार्फत भक्तांची निवासव्यवस्था व सुविधा करण्यात येते.

प्रस्तावना – श्री साईबाबा संस्थानला दानशुर साईभक्त श्री काशिनाथ गोविंद पाटील, वसई यांचेकडून साईपालखी निवारा, निघोज-निमगांव, शिर्डी येथील 'बी' व 'डी' या दोन इमारती देणगी स्वरुपात मिळालेल्या आहेत. त्यापैकी 'बी' इमारती मधील ६४ रुम्स वापरायोग्य आहेत व 'डी' इमारतीचे काम अद्याप अपुर्ण आहे.

मालमत्ता विभागाकडील दि.२५/०५/२०१७ रोजीचे मंजुर टिपणीअन्वये वापरायोग्य असलेल्या बी इमारतीचा ताबा दि.२१/०६/२०१७ पासून साईप्रसाद निवासस्थान विभागाने घेतलेला आहे व डी इमारतीचे काम अपुर्ण असल्याने सदर इमारतीचा ताबा बांधकाम विभागाकडे आहे.

वापरा योग्य असलेल्या ‘बी’ इमारतीचे ०४ मजले असून प्रत्येक मजल्यावर १६ रुम्स याप्रमाणे एकूण ६४ रुम्स उपलब्ध आहेत. यासर्व ६४ रुम्स वातानुकूलीत आहेत. प्रतिरुम मध्ये चार कॉट्सची व्यवस्था असून रुम मध्ये टि.व्ही, फॅन,फोम गाद्या, फोम उशा, बेडशीट, ब्लॅंकेट, उशीकव्हर, टिपॉय, जग, ग्लास, आरसा, पडदे, डस्टबीन, पायपुसणे इत्यादि सर्व वस्तु उपलब्ध आहेत.

दि.१५/०६/२०१७ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समिती सभेत निर्णय क्र.५११ अन्वये मौजे निघोज, ता.राहाता येथील देणगी मिळालेल्या बी व डी इमारतींमध्ये आय.ए.एस.अकॅडमी सुरु करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणा-या खर्चास मान्यता देण्यात आली असे ठरल्याने सदर इमारतीचा अद्याप पर्यंत वापर करता आला नाही.

उपरोक्त निर्णयाप्रमाणे आय.ए.एस.अकॅडमी बाबत पुढील कार्यवाही आस्थापना विभागामार्फत सुरु असून सद्यस्थिती बाबत माहिती घेतली असता आता, मा.वरिष्ठ अधिकारी यांचे मौखिक आदेशानुसार ‘गरजु, वंचित, आदिवासी तसेच खेडोपाडयामधील शेतक-यांच्या मुलांसाठी श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी संचलित “श्री साईबाबा अध्ययन कक्ष” कार्यान्वीत करणेकामी मा.तदर्थ समितीपुढे सादर करावयाचा प्रस्ताव तयार करणेचे काम सुरु असले बाबत आस्थापना विभागाने दि.०२/०६/२०२० चे पत्राने कळविले आहे.

दि.०६/०५/२०२० रोजीचे प्राप्त सुचना / निर्देशा नुसार बी इमारती मधील रुम्स साईभक्तांच्या निवासाकरीता सुरु करावयाचे झाल्यास सदर रुम्ससाठी खालील प्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित आहे. कारण प्रस्तावीत सुविधा अखंडपणे (२४x७) याप्रमाणे सुरु राहणार आहे. या ६४ रुम मधून दररोज साधारण २५६ साईभक्तांची निवासव्यवस्था करता येईल. त्यातून संस्थानच्या उत्पन्नात वर्षाकाठी अंदाजे रु.१४ लाख मात्र रक्कमेची वाढ होईल.

**अ) <u>सेवाआकार</u>** – सदर इमारती मधील रुम्स साईभक्तांच्या निवासाकरीता सुरु करावयाचे असल्याने खालील प्रमाणे सेवाआकार आकारणी करता येईल.

| अ.नं | तपशील | एकूण संख्या | प्रतिरुम व्यक्ती मर्यादा | २४ तासांसाठी रुम सेवाआकार |
|---|---|---|---|---|
| ०१ | ए.सी. रुम ०४ कॉट | ६४ | ०४ | रु.६००/- |

सदर इमारत शिर्डी पासून साधारण ०३ कि.मी.अंतरावर असल्याने येथील रुम्स ७० % ऑनलाईन व ३० % स्पॉट बुकिंग याप्रमाणे साईभक्तांना निवासाकरीता उपलब्ध करुन देता येतील.

**ब) <u>मनुष्यबळ</u>** – सदर रुम साईभक्तांच्या निवासाकरीता सुरु करणेकामी तेथे खालील प्रमाणे मनुष्यबळाची आवश्यकता लागेल.

<table>
<tr><td rowspan="2">अ.नं.</td><td rowspan="2">डयुटी पाईंट तपशील</td><td colspan="4">शिफ्ट वाईज कर्मचारी तपशील</td><td rowspan="2">आ.सुट्टी सोडविणे</td><td rowspan="2">कामकाज</td></tr>
<tr><td>I</td><td>II</td><td>III</td><td>एकूण</td></tr>
<tr><td>०१</td><td>पर्यवेक्षक (लिपीक)</td><td>१</td><td>१</td><td>१</td><td>०३</td><td rowspan="3">०२</td><td>शिफ्ट मधील कामकाज नियंत्रण</td></tr>
<tr><td>०२</td><td>काऊंटर लिपीक</td><td>१</td><td>१</td><td>१</td><td>०३</td><td>रुम वाटप कामकाज</td></tr>
<tr><td>०३</td><td>स्टोअर लिपीक / मदतनीस</td><td>०</td><td>०</td><td>०</td><td>०१</td><td>डेडस्टॉक नोंदी व दैनंदिन कपडे धुलाई</td></tr>
<tr><td>०४</td><td>पहिला व दुसरा माळा मदतनीस</td><td>१</td><td>१</td><td>१</td><td>०३</td><td rowspan="2">०२</td><td rowspan="2">साईभक्तांना रुम उघडून देणे, आवश्यक बेडशीट, चादर, गादी इ. साहित्य पुरविणे, खाली झालेल्या रुमची साफ-सफाई करुन घेणे, मुदतवाढी पहाणे, भक्तांना संस्थान सेवा-सुविधांची माहिती देणे इत्यादि.</td></tr>
<tr><td>०५</td><td>तिसरा व चौथा माळा मदतनीस</td><td>१</td><td>१</td><td>१</td><td>०३</td></tr>
<tr><td>०६</td><td>पहिला व दुसरा माळा सफाई कर्मचारी</td><td>१</td><td>१</td><td>१</td><td>०३</td><td rowspan="2">०२</td><td rowspan="2">खाली झालेल्या रुमची व जिने, पॅसेज, गॅल-या तसेच परिसराची साफ-सफाई करणे.</td></tr>
<tr><td>०७</td><td>तिसरा व चौथा माळा सफाई कर्मचारी</td><td>१</td><td>१</td><td>१</td><td>०३</td></tr>
<tr><td></td><td>एकूण कर्मचारी संख्या -</td><td>०६</td><td>०६</td><td>०६</td><td>१९</td><td>०६</td><td>एकूण – २५ कर्मचारी</td></tr>
</table>

मागील तपशिलात नमुद केलेप्रमाणे अ.नं.०१ ते ०३ करीता ०९ कायम कर्मचारी, आस्थापना विभाग व अ.नं.०४ ते ०७ करीता १६ अकुशल कंत्राटी कर्मचारी, कामगार विभाग यांचेकडून उपलब्ध करणेस,

क) **इतर विभागांकडून करुन घ्यावयाचे कामकाज-** सदर रुम साईभक्तांच्या निवासाकरीता सुरु करणेकामी खालील प्रमाणे कामे संबंधीत विभागांकडून करुन घेणे आवश्यक आहे.

| अ.नं | विभाग | करावयाचे कामकाज |
|---|---|---|
| ०१ | बांधकाम विभाग | सदर इमारतीचे तळमजल्यावर मोकळया जागेत बंदीस्त रुम बुकिंग कार्यालय व काऊंटर तसेच स्टोअर रुम व कॅन्टीन व्यवस्था तयार करणे. |
| ०२ | विद्युत विभाग | सदर इमारतीचे टेरेसवर पत्रा शेड असल्याने तेथे गरमपाण्याकरीता सोलर बसविता येणार नाही, त्यामुळे सर्व रुम मध्ये तात्पुरत्या स्वरुपात गिझर बसविणे व विभागासंबंधीत इतर कामकाज |
| ०३ | मेकॅनिकल विभाग | सर्व मजल्यावर वॉटर कुलर बसवून देणे व ए.सी.यंत्रणा कार्यान्वीत करणे तसेच सोलर सिस्टम बसविणे. |
| ०४ | आय.टी. विभाग | निर्णयाप्रमाणे रुम सेवाआकार व ऑनलाईन बुकिंग बाबत कार्यवाही तसेच रुमबुकिंग करीता संगणक व इतर व्यवस्था कार्यान्वीत करणे |
| ०५ | वाहन विभाग | सदर इमारत श्रींचे मंदिरा पासून साधारण ०३ कि.मी. अंतरावर असल्याने साईभक्तांना येणे-जाणेकामी मोफत बस व्यवस्था उपलब्ध करणे. |
| ०६ | सी.सी.टी.व्ही | सर्व रुम मधील एल.ई.डी.टिव्ही व अंतर्गत फोन यंत्रणा कार्यान्वित करणे व संस्थान इंटरकॉमचे आवश्यकतेनुसार कनेक्शन उपलब्ध करुन देणे तसेच भक्तांच्या संरक्षणार्थ आवश्यक ठिकाणी सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविणे. |
| ०७ | कॅन्टीन विभाग | सदर ठिकाणी साईभक्तांकरीता तिन शिफ्ट मध्ये चहा, कॉफी, दुध, बिस्कीटे, पाणी बॉटल तसेच सकाळी नाष्टा पाकिटची सशुल्क व्यवस्था उपलब्ध करणे. |

विभागाचा स्पष्ट अभिप्राय– साईनिवारा येथील 'बी' इमारती मधील रुम्स साईभक्तांच्या निवासाकरीता सुरु करणेकामी प्रस्तावात वर नमुद केलेप्रमाणे 'अ', 'ब' व 'क' नुसार कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समिती सभेपुढे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.३३८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईनिवारा येथील 'बी' इमारती मधील रुम्स साईभक्तांच्या निवासाकरीता सुरु करणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता देण्यात आली. तथापी याकरीता आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग संस्थानचे इतर विभागामधुन उपलब्ध करुन घेण्यात यावा, नवीन कर्मचारी घेऊ नये, असे ठरले.**

**(कार्यवाही- साईप्रसाद निवासस्थान विभाग)**

---

**विषय नं.३४** **साईआश्रम भक्तनिवास विभागातील निवासव्यवस्थेच्या सेवाआकारात वाढ करणेबाबत**.

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी अधिनियम २००४:- २१ (१) (ग) " भक्तांना मंदिरात देवतेच्या दर्शनासाठी व प्रार्थनेसाठी किंवा धर्मिक सेवा किंवा समारंभ करण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे." व (२) पोट-कलम (१) (ख) "भक्तांना राहण्याकरिता व वापर करण्याकरिता विश्रामगृहे बांधणे व त्याची देखभाल करणे."

प्रस्तावनाः- श्री साईचे दर्शनासाठी शिर्डीस येणा-या भक्तांच्या संख्येत दिवसेंदिवस होणारी वाढ लक्षात घेता भक्तांचे निवासव्यवस्थेसाठी श्री साई ट्रस्ट, चेन्नई यांनी दिलेल्या देणगीतुन संस्थानने साईआश्रम भक्तनिवास या भव्य वास्तुचे बांधकाम केलेले असुन सदर विभागात देण्यात येत असलेल्या निवासव्यवस्थेचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ.नं | एकुण इमारती | एकुण मजले | प्रत्येक इमारती मधील रुम संख्या | एकूण रुम संख्या | एका रुममध्ये भक्तनिवास क्षमता | एकूण होणारी निवासव्यवस्था |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | इमारती-०९(नॉन एसी) | तळमजला+३(G+३) | १२८ रुम | ११५२ | ३+२=५ | ५,७६० |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | इमारती-०३(एसी) | तळमजला+३(G+३) | १२८ रुम | ३८४ | ३+२=५ | १,९२० |
| एकूण | इमारती-१२ | | | १,५३६ | | ७,६८० |

उपरोक्त प्रमाणे एकुण १५३६ खोल्या असुन पुर्ण क्षमतेने निवासव्यवस्था केल्यास एकुण ७,६८० साईभक्तांची निवासव्यवस्था करण्यात येते. प्रत्येक रुम मध्ये तीन कॉटची व्यवस्था असुन भक्तांचे मागणीनुसार जादा दोन गाद्या प्रत्येकी रु ५०/- सेवाआकार आकारुन पुरविल्या जातात. या शिवाय रुम मध्ये विविध प्रकारच्या सुविधा दिल्याजातात त्या पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं | सुविधा तपशील | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | प्रत्येक रुम मध्ये खालील प्रमाणे साहीत्य पुरविण्यात येते. | | | | | | | | |
| | **अ. नं** | वस्तुचे नाव | नग | **अ.नं** | वस्तुचे नाव | नग | **अ.नं** | वस्तुचे नाव | नग |
| | **१** | कॉट | ३ | **७** | मग | १ | **१३** | बेडशीट (३+२) | ५ |
| | **२** | क्वायर मेट्रेस फोमगादी | ३ | **८** | डस्टबीन | १ | **१४** | चादर (३+२) | ५ |
| | **३** | रबर राईज्ड टू फोल्ड गादी (मागणीनुसार) | २ | **९** | अंघोळीचे स्टुल | १ | **१५** | आरसा | १ |
| | **४** | फायबर उशी (३+२) | ५ | **१०** | अंघोळीची बादली | १ | **१६** | स्टील रॉड | १ |
| | **५** | स्टील ग्लास | २ | **११** | प्लास्टीक खुर्ची | २ | **१७** | स्वच्छता गृहात मग | १ |
| | **६** | वॉटर जग | १ | **१२** | उशीकव्हर (३+२) | ५ | **१८** | साईबाबांचा फोटो | १ |
| २ | सौरऊर्जाप्रणालीव्दारे रुम मध्ये २४ तास गरम पाणी. | | | | | | | | |
| ३ | भक्तांना पहिल्या, दुस-या व तिस-या मजल्यावर जा-ये करण्यासाठी २४ तास स्वयंचलित लिफ्ट सुविधा. | | | | | | | | |
| ४ | २४ तास विद्युत पुरवठा. | | | | | | | | |
| ५ | एसी रुम मध्ये टर्किश टॉवेल व हात धुणेसाठी साबण. | | | | | | | | |
| ६ | परिसरामध्ये प्रसाद भोजनाची व्यवस्था. | | | | | | | | |
| ७ | श्रींच्या दर्शनासाठी भक्तांना जाणे-येणेसाठी मोफत बस सेवा. | | | | | | | | |
| ८ | भक्तांचे सामान रुम पर्यंत नेणेसाठी लगेज ट्रॉलीची मोफत सुविधा. | | | | | | | | |
| ९ | जेस्ठ नागरीक अपंग, आजारी इ. साईभक्तांसाठी बॅटरी कारची मोफत सुविधा. | | | | | | | | |
| १० | ऑनलाईन रुम आरक्षण सुविधा. | | | | | | | | |
| ११ | साईभक्तांना साईबाबांवर आधारीत भजन/किर्तन इ. कार्यक्रम करावयाचे असल्यास ॲम्फीथिएटरची सुविधा. | | | | | | | | |
| १२ | साईआश्रम भक्तनिवास विभागात गर्दीच्या काळात साईभक्तांच्या निवासासाठी तात्पुरती अतिरिक्त निवासव्यवस्था तसेच विविध धार्मिक, सांस्कृतीक कार्यक्रमांसाठी भव्य शताब्दी मंडप उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. | | | | | | | | |
| १३ | साईभक्तांसाठी सकाळी अल्पदरात अल्पोपहाराची सुविधा. | | | | | | | | |
| १४ | विभागातील A ते G व H ते L या इमारती लगत दोन कॅन्टीनमध्ये चहा, कॉफी, दुध,पाणी इ. सुविधा अल्पदरात उपलब्ध. | | | | | | | | |
| १५ | गर्दीचे काळात प्रथमोपचार केंद्र. | | | | | | | | |
| १६ | निसर्गरम्य वॉटर फॉल | | | | | | | | |
| १७ | साईभक्तांचे औषध ठेवणेकामी फ्रीजची व्यवस्था. | | | | | | | | |

उपरोक्त प्रमाणे पुरविणेत येत असलेल्या सेवा-सुविधा व अत्यल्प दरात निवासव्यवस्था उपलब्ध असल्याने या विभागात नेहमीच साईभक्तांची मोठ्या प्रमाणात निवासासाठी खोल्यांची मागणी असते. सदर निवासस्थानातील १५३६ खोल्यापैकी ८० % खोल्या ऑनलाईन बुकींग पद्धतीने उपलब्ध करुन देण्यात येत असुन उरलेल्या २० % खोल्या स्पॉटबुकिंग पद्धतीने देण्यात येतात.

**प्रस्ताव:-** साईआश्रम भक्तनिवास विभागात भक्तांसाठी निवासव्यवस्था चालु करण्यापुर्वी सदर इमारतींचे बांधकामासाठी श्री साईट्रस्ट,चेन्नईचे देणगीदार साईभक्त श्री.के.व्ही.रमणी यांनी आर्थिक सहाय्य केल्याने संस्थानमार्फत दि.०४/०२/२००६ रोजी करारनामा करण्यात आला सदर करारनाम्यात साईभक्तांना निवासासाठी देण्यात येणा-या खोल्यांसाठी आकारणेत येणा-या सेवाआकाराबाबत पुढील प्रमाणे काही तरतुदी करण्यात आल्या.

The Sansthan will provide the accommodation to the devotees at a concessional cost, without any profit.

The Sansthan specifically agrees to provide accommodation in Sai Ashram buildings, to the needy and deserving poor devotees at a subsidized cost including the cost of all facilities and amenities, as follows.

1. At least 10 % of the accommodation in SaiAshram will be given at a cost not exceeding 10 Rs.per person per day of stay.

2. At least 40 % of the accommodation in SaiAshram will be given at a cost not exceeding 50 Rs.per person per day of stay.

3. The balance accommodation in SaiAshram, may be given at any nominal cost as decided by the Sansthan.

परंतु मा.व्यवस्थापन समिती दि.२५/०८/२०१२ चे सभेमधील निर्णय क्र.७०२ अन्वये सदर करारनाम्याप्रमाणे सेवाआकार निश्चित केल्यास, सारख्याच आकाराच्या व टाईपच्या खोल्यांसाठी वेगवेगळा सेवा आकार घेतल्यास भक्तांचे निवासासाठी खोल्या देतांना मोठ्या प्रमाणात अडचणी निर्माण होतील तसेच कमी जास्त सेवाआकार घेतांना भक्तांचे मध्ये गैरसमज निर्माण होईल.

उपरोक्त परिस्थिती विचारात घेऊन दि.२०/०८/२०१२ रोजी श्री शिर्डी साईट्रस्ट, चेन्नईचे कार्यकारी विश्वस्त श्री रमणी सो. यांचेशी साईआश्रम भाग १ व २ मधील खोल्या व हॉलचे सेवाआकाराबाबत चर्चा करण्यात आली असुन त्यानुसार मा.व्यवस्थापन समिती सभेमध्ये निर्णय क्र.७०२ अन्वये खालील प्रमाणे सेवा आकार निश्चित करण्यात आला होता.

| | | |
|---|---|---|
| १ | साईआश्रम भाग १ मधील ११५२ नॉन ए.सी खोली, प्रती खोली रुपये | ५००/- |
| २ | साईआश्रम भाग १ मधील ३८४ ए.सी खोली, प्रती खोली रुपये | ९००/- |
| ३ | साईआश्रम भाग १ मधील जादा व्यक्तींसाठी (प्रत्येकी) | ५०/- |

साईआश्रम भक्तनिवास विभाग दि.११/०४/२०१३ रोजी सुरु करण्यात आला तेव्हा मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०८/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७०२. प्रमाणे ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तींकरीता) रु ९००/- व नॉन ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तींकरीता) रु ५००/- तसेचप्रत्येकी जादा व्यक्तीस रु.५०/- मात्र सेवाआकार आकाण्यात येत होता.

परंतु साईआश्रम भक्तनिवास विभाग नव्याने सुरु झाला असल्याने,निवासासाठी खोल्यांची मागणी करणा-या साईभक्तांची संख्या कमी होती सुरवातीच्या कालावधीत जास्तीत जास्त ४०% खोल्याचा वापर साईभक्त करीत होते व उर्वरित खोल्यारिकाम्या राहत होत्या पण सर्व खोल्यांचा मेंटनन्स व इतर खर्च पुर्णपणे द्यावा लागत असल्याने संस्थानचे आर्थिक नुकसान होत होते.

त्यामुळे, दि.१३/१२/२०१३ रोजीच्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेतील निर्णय क्र.९८८ अन्वये तत्कालीन परिस्थितीचा विचार करुन निर्णय घेण्यात आला त्यात,

"साईआश्रम भक्तनिवास येथील निवासव्यवस्थेचा जास्तीत जास्त साईभक्तांनी लाभ घ्यावा व संस्थानचे आर्थिक नुकसान टाळावे या हेतुने खोल्यांचे दर कमी करणे आवश्यक आहे.त्यामुळे दि.०१ जानेवारी २०१४ पासुन साईआश्रम भक्तनिवासमधील प्रती ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तीं) रु ९००/- याऐवजी रु ५००/- व प्रती नॉन ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तीं) रु ५००/- याऐवजी रु.२००/- तसेच जादा व्यक्तीस प्रत्येकी रु.५०/- मात्र सेवाआकार आकारण्यात यावा जेणेकरुन जास्तीत-जास्त साईभक्त या खोल्यांचा लाभ घेतील व गोर-गरीब भक्तांची निवासाची सोय होईल.

**सदरहू निर्णय प्रायोगिक तत्वावर असून साईआश्रम भक्तनिवासमध्ये निवास करणा-या साईभक्तांना सर्व सोयी-सुविधा मिळाल्यानंतर समिती याचा फेरविचार करु शकेल.**"असा निर्णय घेण्यात आला.

हा निर्णय प्रायोगिक तत्वावर असून हा निर्णय घेण्यामागे निवासव्यवस्थेचा जास्तीत जास्त साईभक्तांनी लाभ घ्यावा व निवासव्यवस्था पुर्ण क्षमतेने भरली जावी हा हेतु होता. व सदर निर्णयानुसार सेवा आकार कमी केल्यामुळे निवासव्यवस्था मागणी करणा-या भक्तांच्या संख्येत उल्लेखनीय वाढ होऊन सदर हेतु साध्य झाल्याचे दिसते. सन २०१९-२० या आर्थिक वर्षात निवासव्यवस्थेमधुन मिळालेल्या उत्पन्नाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| **अ.नं** | **तपशील** | **सन २०१९-२० मध्ये निवासव्यवस्थेतुन मिळालेले उत्पन्न** |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन बुकिंग पासुन मिळालेला सेवाआकार | ९,५१,०६,८५०/- |
| २ | स्पॉट बुकिंग पासुन मिळालेला सेवाआकार | ६,०४,४२,९७९/- |
| | **एकुण** | **१५,५५,४९,८२९/-** |

सन २०१९-२० या आर्थिक वर्षात एसी खोलीसाठी रु ५००/- व नॉन एसी खोलीसाठी रु २००/- सेवाआकार आकारण्यात येत असुन, ऑनलाईन व स्पॉट बुकींग दोन्ही मिळून संस्थानला त्यातून एकूण १५ कोटी ५५ लाख ४९ हजार ८२९ मात्र उत्पन्न झाले आहे. त्याचबरोबर सन २०१९-२० या आर्थिक वर्षात निवासव्यवस्थेसाठी आलेल्या खर्चाचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

| अ.नं | अंदाजे खर्चाचा तपशील (सन २०१९-२०) | रक्कम |
|---|---|---|
| १ | विद्युत | ३,२८,४०,०३६/- |
| २ | पाणीपुरवठा | ७२,००,३३४/- |
| ३ | बांधकाम | १,३८,९९५/- |
| ४ | कर्मचारी वेतन (कायम) | ८९,९०,९३१/- |
| ५ | कंत्राटी कुशल कर्मचारी | २४,२२,४३१/- |
| ६ | संरक्षण विभाग | १,८३,६४,११०/- |
| ७ | हाऊसकिपींग | ९,२०,५०,५३०/- |
| ८ | किटकनाशक औषध फवारणी | ६,९६,१२६/- |
| ९ | वाहन विभाग | २२,५२,०६७/- |
| १० | लॉन्ड्री चार्जेस | १९,१८,८५६/- |
| ११ | बगीचा | ४,३२,२००/- |
| १२ | प्लास्टीक बादली, मग, डस्टबीन, ट्रे इ. | ६,८७,७१५/- |
| | **एकूण खर्च रु.** | **१६,७९,९४,३३१/-** |

| **सन १९-२० मध्ये निवासव्यवस्थेतुन मिळालेले उत्पन्न** | **निवासव्यवस्थेसाठी झालेला खर्च** | **होत असलेला तोटा** |
|---|---|---|
| १५,५५,४९,८२९/- | १६,७९,९४,३३१/- | ०१,२४,४४,५०२/- |

**सन २०१९-२० या आर्थिक वर्षात निवासव्यवस्थेतुन एकुण १५ कोटी ५५ लाख ४९ हजार ८२९ मात्र उत्पन्न झाले असुन त्यातुन उपरोक्त १६ कोटी ५९ लाख ५६ हजार २४८ मात्र खर्च वजा करता एकूण झालेले तोटा रु.०१ कोटी २४ लाख ४४ हजार ५०२ मात्र आहे.**

दि.१२/०५/२०२० रोजी शिर्डी येथील हॉटेल असोसिएशनचे अध्यक्ष श्री.विलास कोते यांना शिर्डी येथील खाजगी हॉटेलमध्ये घेण्यात येणा-या अंदाजे दराबाबत दुरध्वनीद्वारे चौकशी केली असता त्यांनी खालीलप्रमाणे दर आकारणेत येत असलेबाबत सांगितले.

| अ.नं. | तपशिल | रुममधील बेडची संख्या | २४ तासाकरीता एका रुमचा सेवाआकार अंदाजे रु. |
|---|---|---|---|
| १ | नॉन एसी | ०२ बेड | ५००-६०० |
| २ | नॉन एसी | ०३ बेड | ८००-९०० |
| ३ | एसी | ०२ बेड | ७०० |
| ४ | एसी | ०३ बेड | १,२०० |

उपरोक्त दर हे खाजगी हॉटेल्सचे आहे. त्यामध्ये इतर सोयी/सुविधा (उदा.रुम सर्व्हीस,टी.व्ही.,सोफा इ.) पुरविल्या जातात.तसेच खाजगी हॉटेलचे दर गर्दीचे प्रमाणानुसार बदलत असतात.

**विभागाचे स्पष्ट मत/अभिप्राय:**-दि.२५/०८/२०१२ रोजीचे मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.७०२ अन्वये, ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तींकरीता) रु ९००/- व नॉन ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तींकरीता) रु ५००/- तसेच प्रत्येकी जादा व्यक्तीस रु.५०/- मात्र सेवाआकार निश्चित करण्यात आला होता, परंतु निवासव्यवस्थेचा पुर्ण क्षमतेने साईभक्तांनी लाभ घ्यावा व संस्थानचे आर्थिक नुकसान टाळावे या हेतुने सदर सेवाआकार कमी करण्यात येऊन, संदर्भ क्र.०२ मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय क्र.९८८ अन्वये, प्रती ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तीं) रु ९००/- याऐवजी रु ५००/- व प्रती नॉन ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तीं) रु ५००/- याऐवजी रु.२००/- तसेच जादा व्यक्तीस प्रत्येकी रु.५०/- मात्र सेवाआकार करण्यात आला. सदर निर्णय निवासव्यवस्थेचा जास्तीत जास्त साईभक्तांनी लाभ घ्यावा या हेतुने प्रायोगिक तत्वावर घेण्यात आला असुन सद्यस्थितीत निवासव्यवस्थेचा पुर्ण क्षमतेने वापर होत आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०९/२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.७९९. **अन्वये, 'साईआश्रम भक्तनिवासचा सेवाआकार कमी असल्यामुळे तेथील निवासव्यवस्थेचा जास्तीत जास्त साईभक्तांना लाभ होत आहे व सर्व सामान्य साईभक्तांची निवासाची सोय होत आहे. याकरीता सध्या साईआश्रम भक्तनिवासच्या सेवाआकारात कोणतीही वाढ करु नये.'**

प्रस्तावित वाढीव सेवाआकारामुळे खालीलप्रमाणे उत्पन्नात वाढ होईल, त्याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **अ.नं** | **खोल्यांचा तपशील** | **वाढीव प्रस्तावित सेवाआकार** | **प्रतिदिन सेवाआकार** | **एक वर्ष कालावधी** | **वाढीव सेवाआकारापासुन मिळणारे उत्पन्न** |
|---|---|---|---|---|---|
| १ | ए.सी ३८४ खोल्या | रु १००/- | रु ०३८,४००/- | ३६५ दिवस | रु १,४०,१६,०००/- |
| २ | नॉन ए.सी ११५२ खोल्या | रु १००/- | रु १,१५,२००/- | ३६५ दिवस | रु ४,२०,४८,०००/- |
| **एकुण** | **१५३६खोल्या** | **---** | **१,५३,६००/-** | **---** | **रु ५,६०,६४,०००/-** |
| **अक्षरी रुपये बारा कोटी एकसष्ट लाख चौवेचाळीस हजार मात्र.** | | | | | |

तथापी, साईआश्रम भक्तनिवास विभागातील निवासव्यवस्थेतुन मिळणारे उत्पन्न व निवासव्यवस्थेसाठी होत असलेला खर्च, वाढती महागाई, विद्युत आकार, साईभक्तांना देण्यात येणा-या सेवा-सुविधा, इत्यादीचा विचार करता सेवाआकारात वाढ करणे क्रमप्राप्त आहे. परंतु सध्या संस्थान अधिनस्त विविध भक्तनिवास जसे व्दारावती, साईप्रसाद निवासस्थान (अतिथीगृह) इत्यादी निवासव्यवस्थेच्या तुलनेत इकडील विभागातील निवासव्यवस्था सर्वसाधारण असल्याने मा.व्यवस्थापन समितीचे दि.२५/०८/२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ७०२ चे निर्णयानुसार निश्चित सेवाआकार लागु करणे रास्त होणार नसल्याने सुवर्ण मध्य म्हणुन साईआश्रम भक्तनिवासमधील ए.सी खोलीचे प्रती दिवस (०३ व्यक्तींकरीता) रु.६००/- व नॉन ए.सी खोलीचे (०३ व्यक्तींकरीता) रु ३००/- तसेच जादा व्यक्तीस प्रत्येकी रु.५०/- मात्र याप्रमाणे सेवाआकार आकारता येईल जेणे करुन जास्तीत जास्त साईभक्त लाभ घेऊ शकतील व सर्व सामान्य साईभक्तांची निवास व्यवस्था करता येईल असे नम्र मत आहे.

सदरचा विषय धोरणात्मक असल्याने संदर्भीय प्रस्ताव मा.तदर्थ (**Ad-hoc**) समिती सभेसमोर निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३३९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईआश्रम भक्तनिवासमधील प्रती ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तीं) रु.५००/-ऐवजी रु.६००/- व प्रती नॉन ए.सी खोलीसाठी (०३ व्यक्तीं) रु.२००/-ऐवजी रु.२५०/- तसेच जादा व्यक्तीस प्रत्येकी रु.५०/- मात्र याप्रमाणे सेवाआकार आकारण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-साईआश्रम भक्तनिवास विभाग)**

---

**विषय नं.३५** **साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील रुम्स्, हॉल, लॉकर्सचे सेवाआकार वाढविणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतुद-

१) २१ चा १ चा (क) –मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्ताची देखभाल व्यवस्थापन व प्रशासन.

२) (ग)- भक्तांना देवतेच्या दर्शनासाठी व मंदिरात प्रार्थनेसाठी किंवा कोणतेही धार्मिक कार्य किंवा समारंभ पार पाडण्यासाठी सोयी व सुविधा पुरविणे.

३) (त्र)- भक्तांच्या निवासासाठी व त्यांच्या उपयोगासाठी विश्रामगृहे बांधणे व त्यांची देखभाल करणे.

मा.व्यवस्थापन समितीचा ठराव-

०१) दि.१७/०५/२००९ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील समंत विषय नं.४० व निर्णय क्र.५०३

०२) दि.२७/१०/२०१३ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील विषय नंबर-०२ व निर्णय क्रं-८७१

प्रस्तावीत– सन-१९९४ पासुन साईबाबा भक्तनिवासस्थान इमारत साईभक्तांचे सेवेत रुजु झाली. सदर इमातीमध्ये एकुण-५२७ खोल्या १९८ लॉकर साईभक्तांसाठी उपलब्ध आहेत.

साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीचे जे.के. कन्सट्रशन ॲड कं. परळी वैजिनाथ यांना मा.व्यवसथापन समितीचे दि.०८.०१.२०१८ रोजीचे सभेमधील विषय नं. २२ व निर्णय क्रं.२२ अन्वये बांधकाम विभागामार्फत नुतनिकरणाचे काम देण्यात येऊन साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमध्ये ए,बी,सी व डी विंग प्रमाणे नुतणीकरणाचे काम सद्या चालु असुन ३८६ पैकी १७१ खोल्यांचे नुतणीकरणाचे काम पुर्ण झालेले असुन उर्वरीत खोल्यांचे काम पुर्णत्वाकडे आहे.

**सद्याचे सेवा आकार**

| **अं.नं.** | **तपशील** | **खोली हॉल संख्या** | **व्यक्तीची मर्यादा** | **सेवा आकार २४ तासाकरीता रु. . पैसे** | **डिपॉझीट** | **व्यक्ती मर्यादा व इतर माहिती (१० वर्षापर्यतचे मुले वगळुन) प्रति व्यक्ती दर.** |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०३ कॉटच्या खोल्या टॉयलेट /बाथरुम सह | २३२ | ०३+२ | १२५/- | --- | ०३ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस प्रत्येकी २७/- प्रमाणे गादी व चादर सह. |
| २ | ०४ कॉटच्या खोल्या टॉयलेट /बाथरुम सह | २०६ | ०४+२ | १५०/- | --- | ०४ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस प्रत्येकी २७/- प्रमाणे गादी व चादरसह. |
| ३ | ०३/४ कॉट एसी खोल्या टॉयलेट /बाथरुम सह | ०८ | ०३+२ | ५५०/- | --- | ०३ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस १००/- प्रमाणे गादी व चादरसह . |
| ४ | ०६ कॉटच्या एसी खोल्या टॉयलेट /बाथरुम सह | ०३ | ०६+२ | ९००/- | --- | ०६ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस ५०/- प्रमाणे गादी व चादर सह |
| ५ | ०५ कॉटच्या नॉन एसी खोल्या टॉयलेट /बाथरुम सह | ०१ | ०५+२ | ५००/- | --- | ०५पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस ५०/- प्रमाणे गादी व चादर सह. |
| ६ | ०६ कॉटच्या नॉन एसी (T Suit) संडासबाथरुम सह | ०१ | ०६+२ | ६००/- | --- | ०६ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस ५०/- प्रमाणे गादी व चादर सह. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ०७ कॉटच्या खोल्या टॉयलेट /बाथरुम सह | ०१ | ७+२ | २००/- | --- | ०७ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस २७/- प्रमाणे गादी व चादरसह |
| ८ | ११ कॉटच्या खोल्या टॉयलेट /बाथरुम सह | २० | ११+२ | ४५०/- | --- | ११ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस २७/- प्रमाणे गादी व चादरसह |
| ९ | १२ कॉटच्या खोल्या टॉयलेट /बाथरुम सह | ०२ | १२+२ | ५००/- | --- | १२ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस २७/- प्रमाणे गादी व चादरसह |
| १० | कॉट विरहीत खोल्या टॉयलेट /बाथरुम सह | ४२ | १०+५ | १००/- | --- | १० पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस १०/- प्रमाणे गादी व चादरसह. |
| ११ | कॉट विरहीत हॉल बिगर टॉयलेट /बाथरुम सह | ०९ | ४० | ३००/- | --- | Fix Rate |
| १२ | कॉट विरहीत हॉल टॉयलेट /बाथरुम सह | ०२ | ४० | ५००/- | --- | Fix Rate |
| १३ | १९८ लॉकर्स (कॉमन टॉयलेट/बाथरुम सह) | | | प्रती लॉकर- रु.१०/- | रु.१०० डिपॉझीट | गादी-५ रुपये<br>चादर-३ रुपये, डिपॉझीट रुपये-२००/- |

**साईबाबा भक्तनिवासस्थान विभागामार्फत पुरविण्यात येणा-या सुविधांचा तपशिल खालीलप्रमाणे-**

०१ प्रत्येक रुम मध्ये खालील प्रमाणे सेवा व साहित्य पुरविण्यात येते.

| अ.नं. | वस्तुचे नाव | नग | अ.नं. | वस्तुचे नाव | नग |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | कॉट | ३ | ०७ | मग | ०२ |
| ०२ | क्वायर मॅट्रेस फोम गादी | ३ | ०८ | बादली | ०१ |
| ०३ | कापुस गादी उशी सह. | २ | ०९ | डस्टबीन | ०१ |
| ०४ | फायबर उशी | ३ | १० | आरसा | ०१ |
| ०५ | चादर /रग | ३ | ११ | टिपॉय | ०१ |
| ०६ | प्लॅस्टिक खुर्ची | २ | | | |

| | |
|---|---|
| ०२ | सौरउर्जा प्रणालीव्दारे रुम मध्ये २४ तास गरम पाणी. |
| ०३ | साईभक्तांना पहिल्या ,दुस-या,तिस-या मजल्यावर ये-जा करण्यासाठी २४ तास स्वयंचलित लिप्ट सुविधा. |
| ०४ | २४ तास विद्युत पुरवठा . |
| ०५ | परिसरामध्ये नाष्टा पाकीट , प्रसाद भोजनाची व्यवस्था. |
| ०६ | www.online.sai.org.in या संस्थानचे अधिकृत वेबसाईटवर खोली आरक्षण सुविधा उपलब्ध आहे. |
| ०७ | इमारती लगत कॅन्टीनमध्ये चहा, कॉफी, दुध , पाणी बॉटल , इ. सुविधा अल्पदरात उपलब्ध आहे. |
| ०८ | इमारतीचे आतील बाजुस निसर्गरम्य बगीचा, वॉटर फॉल, |
| ०९ | साईभक्तांचे वाहनाकरीता मोफत प्रशस्त पार्किंग सुविधा. |
| १० | श्रींच्या दशर्नासाठी मंदीर परिसरामध्ये ये-जा करण्यासाठी मोफत बस सेवा . |

उपरोक्त प्रमाणे पुरविण्यात येत असलेल्या सेवा सुविधा अल्पदरात उपलब्ध असल्याने सदरचे निवासस्थानामध्ये नेहमीच साईभक्तांची मोठया प्रमाणात निवासासाठी खोल्यांची मागणी असते . सदर निवासस्थान मधील ३४५ खोल्या (८०%) ऑनलाईन बुकिंग पध्दतीने उपलब्ध करुन देण्यात येत असुन ९३ खोल्या (२०%) स्पॉट बुकींगव्दारे देण्यात येतात.

प्रस्तावः- साईबाबा भक्तनिवासस्थान विभागाचे दि.१७/०५/२००९ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील विषय नं.४० व निर्णय क्र.५०३ अन्वये सेवा आकार वाढविण्यात आलेले होते. तसेच संदर्भ क्र. ०२ अन्वये दि.२७/१०/२०१३ झालेल्या मा.व्यवस्थापन समितीचे सभेमधील विषय नंबर-०२ व निर्णय क्रं-८७१ एसी खोलीचे सेवाआकर ९०० व प्रती जादा व्यक्तीस ५० रुपये प्रमाणे सेवाआकार वाढविण्यात आलेले होते.

**सन २०१९/२०२० या एक वर्षाचे जमा/खर्च तपशिल.**

| अ.नं | जमा तपशिल | रक्कम | अ.नं | खर्च तपशिल | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| १ | स्पॉट कॅश भरणा | १,०१,०५,३४९/- | १ | कायम कर्मचारी वेतन खर्च | ३,०२,०९,८७६/- |
| २ | स्वाईप मशिन भरणा (कॅशलेस) | ९,४९,१०२/- | २ | कंत्राटी कर्मचारी वेतन खर्च | ५६,४५,७२५/- |
| ३ | ऑनलाईन भरणा | १,१६,६९,०८५/- | ३ | विद्युत आकार | १,२३,०५,६४४/- |
| ४ | कर्मचारी सोसायटीकडून आलेला सेवा आकार. | २,५८,१८५/- | ४ | पाणी पुरवठा खर्च | २९,४२,५२१/- |
| **एकूण-** | | **२,२९,८१,७२१/-** | ५ | स्वच्छता कर्मचारी/साहित्य खर्च. | १,४५,६२,४१५/- |
| | | | ६ | प्रवास खर्च | २,३५०/- |
| | | | ७ | धुलाई केमिकल/इंधन खर्च खर्च. | ६,४५,९८५/- |
| | | | ८ | भक्तनिवास खर्च (पेस्ट कंट्रोल बीले, किरकोळ छपाई, किरकोळ खरेदी इ.) | १,४६,८१०/- |
| | | | | **एकूण** | ६,६४,६१,३२६/- |

| सन २०१९ -२० मध्ये निवासव्यवस्थेतुन मिळालेले उत्पन्न | निवासव्यवस्थेसाठी झालेला खर्च | होत असलेला तोटा |
|---|---|---|
| **२,२९,८१,७२१/-** | ६,६४,६१,३२६/- | **४,३४,७९,६०५/-** |

दिनांक १२/०५/२०२० रोजी शिर्डी येथील हॉटेल असोसिएशनचे अध्यक्ष श्री विलास कोते यांना शिर्डी येथील खाजगी हॉटेलमध्ये घेण्यात येणा-या अंदाजे दराबाबत व्दारावती विभागाने दुरध्वनीवरुन चौकशी केली असता त्यांनी खालील प्रमाणे दर आकारण्यात येत असल्याचे सांगितले.

| अ.नं. | तपशिल | रुममधील बेडची संख्या | २४ तासाकरीता एका रुमचा सेवाअकार अंदाजे रु. |
|---|---|---|---|
| ०१ | नॉन एसी | ०२ बेड | ५००-६०० |
| | नॉन एसी | ०३ बेड | ८००-९०० |
| | एसी | ०२ बेड | ७०० |
| | एसी | ०३बेड | १,२०० |
| उपरोक्त दर हे साई भक्तांचे गर्दीनुसार कमी जास्त करण्यात येत असतात. तसेच रुम मध्ये साईभक्तांना रुम सर्व्हिस देण्यात येते. | | | |

**विभागाची मागणी-** सदरहु इमारतीमधील खोल्यांचे दर सन-२००९ मध्ये सध्याचे सेवाआकार मागील ११ वर्षापुर्वी निच्छित केलेले आहेत. दरम्यानचे काळात यामध्ये वाढ झालेली नाही.

बांधकाम विभागामार्फत नुतनीकरणाचे काम चालु आहे सदर नुतनिकरणाचे कामामध्ये खोल्यां मध्ये साईभक्तांचे सामान ठेवण्याकरीता लगेज रॅक तयार करण्यात आलेल्या आहे. सदर लगेज रॅक मुळे पुर्वी प्रमाणे ०४ कॉट खोल्यामध्ये ०४ कॅाट ठेवण्यास अडचनीचे होत असल्याने खालील प्रमाणे काही खोल्यामध्ये साईभक्तांचे सोयीसाठी आवश्यक ते बदल करणे गरजेचे आहे.

**नुतनिकरण कामामध्ये बदल केलेल्या खोल्याचा तपशिल .**

| **अं.नं.** | **तपशील** | **खोली /हॉल संख्या** | **व्यक्तीची मर्यादा** | **सद्याचा सेवा आकार रु. पैसे** | **व्यक्ती मर्यादा व इतर माहिती. (१० वर्षाचे मुले वगळुन )** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०३ कॉट खोली | ५०० | ०३ | १२५/- | ०३ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस प्रत्येकी २७/- प्रमाणे गादी व चादरसह. |
| ०२ | ११ कॉट खोली | २५ | ११ | ४५०/- | ११ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस २७/- प्रमाणे गादी व चादरसह |
| ०३ | ०६ कॉटच्या एसी | ०१ | ०६ | ९००/- | ०६ पेक्षा जादा प्रत्येक व्यक्तीस ५०/- प्रमाणे गादी व चादरसह |
| ०४ | ०९ खोल्या कॉट विरहीत हॉल (स्टोअर हॉल) | ०९ | ४० | ३००/- | Fix Rate |
| ०५ | ०२ खोल्या कॉट विरहीत हॉल | ०२ | ४० | ५००/- | Fix Rate |
| ०६ | १९८ लॉकर्स (संडास-बाथरुम कॉमन) | | | प्रती लॉक रु.१०/- रु.१०० डिपॉझीट | गादी-५ रुपये<br>चादर- ०३ रुपये, डिपॉझीट २०० /- रुपये , |
| | **एकुण** | **५३७ खोल्या** | | | |

| | **तपशील** | **खोली / हॉल संख्या** | **वरील नमुद खोली संख्यामध्ये नुतनिकरण कामामध्ये करण्यात आलेले बदल खालील प्रमाणे.** |
|---|---|---|---|
| | ०४ कॉट्च्या खोल्या | २०६ | एकुण २०६ खोल्या मध्ये पुर्वी ०४ कॉट टाकण्यात आलेले होते परंतु नुतनिकरणामध्ये लॅगेज रॅक बनविण्यात आलेले असल्यांने खोली मध्ये ०४ कॉटला टाकल्यास अडचणीचे व भक्तांसाठी वावरण्यास जागा कमी असल्याने ०३ कॉट मध्ये रुपातरीत करावे लागतील. |
| | ०३ कॉट एसी खोल्या | ०८ | सन १९९४ साली साईबाबा भक्तनिवास ही नव्याने इमारत तयार करण्यात येऊन त्या ठिकाणी मा.व्यवस्थापन समिती विश्वस्तांसाठी दोन खोल्या एकत्रित करुन ०८ एसी व्ही.आय.पी खोल्या बनविण्यात आलेल्या होत्या. सदर ०८ खोल्याची नुतनिकरणा मध्ये एकत्रीत दोन रुम असलेल्या ०१ एसीचे ०२ नॉन एसी मध्ये रुपांतर करता येईल व त्यामुळे ८+८ =१६ खोल्या तयार होतील व प्रत्येक खोली मध्ये ०३ कॉट प्रमाणे सुमारे ८० (३+२=५) साईभक्तांची निवासाची सोय होणार आहे. |
| | ०५ कॉटच्या नॉन एसी खोल्या | ०१ | एकुण ०१ खोली मध्ये दोन खोल्या एकमेकांशी जोडलेल्या असुन सदर नुतनिकरणाचे कामामध्ये त्या दोन खोल्या वेग वेगळया करण्यात येवुन सदरचे दोन खोल्यामध्ये ०३ कॉट नॉन एसी खोल्या तयार करता येतील. |
| | कॉट विरहीत खोल्या | ४२ | एकुण ४२ खोल्या मध्ये पुर्वी १० गादया जमिनीवर टाकण्यात येत होते. परंतु सदर खोल्याचे नुतनिकरण केले असुन या खोल्यामध्ये प्रत्येकी ०३ कॉटमध्ये रुपांतर करुन भक्तांना सुस्थितीत निवासाची सोय उपलब्ध करुन देता येईल. |
| | ०७ कॉटच्या खोल्या-टॉयलेट /बाथरुम सह | ०१ | सदर एकत्रित दोन रुममध्ये ०७ कॉट असून साईभक्तांचे सोईसाठी या दोन रुम स्वतंत्र करण्यात येऊन त्यातील एका खोलीस टॉयलेट/बाथरुमची व्यवस्था करुन मिळणेकामी बांधकाम विभाग प्रतिनिधी यांनी दि.१८.०५.२०२० रोजी समक्ष पाहणी दरम्यान चर्चा करणेत आलेली असून टॉयलेट / बाथरुम बांधुन ०३ कॉटच्या स्वतंत्र दोन रुम करता येतील असे सांगितलेले आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| | अेसी डी-०१ खोली –<br><br>बी-०१ अेसी खोली- | ०१<br><br>०१ | सन १९९४ साली साईबाबा भक्तनिवास ही नव्याने इमारत तयार करण्यात येऊन त्या ठिकाणी मा. व्यवस्थापन समिती अध्यक्षांसाठी एसी व्ही.आय.पी खोली बनविण्यात आलेली होती. एसी रद्द करुन त्या ठिकाणी नॉन एसी ११ कॉटचे खोलीमध्ये जादा साईभक्तांची व्यवस्था करता येईल.<br>व्ही .आय.पी निवास व्यवस्थेसाठी ०१ एसी खोली बनविण्यात आलेली होती. एसी रद्द करुन त्या ठिकाणी नॉन एसी ११ कॉटचे खोलीमध्ये जादा साईभक्तांची व्यवस्था करता येईल. |
| | ०६ कॉटच्या नॉन एसी (T Suit) | ०१ | एकुण **०१** खोली सदर रुम इमारतीचे कॉर्नरला असून व पुरेशी जागा उपलब्ध असल्याने या खोलीमध्ये ०६ कॉट ऐवजी ११ कॉटचे खोलीमध्ये जादा साईभक्तांची व्यवस्था करता येईल. |
| | १२ कॉटच्या खोल्या टॉयलेट /बाथरुम सह | ०२ | एकुण ०२ खोल्या मध्ये पुर्वी १२ कॉट टाकण्यात आलेले होते परंतु नुतनिकरण केल्याने खोली मध्ये लॅगेज रॅक बनविण्यात येणार असल्यांने खोली मध्ये १२ कॉटला अडचनीचे व भक्तांसाठी वावरण्यास जागा कमी पडणार असल्यांने ०१ कॉट कमी करुन ११ कॉट मध्ये रुपांतरीत करता येईल. |
| एकुण खोली संख्या - | | **२६३** | |

उपरोक्त प्रमाणे नुतनिकरणाचे कामामध्ये बदल केल्यास सदरहु इमारती मध्ये पुर्वी ५२७ खोल्या होत्या त्यात वाढ होऊन ५३७ खोल्या तयार होतील व रुम मध्ये सर्व रुम ०३ कॉट-५०० खोल्या व ११ कॉट -२५ खोल्या मध्ये साईभक्तांना १,७७५/- कॉट ची सोय उपलब्ध होईल.

साईभक्तांना अनेक वेळा सेवा सुविधा पुरवाव्या लागतात. जसे दर दिड वर्षानी बेडशीट, उशीकव्हर, तसेच चादर, गादी ०३ वर्षानी बदलावे लागतात. आवश्यक प्लॅस्टीक साहित्य व किरकोळ सामानाची खरेदी करावी लागते. त्यामुळे खर्चात वाढ होते व तोटा वाढत जातो त्यासाठी सध्याचे खोल्यांचे सेवाआकारमध्ये वाढ करणे क्रम प्राप्त आहे.

छाननी करुन अनुमान- दिवसे-दिवस साईभक्तांची वाढणारी संख्या, प्रदान कराव्या लागणा-या सेवा-सुविधांचेसाठी खरेदी कराव्या लागणा-या वस्तु / सेवा दरात झालेली वाढ याचा विचार होऊन वरिल प्रमाणे नवीन सेवाआकाराप्रमाणे प्रस्तावीत दर लागु करता येईल असे मत आहे.

विभागाचा स्पष्ट मत/ अभिप्राय-

०१ ) साईबाबा भकतनिवासस्थान विभागातील नव्याने सर्व खोल्यांचे नुतनिकरणाचे कामकाज पुर्ण होत आहे. त्यामध्ये असलेल्या उपरोक्त प्रमाणे वेगवेगळया प्रकारच्या खोल्यांपैकी काही खोल्यांचे एसी जुणे व खराब झालेले असल्यांने

तसेच पुर्वी दोन एकत्रित खोल्यांचे एका एसी खोलीत रुपांतर केलेली असल्यांने एसी खोली रद्द करुन तिन कॉटची वेगवेगळी वरील तक्त्यात दर्शविल्या प्रमाणे दोन खोल्या तयार करुन सेवा आकार घेण्यास मान्यता मिळणेस.

**०२)** सध्या उपलब्ध असलेल्या निवासस्थाना पैकी साईबाबा भक्तनिवासस्थान हे (सन १९९४)अतिशय जुनी इमारत असुन सेवा आकार कमी असल्याने तसेच लॉकर्स व जनरल हॉलची सुविधा असल्यांने नेहमी गर्दीचे प्रमाण जादा असल्यांने साईभक्तांना जास्तीत–जास्त सेवासुविधा पुरविणे सहज शक्य व्हावे तसेच पुरविण्यात येणा-या सेवा सुविधांचा दर्जा उच्च असावा यासाठी प्रचलित खोल्यांचे सेवाआकारमध्ये काही प्रमाणात वाढ करणेस.

तथापी वाढती महागाई विदयुत आकार, पाणी पटटी, कर्मचारी वेतन, धुलाई खर्च व इतर खर्च याचा साईभक्तांना देण्यात येणा-या सेवा सुविधा इत्यादीचा विचार करता तसेच शिर्डीतील स्थानिक हॉटेल व्यवसायकडुन आकारण्यात येणा-या दराचा विचार करता साईबाबा भकतनिवासस्थानातील नॉन एसी खोल्यांचे **सेवाआकारात खालील प्रमाणे वाढीव सेवा आकार करण्यात** यावा, असे नम्र मत आहे.

**प्रास्तावित वाढीव सेवाआकारा पासुन प्रति दिन व वार्षिक मिळणारे उत्पन्न खालील प्रमाणे.**

| अ.नं. | खोल्यांचा तपशील | खोली /लॉकर्स | वाढीव प्रास्तावित सेवाआकार | प्रति दिन सेवा आकार | एक वर्ष कालावधी | वाढीत सेवाआकारापासुन मिळणारे उत्पन्न |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | ०३ कॉट च्या नॉन एसी | ५०० खोल्या | १७५/- | ८७,५००/- | ३६५ | ३,१९,३७,५००/- |
| ०२ | ०६ कॉटच्या | ०१ एसी खोली. | ०० | ०० | ०० | ०० |
| ०३ | ११ कॉटच्या | २५ खोल्या | १५०/- | ३,७५०/- | ३६५ | १३,६८,७५०/- |
| ०४ | कॉट विरहीत हॉल बीगर टॉयलेट /बाथरुम सह | ०९ हॉल | २००/- | १८००/- | ३६५ | ६,५७,०००/- |
| ०५ | कॉट विरहीत हॉल टॉयलेट /बाथरुम सह | ०२ हॉल | १००/- | २००/- | ३६५ | ७३,०००/- |
| ०६ | लॉकर्स कॉमन टॉयलेट /बाथरुम सह | १९८ | लॉकर ००/- रु गादी ०५/- रु चादर ०७ /- रु | | | |
| **एकुण वार्षिक उत्पन्न रुपये -** | | | | | | **३,४०,३६,२५०/-** |

| अ.नं. | तपशिल | सेवाआकार व खर्च तपशील |
|---|---|---|
| ०१ | सन २०१९-२० आर्थिक वर्षात मिळालेले उत्पन्न | **२,२९,८१,७२१/-** |
| ०२ | वाढीव प्रस्तावित सेवाआकार | **३,४०,३६,२५०/-** |
| | **एकुण उत्पन्न -** | **५,७०,१७,९७१/-** |
| ०३ | साईबाबा भक्त निवासस्थान खर्च रुपये - | **६,६४,६१,३२६/-** |
| | **एकुण तोटा -** | **९४,४३,३५५/-** |

उपरोक्त प्रमाणे सन २०१९ - २० या आर्थिक वर्षात निवासव्यवस्थेतुन एकुण **२,२९,८१,७२१/-**मात्र उत्पन्न मिळाले असुन त्यातुन **वाढीव प्रास्तावित सेवाआकार रु. ३,४०,३६,२५०/-**मात्र असे एकुण ५,७०,१७,९७१/- वार्षिक सेवा आकार साईबाबा भक्तनिवासस्थान विभागास प्राप्त होईल. व साईबाबा भक्त निवासस्थान खर्च-रु. ६,६४,६१,३२६/- वजा जाता रूपये - **९४,४३,३५५/-** तोटा शिल्लक राहील.

| **सद्याचा सेवा आकार** | | | | | | **वाढीव प्रास्तावित सेवाआकार** | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| **अ.नं.** | **तपशिल** | **खोली/लॉकस संख्या** | **प्रति जादा व्यक्ती क्षमता** | **सदयाचा एका रुम / लॉकर्स चा सेवा आकार** | **प्रति जादा व्यक्ती सेवा आकार रु.** | **वाढीव प्रास्तावित सेवाआकार रु. पै.** | **वाढीव सुधारीत सेवाआकार रु . पै.** | **प्रति जादा व्यक्ती सेवा आकार** |
| ०१ | ०३ कॉटच्या खोल्या नॉन एसी | ५०० खोल्या | ३+२ | १२५/- | २७/- | १७५/- | ३००/- | ५०/ |
| ०२ | ०६ कॉटच्या खोल्या एसी . | ०१ खोल्या | ६+२ | ९००/- | ५०/- | ०० | ९००/- | ५०/ |
| ०३ | ११ कॉट खोल्या | २५ खोल्या | ११+२ | ४५०/- | २७/- | १५०/- | ६००/- | ५०/ |
| ०४ | कॉट विरहीत हॉल बीगर टॉयलेट /बाथरुम सह | ०९ हॉल | ४० गादी | ३००/- | ---- | २००/- | ५००/- | --- |
| ५ | कॉट विरहीत हॉल ०२ टॉयलेट/बाथरुम सह | ०२ हॉल | ४० गादी | ५००/- | ---- | १००/- | ६००/- | --- |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ६ | लॉकर्स कॉमन संडासबाथरुम सह | १९८ लॉकर्स | -- | प्रती लॉकर- रु.१०/- रु.१०० डिपॉझीट | गादी-५ रुपये<br>चादर- ०३ रुपये, डिपॉझीट २००/- रुपये | लॉकर ००/- गादी ०५/- चादर ०७ /- | लॉकर-१०/-रु. डिपॉझीट रु.१००<br>गादी -१०/-रू.<br>चादर -१०/- डिपॉझीट रु.२०० | |
| **एकुण खोल्या -** | | **५३७** | | | | | | |

तरी उपरोक्त ०१ व ०२ प्रमाणे सर्व बाबीचा विचार करता नुतनिकरण खोल्यांच्या कॉट संख्येत बदल करणेस तसेच प्रचलित सेवा आकारामध्ये वरील प्रस्तवीत केले प्रमाणे सेवाआकार वाढविणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ (Ad –hoc ) समितीचे सभेपुढे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३४०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, साईबाबा भक्तनिवासस्थान इमारतीमधील खोल्यांसाठी खालील प्रमाणे सेवाआकार घेण्यास मान्यता देण्यात आली.**

| **अ.नं.** | **तपशिल** | **सुधारीत सेवाआकार रु . पै.** | **प्रति जादा व्यक्ती सेवा आकार** |
|---|---|---|---|
| **०१** | **०३ कॉटच्या खोल्या नॉन एसी** | **२००/-** | **५०/** |
| **०२** | **०६ कॉटच्या खोल्या एसी .** | **९००/-** | **५०/** |
| **०३** | **११ कॉट खोल्या** | **६००/-** | **५०/** |
| **०४** | **कॉट विरहीत हॉल बीगर टॉयलेट /बाथरुम सह** | **३००/-** | **---** |
| **०५** | **कॉट विरहीत हॉल ०२ टॉयलेट/बाथरुम सह** | **५००/-** | **---** |
| **०६** | **लॉकर्स कॉमन संडासबाथरुम सह** | **लॉकर-१०/-रु. डिपॉझीट रु.१००**<br>**गादी -१०/-रू.**<br>**चादर -१०/- डिपॉझीट रु.२००** | **गादी-५ रुपये**<br>**चादर- ०३ रुपये, डिपॉझीट २००/- रुपये** |

**(कार्यवाही- साईबाबा भक्तनिवासस्थान विभाग)**

---

**विषय नं.३६** **संस्थानला माहे ऑक्टोबर २०१९ ते सप्टेंबर २०२० या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवालाबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.१०.२०१२ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८०० अन्वये "यापुढे मोतीचुर लाडु प्रसाद निर्मीती करीता खरेदी करणेत येत असलेल्या गावरान तुपाचे प्रत्येक नमुन्याची तपासणी अश्वमेध इंजिनीअर्स ॲण्ड कन्सलटंटस नासिक, या NABL मान्यताप्राप्त प्रयोगशाळेकडुन करुन घेण्यात यावी", असे ठरलेले आहे.

खरेदी विभागाचे दि.१४.०७.२०१७ रोजीचे टिपणीवरील निर्देशानुसार संस्थानला प्राप्त होणा-या गाईचे शुद्ध तुप व खाद्यतेलाची तपासणी राज्य/ केंद्र शासनाच्या प्रयोगशाळेमधून करुन घेणेबाबत निर्देश आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.३१.०८.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६३७ अन्वये "संस्थानसाठी किराणा माल अथवा इतर ज्या साहित्यांच्या नमुन्यांची लॅब तपासणी करण्यात येते अशा लॅब तपासण्यांचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात यावा", असे ठरलेले आहे.

वरील नमुद निर्णयाप्रमाणे, गाईचे शुद्ध तुपाचे सध्याचे पुरवठादार व्ही.एस.पी.डेअरी इंडस्ट्रीज, ऊमरगांव, गुजरात,यांचेकडून संस्थानला प्राप्त होणा-या शुद्ध तूपाची तपासणी संस्थानचे प्रयोगशाळेसह अश्वमेध इंजिनीअर्स

ॲण्ड कन्सलटंटस, नासिक, (एन.ए.बी.एल.मान्यताप्राप्त प्रयोगशाळा), जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा (राज्य शासकीय प्रयोगशाळा) व केंन्द्रीय खाद्य प्रोद्योगिक अनुसंधान संस्थान, मैसूर, (केंद्र शासन मध्यवर्ती प्रयोगशाळा) यांचेकडून करणेत येत आहे. तसेच खाद्यतेलाची तपासणी संस्थानचे प्रयोगशाळेसह राज्य शासकीय प्रयोगशाळेकडून करणेत येत आहे.

वरील निर्णयानुसार संस्थानला माहे ऑक्टोबर २०१९ ते जानेवारी २०२० या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुद्ध तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेंमार्फत करणेत आलेल्या तपासण्यांचे अहवाल तपशिलवार परिशिष्ठासह यासोबत सादर केले आहेत. त्यामध्ये

**अ)** उपरोक्त सर्व प्रयोगशाळेंचे तपासणी अहवालामध्ये शुद्ध तूपाचे व खाद्यतेलाचे सर्व नमुने अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६, (नियम व नियमन २०११) नुसार योग्य (conform) असल्याचे नमुद केलेले आहे.

**आ)** तसेच उपरोक्त परिशिष्ठामध्ये नमुद केलेल्या सर्व बॅचचे शुद्ध तुप व खाद्यतेलाचा साठा भांडार विभागामधून विनातक्रार संपलेला आहे.

तरी वरीलप्रमाणे तपासणी अहवालाच्या झेरॉक्स प्रती (पा.नं.०१ ते ४३) व दि.२१.०५.२०२० रोजीचे तपशिलवार परिशिष्ठ (पा.नं. १ ते ८) यासोबत सादर केलेले आहे, ते मा. व्यवस्थापन तदर्थ समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३४१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानला माहे ऑक्टोबर २०१९ ते सप्टेंबर २०२० या कालावधीमध्ये प्राप्त झालेल्या शुध्द तुप व खाद्यतेलाचे विविध प्रयोगशाळेमार्फत करणेत आलेल्या तपासणी अहवालांचे अवलोकन करुन त्याची नोंद घेण्यात आली.**

**(कार्यवाही-भांडार विभाग)**

---

**विषय नं.३७** **माहे एप्रिल-२०१९ ते मार्च-२०२० अखेर लावलेल्या ठेकेदारी कर्मचारी संख्येची नोंद घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत कंत्राटी पध्दतीने पुरविण्यात आलेल्या कुशल ,अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदीन व श्रमदिन संख्येचे विभागनिहाय तपशिलवार तक्ते प्रत्येक महिन्यास मा.कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेसाठी सादर करणेत यावेत व आर्थिक वर्षाचे शेवटी उपरोक्त विषयांचा एकत्रित अहवाल मा.व्यवस्थापन समिती समोर नोंद घेण्यासाठी सादर करणेत यावा बाबत मा.विश्वस्तांचे सूचने नुसार उपरोक्त संदर्भीय ठरावान्वये मान्यता मिळालेली आहे.

उपरोक्त मा.विश्वस्तांचे सूचनेनुसार **माहे एप्रिल-२०१९ ते माहे मार्च-२०२०** अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत कंत्राटी पध्दतीने पुरविण्यात आलेल्या कुशल, अकुशल व सुरक्षा कामगारांचा प्रतिदीन व श्रमदिन संख्येचा तपशिल खालीलप्रमाणे देणेत येत आहे.

| अ.नं | कालावधी | तपशील | अकुशल | | कुशल | | एकूण | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या | प्रतिदिन संख्या | श्रमदिन संख्या |
| ०१ | **एप्रिल-२०१९** | लेबर | १०८२ | २८५६७ | ६३७ | १७५५५ | १७१९ | ४६१२२ |
| | | सिक्युरीटी | ८४३ | २१४८८ | ६३ | १७३६ | ९०६ | २३२२४ |
| ०२ | **मे-२०१९** | लेबर | १०८२ | २८६९६ | ६३८ | १७०५८ | १७२० | ४५७५४ |
| | | सिक्युरीटी | ७७८ | २२०९५ | ६४ | १७७५ | ८४२ | २३८७० |
| ०३ | **जून-२०१९** | लेबर | १०८२ | २८६९६ | ६३८ | १७०५८ | १७२० | ४५७५४ |
| | | सिक्युरीटी | ७७४ | २२४९९ | ६८ | १७४५ | ८४२ | २४२४४ |
| ०४ | **जूलै-२०१९** | लेबर | १०७५ | २९८३९ | ६४४ | १८३७६ | १७१९ | ४८२१५ |
| | | सिक्युरीटी | ७९४ | २२५७७ | ६५ | १७७४ | ८५९ | २४३५१ |
| ०५ | **ऑगष्ट-२०१९** | लेबर | १०६८ | २९५८९ | ६३८ | १८३०९ | १७०६ | ४७८९८ |
| | | सिक्युरीटी | ७७८ | २२५०० | ६६ | १८०२ | ८४४ | २४३०२ |
| ०६ | **सप्टेंबर-२०१९** | लेबर | १०६८ | २८९४० | ६४१ | १७५७७ | १७०९ | ४६५१७ |
| | | सिक्युरीटी | ७७९ | २१६४३ | ६७ | १८१७ | ८४६ | २३४६० |
| ०७ | **ऑकटोबर-२०१९** | लेबर | १०६७ | २९११८ | ६३९ | १७८४४ | १७०६ | ४६९६२ |
| | | सिक्युरीटी | ७७७ | २२७९५ | ६८ | १८५५ | ८४५ | २४६५० |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०८ | नोव्हेंबर-२०१९ | लेबर | १०६६ | २७९१३ | ६४० | १७२८९ | १७०६ | ४५२०२ |
| | | सिक्युरीटी | ७८१ | २१२८६ | ७० | १८२६ | ८५१ | २३११२ |
| ०९ | डिसेंबर-२०१९ | लेबर | १०६७ | २९६३२ | ६४० | १८१८६ | १७०७ | ४७८१८ |
| | | सिक्युरीटी | ७८२ | २२६१० | ७१ | १८९२ | ८५३ | २४५०२ |
| १० | जानेवारी-२०२० | लेबर | १०७१ | १९९९९ | ६४० | १५७८१ | १७११ | ३५७८० |
| | | सिक्युरीटी | ७७९ | १८३६० | ७४ | १९१७ | ८५३ | २०२७७ |
| ११ | फेब्रूवारी-२०२० | लेबर | ६९४ | १७९३१ | ५५४ | १४६१६ | १२४८ | ३२५४७ |
| | | सिक्युरीटी | ६३५ | १७०२४ | ७१ | १९०० | ७०६ | १८९२४ |
| १२ | मार्च-२०२० | लेबर | ६९६ | १९४९५ | ५५० | १५९२९ | १२४६ | ३५४२४ |
| | | सिक्युरीटी | ६३४ | १८७३९ | ७१ | २०५७ | ७०५ | २०७९६ |
| | **एकूण संख्या** | | **२१२५२** | **५७२०३१** | **८३१७** | **२२७६७४** | **२९५६९** | **७९९७०५** |

उपरोक्त नमूद केले प्रमाणे माहे एप्रिल-२०१९ ते माहे मार्च-२०२० अखेर या आर्थिक वर्षात दरमहा संस्थानला लेबर व सिक्युरीटी कॉन्ट्रक्टर्स यांचेमार्फत कंत्राटी पध्दतीने कुशल, अकुशल व सुरक्षा कामगार आवश्यकतेप्रमाणे पुरविणेत आलेले आहे. तरी सदर प्रतिदिन व श्रमदिन संख्येची नोंद घेणेत येवून, त्यास मान्यता असावी.

उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३४२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, संबधीत विभागाने केलेला तक्ता मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे समक्ष स्पष्ट (explain) करावा, असे आदेशीत करण्यात आले.**

**(कार्यवाही-कामगार विभाग)**

---

**विषय नं.३८** **सन २०२०-२१ च्या आर्थिक वर्षात निरुपयोगी भंगार साहित्य विक्रीकामी प्राप्त ई-निविदातील उच्चत्तम दरासंदर्भात निर्णय होणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.व्यवस्थापन समिती दि.१४/०१/२०२० रोजीचे सभेतील निर्णय क्र.२९ नुसार सन-२०२०-२१ या वर्षात संस्थानकडील दैनंदिन वापराने जमा होणारे निरूपयोगी भंगार साहित्याची विहीत पध्दतीने विक्री करणेसाठी मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार ऑनलाईन व्यापा-यांकडून भंगार साहित्य विक्रीकामी ई-निविदा मागविणेत आलेल्या आहेत. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे –

| | | |
|---|---|---|
| ०१ | विक्री करावयाचे साहित्य/वस्तूचा तपशिल | अ.नं.१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| ०२ | मागणी | अ.नं.१२ मध्ये नमुद केलेप्रमाणे |
| ०३ | ई-निविदा प्रसिध्दी | दि. ०३/०३/२०२० ते १३/०३/२०२० |
| ०४ | वृत्तपत्राच्या अधिसूचनेच्या व्यतिरिक्त चौकशी कशी पाठवली जाते? | www.mahatenders.gov.in<br>संस्थान वेबसाईटवर व मागिल वर्षाच्या व्यापा-यांना दुरध्वनीवरुन |
| ०५ | तर तसे, कोणाला पाठविले | -- |
| ०६ | निविदा सुरू झालेची दिनांक व वेळ | दि. ०३/०३/२०२०, टेक्नीकल बीड – १६/०३/२०२०,<br>कमर्शियल बीड – २०/०५/२०२० |
| ०७ | प्राप्त निविदाकारांची संख्या | ०७ |
| ०८ | पात्र निविदाकारांची संख्या | ०७ |
| ०९ | सर्व निविदाकारांनी नमुने दिली आहेत का. | - |
| १० | सर्व निविदाकारांनी बयाणा रक्कम अदा केली आहे का | होय . |
| ११ | जर नमुने दिले नाही, तर का | - |
| १२ | **निविदाकारांनी सादर केलेले दर-** | |

| Sl.No | Description of Work / Item(s) | No.of Qty | Units | akbar sandekha pathan | Shafik Sama Sayyad | New india scrap | VIVEK TIN SUPPLY | Tulsidas Velji And Co | AAI SHREE KHODIYAR TIN | DOSTANA SCRAP CENTER |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

| | | | | | | center | | | REPAIRING AND SUPPLIER | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate | Rate |
| 1 | रिकामे तेलातूपाचे लहान/मोठे तोंडाचे चांगले डबे | 1 | प्रति नग | 36.00 | 21.00 | 34.00 | 30.90 | 0.00 | 50.74 | 22.00 |
| 2 | रिकामे तेलातूपाचे लहान/मोठे तोंडाचे तोंड फुटलेले / चेपलेले/काळे पडलेले खराब डबे | 1 | प्रति नग | 31.10 | 20.00 | 28.00 | 24.60 | 0.00 | 24.78 | 20.00 |
| 3 | रिकामे काजूचे डबे (आहे त्या स्थितीत) | 1 | प्रति नग | 12.00 | 8.00 | 13.25 | 8.10 | 0.00 | 9.44 | 9.00 |
| 4 | निरूपयोगी गोण्या (कलतान) चांगले (५० किलो भरतीच्या) | 1 | प्रति नग | 17.25 | 8.75 | 15.30 | 0.00 | 17.01 | 0.00 | 9.25 |
| 5 | निरूपयोगी गोण्या (कलतान) खराब (५० किलो भरतीच्या) | 1 | प्रति नग | 12.55 | 7.50 | 11.20 | 0.00 | 13.72 | 0.00 | 8.25 |
| 6 | प्लॉस्टिक गोण्या | 1 | प्रति किलो | 12.20 | 6.25 | 10.50 | 0.00 | 13.03 | 0.00 | 7.50 |
| 7 | प्लॉस्टिक वस्तू (उदा. कचरा कुंडया /बादल्या/मग, छोटे/मोठे फुटलेले ड्रम, फुटलेल्या पाण्याच्या फायबर टाक्या, तुटलेल्या प्लॅस्टिक खुर्च्या इ.) | 1 | प्रति किलो | 13.00 | 18.00 | 21.50 | 0.00 | 0.00 | 0.00 | 19.00 |
| 8 | प्लॉस्टिक ड्रम २० लि. ते ५० लि.चे आतील सर्व कलर ( चांगले) | 1 | प्रति नग | 28.00 | 30.25 | 41.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 35.50 |
| 9 | प्लॉस्टिक ड्रम ५१ लि. ते १०० लि. पर्यंतचे सर्व कलरचे (चांगले) | 1 | प्रति नग | 35.00 | 41.50 | 56.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 42.00 |
| 10 | दुधाच्या रिकाम्या प्लॅस्टिक पिशव्या (भरलेल्या बारदान /गोणीसह) | 1 | प्रति किलो | 13.00 | 5.50 | 9.00 | 4.30 | 14.00 | 0.00 | 7.50 |
| 11 | रिकामे खोक्याचा चांगला पुठ्ठा (कार्टून) | 1 | प्रति किलो | 9.25 | 5.50 | 8.00 | 6.10 | 8.00 | 0.00 | 6.50 |
| 12 | रिकामे खोक्याचा तेलकट / खराब पुठ्ठा | 1 | प्रति किलो | 8.52 | 4.50 | 6.30 | 3.20 | 6.32 | 0.00 | 5.25 |
| 13 | उत्तर पत्रिका व इतर तत्सम रद्दी (भरलेल्या बारदान गोणीसह) | 1 | प्रति किलो | 11.25 | 8.75 | 9.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 10.50 |
| 14 | निरूपयोगी लोखंडी भंगार साहित्य | 1 | प्रति किलो | 21.52 | 18.50 | 21.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 18.50 |
| 15 | लोखंडी कीस | 1 | प्रति किलो | 6.00 | 7.50 | 5.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 5.25 |
| 16 | निरूपयोगी लोखंडी पत्र्याचे भंगार साहित्य | 1 | प्रति किलो | 13.20 | 11.25 | 12.30 | 0.00 | 0.00 | 0.00 | 12.25 |
| 17 | निकामी तांब्याचे भंगार साहित्य | 1 | प्रति किलो | 245.00 | 281.00 | 301.25 | 0.00 | 0.00 | 0.00 | 285.00 |
| 18 | निरूपयोगी पितळी भंगार साहित्य | 1 | प्रति किलो | 100.00 | 182.00 | 195.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 170.50 |
| 19 | निकामी स्टीलचे भंगार साहित्य | 1 | प्रति किलो | 26.00 | 28.50 | 37.50 | 0.00 | 0.00 | 0.00 | 32.25 |

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 20 | निकामी ॲल्युमिनिअम भंगार साहित्य | 1 | प्रति किलो | 65.00 | 60.25 | 71.50 | 0.00 | 0.00 | 0.00 | 65.00 | |
| | | 21 | जळालेले इले.बल्ब, टयुबबार इ. | 1 | प्रति किलो | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | |
| | | 22 | इले.टयुबचे जळालेले कॉपर चोक | 1 | प्रति नग | 18.00 | 15.00 | 16.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 12.20 | |
| | | 23 | इले.टयुबचे जळालेले इलेक्ट्रॉनिक चोक | 1 | प्रति नग | 1.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 32.50 | |
| | | 24 | सोडीयम लाईटचे जळालेले चोक | 1 | प्रति नग | 85.00 | 40.25 | 71.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | |
| | | 25 | वापरलेले काळे ऑईल | 1 | प्रति लिटर | 17.00 | 11.50 | 15.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 11.25 | |
| | | 26 | मूर्तीवर वाहीलेले निर्माल्य तेल | 1 | प्रति लिटर | 27.00 | 17.00 | 23.00 | 36.90 | 0.00 | 32.00 | 14.50 | |
| | | 27 | विटलेल्या,फाटलेल्या,जीर्ण झालेल्या कापडी वस्तू (उदा.चादर,बेडशीट, ब्लॅकेट, खराब झालेल्या गादया, गादीच्या /उशीच्या खोळी,टॉवेल, इ.) | 1 | प्रति किलो | 7.85 | 2.30 | 3.50 | 0.00 | 0.00 | 0.00 | 5.00 | |
| | | 28 | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या कापूस गादया(रूग्णालय सोडून फक्त भक्त निवासस्थान कडील) | 1 | प्रति नग | 41.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | |
| | | 29 | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या फोम गादया(रूग्णालय सोडून फक्त भक्त निवासस्थान कडील) | 1 | प्रति नग | 51.00 | 0.00 | 45.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | |
| | | 30 | नारळाच्या शेंडया | 1 | प्रति किलो | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | |
| | | 31 | निरूपयोगी /अनावश्यक लाकडी भंगार साहित्य | 1 | प्रति किलो | 3.00 | 2.25 | 2.50 | 0.00 | 0.00 | 0.00 | 2.50 | |
| | | 32 | निरूपयोगी जनरेटरच्या पांढ-या बॅट-या मोठी साईज | 1 | प्रति नग | 1625.00 | 1520.00 | 1786.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 1250.00 | |
| | | 33 | निरूपयोगी जनरेटरच्या काळया बॅट-या मोठी साईज | 1 | प्रति नग | 1300.00 | 1550.00 | 1525.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 1350.00 | |
| | | 34 | संगणकाच्या निकामी बॅट-या मोठी साईज | 1 | प्रति नग | 125.00 | 125.00 | 151.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 125.00 | |
| | | 35 | संगणकाच्या वापरून खराब झालेले प्रिन्टर,रिबन, टोनर, टेलीफोन,घडयाळे इ. | 1 | प्रति किलो | 7.00 | 5.50 | 6.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 5.00 | |
| | | 36 | रिकाम्या पाण्याच्या प्लॉस्टिक बाटल्या | 1 | प्रति किलो | 16.00 | 16.50 | 18.25 | 6.15 | 23.43 | 0.00 | 13.00 | |
| | | 37 | कागदाची चूर केलेली रद्दी | 1 | प्रति किलो | 1.50 | 3.00 | 1.25 | 0.00 | 3.01 | 0.00 | 3.00 | |
| | | 38 | रंगीत कागदाची रद्दी | 1 | प्रति किलो | 10.25 | 5.00 | 7.00 | 0.00 | 4.51 | 0.00 | 4.50 | |
| | | 39 | टाईम दर्शनपासची फाडलेली रंगीत-जाड पेपची रद्दी (प्लॉस्टिक कव्हर आहे त्या स्थितीत) | 1 | प्रति किलो | 1.00 | 6.50 | 0.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 2.50 | |
| | | 40 | संगणकाच्या निकामी छोटया बॅट-या | 1 | प्रति किलो | 30.00 | 3.50 | 45.00 | 0.00 | 0.00 | 0.00 | 35.00 | |

| | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 41 | निरूपयोगी खराब झालेले कारपेट | 1 | प्रति किलो | **0.00** | **2.50** | **2.00** | **0.00** | **0.00** | **0.00** | **2.00** |
| 42 | पावती पुस्तके,कुपन बुके,रजिष्टर वगैरेचा बाईडींग पुठ्ठा | 1 | प्रति किलो | **3.50** | **2.25** | **2.00** | **0.00** | **0.00** | **0.00** | **2.50** |
| 43 | बीडाचे भंगार साहित्य | 1 | प्रति किलो | **17.00** | **17.00** | **15.00** | **0.00** | **0.00** | **0.00** | **16.00** |
| 44 | भटूर | 1 | प्रति किलो | **100.00** | **150.00** | **105.00** | **0.00** | **0.00** | **0.00** | **170.00** |

१३ यापूर्वी केलेल्या खरेदीचा तपशिल आणि खरेदी दर-

| अ.नं. | वर्ष | परिमाण | दर प्रती नग रू. |
|---|---|---|---|
| अ.नं.२३ मध्ये नमूद केलेप्रमाणे. | | | |
| | | | |

१४ मागील वर्षात वापरण्यात आलेल्या परिमाणाचा तपशिल-

| अ.नं. | वर्ष | खर्च परिमाण |
|---|---|---|
| -- | -- | ---- |

| | | |
|---|---|---|
| १५ | सध्याची शिल्लक स्थिती | ---- |
| १६ | मागील खरेदी दर | - |
| १७ | मागील पुरवठादार | - |
| १८ | सध्याचे न्युनत्तम निविदाकाराने सादर केलेले दर | वरील अ.नं.१२ प्रमाणे |
| १९ | सध्याचे न्युनत्तम निविदाकाराचे नांव | वरील अ.नं.१२ प्रमाणे |
| २० | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला आहे का. | होय |
| २१ | सदर खरेदीचा प्रस्ताव खरेदी समिती समोर सादर करण्यात आला असल्यास उपस्थितांची नांवे | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>मा.उप मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>मा.मुख्य लेखाधिकारी,<br>मा.प्रशासकीय अधिकारी,<br>प्र.अधिक्षक, अभिलेख कक्ष विभाग |
| २२ | घाऊक आणि किरकोळ दर यांचे तपशिल अंदाजे रू.----/- प्रती | |

२३ मागील दर व सध्याचे प्राप्त दर यातील तुलनात्मक तक्ता

| **अ.नं.** | **तपशिल** | **मागील वर्षीचे खरेदी दर** | **सध्याचे प्राप्त दर** | **कमी/जास्त** |
|---|---|---|---|---|
| 1 | रिकामे तेलातूपाचे लहान / मोठे तोंडाचे चांगले डबे | 53.51 | 50.74 | 2.77 ने कमी |
| 2 | रिकामे तेलातूपाचे लहान/मोठे तोंडाचे तोंड फुटलेले / | 43.60 | 31.10 | 12.50 ने कमी |
| 3 | रिकामे काजूचे डबे (आहे त्या स्थितीत) | 14.16 | 13.25 | 0.91 ने कमी |
| 4 | निरूपयोगी गोण्या (कलतान) चांगले “ किलो भरतीच्या ” | 15.85 | 17.25 | 1.40 ने जास्त |
| 5 | निरूपयोगी गोण्या (कलतान) खराब “ किलो भरतीच्या ” | 11.20 | 13.72 | 2.52 ने जास्त |
| 6 | प्लॉस्टिक गोण्या | 10.00 | 13.03 | 3.03 ने जास्त |
| 7 | प्लॉस्टिक वस्तू (उदा. कचरा कुंडया /बादल्या/मग,छोटे/मोठे फुटलेले ड्रम, फुटलेल्या पाण्याच्या फायबर टाक्या इ. ) | 26.25 | 21.50 | 4.75 ने कमी |
| 8 | प्लॉस्टिक ड्रम २० लि. ते ५० लि.चे आतील सर्व कलर (चांगले) | 51.50 | 41.00 | 10.5 ने कमी |
| 9 | प्लॉस्टिक ड्रम ५१ लि. ते १०० लि. पर्यंतचे सर्व कलरचे (चांगले) | 78.50 | 56.00 | 22.5 ने कमी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 10 | दुधाच्या रिकाम्या प्लॅस्टिक पिशव्या (भरलेल्या बारदान / गोणीसह) | 20.35 | 14.00 | 6.35 ने कमी |
| 11 | रिकामा खोक्याचा चांगला पुठ्ठा (कार्टून) | 10.15 | 9.25 | 0.90 ने कमी |
| 12 | रिकामा खोक्याचा तेलकट / खराब पुठ्ठा | 8.25 | 8.52 | 0.27 ने जास्त |
| 13 | उत्तर पत्रिका व इतर तत्सम रद्दी (भरलेल्या बारदान गोणीसह) | 18.50 | 11.25 | 7.25 ने कमी |
| 14 | निरूपयोगी लोखंडी भंगार साहित्य | 27.00 | 21.52 | 6.5 ने जास्त |
| 15 | लोखंडी कीस | 16.00 | 7.50 | 5.48 ने कमी |
| 16 | निरूपयोगी लोखंडी पत्र्याचे भंगार साहित्य | 21.80 | 13.20 | 8.50 ने कमी |
| 17 | निकामी तांब्याचे भंगार साहित्य | 400.00 | 301.25 | 98.75 ने कमी |
| 18 | निरूपयोगी पितळी भंगार साहित्य | 300.00 | 195 | 105 ने कमी |
| 19 | निकामी स्टीलचे भंगार साहित्य | 41.50 | 37.50 | 4.00 ने कमी |
| 20 | निकामी ॲल्युमिनिअम भंगार साहित्य | 98.50 | 71.50 | 27 ने कमी |
| 21 | जळालेले इले.बल्ब, टयुबबार इ. | 00.70 | 00 | रेट आले नाही |
| 22 | इले.टयुबचे जळालेले कॉपर चोक | 30.00 | 18.00 | 12 ने कमी |
| 23 | इले.टयुबचे जळालेले इलेक्ट्रॉनिक चोक | 3.00 | 32.50 | 29.50 ने जास्त |
| 24 | सोडीयम लाईटचे जळालेले चोक | 107.50 | 85.00 | 22.5 ने कमी |
| 25 | वापरलेले काळे ऑईल | 28.32 | 17.00 | 11.32 ने कमी |
| 26 | मूर्तीवर वाहीलेले निर्माल्य तेल | 35.10 | 36.90 | 1.8 ने जास्त |
| 27 | विटलेल्या,फाटलेल्या,जीर्ण झालेल्या कापडी वस्तू (उदा.चादर,बेडशीट, ब्लॅंकेट, खराब झालेल्या गादया, गादीच्या /उशीच्या खोळी,टॉवेल, इ.) | 13.60 | 7.85 | 5.75 ने कमी |
| 28 | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या कापूस गादया (रूग्णालय सोडून फक्त निवासस्थान विभागाकडील) | 70.55 | 41.00 | 29.55 ने कमी |
| 29 | निरूपयोगी/जीर्ण झालेल्या फोम गादया (रूग्णालय सोडून फक्त निवासस्थान विभागाकडील) | 41.30 | 51.00 | 9.70 ने जास्त |
| 30 | नारळाच्या शेंडया | 0.50 | 00 | रेट आले नाही |
| 31 | निरूपयोगी /अनावश्यक लाकडी भंगार साहित्य | 6.00 | 3.00 | 3.00 ने कमी |
| 32 | निरूपयोगी जनरेटरच्या पांढ-या बॅट-या मोठी साईज | 2,386.50 | 1786.00 | 600.5 ने कमी |
| 33 | निरूपयोगी जनरेटरच्या काळया बॅट-या मोठी साईज | 1,933.50 | 1550.00 | 383.5 ने कमी |
| 34 | संगणकाच्या निकामी बॅट-या मोठी साईज | 221.00 | 151 | 70 ने कमी |
| 35 | संगणकाच्या वापरून खराब झालेले प्रिंन्टर, रिबन, टोनर, टेलीफोन, घडयाळे इ. | 12.00 | 7.00 | 5 ने कमी |
| 36 | रिकाम्या पाण्याच्या प्लॅस्टिक बाटल्या | 23.00 | 23.43 | 0.43 ने जास्त |
| 37 | कागदाची चूर केलेली रद्दी | 6.20 | 3.01 | 3.19 ने कमी |
| 38 | रंगीत कागदाची रद्दी | 11.85 | 10.25 | 1.60 ने कमी |
| 39 | टाईम दर्शनपास फाडलेली रंगीत जाड पेपर रद्दी (प्लॅस्टीक कव्हर आहे त्या स्थितीत ) | 8.25 | 6.25 | 2.00 ने कमी |
| 40 | संगणकाच्या निकामी छोटया बॅट-या | 65.50 | 45.00 | 20.5 ने कमी |
| 41 | निरूपयोगी खराब झालेले कारपेट | 3.50 | 2.50 | 1.00 ने कमी |
| 42 | पावती पुस्तके, कुपन बुके, रजिष्टर वगैरेचा बाईंडींग पुठ्ठा | 6.00 | 3.50 | 2.5 ने कमी |
| 43 | बीडाचे भंगार | 27.00 | 17.00 | 10.00 ने कमी |
| 44 | भटूर | 270.00 | 170.00 | 100 ने कमी |

२४ **सदर खरेदीसाठी विभागाने निश्चित केलेला अंदाजे खर्च रू. – निरंक**

**प्रस्ताव-**

**१)** ऑनलाईन प्राप्त झालेल्या ०७ निविदाधारकापैंकी अ.नं.१२ मधील क्रं.४३.बीडाचे भंगार या साहित्याचे दर, शफिक समा सय्यद व अकबर सांडेखॉ पठाण यांचे दर सारखे आलेले असल्याने दोघांनाही समान कालावधीसाठी विभागुन विक्री करता येईल.

**२)** उपरोक्त अ.क्रं १२ मधील क्रं.२१,जळालेले इले.बल्ब, टयुबबार इ. व क्रं.३०, नाराळाच्या शेंडया या साहित्यांसाठी दर प्राप्त झालेले नाहीत. सदरचे साहित्यांची वार्षिक विक्री किंमत रु.३ लाखांचे आत असलेने मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने दरपत्रक (कोटेशन) मागवुन दरपत्रकातील उच्चतम दर धारकास कार्यादेश देता येईल.

**३)** सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी ऑनलाईन प्राप्त झालेल्या ०७ निविदामधील प्राप्त दर मागील वर्षाचे (सन २०१९-२०) चे तुलनेत बहुतांश साहित्याचे दर कमी आलेले आहे. तरी उपरोक्त Online प्राप्त झालेल्या ०७ निविदाधारकांचे अ.नं.१२ मध्ये दर्शविलेले उच्चत्तम दरांबाबत निर्णय होऊन उच्चतम दरधारकास कार्यादेश देणेसाठी सदरचा विषय मा. तदर्थ (Ad-hoc ) समितीपुढे मान्यतेसाठी सादर.

**निर्णय क्र.३४३** **यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२०-२१ या आर्थिक वर्षात निरुपयोगी भंगार साहित्य विक्री करणेकामी राबविण्यात आलेल्या ई-निविदा प्रक्रियेतील प्राप्त उच्चत्तम दराने निरुपयोगी भंगार साहित्य विक्री करणेस मान्यता देण्यात आली. तसेच ज्या भंगार साहित्यासाठी समान दर प्राप्त झालेले आहेत अशा भंगार साहित्याची विक्री समान विभागुन करण्यात यावी,असे ठरले.**

**तसेच उपरोक्त प्रस्तावामध्ये नमुद केलेले जळालेले इले.बल्ब, टयुबबार व नारळाच्या शेंडया या साहित्यांसाठी दर प्राप्त झालेले नसुन सदरचे साहित्यांची वार्षिक विक्री किंमत रु.३ लाखांचे आत असल्याने मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने दरपत्रक (कोटेशन) मागवुन दरपत्रकातील उच्चतम दराने सदर साहित्याची विक्री करण्यात यावी, असे ठरले.**

**(कार्यवाही-अभिलेख कक्ष विभाग)**

---

**विषय नं.३९** **शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून इ.६वी, इ.८वी व इ.१०वी ची नैसर्गिक संख्या वाढीमुळे प्रत्येकी ०१ वाढीव तुकडी सुरु करणेस मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.१४ ( भाग ४) कर्तव्ये व अधिकार १७ (२-ढ) :- मध्ये सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास सहायय करील. तसेच, शिर्डी व अन्य ठिकाणी शैक्षणिक संस्था स्थापन करील.

प्रास्ताविक:- (अ) मा.व्यवस्थापन समितीचे दि.०४.०७.२०१९ चे सभेतील निर्णय क्र.३८३ नुसार श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर करीता शैक्षणिक वर्ष २०१९-२० पासून इ.७ वी व इ.९ वी ची प्रत्येकी ०१ वाढीव तुकडी सुरू करणेस तसेच श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील कार्यभार कमी असलेले ०३ कुशल कंत्राटी शिक्षक कन्या विद्या मंदिर विभागाकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. त्यानुसार शैक्षणिक वर्ष २०१९ -२० पासून इ.७ वी व इ.९ वी ची प्रत्येकी ०१ वाढीव तुकडी सुरू करण्यात आलेली आहे. परिणामी शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये इ.७ वी च्या अ, ब, क अशा एकुण ०३ वर्ग तुकडी असून विद्यार्थिनी संख्या १५४ तर इयत्ता ९ वी. च्या अ,ब, क अशा एकूण ०३ वर्ग तुकडी सुरू असून विद्यार्थिनी संख्या १४९ आहेत.

विषयांकित संदर्भ क्र.१ व २ अन्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून आर.टी.ई.अंतर्गत नियमानुसारविद्यार्थिनींना नवीन प्रवेश द्यावा लागत असल्यामुळे इ.८ वी व इ.१० वीच्या वर्गात नव्याने प्रवेशित होणा-या विद्यार्थीनी व मागील वर्षातील सर्व विद्यार्थिनींना पुढील वर्षात प्रवेश दयावयाचा झाल्यास विद्यार्थिनींची संभाव्य विद्यार्थिनी संख्या वाढ तसेच मागील वर्षाच्या नव्याने सुरु केलेल्या दोन तुकडयांच्या नैसर्गिक तुकडीवाढीनुसार इ.८ वीच्या विद्यार्थिनींची संख्या १५४ आहे व इ.१० च्या विद्यार्थिनींची संख्या १४९आहे त्यामुळे प्रत्येकी ०१ वाढीव तुकडी सुरू करावी लागणार आहे.

(ब) तसेच शैक्षणिक वर्ष २०१९-२०मध्ये इ.५ वीच्या विद्यार्थिनींची एकूण संख्या १२७ असून ०२ वर्ग तुकडीमध्ये विद्यार्थीनी शिक्षण घेत आहेत. शिर्डी शहरातील जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये इ.५ वी पर्यंतच वर्ग आहेत. त्यामुळे शिर्डी पसिरात असलेल्या शाळेतील शैक्षणिक वर्ष २०१९-२० मध्ये इ.५ वी मध्ये उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थीनींना आर.टी.ई.अंतर्गत नियमानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मध्ये इ.६ वीत प्रवेश देणे

क्रमप्राप्त आहे. त्यामुळे सदर विद्यार्थिनींना प्रवेश दयावयाचा झाल्यास विद्यार्थी संख्या विचारात घेता सन २०२०-२१ मध्ये इ ६ वीची ०१ वाढीव तुकडी सुरू करावी लागेल.

**संदर्भ क्र २ नुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ची संभाव्य विद्यार्थीनी संख्या खालीलप्रमाणे राहील.**

| अ.न. | इयत्ता व तुकडी | आर.टी.ई.अंतर्गत नियमानुसारविद्यार्थिनीं संख्या | एकुण पट | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ प्रस्तावित विद्यार्थिनीं संख्या |
|---|---|---|---|---|
| १ | ५ वी अ | **प्राथमिक** शाळांच्या प्रत्येक एका तुकडीत **३०** विद्यार्थी | -- | -- |
| २ | ५ वी ब | | | -- |
| **३** | **६ वी अ** | **उच्च प्राथमिक** शाळांच्या प्रत्येक एका तुकडीत **३५** विद्यार्थी | **१२७** | **६९** |
| **४** | **६ वी ब** | | | **५८** |
| **५** | **६ वी क** | | | -- |
| ६ | ७ वी अ | **उच्च प्राथमिक** शाळांच्या प्रत्येक एका तुकडीत **३५** विद्यार्थी | १२६ | ६३ |
| ७ | ७ वी ब | | | ६३ |
| ८ | ७ वी क | | | -- |
| **९** | **८ वी अ** | **उच्च प्राथमिक** शाळांच्या प्रत्येक एका तुकडीत **३५** विद्यार्थी | **१५४** | **५९** |
| **१०** | **८ वी ब** | | | **४७** |
| **११** | **८ वी क** | | | **४८** |
| १२ | ९ वी अ | **माध्यमिक** शाळांच्या प्रत्येक एका तुकडीत **४०** विद्यार्थी | १३३ | ६० |
| १३ | ९ वी ब | | | ७३ |
| १४ | ९ वी क | | | -- |
| **१५** | **१० वी अ** | **माध्यमिक** शाळांच्या प्रत्येक एका तुकडीत ४० विद्यार्थी | **१४९** | **६४** |
| **१६** | **१० वी ब** | | | **४२** |
| **१७** | **१० वी क** | | | **४३** |
| | | | **एकूण-** | **६८९** |

दि.२१/०५/२०२० रोजीचे प्रस्तावित टिपणीत खालीलप्रमाणे निर्देश देण्यात आले होते तथापी दिलेले निर्देश व त्याबाबतचा खुलासा खालीलप्रमाणे आहे.

मुद्दा क्रं.-iसद्यस्थिती ६ वी ८ वी व १० वी चा पट किती आहे. तसेच तुकडया किती आहे.

खुलासा- श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर कडिलसद्यस्थिती इयत्ता ६ वी ८ वी व १० वीची एकूण तीन वर्गाची विद्यार्थिनीची पट संख्या ६८९ आहे. व प्रत्येकी वर्गाच्या ०२ तुकडया आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२०-२१ ची संभाव्य विद्यार्थीनी संख्या खालीलप्रमाणे.

| अ.न. | इयत्ता व तुकडी | शैक्षणिक वर्ष २०२०-२१ प्रस्तावित विद्यार्थिनीं संख्या | एकुण पट | आर.टी.ई.अंतर्गत नियमानुसारविद्यार्थिनीं संख्या |
|---|---|---|---|---|
| **१** | **६ वी अ** | **६९** | **१२७** | उच्च प्राथमिक शाळांच्या प्रत्येक एका तुकडीत **३५** विद्यार्थी |
| **२** | **६ वी ब** | **५८** | | |
| **३** | **८ वी अ** | **५९** | **१५४** | उच्च प्राथमिक शाळांच्या प्रत्येक एका तुकडीत **३५** विद्यार्थी |
| **४** | **८ वी ब** | **४७** | | |
| **५** | **१० वी अ** | **६४** | **१४९** | माध्यमिक शाळांच्या प्रत्येक एका तुकडीत ४० विद्यार्थी |
| **६** | **१० वी ब** | **४२** | | |
| | | **एकूण -** | **६८९** | |

सदर वरिल तक्त्यानुसार विद्यार्थी संख्या विचारात घेता आर.टी.ई.अंतर्गत नियमानुसार शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून इयत्ता ६ वी ८ वी व १० वीची प्रत्येकी ०१ वाढीव तुकडी सुरू करावी लागेल.

मुद्दा क्रं.ii- वाढीव तुकडीसाठी शिक्षण विभागाची मान्यता घ्यावी लागेल काय ?

खुलासा-संदर्भ क्र.२ नुसार- महाराष्ट्र शासन निर्णय क्र. एसएसएन-२०१५ /प्र.क्र.१६/१५/टीएनटी-२ दि.२८ ऑगस्ट २०१५ शालेय शिक्षण व क्रिडा विभाग.निर्णयान्वये राज्यातील प्राथमिक, उच्च प्राथमिक व

माध्यमिक शाळातील विद्यार्थ्यांच्या पटसंख्येच्या आधारावर शिक्षक पदे निर्धारीत करणे, नवी शाळा सुरू करणे, वर्ग जोडणे, शाळांच्या संरचनेमध्ये बदल करणे, तुकडी मुजुर करणे, टिकवणे इ. उच्च प्राथमिक शाळांच्या विद्यार्थी संख्या१०५ पेक्षा अधिक झाल्यास प्रत्येक एका तुकडीत ३५ विद्यार्थी व एक शिक्षक अनुज्ञेय राहील व माध्यमिक शाळांच्या प्रत्येक एका तुकडीत ४० विद्यार्थी व एक शिक्षक अनुज्ञेय राहील. तरी महाराष्ट्र शासन निर्णययाची मान्यता असल्यामुळे वाढीव तुकडीसाठी शिक्षण विभागाची मान्यता घ्यावी लागणार नाही.

मुद्दा क्रं.iii- साईबाबा कन्या विद्या मंदिर विभागाकडे असण-या सर्व कंत्राटी शिक्षक व कायम शिक्षकांना पुर्ण कार्यभार आहे काय ?

खुलासा- कन्या विद्या मंदिर विभागाकडीलसर्व कंत्राटी शिक्षक व कायम शिक्षकांना पुर्ण कार्यभार आहे व सोबत शिक्षकांना पुर्ण कार्यभाराचा ( अध्यापन ) तक्ता जोडलेला आहे.

मुद्दा क्रं.iv- साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयकडे कमी कार्यभार असलेले शिक्षक आहेत काय? याबाबत प्राचार्यांचा अभिप्राय घ्यावा.

खुलासा- साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे कमी कार्यभार असलेले शिक्षकांची दि.११/०६/२०१९ ची मंजुर टीपणी असून सोबत जोडत आहे.

प्राचार्यांचा अभिप्राय- मागील वर्ष सन २०१९-२०२० मध्ये इ.११ वी मध्ये प्रवेश कमी झाल्याने विद्यार्थि संख्या कमी झालेली आहे.परिणामी शिक्षकांचा कार्यभार कमी झालेला आहे. त्यामुळे साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडील कंत्राटी शिक्षक हे अतिरिक्त होत आहेत.यामुळेकन्या विद्या मंदिरकडे कनिष्ठ महाविद्यालयाकडे कमी कार्यभार असलेले ०३ कुशल कंत्राटी शिक्षक यांना अध्यापनाचा कार्यभार उपलब्ध करून देता येईल.

विभागाची मागणी:- विषयांकित संदर्भ क्र. १ व २ नुसार प्रस्ताविकात नमुद केलेली वस्तुस्थिती विचारात घेता, (व्य.स.निर्णय क्र.३३०) श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या विभागातील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून इ. ६ वी, इ.८ वी, व इ.१० वी या वर्गासाठी प्रत्येकी ०१ वाढीव तुकडी सुरु करणेस तसेच सदर वाढीव तुकडीला अध्यापन करणेकामी ०३ वाढीव शिक्षकांची आवश्यकता भासणार आहे त्याकामी आजमितीस श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे कमी कार्यभार असलेले ०३ कुशल कंत्राटी शिक्षक यांना श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या विभागाकडे अध्यापनासाठी वर्ग करता येतील. तसेच श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर कडिल ०४ वर्ग खोल्या तात्पुरत्या स्वरुपात श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे वर्ग केलेल्या असून, त्यांच्या शाळेच्या वेळेनुसार त्यांच्या कडून त्यांना अडचण न येता वर्ग खोल्या उपलब्ध करुन घेता येईल व वर्गासाठी प्रत्येकी ०१ वाढीव तुकडी सुरु करता येईल. तसेच कनिष्ठ महाविद्यालयाकडे कमी कार्यभार असलेले ०३ कुशल कंत्राटी शिक्षक यांना अध्यापनाचा कार्यभार उपलब्ध करून देता येईल.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार अनुमान :- शालेय प्रशासनाचे दृष्टीने धोरणात्मक विषय आहे.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- मागणी परिच्छेदात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस मान्यता मिळणेकामी सदरचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेपुढे निर्णयार्थ व मान्यतेस्तव सादर करणेस, मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३४४** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या विभागातील शैक्षणिक वर्ष २०२०-२१ पासून इ.६ वी, इ.८ वी, व इ.१० वी या वर्गासाठी प्रत्येकी ०१ वाढीव तुकडी सुरु करणेस मान्यता देण्यात आली. तसेच सदर वाढीव तुकडयांना अध्यापन करणेकामी श्री साईबाबा कनिष्ठ महाविद्यालयाकडे कमी कार्यभार असलेले ०३ कुशल कंत्राटी शिक्षक यांना श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर या विभागाकडे अध्यापनासाठी वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली. श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुलकडे तात्पुरत्या स्वरुपात वर्ग करण्यात आलेल्या ०४ वर्ग खोल्या उपलब्ध करुन घेण्यात याव्यात, असे ठरले.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा कन्या विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय)**

---

**विषय नं.४०** **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील जिवनदायी आरोग्य योजना विभागाचे विशेष लेखापरिक्षण अहवालाबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी संचलित श्री साईबाबा हॉस्पिटलमधील जिवनदायी आरोग्य योजना विभागाचे विशेष लेखापरिक्षण करण्यासाठी मा.व्य.समिती सभा विषय क्र.१०५ निर्णय क्र.१०५ दि.२५.०२.२०१७.अन्वये सनदी लेखापरिक्षक मे. शिंदे चव्हाण गांधी ॲण्ड कं. चार्टर्ड अकौंटंटस् , लातूर यांची

विशेष लेखापरिक्षक म्हणून जा.नं.एसएसएसटी/एसएसबीएच/वित्त/२८/२०१७ दि.०५ एप्रिल २०१७ रोजी विशेष लेखापरिक्षण करण्याचे आदेश.अन्वये नियुक्ती करण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन त्यांनी सदरचे विशेष लेखापरिक्षण शिर्डी येथे दि.०९.०४.२०१७ तेदि.१९.०४.२०१७ पर्यत संस्थानमध्ये थांबुन पुर्ण करुनत्याचा अहवाल दि.२०.०४.२०१७ रोजी संस्थानला सादर केला आहे.

जिवनदायी आरोग्य योजना विभागाचे केलेल्या विशेष लेखापरिक्षण अहवाल खालीलप्रमाणे,

| Sr. No. | Audit Item | Brief Description | Detailed Observations | Financial impact Type | Financial impact in Rs. (if, any) |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Verification of Jeevandai Health Scheme Rule | Violation of Jeevandayi Health Scheme rules | Under the JeevandaiArogyaYojna; Hospital has performed surgery of 18984 patients where gross bill amounting of Rs. 168,78,60,959/- and sanctioned amount by JeevandaiYojna is 154,81,18,066/-. In this scheme hospital has given net charity of Rs. 6,37,66,665 at the time of dischsrge of patients. | | |
| | | | Under the JeevandaiArogyaYojna; Hospital has received short fund of Rs. 9,04,36,655/- than primary sanctioned fund till 31/03/2017. Jeevandai Department have not communicated any remark / observation for short payment / deduction of funds against primary sanctioned funds. On review of letters received from JeevandaiArogyaYojna it appears that in few cases short amount was received due to use of stents other than specified, multiple use of stents and non submission of tax invoice after giving several reminders etc. | Financial Loss | 9,04,36,655 |
| | | | As per letter of Jeevandayi Health scheme dated 19/04/2007 ; Sansthan hospital should bear expenditure in excess of sanction amount of scheme. | | |
| | | | Dy Director Health Services, Nashik had issued letter dated 01/12/2009 to sansthan for Not to use Drug Elluted Stent and use other fair quality stents. But sansthan has used Drug Elluted stent and violated the rule of scheme. | | |
| | | | We have reviewed board resolution no. 117 date 07/02/2013; it recommended to use higher cost implants of stent & allowed charity (expenses) but otherside as per above Jeevandayi Health scheme letter dated 01/12/2009 for not to use Drug Elluted stent. Though board has allowed to do so. It was resulted into sudden increase in expenses (charity) i.e. increase in the short amount than sanctioned amount under JeevandaiYojna. | | |
| | | | We have reviewed manual register maintained in billing department for Jeevandayi patients where short amount received then sanctioned amount due to violation of rules with regard to..1) 2 Drug Eluted Stents used from 25/06/2013 to 25/11/2013 for many patients.2) 3 Stents (2 DES & 1 BM) used from 25/06/2013 to 25/11/2013 for for many patients.3) 3 Drug Elluted Stents used from 25/06/2013 to 25/11/2013 for for many patients. | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 2 | Verification of Charity to Poor Patient | Sanction of Management Committee not taken for treating short payment under JeevandaiYojna as 'Charity to Poor Patient'. | We have reviewed yearly statements of fund received from JeevandaiYojna for the Financial year 2007-08 to 2016-17 and It is observed that<br>i) Hospital has received short fund of Rs. 9,04,36,655/- than primary sanctioned fund under JeevandaiYojna. | | |
| | | | ii) Hospital has recorded short payment / deduction of funds as 'Charity to Poor Patient' but in this regard sanction of Management Committee has not been taken. **Annexure 'A'** is attached herewith for your reference. | | |
| 3 | Verification of Bills submitted under JeevandaiYojna | Statement of cardiac patient with files submitted to Deputy Director of Health Service, Nashik much later from date of surgery performed. | We have reviewed statements of cardiac patient bills submitted to Deputy Director of Health Service, Nashik for the Financial year 2007-08 to 2014-15 and It is observed that i) Most of the bills have been submitted to Health Service much later i.e beyond 6 months, one year, one and half year and two years from the date of surgery of Patients performed. For submission of bills at early so many reminder is received from Health Service, Nashik but hospital has not submitted in time. | | |
| | | | ii) Hospital has received claim beyond reasonable time due to delay in submission of bills and resubmission of corrected bills to Deputy Director of Health Service, Nashik. | | |
| | | | iii) Due to delay in receiving funds Sansthan has lost opportunity interest if funds invetedelesewhere. Interest is calculated after giving 90 days grace period from the date of bill to date of submission of original bill to Dy. Director of Health Service. | Opportunity loss of Interest | Apprx. 9,00,00,000 |
| | | | iv) We have mentioned few cases on test check basis where submission is much later from the date of surgery performed. **Annexure 'B'** is attached herewith for your reference. | | |
| 4 | Verification of Bills submitted under JeevandaiYojna | Non Re-submission of Bills of 957 Cardiac Patient under JeevandaiArogya Yojana in due time. | We have reviewed circulars, other record and files of JeevandaiYojna and It is observed that i) JeevandaiYojna has come to end with effect from 21/11/2013 vide circular of Deputy Director of Health Service dated 26/11/2013. | Financial Loss | 3,22,83,147 |
| | | | ii) As per para 4 of said curcular; Due date is given i.e. 30/11/2013 for submission of cardiac patient bills under JeevandaiArogyaYojna. | | |
| | | | iii) Hospital has submitted periodically bills of all paitient up to 20/08/2014; Though JeevandaiArogyaYojna come to end with effect from 21/11/2013 and last due date is 30/11/2013. | | |
| | | | iv) Health Department, Nashik has returned bills of 1379 patient dated 28/10/2014 for making the correction in bills and requiring the additional documents. | | |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | v) Further Health Service department intimated via mail dated 24/11/2014 that last date is 25/11/2014 for resubmission of bills. | | |
| | | | vi) Hospital has made compliance of 370 bills and submitted to Deputy Health Service dated 25/11/2014. Hospital also submitted 52 bills amounting of Rs. 41,50,000/- dated 16/03/2015 which relates to surgery performed during 21/11/2013 to 25/11/2013 i.e. after end of JeevandaiYojna Scheme. | | |
| | | | vi) But hospital has failed to resubmit the 957 bills on stipulated time i.e. 25/11/2014 amounting of Rs. 3,22,38,147/-. | | |
| | | | vii) Further hospital has made request for accepting the delayed bills but said request is rejected by Maharashtra Government vide letter dated 03/01/2015 stating that reasonable time is given for submission i.e one year from closure of scheme but you have failed to submit bills hence request is rejected. | | |
| | | | viii) Hence claim of Hospital of Rs. 3,22,83,147/- is not valid against receivable amount of Rs. 7,58,17,009/- from JeevandaiArogyaYojna. Hence it will be considered as financial loss of Sansthan. **Annexure 'C'** is attached herewith for your reference. | | |
| 5 | Verification of Receivable Amount from JeevandaiArogyaYojna | | We have reviewed books of accounts of Saiababa Hospital with regard to receivable amount from Health Service, Nashik under JeevandaiArogyaYojna and also obtained confirmation for receivable amount from Health Service Nashik, where it is observed that.. | | |
| | | | I) Amount receivable under JeevandaiArogyaYojna as per Hospital Books as on 31/03/2017 of 1506 patients. | 7,58,17,009 | |
| | | | II) Hospital will not receive the amount of 957 patients due to non submission of Bills in time. Reference Point No. 4 of said report. | 3,22,83,147 | |
| | | | III) Net Amount receivable (I-II) of 549 Patients | 4,35,33,862 | |
| | | | IV) Amount receivable under JeevandaiArogyaYojna As per confirmation of Health Service, Nashik is Rs. 3,04,21,349/- against sanctioned amount of Rs. 4,02,54,000/- of 476 patients | 4,02,54,000 | |
| | | | V) Amount not receivable under JeevandaiArogyaYojna of 73 Patients. Hence it will be treated as Financial Loss. | 32,79,862 | 32,79,862 |
| | | | **Total** | | 21,59,99,664/- |

(अक्षरी रु. एकविस कोटी एकोणसाठ लाख नव्यान्नव हजार सहाशे चौसष्ठ मात्र.)

जिवनदायी योजनेच्या विशेष लेखापरीक्षण अहवालामध्ये नमुद असलेल्या मुद्यांवर थोडक्यात विभागाचा अभिप्राय खालीलप्रमाणे

**विशेष लेखापरिक्षण अहवाल मुद्दा क्र. १ व २**

१. श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये सन २००७ ते नोव्हेंबर २०१३ अखेर (**JD** १८,९८४ + **NRHM** २७) एकुण १९,०११/- रुग्णांच्या शस्त्रक्रीया करण्यात आलेल्या असुन सदर रुग्णांच्या प्राथमिक मंजुरी आदेशास अनुसरुन रक्कम रु. १५५,००,०६,७५९/- (**JD** १५४,८१,१८,०६६/-+**NRHM** १८,८८,६९३/-) इतकी रक्कम मंजुर झालेली होती.

२. उपरोक्त १९,०११ रुग्णांपैकी एकुण १७,५०२/- रुग्णांची (**JD** १७,४८०+**NRHM** २२) प्राथमिक मंजुरी आदेश रक्कम रु.१४७,४०,०४,९३५/- रकमेपैकी रक्कम रु.१३८,३५,५४,४०७/- इतकी रक्कम संस्थानला प्राप्त झालेली आहे.

३. उपरोक्त मुद्दा क्र. २ नुसार प्राथमिक मंजुरी आदेश रकमेपेक्षा रक्कम रु.९,०४,५०,५२८/- इतकी रक्कम शासनाकडुन कमी प्राप्त झालेली आहे. परंतु विशेष लेखापरिक्षण अहवालामध्ये वित्त विभागाचे लेखापुस्तकांमध्ये नमुद असलेल्या रकमेपेक्षा रु. १३,८७३/- (JV No. 512/31.03.2015) इतकी रक्कम कमी गृहीत धरुन रक्कम रु.९,०४,३६,६५५/- दर्शविलेली आहे.

४. विशेष लेखापरिक्षण अहवाल मुद्दा क्र. १ व २ मध्ये दर्शविलेप्रमाणे मार्च २०१७ अखेर एकुण ५,८९५ इतक्या रुग्णांची रु.९,०४,५०,५२८/- इतकी रक्कम शासनाकडुन प्राथमिक मंजुरी रकमेपेक्षा कमी प्राप्त झालेली आहे. शस्त्रक्रियांसाठी वापरण्यात येणारे एक Octopus हे साधारणत: १० रुग्णांना व एक Balloon, Oxygenators हे साधारणत: ५ ते ६ रुग्णांना वापरण्यात येत असल्याने ज्या बिलांसोबत सदरच्या साधन सामुग्रीचे टॅक्स इनव्हाईसेस जोडता येणे शक्य होणार नाही अशा बिलांमधुन टॅक्स इनव्हाईसेस अभावी अनुज्ञेय होऊ शकत नसलेली रक्कम कपात करुन उर्वरीत रक्कम अदा करण्यास जा.क्र.एसएसएस/ एसएसबीएच/एमडी/ ८०६१/२०१४ दिनांक २४ मार्च २०१४ नुसार तत्कालीन वैद्यकीय संचालक यांनी संमती दिलेली होती.

**विशेष लेखापरिक्षण अहवाल मुद्दा क्र. ३**

१. बिले सादर करणेसाठी ९० दिवसांचा कालावधी गृहीत धरुन त्यानंतर झालेल्या विलंबास अनुसरुन लेखापरिक्षकांनी अंदाजे व्याज रक्कम दर्शविलेली आहे.

**विशेष लेखापरिक्षण अहवाल मुद्दा क्र. ४**

१. त्रुटी पुर्तता करण्यासाठी परत आलेल्या एकुण फाईल्सपैकी ९५७ रुग्णांची रक्कम रु.३,२२,८३,१४७/- रकमेच्याफाईल्स मा. उपसंचालक, नाशिक यांचे कार्यालयास फेरसादर करणेसाठी तत्कालीन जनसंपर्क अधिकारी यांनी वेळोवेळी पत्रव्यवहार केलेला होता परंतु मा. उपसंचालक, नाशिक यांचे कार्यालयाने मुदतीत फाईल्स सादर न झाल्याचे कारण देत सदरच्या फाईल्स स्विकारल्या नाही.

**विशेष लेखापरिक्षण अहवाल मुद्दा क्र. ५**

१. जिवनदायी योजनेअंतर्गत १,५०६ रुग्णांची प्राथमिक मंजुरी आदेशास अनुसरुन रक्कम रु.७,५८,१७,००९/- इतकी रक्कम विशेष लेखापरिक्षण कालावधीपर्यंत येणे बाकी होती

२. जिवनदायी योजनेअंतर्गत १,५०६ रुग्णांपैकी लेखापरिक्षण अहवालानुसार एकुण ४७६ रुग्णांची प्राथमिक मंजुरी आदेश रक्कम रु.४,०२,५४,०००/- दर्शविलेली आहे, परंतु लेखापुस्तकांतील नोंदीप्रमाणे सदर रुग्णांची प्राथमिक मंजुरी रक्कम रु.३,८३,०३,०१०/- इतकी असुन एप्रिल २०१८ मध्ये रु.३,०४,२१,३४९/- इतकी रक्कम प्रत्यक्षात प्राप्त झालेली असुन प्राथमिक मंजुरीपेक्षा २ रुग्णांची रु.१६,२४९/- इतकी रक्कम जास्त प्राप्त झालेली आहे व ४७४ रुग्णांची रक्कम रु.७८,९७,९१०/- इतकी रक्कम शासनाकडुनच कमी प्राप्त झालेली आहे.

३. उपरोक्त मुद्दा क्र. १ व २ (३) मध्ये नमुद केल्याप्रमाणे रक्कम रु.९,०४,५०,५२८/- व मुद्दा क्र. ५ (२) ची रक्कम रु.७८,९७,९१०/- अशी एकुण रक्कम रु.९,८३,४८,४३८/- इतकी रक्कम आजतागायत प्राथमिक मंजुरी आदेशापेक्षा शासनाकडुन कमी प्राप्त झालेली आहे.

याबाबत मा. उपसंचालक, नाशिक यांनी शासन निर्णयान्वये गठीत करण्यात आलेल्या विशेषज्ञ समितीच्या बैठकीमध्ये सदस्याद्वारे बिले तपासण्यात येऊन सादर केलेल्या देयकामधील अनुज्ञेय असलेली रक्कम मंजुर करुन रक्कम अदा केलेली आहे, असे जा.क्र. उपसंआसे/लेखा-५/जिवनदायी/१०७२५-२६/२०१८ दिनांक ९ मार्च २०१८ पत्राद्वारे कळिवलेले आहे.

४.	जिवनदायी योजनेअंतर्गत १,५०६ रुग्णांपैकी लेखापरिक्षण अहवालाप्रमाणे ९५७ रुग्णांची बिले विहीत वेळेत फेरसादर झालेली नसल्याने रु.३,२२,८३,१४७/- तसेच ७३ रुग्णांच्या फाईल लेखापरिक्षणासाठी उपलब्ध झालेल्या नसल्याने रु.३२,७९,८६२/- अशी एकुण रक्कम रु.३,५५,६३,००९/- इतकी रक्कम संस्थानला प्राप्त होणार नसल्याने आर्थिक नुकसान होणार आहे असे नमुद केलेले आहे, परंतु लेखापुस्तकातील नोंदीप्रमाणे एकुण १०३० रुग्णांची प्राथमिक मंजुरी आदेश रक्कम रु. ३,७५,१३,९९९/- इतकी रक्कम संस्थानला प्राप्त होणार नाही.

जिवनदायी आरोग्य योजनेचा उपरोक्त विशेष लेखापरिक्षण अहवाल अवलोकनार्थ मा. व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३४५** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील जिवनदायी आरोग्य योजना विभागाचे विशेष लेखापरिक्षण अहवालाचे समिती सदस्य मा.श्री.दिलीप स्वामी साहेब यांनी अवलोकन करुन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेपुढे सादर करावा, असे ठरले.**

**(कार्यवाही-श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४१** **श्री साईनाथ रुग्णालयातील नव्याने कार्यान्वीत होणाऱ्या विभागाकरीता ऑक्सीजन व नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेकामी रु.९,८१,०५९/-चे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम २००४ मधील तरतूद :- १७ (२) ण

व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-

प्रास्ताविक:- श्री साईनाथ रुग्णालयातील तिस-या मजल्याचे काम पूर्ण झालेले असून तेथे Ortho OT & Ward, Male Medical Ward, Female Medical Ward आणि Deluxe Room इ. विभाग नव्याने कार्यान्वित होणार असून सदर वार्ड / विभागामध्ये ऑक्सीजनव नायट्रस गॅसच्या पाईपलाईनची आवश्यकता लागणार आहे. त्यानुसार श्री साईनाथ रुग्णालयातील दि.१६/०३/२०२० चे मागणीपत्रकान्वये ऑक्सीजनव नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेची मागणी केलेली आहे. सदरऑक्सीजनव नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेकामी येणा-या अंदाजे खर्चाचा करीता बायोमेडीकल विभागाकडून दोन पुरवठाधारकांचे कोटेशन प्राप्त झाले आहे.

त्यानुसार दोन पुरवठाधारकांचे प्राप्त झालेले कोटेशनचे दरानुसार सरासरी अंदाजे किंमत काढण्यात येऊन त्यानूसार श्री साईनाथ रुग्णालयातील वार्ड / विभागाने मागणी केलेले ऑक्सीजनव नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेकामी प्रस्ताव तयार करण्यात आलेला आहे.

त्याचा तपशील खालील प्रमाणे –

| Sr. No. | Description | Qty | Himalaya Surgical, Kopargaon | United Services, Kalyan West | Total Amt | Avg Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 22mm Copper pipe 0.9mm thickness | 200 MTR | 767.00 | 684.40 | 1451.40 | 725.70 | 145140.00 |
| 2 | 15mm Copper pipe 0.9mm thickness | 350 MTR | 649.00 | 472.00 | 1121.00 | 560.50 | 196175.00 |
| 3 | 22mm Isolation Valve | 6 Nos. | 2124.00 | 1652.00 | 3776.00 | 1888.00 | 11328.00 |
| 4 | 15mm Isolation Valve | 12 Nos. | 1770.00 | 1180.00 | 2950.00 | 1475.00 | 17700.00 |
| 5 | Medical gas outlets front loaded din standard Or BS standard | 60 Nos. | 2360.00 | 1947.00 | 4307.00 | 2153.50 | 129210.00 |
| 6 | 3 Gas Zonal Value Box | 2 Nos. | 10030.00 | 8850.00 | 18880.00 | 9440.00 | 18880.00 |
| 7 | 2 Gas Zonal Value | 2 | 9440.00 | 7670.00 | 17110.00 | 8555.00 | 17110.00 |

| Sr. No. | Description | Qty | Himalaya Surgical, Kopargaon | United Services, Kalyan West | Total Amt | Avg Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Box | Nos. | | | | | |
| 8 | 3 Gas Digital Alarm System | 2 Nos. | 23010.00 | 21240.00 | 44250.00 | 22125.00 | 44250.00 |
| 9 | 2 Gas Digital Alarm System | 2 Nos. | 21830.00 | 17700.00 | 39530.00 | 19765.00 | 39530.00 |
| 10 | BPC Flow meter with Humidifier Bottle | 30 Nos. | 1298.00 | 1121.00 | 2419.00 | 1209.50 | 36285.00 |
| 11 | Vacuum Jar 600 unit Ml for Word | 25 Nos. | 1711.00 | 1475.00 | 3186.00 | 1593.00 | 39825.00 |
| 12 | Vacuum jar unit 1000ml for special room | 5 Nos. | 2183.00 | 1947.00 | 4130.00 | 2065.00 | 10325.00 |
| 13 | Suction Trolley with 2000 x 2 ml jar & central controller | 2 Nos. | 1121.00 | 8850.00 | 9971.00 | 4985.50 | 9971.00 |
| | | | | **Total Amt. in Rs.** | | | **715729.00** |
| | **AMC 1st Year** | | 62370.00 | 19555.00 | 81925.00 | 40962.50 | 40962.50 |
| | **AMC 2nd year** | | 62370.00 | 19555.00 | 81925.00 | 40962.50 | 40962.50 |
| | **AMC 3rd Year** | | 77962.00 | 32592.00 | 110554.00 | 55277.00 | 55277.00 |
| | **AMC 4tj Year** | | 77962.00 | 32592.00 | 110554.00 | 55277.00 | 55277.00 |
| | **AMC 5th Year** | | 93555.00 | 52147.00 | 145702.00 | 72851.00 | 72851.00 |
| | | | | **Total Amt AMC in Rs.** | | | **265330.00** |
| | | | | **Total Amt Work & AMC** | | | **981059.00** |

त्यानुसार सदर ऑक्सीजनव नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेकामी पूर्णांकित रु.९,८१,०५९/- (अक्षरी रक्कम रु. नऊ लाख एक्याऐंशी हजार एकोणसाठ मात्र) इतका खर्च अपेक्षित आहे.

मागणी– श्री साईनाथ रुग्णालयातील वार्ड / विभागाने मागणी केलेले ऑक्सीजनव नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेची मागणी पत्रकान्वये मागणी केलेली आहे.

संस्थान अधिनियम/ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान:-

१) अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालये चालविण्यात येतात.

२) शासकीय विभागानी करावयाच्या कार्यालयीन खरेदीसाठी कार्यपध्दतीची नियमावली नुसार शासन निर्णय क्र. भांखस – २०१४ / प्र.क्र. ८२ / भाग – ३ / उद्योग – ४, दि. १ डिसेंबर २०१६ अन्वये परिच्छेद ३.२. – नियमपुस्तिकेनुसार खुली स्पर्धात्मक निविदा प्रक्रिया पार पाडण्यासाठी ज्या निविदांचे अंदाजित मुल्य रू.३,००,०००/- पेक्षा जास्त आहे अशा सर्व निविदा ई-निविदा पध्दतीने काढण्यात याव्यात. संबंधित विभागांना

रु.५ हजार पर्यंतच्या किंमतीच्या वस्तु निविदा/ दरपत्रके न मागविता थेट जागेवरखरेदी करण्याची मुभा देण्यात आली आहे. अशा वस्तुंची एकुण खरेदी त्या त्या अर्थिक वर्षात रुपये ५०,०००/- पेक्षा जास्त नसावी.

विभागाचा अभिप्राय/स्पष्ट मत:- श्री साईनाथ रुग्णालयातील तिस-या मजल्याचे काम पूर्ण झालेले असून तेथे Ortho OT & Ward, Male Medical Ward, Female Medical Ward आणि Deluxe Room इ. विभाग नव्याने कार्यान्वित होणार आहेत. सदर वार्ड / विभागामध्ये ऑक्सीजनव नायट्रस गॅसच्या पाईपलाईनची आवश्यकता आहे. त्यानुसार श्री साईनाथ रुग्णालयाने मागणीपत्रकान्वये ऑक्सीजनव नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेची मागणी केलेली आहे. सदर ऑक्सीजनव नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणे कामीची अंदाजे किंमत ३ लाखापेक्षा जास्त आहे त्यामुळे सदर काम विहीत पध्दतीने ई निविदा मागवून खरेदी करून देण्यास हरकत नाही असे मत आहे.

तरी श्री साईनाथ रुग्णालयातील वार्ड / विभागाने मागणी केलेले ऑक्सीजनव नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेकामी अंदाजे किंमत ३ लाखापेक्षा जास्त आहे त्यामुळे सदर काम विहीत पध्दतीने ई निविदा मागवून करण्यास व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.९,८१,०५९/- (अक्षरी रक्कम रु. नऊ लाख एक्याऐंशी हजार एकोणसाठ मात्र) चे खर्चास मान्यता असावी.

**निर्णय क्र.३४६** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयातील नव्याने कार्यान्वीत होणाऱ्या विभागाकरीता ऑक्सीजन व नायट्रस गॅसच्या पाईपलाईनचे काम करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.९,८१,०५९/-मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४२** **ज्युनिअर रेडीओलॉजीस्ट पदाची नेमणूक सुरु ठेवणेबाबत डॉ.राजबाला निकम यांचे दि.१०.०४.२०२० रोजीचे अर्जाबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ. राजबाला रविंद्र निकम यांचा दि. १०/०४/२०२० रोजीचा अर्ज प्राप्त झाला असुन त्यामध्ये खालीलप्रमाणे नमुद आहे.

I Dr. Rajbala R. Nikam is working in Dept of Radiology since 2016. My recent order end on 2nd Aprl 2020 and as I want to continue as Jr. Radiologist on same post. So kindly allow me and do needful.

मा. व्यवस्थापन समिती दि. ०८/०१/२०१९ रोजीचे सभेतीलनिर्णय क्र. १४ नुसार ,"यावर सविस्तर चर्चा होऊन उपरोक्त प्रस्तावात नमुद वैद्यकीय अधिकारी यांना कंत्राटी पद्धतीने व एक फिजीओथेरपिस्ट यांना ठेकेदारामार्फत त्यांचे नेमणूक संपुष्टात येत असल्याचे लगतचे दिनांकापासुन ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पद्धतीने देण्यात येत असलेल्या एकत्रितमानधनावर वैद्यकीय संचालक/वैद्यकीय अधिक्षिका यांचे समाधानकारक कामकाजाचे अहवालानुसार तसेच संबंधित वैद्यकीय अधिका-यांकडून पुन्हा नेमणूक मिळणेचे मागणीपत्रास अधिन टप्प्याटप्याने ११ महिने पुर्ण होणेपुर्वी पासुन चार दिवसांचा ब्रेक देऊन पूर्वीच्या आदेशाप्रमाणे नेमणूका देण्यास मान्यता देण्यात आली."

उपरोक्त निर्णयानुसार डॉ. राजबाला रविंद्र निकम यांची दि. ०३/०५/२०१९ पासुन पुढे कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने कालावधीसाठी श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ज्युनिअर रेडीओलॉजिस्ट पदावर नेमणूक करण्यात आली होती.त्यानुसार त्या दि. ३/५/२०१९ रोजी कामावर हजर झाल्या.

तदनंतर, डॉ. राजबाला रविंद्र निकम यांनी खालीलप्रमाणे रजा घेतल्या आहेत.

| अ.नं. | कालावधी | शेरा |
|---|---|---|
| ०१. | दि. २७/०५/२०१९ ते दि. २६/०८/२०१९ ९१ दिवस | प्रेगन्ससी काळात आजारी असल्याने विनावेतन |
| ०२. | दि. २७/०५/२०१९ ते दि. ३१/०३/२०२० अखेर २१६ | अकार्यदिन |

दि. ३१/०३/२०२० नंतर आजपर्यंत डॉ. राजबाला निकम रुग्णालयात कामावर आलेल्या नसुन त्यांचे नेमणुक चालु ठेवण्याचे उपरोक्त अर्जावर प्र. वैद्यकीय संचालक यांनी Put up a note in detail असा अभिप्राय दिलेला आहे.

डॉ. राजबाला निकम व इ.९ वैद्यकीय अधिका-यांचा ११ महिने कंत्रटी नेमणूकीचा कालावधी दि.०२/०४/२०२० रोजी संपुष्टात येत असल्याने डॉ. निकम यांचे व्यतिरिक्त इतर ०९ वैद्यकीय अधिका-यांचे पुन्हा नेमणूक मिळणेबाबतचे पत्र प्राप्त झाल्याने तसेच सदर पत्रावर वैद्यकीय संचालक / वैद्यकीय अधिक्षिका

यांनी त्यांचे समाधानकारक कामकाज असल्याबाबत अभिप्राय दिला असल्याने संबंधित ०९ वैद्यकीय अधिका-यांच्या मा.व्यवस्थापन समिती दि. ०४/१२/२०१९ रोजीचे सभेतील निर्णय क्र. ५७२ नुसार, त्यांचे नेमणूक संपुष्टात असल्याचे लगतचे दिनांकापासुन ४ दिवस सेवाखंडीत करुन ११ महिने कालावधीसाठी तात्पुरत्या स्वरुपात कंत्राटी पद्धतीने सध्या देण्यात येतअसलेल्या एकत्रित मानधनावर वैद्यकीय संचालक/ वैद्यकीय अधिक्षिका यांचे समाधानकारक कामकाजाचे अहवालानुसार तसेच संबंधित वैद्यकीय अधिका-यांकडून पुन्हा नेमणूक मिळणेचे मागणीपत्रास अधिन राहुन दि.३०/०३/२०२० रोजीचे टिपणी अन्वये नेमणूक आदेश देणेत आले आहेत.

डॉ.राजबाला निकम यांची प्रेगनन्सी रजा (अकार्यदिन विनावेतन रजा दि. ३१/०३/२०२० रोजी संपलेली आहे. त्यांची ११ महिने कालावधीची नेमणूक दि.०२/०४/२०२० रोजी संपुष्टात आलेली आहे. त्यांचे पुन्हा नेमणुक मागणी पत्र दि.१०/०४/२०२० रोजी प्राप्त झाले आहे. त्यात कधी जॉईन करता येईल याचा उल्लेख नाही.

तरी, डॉ.राजबाला रविंद्र निकम यांचा दि. १०/०४/२०२० रोजीचा अर्ज प्राप्त झाला असुन त्याबाबत निर्णय होणेस विनंती.

निर्णयास्तव सादर.

**निर्णय क्र.३४७** **यावर सविस्तर सविस्तर होऊन, डॉ. राजबाला रविंद्र निकम यांची श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये ज्युनिअर रेडीओलॉजिस्ट यापदावर कंत्राटी पद्धतीने तात्पुरत्या स्वरुपात ११ महिने कालावधीसाठी नेमणूक करण्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**विषय नं.४३** **श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये एप्रिल २०२० महिन्यात वैद्यकीय बिलात देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१९,२२,८९८/-ची नोंद घेऊन खर्चास मान्यता मिळणेबाबत**.

**प्रस्ताव-** श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकिय बिलात सवलत देण्या संबंधित मा.व्य.स.निर्णय क्र.५१९/दि.२४.०७.२०११ संमत झाला आहे. वैद्यकिय बिलात सवलत देण्याचे अधिकार उप.वै.संचालक/वै.संचालक यांना देण्यात आलेले आहेत त्यांचे गैर हजेरीत वै.प्रशासक/जनसंपर्क अधिकारी यांना अधिकार सुपुर्त करण्यात येऊन रुग्णांना मासिक वैद्यकिय बिलात सवलत देण्यात येते.

सोशल वर्कर हे रुग्णांची आर्थिक परिस्थीती जाणून घेतात व आवश्यक कागदपत्रांसह सवलत मंजुरी करीता प्रस्तावीत करतात.अशा प्रकारे हॉस्पिटलमध्ये वैद्यकिय बिलात सवलत देण्याकरीता स्वतंत्र विभाग कार्यरत आहे. निर्णय क्र.५६४/२६.०६.२०१४ अन्वये प्रत्येक महिन्यात देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मा.कार्यकारी अधिकारी यांची मान्यता घेण्यात येऊन आर्थिक वर्षाच्या शेवटी एकत्रित अहवाल मा.व्य.स.चे सभे समोर नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावा असे ठरले आहे. माहे सप्टेंबर २०१७ मध्ये देण्यात आलेल्या वैद्यकिय सवलतीस मान्यतेचे प्रस्तावावर मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दर महा मा.व्य.समिती सभेसमोर सादर करण्यास शेरा दिला आहे. त्याप्रमाणे माहे **एप्रिल २०२०**मध्ये श्री साईबाबा हॉस्पिटलला ओपीडी रुग्ण **३,८८३** व **३१७** आयपीडी रुग्णांपैकी **५१९**ओपीडी व **१३७**आयपीडी रुग्णांना वैद्यकिय बिलात एकुण **रु.१७,६४,२९८/-** इतकी सवलत देण्यात आली व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय बिलात सवलत देण्या संबंधीत मा.व्य.स.निर्णय क्रं.३४६/दि.१८-१९.०८.२००१ संमत झाला आहे, जा.नं.एसएसएस/एसएसएच/३३१/२०१७ दि.३०.०३.२०१७ आदेश. दि.०६.०३.२०१० ची सिकल सेल आजाराच्या रुग्णांना मोफत रक्त देणेबाबत टिपणी प्रमाणे एकुण **१२३**रुग्णाना रक्कम **रु.१,५८,६००/-** इतकी मोफत/सवलत देण्यात आली आहे. सवलत/मोफतचे विवरण खालील प्रमाणे-

(अ) **श्री साईबाबा हॉस्पिटल**

| **अ.नं.** | **रुग्णांची गटवारी** | **लाभार्थी संख्या** | **एकुण बिल रक्कम** | **बिलापोटी मिळालेली रक्कम** | **बिलात दिलेली सवलत** |
|---|---|---|---|---|---|
| १ | गरीब/दारिद्रय रेषेखालील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ३९ | ३,४७,२८४/- | - | ३,४७,२८४/- |
| २ | आर्थिक दृष्टया दुर्बल घटकातील रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | १०१ | ९,४८,८३७/- | ३,६७,४४०/- | ५,८१,३९७/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३ | सकृत दर्शनी गरीब रुग्णांना दिलेली सवलत रक्कम | ५ | १,४४,४७४/- | ४२,०००/- | १,०२,४७४/- |
| ४ | कुत्रा, साप, माकड चावलेले रुग्ण, साई भक्त, साध्वी कन्या कुमारी, आश्रम, डायलेसिस, हिमोफिलीया, शालेय पोशन आरोग्ययोजना इ. | २५० | ६,४६,८१७/- | ३,१२,७१८/- | ३,३४,०९९/- |
| ५ | महात्मा फुले आरोग्या योजना आरोग्य योजना आयपीडी रुग्णांना दिलेली सवलत | ४५ | ११,१३,६४९/- | ८,०३,०००/- | ३,१०,६४९/- |
| ६ | महात्मा फुले आरोग्या योजना ओपीडी रुग्णांना दिलेली सवलत | २१६ | ८८,३९५/- | - | ८८,३९५/- |
| | **एकुण** | **६५६** | **३२,८९,४५६/-** | **१५,२५,१५८/-** | **१७,६४,२९८/-** |

**(ब) श्री साईनाथ रक्तपेढी**

| **अ.नं.** | **रुग्णांची गटवारी** | **लाभार्थी संख्या** | **एकुण बिल रक्कम** | **बिलापोटी मिळालेली रक्कम** | **बिलात दिलेली सवलत** |
|---|---|---|---|---|---|
| **१** | थॅलॅसिमिया | ४३ | ५५,४००/- | - | ५५,४००/- |
| **२** | हिमोफिलीया | १ | ८००/- | - | ८००/- |
| **३** | सिकल सेल ॲनेमीया फ्रि | ० | - | - | - |
| **४** | फ्रि डन बाय एमएडी/एमएस | ९ | १०,८००/- | - | १०,८००/- |
| **५** | व्हॉलंटरीब्लड डोनेशन फ्रि | १५ | १,८००/- | - | १,८००/- |
| **६** | महात्मा फुले आरोग्या योजना | १६ | २७,४००/- | - | २७,४००/- |
| ७ | संस्थान एम्प्लॉयी फ्रि | ३ | ६,८००/- | - | ६,८००/- |
| ८ | कॉन्ट्रक्ट एम्प्लॉयी फ्रि | २ | ३,०००/- | - | ३,०००/- |
| ९ | श्री साईनाथ हॉस्पिटल फ्रि | ३४ | ५२,६००/- | - | ५२,६००/- |
| | **एकुण** | १२३ | १,५८,६००/- | - | १,५८,६००/- |
| | **एकुण अ+ब** | **७७९** | **३४,४८,०५६/-** | **१५,२५,१५८/-** | **१९,२२,८९८/-** |

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये एप्रिल २०२० मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१९,२२,८९८/- ची नोंद घेऊन दिलेल्या सवलतीस मान्यतेसाठी मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे सादर.

**निर्णय क्र.३४८** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटल व श्री साईनाथ रक्तपेढीमध्ये माहे एप्रिल-२०२० मध्ये वैद्यकिय बिलात सोशल वर्कर विभागामार्फत विहित पध्दतीने देण्यात आलेली सवलत रक्कम रु.१९,२२,८९८/- ची नोंद घेण्यात येऊन त्यास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही- श्री साईबाबा हॉस्पिटल)**

---

**यानंतर आजचे तदर्थ (Ad-hoc) समिती सभेमध्ये आयत्या वेळी खालील विषयांवर निर्णय घेण्यात आले.**

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०१** **देणगीदार साईभक्तांना देणगी काऊंटरवर द्यावयाच्या प्रस्तावीत सुविधांबाबत.**

**प्रस्ताव-** श्री क्षेत्र शिर्डी येथे, श्री साईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातुन दररोज हजारो साईभक्त शिर्डीत दाखल होत असतात. अश्याप्रकारे जगाच्या कानाकोप-यातुन येणा-या साईभक्तांची दिवसेंदिवस शिर्डीमध्ये मोठया प्रमाणात गर्दी वाढत आहे. श्रींचे यथोचित दर्शन झाल्यानंतर साईभक्तांच्या मनाला मोठया प्रमाणात अत्मिक समाधान लाभते. त्यामुळे साईभक्तांना जणुकाही मनातील सर्व इच्छा आकांशा पुर्ण झाल्याचा प्रत्यय शिर्डीत आल्यावर मिळतो. श्रींचे दर्शन झाल्यानंतर साईभक्त हे आनंदी आणि प्रसन्न मुद्रेने मंदीरातुन बाहेर पडल्यावर, आपणही श्री

साईबाबांना काहीतरी यथोचित देणगी स्वरुपात (रोख रक्कम / चेक/ डी डी, परकीय चलन, मौल्यवान वस्तु, सोने चांदी, विविध रंगांची वस्त्रे वगैरे) अर्पण करावी, अशी प्रत्येक साईभक्ताची मनोमन भावना असते. त्यामुळे श्रींना मनोभावे दक्षिणा अर्पण करण्यासाठी श्री साईभक्त संस्थानचे देणगी कांऊन्टरवर जाऊन आपआपल्यापरीने यथाशक्ती देणगी देत असतात.

त्यास अनुसरुन, जे साईभक्त संस्थानला रोख स्वरुपात, वस्तुरुपाने, चेक/डिडि, ऑनलाईन, मनिऑर्डर, डेबीट/क्रेडीट कार्डव्दारे रक्कम रु.२५ हजार व त्यापेक्षा जास्त रक्कम देणगी देतात, त्यांना २० ग्रॅम वजनाची चांदीची पादुका १ नग व इतर वस्तु सप्रेम भेट देऊन संस्थानमार्फत गौरव करण्याबाबतचा **प्रस्ताव दि.३०/११/२०१६ रोजी झालेल्या मा.व्यपस्थापन समितीचे सभेसमोर सादर करण्यात आलेला होता. त्यावर निर्णय क्रं.८७३ अन्वये पुढीलप्रमाणे निर्णय झालेला आहे.“ रक्कम रु.२५,०००/- व त्यापुढील रककमेची /वस्तु साहित्याची देणगी देणा-या साईभक्तास २० ग्रॅम वजनाच्या चांदीच्या श्री साई पादुका तसेच साईचरित्र ग्रंथ व एक थ्री डी फोटो प्रसादरुपाने देण्यात यावा, असे ठरले आहे.”**

तदनंतर, श्री साईबांबाना अर्पण केलेल्या वस्त्रांच्या विनियोगाबाबत दि.२२/०८/२०१८ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन समितीच्या सभेसमोर प्रस्ताव सादर करण्यात आला असता त्यावर निर्णय क्रं.५१५ अन्वये, पुढील प्रमाणे निर्णय झालेले आहे. ‘‘ श्रींना अर्पण होणारी ०१ मीटर पर्यन्तच्या लांबीची वस्त्रे श्री साईभक्तांना मोफत देण्यात यावी, एक लाख व त्यापेक्षा जास्त रक्कम देणगी देणा-या साईभक्तांना मोठया आकाराचे वस्त्र भेट म्हणुन देण्यात यावे, तसेच सर्व समिती सदस्यांना व मुख्य कार्यकारी अधिकारी यांना प्रत्येक माहिन्याला ०१ या प्रमाणे प्रत्येकी १२ वस्त्रे, मान्यवरांचे सत्कार करणेसाठी देण्यास मान्यात देण्यात आली. तसेच मान्यवरांना सत्कार प्रसंगी वस्त्र देतांना सदर वस्त्र ज्या आरतीच्या वेळी श्रींचे समाधी व मुर्तीवर चढविले असेल त्यावेळचा फोटो देखील दयावा असे ठरले.’’

त्यानुसार, उपरोक्त निर्णय क्रं.८७३ अन्व्ये, कार्यवाही सुरु करण्यात आली होती. तथापि, चांदीची नाणी संपल्याने सध्या देणगीदार साईभक्तांची यादी तयार करण्यात येत आहे. तसेच उपरोक्त निर्णय क्रं.५१५ अन्वये, प्रत्यक्ष कार्यवाही करतांना श्रींना अर्पण होणारे वस्त्र हे परिमाणानुसार सारखे असले तरी त्यांच्या किमतीमध्ये खुपच फरक असल्याने परिमानानुसार वस्त्र वितरण करण्यास मोठयाप्रमाणात अडचणी येत असल्याने, कार्यवाही सुरु केलेली नाही.

त्याअनुषंगाने, उपरोक्त निर्णयात येत असलेल्या अडचणींचा विचार करता, मा.व्यवस्थापन समितीचे सभेतील उपरोक्त दोनही निर्णय निर्गत करुन, यापुढे जे साईभक्त शिर्डीत येवुन, संस्थानचे देणगी कांऊन्टरवर प्रत्यक्ष देणगी देतील, त्यांचेकरिता संस्थानकडुन आणखी काही सेवा सुविधा पुरविल्यास, श्री साईबाबा संस्थानच्या देणगी रक्कमेत वाढ होण्यास त्याचा निश्चीतच फायदा होणार आहे. त्यासाठी देणगी कांऊन्टरवर रोख स्वरुपात अथवा चेक/डी डी, परकीय चलन, सोने चांदीच्या वस्तु अथवा मौल्यवान माणिक मोती, खडे, व इतर साहित्य देणगी देणा-या साईभक्तांना पुढीलप्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार सेवा सुविधा पुरविता येतील. (तथापि, चेकव्दारे देणगी देणा-या साईभक्तांना चेक वटल्यानंतर पुढील भेटीच्या वेळी देणगी रक्कमेनुसार सुविधा देता येतील.)

सध्या देणगीदार साईभक्तांस देण्यात येत असलेल्या सेवा सुविधा व प्रस्तावित सेवा-सविधा यांचा तपशिल पुढील प्रमाणे –**( तक्ता क्रं.०१)**

| **अ.नं.** | **देणगी रक्कम** | **सध्या देण्यात येत असलेल्या सेवा सुविधा** | **प्रस्तावित सेवा-सुविधा** |
|---|---|---|---|
| ०१ | रु.०१/- ते रु.१,०००/- | उदी प्रसाद | उदी-प्रसाद २ नग |
| ०२ | रु.१,००१/- ते रु.१०,०००/- | उदी प्रसाद | उदी प्रसाद ०४ नग<br>१ थ्री डी फोटो रंगीत |
| ०३ | रु.१०,००१/- ते रु.२५,०००/- | उदी प्रसाद | उदी प्रसाद १० नग<br>१ थ्री डी फोटो रंगीत<br>१ सॅटीन शॉल ( रु.२९/- किंमत ) |
| ०४ | रु.२५,००१/- ते रु.५०,०००/- | उदी प्रसाद<br>५ भक्तांना एक वेळ दर्शन<br>५ भक्तांना एक वेळ आरती<br>१ श्री साईचरित्र ग्रंथ | उदी प्रसाद १० नग<br>५ भक्तांना एक वेळ मोफत दर्शन<br>१ श्री साईचरित्र ग्रंथ (भाषेनुसार )<br>१ साईराम शॉल ( रु.१००/- किंमत ) |

| | | | |
|---|---|---|---|
| | | १ श्री डी फोटो ब्लॅक ॲण्ड व्हाईट | ५ व्यक्तींना व्ही आय पी मोफत जेवण |
| ०५ | रु.५०,००१/- ते रु.२,००,०००/- | उदी प्रसाद<br>५ भक्तांना एक वेळ दर्शन<br>५ भक्तांना एक वेळ आरती<br>१ श्री साईचरित्र ग्रंथ<br>१ श्री डी फोटो ब्लॅक ॲण्ड व्हाईट | उदी प्रसाद २० नग<br>५ भक्तांना एक वेळ मोफत दर्शन<br>५ भक्तांना एक वेळ मोफत आरती<br>१ श्री साईचरित्र ग्रंथ<br>१ साईराम शॉल (रु.२००ते५००/-किंमत)<br>१ साईबाबा फोटो ( दगडावर बसलेली )<br>रु.१०००/- रु.पर्यन्त<br>५ व्यक्तींना व्ही आय पी मोफत जेवण |
| ०६ | रु.२,००,००१/- ते रु.५,००,०००/- | उदी प्रसाद<br>५ भक्तांना एक वेळ दर्शन<br>५ भक्तांना एक वेळ आरती<br>१ श्री साईचरित्र ग्रंथ<br>१ श्री डी फोटो ब्लॅक ॲण्ड व्हाईट | उदी प्रसाद २० नग<br>५ भक्तांना दोन वेळ मोफत दर्शन<br>५ भक्तांना दोन वेळ मोफत आरती<br>१ श्री साईचरित्र ग्रंथ<br>५ व्यक्तींना व्ही आय पी मोफत जेवण<br>१ साईराम शॉल ( रु.५००/- किंमत )<br>१ श्रींचा फोटो रु.१०००/- पर्यन्तचा |
| ०७ | रु.५,००,००१/- ते रु.१०,००,०००/- | उदी प्रसाद<br>५ भक्तांना एक वेळ दर्शन<br>५ भक्तांना एक वेळ आरती<br>१ श्री साईचरित्र ग्रंथ<br>१ श्री डी फोटो ब्लॅक ॲण्ड व्हाईट | उदी प्रसाद २५ नग<br>७ भक्तांना ०२ वेळ मोफत दर्शन<br>७ भक्तांना ०३ वेळ मोफत आरती<br>१ श्री साईचरित्र ग्रंथ (भाषेनुसार )<br>७ व्यक्तींना व्ही.आय.पी.मोफत जेवण<br>१ शॉल/वस्त्र (आरतीसाठी चढविणेत आलेली ( रु.२,०००/- किंमत पर्यन्त )<br>१ श्रींचा रंगीतफोटो (समाधी मुर्तीसह) रु.२००० रुपयांपर्यन्त किंमतीची |
| ०८ | रु.१०,००,००१/-व त्यापुढील देणगीदार साईभक्तांसाठी | उदी प्रसाद<br>५ भक्तांना एक वेळ दर्शन<br>५ भक्तांना एक वेळ आरती<br>१ श्री साईचरित्र ग्रंथ<br>१ श्री डी फोटो ब्लॅक ॲण्ड व्हाईट | उदी प्रसाद २५ नग<br>७ भक्तांना ०२ वेळ मोफत दर्शन<br>७ भक्तांना ०३ वेळ मोफत आरती<br>१ श्री साईचरित्र ग्रंथ (भाषेनुसार )<br>७ व्यक्तींना व्ही.आय.पी.मोफत जेवण<br>१ शॉल/वस्त्र (आरतीसाठी चढविणेत आलेली ( रु.२,०००/- किंमत पर्यन्त )<br>१ श्रींचा रंगीतफोटो (समाधीमुर्तीसह) रु.२००० रुपयांपर्यन्त किंमतीची |

उपरोक्त प्रमाणे देणगी रक्कमेनिहाय श्री साईभक्तांना संस्थानकडुन प्रस्तवित केल्यानुसार सेवा सुविधा प्रदान केल्यास संस्थानचे उत्पन्नात वाढ होण्यास त्याचा निश्चितच फायदा होणार आहे.

त्याअनुषंगाने, मागील दोन आर्थिक वर्षात ( सन २०१७-१८ व सन २०१८-१९) श्रींचे मंदिर व मंदीर परिसरात देणगी काऊंटरवर प्रत्यक्ष येऊन श्री साईभक्तांनी दिलेल्या देणगी रकमेनिहाय माहिती तंत्रज्ञान विभागाकडुन मिळालेली साईभक्तांची संख्या पुढील प्रमाणे आहे.

**( तक्ता क्रं.०२)**

| **अ.नं. ०१** | **देणगी रककम ०२** | **देणगीदार साईभक्तांची संख्या** | | **एकुण (३+४) ५** | **सरासरी ( ५÷२ ) ०६** |
|---|---|---|---|---|---|
| | | **सन २०१७-१८ ०३** | **सन २०१८-१९ ०४** | | |
| ०१. | रु.१/- ते रु.१०००/- | ८८७६८७ | ८८९७२१ | १७७७४०८ | ८८८७०४ |
| ०२. | रु.१००१/- ते रु.१०,०००/- | ९५९५० | १०६१६६ | २०२११६ | १०१०५८ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ०३. | रु.१०,००१/- ते रु. २५,०००/- | ९३८३ | ११४८५ | २०८६८ | १०४३४ |
| ०४. | रु.२५,००१/- ते रु. ५०,०००/- | ३०३४ | ३७१४ | ६७४८ | ३३७४ |
| ०५. | रु.५०,००१/- ते रु.२ लाख | २५७६ | २८९१ | ५४६७ | २७३४ |
| ०६. | रु.२,००,००१/- ते रु.५ लाख | १५६ | १७६ | ३३२ | १६६ |
| ०७. | रु.५,००,००१/- ते रु.१० लाख | ३० | ३६ | ६६ | ३३ |
| ०८. | रु.१०,००,००१/- व त्यापुढील | ३५ | ९५ | १३० | ६५ |
| | **एकुण** | ९९८८५१ | १०१४२८४ | २०१३१३५ | १००६५६८ |

तसेच वरील देणगीदार साईभक्तांना प्रस्तावित सुविधा देय झाल्यास, आज अखेर संस्थानकडे शिल्लक असलेल्या वस्त्रांचा साठा पुढील प्रमाणे. –

**( तक्ता क्रं.०३)**

| **अ.नं.** | **वस्त्रांचा तपशील** | **वस्त्रांची किंमत** | **एकुण शिल्लक वस्त्रांची संख्या** |
|---|---|---|---|
| ०१ | सॅटीन रुमाल लहान | रु.०२ मात्र | ४६२२८ |
| ०२ | सॅटीन रुमाल मोठे | रु.०५ मात्र | २०४६५ |
| ०३ | ब्रॉकेट सॅटीन लहान | रु.०९ मात्र | ८७८१ |
| ०४ | ब्रॉकेट सॅटीन मोठे | रु.२९ मात्र | ३५९५ |
| ०५ | साईराम शॉल | रु.२९ मात्र | ३६७० |
| ०६ | शॉल | रु.१०० मात्र | ३५० |
| ०७ | शॉल | रु.२०० ते ५०० रुपये पर्यन्तचे | २५० |
| ०८ | साईबाबा ड्रेस | रु.६०० ते १००० पर्यन्त | ५०० |
| ०९ | साईबाबा ड्रेस | रु. १००० ते २००० पर्यन्त | १५० |
| | | **आज अखेर एकुण वस्त्रांची संख्या** | **८३,९८९** |

उपरोक्त तक्त्यात नमुद केलेनुसार आज अखेर संस्थानकडे शिल्लक वस्त्रांचा साठा उपलब्ध आहे.

श्री साईभक्तांकडुन श्रींना अर्पण केलेल्या वस्त्रांपैकी बहुतांशी, वस्त्रे कापड विक्री कांऊन्टरवरुन देणगीदार साईभक्त प्रसादरुपाने विकत घेतात.

तथापि, उपरोक्त दोन्ही तक्त्यातील तपशिलांचा (देणगीदार साईभक्तांची संख्या व संस्थानकडे शिल्लक असलेल्या वस्त्रांची संख्या ) विचार करता, सध्या संस्थानकडे शिल्लक असलेल्या वस्त्रांच्या प्रमाणात देणगीदार साईभक्तांची संख्या खुपच जास्त दिसत आहे. सबब, उपरोक्त प्रमाणे देणगीदार साईभक्तांना देणगी रकमांनुसार सेवा सुविधा सुरु केल्या तर सध्या संस्थानकडे शिल्लक असलेले व देणगीरुपाने प्राप्त होणारे वस्त्र हे दोन माहिने पुरतील एढेच आहेत. त्यामुळे सध्या संस्थानकडे शिल्लक असलेल्या वस्त्रांचा साठा संपेपर्यन्त देणगीदार साईभक्तांना वस्त्रे सप्रेम भेट देता येतील. वस्त्रांचा साठा संपल्यानंतर, वस्त्रांव्यतिरिक्त फक्त इतर साहित्य सप्रेम भेट म्हणुन देता येतील.

उपरोक्त प्रमाणे देणगी रकमेनिहाय सेवा सुविधा सुरु केल्यास प्रतिवर्षी पुढील प्रमाणे खर्च अपेक्षित आहे.

**(तक्ता क्रं.०४)**

| अ. नं. | देणगी रकमांचा तपशील | साईभक्तांची सरारी संख्या | थ्री डी फोटो | फोटो | साईचरित्र ग्रंथ | शॉल | मोफत दर्शन व मोफत आरती | मोफत जेवण | एकण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१ | रु.०१/- ते रु.१,०००/- | ८८८७०४ | - | - | - | - | - | - | ---- |
| ०२ | रु.१,००१- ते १०,०००/- | १०१०५८ | ५,०५,२९०/- | - | - | - | - | - | ५,०५,२९०/- |
| ०३ | रु.१०,००१ ते २५,०००/- | १०४३४ | ५२,१७०/- | - | - | ३,०२,५८६/- रु.२९ प्रमाणे | - | - | ३,५४,७५६/- |
| ०४ | रु.२५,००१ ते ५०,०००/- | ३३७४ | - | - | २,०२,२४०- | ३,३७,४००/- | ३३,७४,०००/- | २५०/- | ३९,१३,८९०/- |
| ०५ | रु.५०,००१ ते | २७३४ | - | ९,२९,५६०/- | १,६४,०४०/- | ९,५६,९००/- | ९५,६९,०००/- | २५०/- | १,१६,१९,७५०/ |

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | २,००,००० | | | रु.३४० प्रमाणे - | सरासरी रु.६० | सरासरी रु.३५० | | | - |
| ०६ | रु.२,००,००१ ते रु.५,००,०००/- | १६६ | - | १,६६,०००/- रु.१०००/-प्रमाणे | ९९६०/- | ८३,०००/- रु.५००/-प्रमाणे | ११,६२,०००/- | २५०/- | १४,२१,२१०/- |
| **०७** | रु.५,००,००१/- ते १०,००,०००/- | ३३ | - | ६६,०००/- रु.२०००/-प्रमाणे | १९८०/- | ६६,०००/- रु.२०००/-प्रमाणे | ४,३८,९००/- | ३५०/- | ५,७३,२३०/- |
| ०८ | रु.१०,००,००१ /- ते पुढील | ६५ | - | १,३०,०००/- रु.२०००/-प्रमाणे | ३९००/- | १,३०,०००/- रु.२०००/-प्रमाणे | ८,६४,५००/- | ५००/- | ११,२८,९००/- |
| **एकुण** | | १००६५६८ | ५,५७,४६०/- | १,२९,१५६०/- | ३,८२,१२०/- | १८,७५,८८६/- | १,५४,०८,४००/- | १,६००/- | १,९५,१७,०२६/- |

(श्री साईचरित्र ग्रंथाची, शॉलची किंमत व दर्शन आरतीची रक्कम ही सरासरीने काढण्यात आलेली आहे. )

उपरोक्त प्रमाणे देणगी रकमेनिहाय देणगीदार साईभक्तांना प्रस्तावित केलेनुसार सुविधा दिल्यास, प्रतिवर्ष संस्थानला अंदाजे रक्कम रु. २ कोटी मात्रपर्यन्त खर्च अपेक्षीत आहे.

विभागाचा अभिप्राय- येथुनपुढे मंदीर व मंदीर परिसरात देणगी कांऊन्टरवर प्रत्यक्ष येवुन रोख रक्कम, डी डी, परकिय चलन, सोने चांदीच्या वस्तु, मौल्यवान माणिक मोती, खडे, तसेच इतर वस्तु, देणगी देणा-या देणगीदार साईभक्तांना वरील तक्ता क्रं.०१ मध्ये नमुद केलेप्रमाणे प्रस्तावित सेवा-सुविधा देणे सुरु करावयाचे झाल्यास, पुर्वी झालेले उपरोक्त निर्णय क्रं.८७३ व ५१५ हे निरस्त/अधिगृहित करावे लागतील. तसेच संस्थानकडे उपलब्ध असलेल्या वस्त्रांच्या उपलब्धतेनुसार देणगीदार साईभक्तांना वस्त्र देता येतील.

वरील प्रस्तावित केलेप्रमाणे देणगीदार साईभक्तांना सेवा-सुविधा पुरविल्यास, त्याचे संस्थानला पुढील प्रमाणे फायदे होतील.

**०१)** श्री साईभक्त संतुष्ट (समाधानी ) होऊन, त्यांच्या मनात संस्थानविषयी निश्चीतच समाधानाची भावना निर्माण होईल.

**०२)** साईभक्तांमार्फत देश-विदेशात श्री साईबाबांचा प्रचार व प्रसार होण्यास निश्चितच मदत होईल.

**०३)** संस्थानकडुन मिळालेल्या विविध सेवा सुविधांमुळे साईभक्त समाधानी होवुन त्यांना पुन्हा पुन्हा शिर्डीत दर्शनास यावे असे वाटेल.

**०४)** पर्यायाने संस्थानचे उत्पन्नात देखील मोठयाप्रमाणात वाढ होईल, असे मत आहे.

तसेच संस्थानकडे उपलब्ध असलेल्या वस्त्राचा साठा संपेपर्यन्त देणगीदार भक्तांना वस्त्रे देता येतील. तसेच श्रीसाई चरित्र, आणि श्री डी व इतर फोटो हे संस्थानचे प्रकाशने विभागकडुन वेळोवेळी घेता येतील. त्यासाठी एक वर्षा करिता अंदाजे आवश्यक असलेले श्री डी फोटो, एकुण नग १,११,५००, तसेच साईचरित्र एकुण नग ६,४००, आणि टेबल फोटो एकुण नग ६,४००, अशी प्रकाशने विभागास ज्यादा छपाई करुन घ्यावे लागणार आहे.

तसेच देणगीदार साईभक्तांना देण्यात येणा-या सप्रेम भेट वस्तुंकरिता माहिती तंत्रज्ञान विभाग यांचेकडुन सॉफ्ट वेअर मध्ये तशी दुरुस्ती करुन घ्यावी लागणार आहे. जेणेकरुन सॉफ्ट वेअरच्या रिपोर्टनुसार देणगीदार साईभक्तांना देण्यात आलेल्या सप्रेम भेट वस्तुंचा जमा खर्चाच्या नोंदी दर माहिन्याला ठेवता येतील.

प्रस्ताव- उपरोक्त प्रमाणे प्रस्तावित केल्यानुसार रकमेनिहाय देणगीदार साईभक्तांना सेवा सुविधा पुरविणे सुरु करावयाचे झाल्यास, पुर्वी झालेले उपरोक्त निर्णय क्रं.८७३ व ५१५ हे दोन्हीही निर्णय निरस्त करणेस, संस्थानकडे असलेल्या वस्त्रांच्या साठयाच्या उपलब्धतेनुसार देणगीदार साईभक्तांना वस्त्रे देण्यास, तसेच श्री साईचरित्र ग्रंथ , श्री डी फोटोज व इतर फोटोज प्रकाशने विभागाकडुन वेळोवेळी घेणेस, आणि देणगीदार साईभक्तांना देण्यात येणा-या सप्रेम भेट वस्तु करिता माहिती तंत्रज्ञान विभागाकडुन सॉफ्टवेअर मध्ये तशी सुधारणा करुन घेणेस, तसेच प्रस्तावातील उपरोल्लिखीत कार्यपध्दतीसाठी येणा-या योग्य त्या खर्चास मान्यता मिळणेकामी सदर प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे सभेसमोर निर्णयार्थ आयत्यावेळच्या विषयात सादर करणेस मान्यता असावी.

**निर्णय क्र.३४९** **यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे रकमेनिहाय साईभक्तांना सेवा सुविधा पुरविणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली. तथापी रक्कम रु.५०,००१ ते २,००,०००/-पर्यंत देणगी देणाऱ्या साईभक्तांना श्रींचे फोटो ऐवजी श्रींची छोटी मुर्ती देण्यात यावी. नवीन शालची खरेदी कदापीही करु नये, तसेच खर्चात बचत करणेकामी साईभक्तांकडून देणगी स्वरुपात मिळणाऱ्या शाल यांचा वापर करण्यात यावा, असे ठरले. प्रस्तुत प्रकरणी व्यवस्थापन समितीचे दि.३०.११.२०१६ रोजीचे सभेतील निर्णय क्र.८७३ व दि.२२.०८.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५१५**

**निरस्त करण्यास मान्यता देण्यात आली. सदर बाब मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन करुन निदर्शनास आणून द्यावी,असे ठरले.**

**(कार्यवाही-लेखाशाखा/विधी विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२** **कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत साईभक्त व रुग्णांचे पडताळणीकरीता Thermal Screening & Scanning प्रणाली कार्यान्वीत करणेकामी खरेदी प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम२००४मधीलतरतुद:- १७ (१) नुसार भक्तगणांना सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणे.

मा. व्यवस्थापन समितीचाठरावक्रं.:- दि.०४.०४.२०१८, निर्णय क्र.२७५.

प्रास्ताविक:- सद्यस्थितीत जागतिक स्तरावर कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव फार मोठ्या प्रमाणावर होत आहे. भारतात व महाराष्ट्रातही कोरोना विषाणूचा (कोव्हीड १९) प्रादुर्भाव फार मोठ्या प्रमाणात होत आहे. करोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखणेसाठी करावयाचे प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून जा.क्र.एसएसएस/साप्रशा/आस्था/२८३२/२०२०, दि. १७.०३.२०२० रोजीचे आदेशान्वये, श्री साईबाबा मंदिरासह सर्व मंदिरे दि.१७ मार्च, २०२० रोजी दुपारी ३.०० वाजेपासून भक्तांसाठी पुढील आदेश होईपावेतो दर्शनाकरिता (मुख्य दर्शनासह) बंद करणेत आलेले आहे. तसेच, महाराष्ट्रासह देशातही लॉकडाऊन लागू करणेत आलेला आहे.

उपरोक्तप्रमाणे लॉकडाऊन अंतर्गत केंद्र व राज्य शासनामार्फत लागू करणेत आलेले निर्बंध जून महिन्यापासून हळू-हळू शिथील करणेस सुरुवात झालेली आहे. त्यानुसार धार्मिक स्थळांबाबतचे निर्बंध हटवून दर्शन सुविधेसह इतर सुविधा सुरु करणेबाबत आदेश झाल्यास श्री साईबाबा संस्थानला आवश्यक ती खबरदारी घेऊन साईभक्तांना श्रींचे दर्शनाबरोबर इतर सुविधा शासनाचे मार्गदर्शक सुचनेनुसार उपलब्ध करुन द्याव्या लागणार आहेत. महाराष्ट्र शासन क्र. न्यायीक२०२०/प्र.क्र.५८/ ५, सार्वजनिक अरोग्य विभाग,दि. ३० मे. २०२० रोजीचे कार्यालयांबाबत मार्गदर्शक सुचना व अरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे दि. ०४ जून, २०२० रोजीचे धार्मिक स्थळांचे ठिकाणी कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखणेसंदर्भातील उपाय-योजनेबाबतच्या मार्गदर्शक सुचनांनुसार येणारे सर्व साईभक्तांचे व कर्मचा-यांचे तापमान तपासणे आवश्यक आहे.

शासनाचे मार्गदर्शक सुचनांनुसार,कोरोना विषाणूचा प्रादुर्भावाचे दृष्टीने साई भक्तांचे तापमानाची तपासणी हि शक्य तेवढया प्रमाणात अंतर ठेवून करावी लागणार आहे.प्रत्येक साईभक्त व कर्मचारी यांची तपासणी इन्फ्रारेड थर्मामीटरने करावयाची झाल्यास सदरची कार्यवाही जिकरीचे असून याद्वारे होणारे तपासणीत मानवीय चुका होण्याची शक्यता नाकारता येऊ शकत नाही. सबब, याकामी **Camera Based Thermal Screening & Scanning**प्रणाली कार्यान्वीत केल्यास याद्वारे तपासणी जास्तीस जास्त अचुक व सुरक्षीतपणे करणे सुलभ होणार आहे.

संस्थानला या क्षेत्रात कार्यरतअसलेल्या **RK Devices & Solutions** व **SBM Pro India, Mumbai**या पुरवठाधारकांकडून त्यांचे प्रणालीचे सादरीकरण (**Soft Copy**)प्राप्त झालेले आहे. पुरवठाधारकांकडून प्राप्त झालेले यासंबधीचे सादरीकरण यांचे अवलोकन केले असता दोन्ही पुरवठाधारकांचे प्रणालीमध्ये प्रामुख्याने पुढीलप्रमाणे सुविधांचा समावेश आहे.

१. प्रणालीअंतर्गतकॅमेराद्वारे पुरेशा अंतरावरुन व्यक्तीचे शरिराचे विविध अवयवांचेतापमानाची नोंद घेता येते.

२. निर्धारित मर्यादेपेक्षा कमी अथवा जास्त तापमाण आढळुन आल्यास सदर व्यक्तीचे चेहरा **monitor** वर तात्काळ **highlight**केला जातो.

३. प्रणालीव्दारे एका सेकंदात साधारणत: २० व्यक्तींचे शरिराचे तापमानाची तपासणी करता येते.

४. प्रणालीमध्ये शरीराचे तापमान तपासणी बरोबरच व्यक्तींच्या चेह-यांची पडताळणी (**Face Recognition)** करणेची सुविधा उपलब्ध आहे.

५. प्रणालीमध्ये मास्क विरहीत आलेल्या व्यक्ती ओळखणेची सुविधाही उपलब्ध आहे.

६. प्रणालीमध्ये साधारणपणे १६ कॅमेरे जोडण्याची सुविधा उपलब्ध आहे.

७. प्रणालीमध्ये कार्यान्वीत करणेत येणारे Network Video Recorderवर १ लाख व्यक्तींची माहिती जतन केली जाऊ शकते. तद्नंतर सदरची माहिती जतन करावयाची झाल्यास सर्व्हरवर स्थलांतरीत करता येते.

८. प्रणाली पुर्णपणे संपर्क विरहीत आहे.

उपरोक्त नमुद **Thermal Screening & Scanning** प्रणाली कार्यान्वीत केल्यास साईभक्त व कर्मचारी यांची संपर्कविरहीत तपासणी/पडताळणी करता येऊन संशयीत साईभक्तांस दर्शन रांगेत प्रवेश न देता याबाबतची पुढील कार्यवाही करता येणार आहे. प्रणालीमध्ये चेह-यांची पडताळणी (**Face Recognition)**करणेची सुविधाही उपलब्ध असल्याने गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेल्या व्यक्ती ओळखून त्यांना मंदिरात प्रवेश देणे रोखता येणे शक्य होऊ शकते. तसेच सदरची प्रणाली संस्थानचे दोन्ही रुग्णालये या किठाणी कार्यान्वीत केल्यास कोरोना संशयीत रुग्णाबाबत योग्य ती कार्यवाही करता येणे शक्य होईल. सबब, सदरची प्रणाली सुरवातीस मंदिराचे प्रवेशद्वार क्र. ०१ ते ०४ संस्थानचे दोन्ही रुग्णालये (एकुण ६ ठिकाणी) या ठिकाणी कार्यान्वीत करता येईल. प्रणाली कार्यान्वीत करणेकामी येणारे अंदाजे खर्चाबाबत **RK Devices & Solutions** व**SBM Pro India, Mumbai**यांना ई-मेलद्वारे कळविणेसंदर्भात सुचित करणेत आलेले होते. त्यानुसार **RK Devices & Solutions** यांचेमार्फत दि.०६.०६.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे पुढीलप्रमाणे दर कळविणेत आलेले आहेत.

| **Sr.No.** | **Item Description** | **Qty** | **Basic Rate** | **Total Amount** |
|---|---|---|---|---|
| **1** | Thermal Camera+BlackBody Sensor+ Software+ Tripod, Power Supply + Software | 1 | 1,70,000 | 1,70,000 |
| **2** | BlackBody Sensor+Software+Tripod, Power Supply | 1 | 1,04,000 | 1,04,000 |
| **3** | Network Video Recorder | 1 | 20,000 | 20,000 |
| | **Installation & Commissioning Charges** | | | |
| **4** | Installation Charges per Camera | 1 | 25,000 | 25,000 |
| **5** | Cable-Optical Fiber per mtr | 1 | | 12,000 |
| **6** | Cat 6 Cable per running mtr | 1 | | 12,000 |
| **7** | Cable Laying Charges per running mtr | 1 | | 12,000 |
| **8** | Accessories Extra, POE Switch, Media Convertor. FO Convertor | 1 | 30,000 | 30,000 |
| | Total Cost Door or Entry approx. | | | 3,85,000 |

Taxes Extra, Freight & Forwarding at actual

We have considered 2KM of wire or cable to be laid.

If there are any changes it will be applicable at the time of installation.

उपरोक्तप्रमाणे मंदिर प्रवेशद्वार क्र. १ ते ४ व दोन्ही रुग्णालये या ठिकाणी (एकुण ६ ठिकाणी) **Thermal Screening & Scanning**प्रणाली कार्यान्वीत करणेकामी रक्कम रु. ३,८५,०००/- प्रती ठिकाण याप्रमाणे ६ ठिकाणांकरीता अंदाजे एकुण रक्कम रु. २३,१०,०००/-इतका खर्च अपेक्षीत आहे. **RK Devices & Solutions** यांचे सादरीकरण व संबधीतांबरोबर दुरध्वनीद्वारे झालेल्या चर्चेनुसार सदरचे प्रणालीअंतर्गत कार्यान्वीत करवयाचे Network Video Recorderला भविष्यात १०-१२ अतिरीक्त कॅमेरे सलंग्न करता येऊ शकतात. तसेच सदरचे Network Video Recorder वर १ लाख साईभक्तांची माहिती जतन केली जाऊ शकते. आवश्यकतेनुसार सदरची माहिती तदनंतर सर्व्हरवर स्थलांतरीत करावी लागणार आहे. याकामी त्यांचेमार्फत सर्व्हर उपलब्ध करावयाचा झाल्यास अतिरीक्त रक्कम रु. ५३,०००/- इतका खर्च अपेक्षीत असल्याचे त्यांनी ई-मेलद्वारे कळविलेले आहे. याकामी आवश्यक असलेला **monitor (display)** त्यांचेमार्फत पुरविण्यात येईल असेही त्यांनी ई-मेलमध्ये नमुद केलेले आहे.

नमुदकेलेप्रमाणे मंदिर प्रवेशद्वार क्र. १ ते ४ व दोन्ही रुग्णालये या ठिकाणी (एकुण ६ ठिकाणी) **Camera Based Thermal Screening & Scanning**प्रणाली कार्यान्वीत करणेकामी प्रचलीत पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. २३,१०,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc)समितीचे सभेसमोर सादर करता येईल. तसेच मान्यतेअंती याकामी प्रसिद्ध

करावयाच्या निविदेत मागणी करावयाचे सर्व साहित्यांचे तांत्रिक तपशील मा.व्यवस्थापन समितीचे दि. ०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २७५ यास अधिन राहुन मे.टिसीएस यांचे मार्गदर्शन/अभिप्रायाप्रमाणे अंतिम करता येतील, असे नम्र मत आहे.

**मागणी**:- प्रास्तविकेत नमुद केलेप्रमाणे कोरोना विषाणू (कोव्हीड १९) प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजने अंतर्गत मंदिर प्रवेशद्वार क्र. १ ते ४ व संस्थानचे दोन्ही रुग्णालये या ठिकाणी (एकुण ६ ठिकाणी) **Camera Based Thermal Screening & Scanning**प्रणाली कार्यान्वीत करणेकामी प्रचलीत पद्धतीने खरेदी प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु. २३,१०,०००/- चे खर्चासमान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc)समितीचे सभेसमोर सादर करणेस मान्यता असावी, हि नम्र विनंती.

**संस्थानअधिनियम / ठरावयानुसारछाननी, शासननिर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान**:- तांत्रिक, आर्थिक व प्रशासकीय

**विभागाचा अभिप्राय/स्पष्टमत**:- महाराष्ट्र शासन क्र. न्यायीक२०२०/प्र.क्र.५८/ ५, सार्वजनिक अरोग्य विभाग,दि. ३० मे. २०२० रोजीचे कार्यालयांबाबत मार्गदर्शक सुचना व अरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचे दि. ०४ जून, २०२० रोजीचे धार्मिक स्थळांचे ठिकाणी कोरोना विषाणू प्रादुर्भाव खणेसंदर्भातील उपाय-योजनेबाबतच्या मार्गदर्शक सुचनांनुसार येणारे सर्व साईभक्तांचे व कर्मचा-यांचे तापमान तपासणे आवश्यक आहे.

त्यानुसार साईभक्त व संस्थान कर्मचारी यांचे तापमानाची सुरक्षीत व अचुक तपासणी करणेकामी **Camera Based Thermal Screening & Scanning**प्रणाली कार्यान्वीतकरता येईल. संस्थानला या क्षेत्रात कार्यरत असलेल्या **RK Devices & Solutions** व **SBM Pro India, Mumbai**या पुरवठाधारकाकडून त्यांचे प्रणालीचे सादरीकरण (**Soft Copy**) प्राप्त झालेले आहे. पुरवठाधारकांकडून प्राप्त झालेल्या सादरीकरणाचे अवलोकन केले असता दोन्ही पुरवठाधारकांचे प्रणालीमध्ये प्रामुख्याने पुढीलप्रमाणे सुविधांचा समावेश आहे.

१. प्रणालीअंतर्गतकॅमेराद्वारे पुरेशा अंतरावरुन व्यक्तीचे शरिराचे विविध अवयवांचे तापमानाची नोंद घेता येते.
२. निर्धारित मर्यादेपेक्षा कमी अथवा जास्त तापमाण आढळुन आल्यास सदर व्यक्तीचे चेहरा **monitor** वर तात्काळ **highlight** केला जातो.
३. प्रणालीव्दारे एका सेकंदात साधारणत: २० व्यक्तींचे शरिराचे तापमानाची तपासणी करता येते.
४. प्रणालीमध्ये शरीराचे तापमान तपासणी बरोबरच व्यक्तींच्या चेह-यांची पडताळणी (**Face Recognition**) करणेची सुविधा उपलब्ध आहे.
५. प्रणालीमध्ये मास्क विरहीत आलेल्या व्यक्ती ओळखणेची सुविधाही उपलब्ध आहे.
६. प्रणालीमध्ये साधारणपणे १६ कॅमेरे जोडण्याची सुविधा उपलब्ध आहे.
७. प्रणालीमध्ये कार्यान्वीत करणेत येणारे Network Video Recorder वर १ लाख व्यक्तींची माहिती जतन केली जाऊ शकते. तद्नंतर सदरची माहिती जतन करावयाची झाल्यास सर्व्हरवर स्थलांतरीत करता येते.
८. प्रणाली पुर्णपणे संपर्कविरहीत आहे.

उपरोक्त नमुद **Thermal Screening & Scanning**प्रणाली कार्यान्वीत केल्यास साईभक्त व कर्मचारी यांची संपर्कविरहीत तपासणी/पडताळणी करता येऊन संशयीत साईभक्तांस दर्शन रांगेत प्रवेश न देता याबाबतची पुढील कार्यवाही करता येणार आहे. प्रणालीमध्ये चेह-यांची पडताळणी (**Face Recognition**)करणेची सुविधाही उपलब्ध असल्याने गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेल्या व्यक्ती ओळखून त्यांना मंदिरात प्रवेश देणे रोखता येऊ शकते. तसेच सदरची प्रणाली संस्थानचे दोन्ही रुग्णालये या किठाणी कार्यान्वीत केल्यास कोरोना संशयीत रुग्णाबाबत योग्य ती कार्यवाही करता येणे शक्य होईल. सबब, सदरची प्रणाली सुरवातीस मंदिराचे प्रवेशद्वार क्र. ०१ ते ०४ संस्थानचे दोन्ही रुग्णालये (एकुण ६ ठिकाणी) या ठिकाणी कार्यान्वीत करता येईल. प्रणाली कार्यान्वीत करणेकामी येणारे अंदाजे खर्चाबाबत **RK Devices & Solutions** व**SBM Pro India, Mumbai**यांना ई-मेलद्वारे कळविणेसंदर्भात सुचित करणेत आलेले होते. त्यानुसार **RK Devices & Solutions**यांचेमार्फत दि.०६.०६.२०२० रोजीचे ई-मेलद्वारे पुढीलप्रमाणे दर कळविणेत आलेले आहेत.

| Sr.No. | Item Description | Qty | BasicRate | Total Amount |
|---|---|---|---|---|
| 1 | Thermal Camera + BlackBody Sensor + Software + Tripod, Power Supply + Software | 1 | 1,70,000 | 1,70,000 |
| 2 | BlackBody Sensor + Software + Tripod, Power Supply | 1 | 1,04,000 | 1,04,000 |
| 3 | Network Video Recorder | 1 | 20,000 | 20,000 |
| | **Installation & Commissioning Charges** | | | |
| 4 | Installation Charges per Camera | 1 | 25,000 | 25,000 |
| 5 | Cable-Optical Fiber per mtr | 1 | | 12,000 |
| 6 | Cat 6 Cable per running mtr | 1 | | 12,000 |
| 7 | Cable Laying Charges per running mtr | 1 | | 12,000 |
| 8 | Accessories Extra, POE Switch, Media Convertor. FO Convertor | 1 | 30,000 | 30,000 |
| | Total Cost Door or Entry approx. | | | 3,85,000 |

Taxes Extra, Freight & Forwarding at actual

We have considered 2KM of wire or cable to be laid.

If there are any changes it will be applicable at the time of installation.

उपरोक्तप्रमाणे मंदिर प्रवेशद्वार क्र. १ ते ४ व दोन्ही रुग्णालये या ठिकाणी (एकुण ६ ठिकाणी) **Thermal Screening & Scanning**प्रणाली कार्यान्वीत करणेकामी रक्कम रु. ३,८५,०००/- प्रती ठिकाण याप्रमाणे ६ ठिकाणांकरीता अंदाजे एकुण रक्कम रु. २३,१०,०००/- इतका खर्च अपेक्षीत आहे. सदरची प्रणाली कार्यान्वीत करणेकरीता प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविता येईल व निविदेमध्ये मागणी करावयाच्या सर्व साहित्यांचे तांत्रिक तपशीलमा.व्यवस्थापन समितीचे दि. ०४.०४.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र. २७५ यास अधिन राहुन मे.टिसीएस यांचे मार्गदर्शन/अभिप्रायानुसार अंतिम करता येतील.

नमुद केलेप्रमाणे मंदिर प्रवेशद्वार क्र. १ ते ४ व दोन्ही रुग्णालये या ठिकाणी (एकुण ६ ठिकाणी) **Camera Based Thermal Screening & Scanning** प्रणाली कार्यान्वीत करणेकामी प्रचलीत पद्धतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व याकामी येणारे अंदाजे रक्कम रु.२३,१०,०००/- चे खर्चास मान्यता मिळणेकामीचा प्रस्ताव मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.३५०** **यावर सविस्तर चर्चा होऊन, कोरोना विषाणू (कोव्हीड-१९) प्रादुर्भाव रोखणेसाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत साईभक्त व रुग्णांचे पडताळणीकरीता Thermal Screening & Scanning प्रणाली कार्यान्वीत करणेकामी विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणाऱ्या अंदाजे रक्कम रु.२३,१०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-माहिती तंत्रज्ञान विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**
**विषय नं.०३** **सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता श्रींचे दर्शनार्थ येणारे महत्वाचे, अतिमहत्वाचे मान्यवर व देणगीदार साईभक्तांचे सत्काराकामी पावडर मार्बलमुर्ती, प्युअर मार्बल मुर्ती या विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** सन २०२०-२०२१ या वर्षाकरिता फुटाणे प्रसाद, विडयाची पाने, पावडर मार्बलमुर्ती, प्युअर मार्बल मुर्ती व काशी पावडर अष्टगंध खरेदी कामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणे तसेच द्वारकामाई धुनीकरीता रानशेणी गोवरी खरेदी करणेकामी तसेच सत्यनारायण, अभिषेक, पुजेकरीता नारळ विहीत पध्दतीने खरेदी करणेचा प्रस्ताव मा.तदर्थ समितीचे दि.११/०५/२०२० रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर तदर्थ समितीने निर्णय क्र.८४ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होऊन, सन २०२०-२०२१ या वर्षाकरीता उपरोक्त प्रस्तावाद नमुद पावडर मुर्ती व प्युअर मार्बल मुर्ती वगळता उर्वरीत फुटाणे प्रसाद, विडयाची पाने व काशी पावडर अष्टगंध खरेदीकामी विहीत पध्दतीने कोटेशन मागविणे तसेच व्दारकामाई धुनीकरीता रानशेणी गोवरी खरेदी करणेकामी व सत्यनारायण,

अभिषेक पुजेकरीता नारळ खरेदी करणेकामी खरेदी विभागामार्फत विहीत पध्दतीने ई-निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याकामी येणा-या सर्व समावेशक अपेक्षित खर्चास मान्यता देण्यात आली.

तसेच पावडर मार्बल मुर्ती व प्युअर मार्बल मुर्ती खरेदीकामीचा स्वतंत्र प्रस्ताव मा.तदर्थ (Adhoc) समितीसमोर सादर करावा, असे ठरले."

**१) पावडर मार्बल मुर्ती -** श्रीसाईबाबांच्या दर्शनासाठी देश-विदेशातुन अनेक सन्माननीय व्यक्ती येत असतात. या मान्यवर अतिथींचा संस्थानचे वतीने यथोचित सत्कार करण्यात येतो. सत्कारामध्ये मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त मंडळ, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उप मुख्यकार्यकारी अधिकारी, मा.प्रशासकीय अधिकारी व जनसंपर्क अधिकारी यांचे सुचनेनुसार मान्यवरांना आवश्यकतेप्रमाणे पावडर मार्बल मूर्ती देण्यात येते. तसेच संस्थान सेवेतुन सेवानिवृत्त होणारे कर्मचा-यांना संस्थानमार्फत पावडर मार्बल मूर्ती देऊन सत्कार करण्यात येतो. त्याकरीता आवश्यकतेप्रमाणे पुरवठादारांकडुन पावडर मूर्ती नंबर ३, मूर्ती नंबर ४, मूर्ती नंबर ५ अशा पावडर मूर्ती खरेदी करण्यात येतात. माहे-एप्रिल-२०१९ ते माहे-डिसेंबर-२०१९ अखेर या कालावधीत ०४ नंबर मूर्ती-एकूण ६९० नग दर रु.१८९/- प्रमाणे एकूण रु.१,३०,४१०/-(अक्षरी रुपये एक लाख तीस हजार चारशे दहामात्र) खर्च झालेला आहे.

**२) प्युअर मार्बल मुर्ती -**तसेच मा.महामहिम राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती, मा.मुख्यमंत्री महोदय, मा.सुप्रिम कोर्ट व इतर कोर्ट, मा.खासदार किंवा व्ही.व्ही.आय.पी., देणगीदार साईभक्त व इतर तत्सम महत्वाचे व्यक्ती मंदिरात दर्शनासाठी येत असतात. त्यांचा संस्थानचे वतीने शॉल, उदी देऊन यथोचित सत्कार करण्यात येतो. काही व्यक्तींना वेळप्रसंगी वरिष्ठांचे सूचनेनुसार प्युअर/ मकराना मार्बल मूर्ती संस्थानमार्फत भेट म्हणून देण्यात येते. ती ऐनवेळी शिर्डीतील स्थानिक मार्केट मधुन थेट खरेदी करण्यात येते. अशा प्युअर मार्बल मूर्ती आवश्यकतेप्रमाणे थेट खरेदी कराव्या लागतात त्याची संख्या निश्चित नसते. माहे-एप्रिल-२०१९ ते माहे-आक्टोंबर -२०१९ अखेर मंदिर विभागामार्फत खर्च झालेला नाही.

तरी सन-२०२०-२०२१ या आर्थिक वर्षाकरीता अंदाजे खालीलप्रमाणे पावडर मार्बल मुर्ती खरेदी करावी लागेल.

| **अ. क्र** | **तपशील** | **एप्रिल-२०१९ ते डिसेंबर-२०१९ खर्च सध्याचे दर व खर्च** | | **सन-२०-२१ ची मागणी (अंदाजे) (आवश्यकतेप्रमाणे)** | **अंदाजे दर** | | | **अंदाजे खर्च रुपये** | **एकूण अंदाजे खर्च रुपये** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | दर रुपये | प्रमाण | | रुपये | पैसे | प्रमाण | | |
| ०१ | **पावडर मूर्ती नं.३** | ११८/- | --- | **१०० नग** | १२५ | ०० | नग | १२,५००/- | **१,८१,२५०/-** |
| | **पावडर मूर्ती नं.४** | १८९/- | ६९० नग | **७०० नग** | २०० | ०० | नग | १,४०,०००/- | |
| | **पावडर मूर्ती नं.५** | ५५५/- | --- | **५० नग** | ५७५ | ०० | नग | २८,७५०/- | |

उपरोक्तप्रमाणे पावडर मार्बल मुर्ती व प्युअर मार्बल मुर्ती विहीत पध्दतीने कोटेशन मागवून खरेदी करणेचा प्रस्ताव मा.तदर्थ समिती दि.११/०५/२०२० रोजीचे सभेपुढे सादर करणेत आला होता. त्यावर समितीने निर्णय क्र.२६७ खालीलप्रमाणे घेतलेला आहे.

"याबाबत Set Policy नाही, "मान्यवर व्यक्ती", "महत्वाची व्यक्ती", "अति महत्वाची व्यक्ती" कोण ही बाब स्पष्ट नाही. करीता योग्य ती Policy तयार करुन हा विषय Policy सह पुन्हा मा.तदर्थ (Ad-hoc) समितीचे सभेसमोर ठेवण्यात यावा, असे ठरले."

वरीष्ठ अधिकारी व जनसंपर्क विभाग यांनी केलेल्या निर्देशानुसार मंदिर विभागामार्फत सत्कार साहित्य पुरविले जाते. प्रत्यक्ष सत्कार मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष, मा.विश्वस्त, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, मा.उपमुख्य कार्यकारी अधिकारी, मा.मुख्य लेखाधिकारी व वरिष्ठ अधिकारी यांचे हस्ते केला जातो. याकामी श्रींचे दर्शनासाठी येणारे देणगीदार साईभक्त, मान्यवर व्यक्ती व अति महत्वाची व्यक्ती यांचे सत्कार करणेकामी यात खाली नमूद केलेल्या मान्यवरांचा समावेत असतो.

भारतीय गणराज्याचे मा.राष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे मा.उपराष्ट्रपती, भारतीय गणराज्याचे मा.पंतप्रधान, भारतीय गणराज्याचे मा.उपपंतप्रधान, भारतीय गणराज्याचे भुतपुर्व मा.राष्ट्रपती, मा.उपराष्ट्रपती, मा.पंतप्रधान, मा.उपपंतप्रधान, भारतीय गणराज्याचे सर्वोच्च न्यायालयाचे मा.मुख्य न्यायमुर्ती व सर्वोच्च न्यायालयाचे इतर सर्व न्यायमुर्ती, लोकसभा अध्यक्ष, महाराष्ट्र राज्यपाल, मुंबई उच्च न्यायालयाचे मा.मुख्य न्यायमुर्ती व देशातील सर्व उच्च न्यायालयाचे सर्व न्यायमुर्ती, महाराष्ट्र राज्याचे मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्याच्या मंत्रीमंडळातील सर्व मंत्री, महाराष्ट्र राज्य विधानसभा अध्यक्ष व उपाध्यक्ष, महाराष्ट्र राज्यातील सर्व आमदार व खासदार, तसेच भारतरत्न, पद्मभूषण, पद्मश्री पुरस्कार प्राप्त व्यक्ती तसेच महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव, प्रधान सचिव तसेच पोलीस महासंचालक, तसेच भारतीय स्थलसेना, नौसेना व वायुसेनेमधील परमवीर चक्र, महावीर चक्र, अशोक चक्र मिळालेले अधिकारी/सैनिक आदी अतिमहत्वाच्या व्यक्ती.

तसेच श्री साईबाबांना रु.५,००,०००/- व त्यापुढील किंमत असलेले सोने-चांदी, वस्तु अथवा रोख स्वरुपातील देणगी देणारे साईभक्त तसेच मा.व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, विश्वस्त व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व उप मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे निर्देशानुसार महत्वाच्या साईभक्तांचा सत्कार करता येईल, असे मत आहे.

**प्रस्ताव:-** तरी वरीष्ठ अधिकारी व जनसंपर्क विभाग यांनी केलेल्या निर्देशानुसार मंदिर विभागामार्फत सत्कार साहित्य पुरविणे करीता उपरोक्त नमुद केलेल्या मान्यवरांचा श्रींचे दर्शनासाठी आलेल्या महत्वाच्या, अतिमहत्वाच्या व देणगीदार साईभक्तांचे सत्कारासाठी सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाकरीता पावडर मार्बल मुर्ती, प्युअर मार्बल मुर्ती अंदाजे रु.३,००,०००/- मात्र रक्कमेचे आत असल्याने विहित पध्दतीने दरपत्रके मागवुन खरेदी करणेस मान्यता मिळणेकामी सदरहू प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.३५१** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे दर्शनासाठी येणारे महत्वाचे, अतिमहत्वाचे मान्यवर व देणगीदार साईभक्तांचे सत्काराकामी सन २०२०-२०२१ या आर्थिक वर्षाकरीता उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेली पावडर मूर्ती नं.३ विहित पध्दतीने दरपत्रके मागवुन खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या अपेक्षीत खर्चास मान्यता देण्यात आली.**

**(कार्यवाही-मंदिर विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४** **श्रींचे व्दारकामाईतील धुनीजवळील मुख्य भाग, ओटा व पायऱ्या यांचे जुने झालेले मार्बल, फ्लोरींग तसेच चावडीचा मुख्य भाग व व्हरांडा येथील जुने झालेले तंदुर स्टोन फ्लोरींग काढुन त्या ठिकाणी नविन प्युअर व्हाईट मकराना मार्बलचे फ्लोरींग बसविणे व व्दारकामाई सभामंडपातील मार्बल फ्लोरींगला पॉलीश करणे ही कामे साईभक्त श्री.के.व्ही.रमणी, शिर्डी साई ट्रस्ट ,चेन्नई यांचेकडून देणगी दाखल करुन घेण्यास मान्यता देणे.**

**प्रस्ताव-** **श्रीसाईबाबासंस्थानविश्वस्तव्यवस्था,शिर्डीअधिनियम-२००४मधील तरतुद**–अधिनियमाचे कलम २१ (१) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेची तरतूद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये,“मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल,” अशी तरतूद आहे.

**प्रस्तावना**– श्रींचे व्दारकामाई व चावडी येथे मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दि.०४/०६/२०२० रोजी समक्ष पाहणी केली. त्यावेळी व्दारकामाई धुनीजवळील मुख्य भाग, ओटा व पाय-या येथिल मार्बल फ्लोरींग खराब व जुने झालेले असल्याने ते काढून त्याठिकाणी नविन प्युअर व्हाईट मकराना मार्बल बसविण्यात यावे, तसेच चावडीचा मुख्य भाग व व्हरांडा येथिल जुने झालेले तंदूर स्टोन फ्लोरींग काढून त्या ठिकाणी नवीन प्युअर व्हाईट मकराना मार्बलचे फ्लोरींग करणेत यावे अशी चर्चा मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसमवेत झाली आहे.

सध्या कोव्हीड-१९ चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी दि.१७/०३/२०२० पासून व्दारकामाई व चावडी मंदिर साईभक्तांचे दर्शनासाठी बंद असल्याने तेथे साईभक्तांचा वावर नाही. त्यामुळे सदर ठिकाणी नविन फ्लोरींगचे बसविणेचे काम करता येईल.

उपरोक्त विषयांकित कामासाठी खालील तपशिलाप्रमाणे अंदाजे खर्च अपेक्षित आहे.

A) **DWARKAMAI–**

| Sr. No. | Description | Qty. | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Removing cement tiles or marble or polished shahabad floor or dado without bed concrete including stacking the materials as directed with all leads, lifts etc. complete. | 37.80 | Sqm | 36.00 | **1,360.80** |
| 2 | Providing and laying in position flooring of Makrana Marble stone of pure white shade without black spots and of size 18 mm to 20 mm thick on bed 1:6 cement mortar including cement floats striking joints, pointing in C.M.1:3 curing and cleaning etc. complete. (Deviated Item). | 37.80 | Sqm | 8655.00 | **3,27,159.00** |
| 3 | Machine polishing to cement/marble mosaic tiled flooring or any other type of flooring including cleaning, washing etc. complete. | 37.80 | Sqm | 143.00 | **5,405.40** |
| 4 | Hand polishing to dado, skirting including cleaning, washing etc. complete. | 2.25 | Sqm | 64.00 | **144.00** |
| 5 | Providing and fixing machine cut polished 18 mm to 20 mm thick Makrana Marble stone of pure white shade without black spot stone for treads and risers of steps and staircases of approved colour and shade with full moulding and three grooved line for the treads on bed of 1:4 Cement mortar including float filling joints with neat cement slurry curing polishing and cleaning etc. complete. (Deviated Item). | 5.65 | Sqm | 8655.00 | **48,900.75** |
| 6 | **Dwarkamai - Front SabhaMandap -** Providing Mirror polishing to Marble Stone including using all necessary stones and equipments cleaning, washing etc. complete. For Flooring As directed by Engineer in charge. (Deviated Item). | 115.00 | Sqm | 123.00 | **14,145.00** |
| | **TOTAL (RS.):** | | | | **3,97,114.95** |
| | GST @ 18% (RS.): | | | | 71,480.69 |
| | CONTINGENCY @ 4% (RS.): | | | | 15,884.60 |
| | **TOTAL AMOUNT(A) (RS.):** | | | | **4,84,480.00** |

B) **CHAWADI** –

| Sr. No. | Description | Qty. | Unit | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 1 | Removing cement tiles or marble or polished shahabad floor or dado without bed concrete including stacking the materials as directed with all leads, lifts etc. complete. | 69.05 | Sqm | 36.00 | **2,485.80** |
| 2 | Providing and laying in position flooring of Makrana Marble stone of pure white shade without black spots and of size 18 mm to 20 mm thick on bed 1:6 cement mortar including cement floats striking joints, pointing in C.M.1:3 curing and cleaning etc. complete. (Deviated Item). | 69.05 | Sqm | 8655.00 | **5,97,627.75** |
| 3 | Machine polishing to cement/marble mosaic tiled flooring or any other type of flooring including cleaning, washing etc. complete. | 69.05 | Sqm | 143.00 | **9,874.15** |
| 4 | Hand polishing to dado, skirting including cleaning, washing etc. complete. | 2.25 | Sqm | 64.00 | **144.00** |
| 5 | Providing and fixing machine cut polished 18 mm to 20 mm thick Makrana Marble stone of pure white shade without black spot stone for treads and risers of steps and staircases of approved colour and shade with full moulding and three grooved line for the treads on bed of 1:4 Cement mortar including float filling joints with neat cement slurry curing polishing and cleaning etc. complete. (Deviated Item). | 3.70 | Sqm | 8655.00 | **32,023.50** |
| | **TOTAL (RS.):** | | | | **6,42,155.20** |
| | GST @ 18% (RS.): | | | | 1,15,587.94 |
| | CONTINGENCY @ 4% (RS.): | | | | 25,686.21 |
| | **TOTAL AMOUNT (B) (RS.):** | | | | **7,83,429.00** |
| | TOTAL (A+B): | | | | **12,67,909/-** |
| | **TOTAL R/O AMOUNT RS.:** | | | | **12,68,000/-** |

याकामी वर नमूद तपशिलानुसार व्दारकामाई (A) व चावडी (B) मिळून अंदाजे एकूण रक्कम रू.१२,६८,०००/- मात्र इतका खर्च अपेक्षित आहे. साईभक्त श्री.के.व्ही.रमणी, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांनी यापुर्वी संस्थानचे साई आश्रम प्रकल्पातील इमारतींचे बांधकाम देणगी दाखल करुन दिलेले आहे. उक्त कामदेखील त्यांनी देणगीदाखल करुन देण्याची इच्छा व्यक्त केली असल्याचे संस्थानचे जनसंपर्क अधिकारी यांनी सांगितले आहे.

प्रस्ताव– तरी श्रींचे व्दारकामाईतील धुनीजवळील मुख्य भाग, ओटा व पाय-या यांचे जुने झालेले मार्बल फ्लोरींग तसेच चावडीचा मुख्य भाग व व्हरांडा येथिल जुने झालेले तंदूर स्टोन फ्लोरींग काढून त्या ठिकाणी नवीन प्युअर व्हाईट मकराना मार्बलचे फ्लोरींग बसविणे व व्दारकामाई सभामंडपातील फ्लोरींगला पॉलीशींग करणे ही

कामे साईभक्त श्री. के. व्ही. रमणी, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेकडून देणगीदाखल करुन घेणेस मान्यतामिळणेस विनंती.

**निर्णय क्र.३५२** **यावर सविस्तर चर्चा होऊन, श्रींचे व्दारकामाईतील धुनीजवळील मुख्य भाग, ओटा व पायऱ्या यांचे जुने झालेले मार्बल, फ्लोरींग तसेच चावडीचा मुख्य भाग व व्हरांडा येथील जुने झालेले तंदुर स्टोन फ्लोरींग काढुन त्या ठिकाणी नविन प्युअर व्हाईट मकराना मार्बलचे फ्लोरींग बसविणे व व्दारकामाई सभामंडपातील मार्बल फ्लोरींगला पॉलीश करणे ही कामे साईभक्त श्री.के.व्ही.रमणी, शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचेकडून देणगी दाखल करुन घेण्यास मान्यता देण्यात आली. तथापी तत्पुर्वी संबधीतांना विश्वासात घेण्यात यावे.**

**(कार्यवाही-बांधकाम विभाग)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०५** **श्री साईबाबा संस्थानमधील सर्व कर्मचाऱ्यांना कोरोना विषाणुचा प्रादुर्भाव रोखणेकामी आर्सोनिसयम अल्बम (Arsenicium album** 30) **व व्हिटॅमीन सी (Vitamin C) गोळया मोफत वाटप करणेबाबत.**

**प्रस्ताव-** <u>**अधिनियम २००४ मधील तरतुद**</u> – कलम १७ (१) व १७ (२)(ण) मानव जातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपतीमध्ये सहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल.

<u>**व्यवस्थापन समिती ठराव क्र**</u> **-** नवीन ठराव.

<u>**प्रास्ताविक-**</u> समाजातील सर्व तळा-गाळातील गरीब व गरजु रुग्णांना वैद्यकीय सेवा मिळावी या उद्देशाने साईबाबांच्या शिकवणुकीस अनुसरुन १९६४ साली श्री साईनाथ रुग्णालय सुरु करण्यात आलेले आहे. सदर रुग्णालयांत एकुण ३०० बेड अंतर्रुग्ण विभागात कार्यरत आहेत. या रुग्णालयात रुग्णांच्या सेवेसाठी उत्तम पायाभुत सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

सदयस्थितीला कोरोना विषाणूचा संसर्ग जगभरासह भारतात तसेच महाराष्ट्रात होत आहे.महाराष्ट्र शासनाने विनाकारण गर्दी करु नये,जेणेकरुन सदर विषाणूंचा प्रसार कमी होऊन संसर्ग होणार नाही याबददल सूचना दिलेल्या आहेत.

सध्या जगभरात थैमान घातलेल्या करोना विषाणु (कोवीड - १९) ची साथ चालु असुन सदरच्या विषाणुचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत आहे.याअनुषंगाने भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाने कोरोना विषाणुच्या संक्रमणामध्ये प्रतिकारशक्ती वाढविणेकामी Arsenicium album 30 हया होमिओपॅथी गोळया घेण्यास परवानगी दिलेली आहे.Arsenicium album 30 औषध हे सकाळी उपाशीपोटी ५ गोळया घ्याव्यात असे सुचविलेले आहे.त्याचप्रमाणे ३ वर्षाच्या आतील मुलांना तीन दिवस २ गोळया देता येतील.हयाप्रमाणे पुन्हा एक महिन्याने सदरच्या औषधांचा डोस याच प्रमाणात रिपीट करावयाचा आहे.

श्री साईबाबा संस्थानमध्ये कायम,कंत्राटी,आऊटसोर्स कर्मचारी कार्यरत आहे.संस्थान कर्मचा-यांना साईभक्त व रुग्ण यांच्या संपर्कात कामकाज करणे भाग असते.यामधुन त्यांना कोरोनाचा संसर्ग झाल्यास त्यांचे कुंटुंब तसेच ते राहत असलेल्या परिसरातील नागरिकांना कोरोना संसर्ग होऊ शकतो.याकरिता संस्थानमध्ये कार्यरत असलेल्या सर्व कर्मचारी व त्यांचे कुटुंबीय यांचेसाठी **Arsenicium album 30** व **Vitamin C** गोळया उपलब्ध करुन देता येईल,असे मत आहे. सदरची औषधे सदयस्थितीला रुग्णालयात मुबलक प्रमाणात उपलब्ध आहे.

विभागाचे मत – उपरोक्त परिस्थितीचा विचार करता, श्री साईबाबा संस्थानमधील सर्व कर्मचा-यांना व त्यांचे कुटुंबीय यांना कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव होऊ नये, याकरिता श्री साईबाबा संस्थानच्या रुग्णालयांमार्फत Arsenicium album 30 व Vitamin C या गोळया मोफत वाटप करणेस मान्यता असावी.

सदरचा विषय मा.तदर्थ समितीपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५३** **सदरचा प्रस्ताव नामंजुर करण्यात आला.**

**(कार्यवाही-श्री साईनाथ रुग्णालय)**

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०६** **आय.ए.एस.ॲकेडमी सुरु करणेबाबतचे तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे निर्णय/ठराव निरस्त करणेबाबत.**

**प्रस्ताव-** तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे विविध सभांमध्ये मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील देणगी मिळालेल्या इमारतींमध्ये आयएएस ॲकॅडमी सुरु करणेबाबत विविध निर्णय / ठराव पारित करणेत आलेले आहेत, त्याचा थोडक्यात गोषवारा खालीलप्रमाणे -

| अ.नं. | मा.व्यवस्थापन समिती सभेचा विषय नं., निर्णय क्रमांक व विषयाचा तपशिल | झालेला निर्णय |
|---|---|---|
| ०१ | **मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२२/१२/२०१६, आयत्या वेळेचा विषय नं.०२, निर्णय क्र.९४७ -** श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, ता.वसई-विरार (पूर्व) जिल्हा ठाणे यांची मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८, २८२/१, २८४ व २८८ मधील भुखंड क्रमांक १ मधील इमारत बी व डी विनामोबदला हस्तांतर करणे व त्याठिकाणी संस्थानमार्फत आय. ए. एस. ॲकॅडमी सुरु करणेबाबत. | श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, ता.वसई-विरार (पूर्व) जिल्हा ठाणे यांची मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८, २८२/१, २८४ व २८८ मधील भुखंड क्रमांक १ मधील इमारत बी व डी विनामोबदला हस्तांतर करणेस मान्यता देणेत आली.<br>तसेच या इमारतींमध्ये राज्यातील गोर-गरीब, आदिवासी, वंचित, दुर्बल विद्यार्थ्यांसाठी राज्य लोकसेवा आयोगाच्या परिक्षेची तयारी करुन घेणे व त्यांना प्रशासकी सेवेचा लाभ मिळवून देणेकामी निवृत्त राजपत्रीत अधिका-यांच्या मार्गदर्शनाखाली आय.ए.एस.अकॅडमी सुरु करणेचा अभ्यासपुर्वक सविस्तर प्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले. |
| ०२ | **मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक २३-२४/०५/२०१७, आयत्या वेळेचा विषय नं.२८, निर्णय क्रमांक ४४८-** आजचे व्यवस्थापन समिती सभेमध्ये संस्थान व्यवस्थापनाच्या दृष्टीने मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळी खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले. | श्री.काशिनाथ गोविंद पाटील, कोपरी, ता.वसई-विरार (पूर्व) जिल्हा ठाणे यांनी त्यांचे मालकीच्या मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८, २८२/१, २८४/२८८/६ मधील भूखंड क्रमांक ०१ मधील बी व डी इमारती देणगी स्वरुपात संस्थानला दिलेल्या आहेत. आजचे सभेत ते उपस्थित होते व त्यांनी समिती सभेसमोर सदरहू इमारतीची ताबा पावती मा.अध्यक्ष महोदय यांना दिली, त्यांनतर सभेने त्यांचा व त्यांचे सहाका-यांचा शॉल, श्रीफळ व उदी देऊन सत्कार केला.<br>या देणगी मिळालेल्या इमारतीमध्ये उपेक्षित, वंचित, अदिवासी तसेच खेडोपाडयामधील शेतक-यांच्या मुलांसाठी आय.ए. एस. अकॅडमी सुरु करण्याचा यापुर्वीच समितीने निर्णय समंत केलेला होता. यावेळी मा. अध्यक्ष महोदय यांनी सभेस माहीती दिली की, सेवा निवृत्त जेष्ठ सनदी अधिकारी श्री सुधीर ठाकरे यांनी विनामोबदला या अकॅडमीच्या गव्हर्निग कौन्सिलचे अध्यक्षपद स्विकारणेस समंती दिलेली आहे. श्री सुधीर ठाकरे हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे ३ वर्ष अध्यक्ष होते. दिनांक ०१ ऑक्टोबर, २०१७ पासून श्रींचे समाधी शताब्दी महाउत्सवास प्रारंभ होत असून, त्याच दिवशी सदरहु आय.ए.एस.ॲकॅडमी सुरु करण्यात यावी. यासाठी श्री.सुधीर ठाकरे यांना याकामी नेमणूक पत्र देणेकामी व गर्व्हनिंग कौन्सीलसाठी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांची मान्यता घेण्यात यावी तसेच आय.ए.एस.ॲकॅडमीसाठीची सविस्तर नियमावली तयार करणेत येऊन ती समिती सभेपुढे सादर करणेत यावी, असे ठरले. |
| ०३ | **मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक १५/०६/२०१७, आयत्या वेळेचा विषय नं.२०, निर्णय क्रमांक ५११ -** मौजे निघोज, ता.राहाता येथील गट नं.१७७,१७८,२८२/१, २८४ व २८८ | मौजे निघोज, ता.राहाता येथील देणगी मिळालेल्या बी व डी इमारतीमध्ये आय.ए.एस.ॲकॅडमी सुरु करणेसाठी प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देण्यात आली.<br>तसेच या ॲकॅडमीच्या गर्व्हनर कौन्सीलमध्ये सदस्य म्हणून मा.अध्यक्ष, मा.उपाध्यक्ष यांचेबरोबरच मा.ॲड.मोहन जयकर, |

| | | |
|---|---|---|
| | मधील देणगी मिळालेल्या इमारत बी व डी मध्ये आय.ए.एस.ॲकॅडमी सुरु करणेबाबत. | मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे व मा.श्री.प्रताप भोसले या समिती सदस्यांचा समावेश करणेत यावा, असे ठरले. |
| **अ.नं.** | **मा.व्यवस्थापन समिती सभेचा विषय नं., निर्णय क्रमांक व विषयाचा तपशिल** | **झालेला निर्णय** |
| ०४ | **मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२०/०८/२०१७, विषय नं.१०, निर्णय क्र.६८५-** श्री साईबाबा संस्थानमार्फत I.A.S. ॲकॅडमी सुरु करणेसंदर्भातील विविध विषयावर चर्चा करुन धोरणात्मक निर्णय घेणे. | श्री साईबाबा संस्थानमार्फत सुरु करावयाच्या I.A.S.ॲकॅडमीच्या गर्व्हनिंग कौन्सीलमध्ये मा.श्री.सुधीर ठाकरे, मा.श्री.सुरेश हावरे, मा.श्री.चंद्रशेखर कदम, मा.ॲड.मोहन जयकर, मा.श्री.भाऊसाहेब वाकचौरे, मा.श्री.बिपीनदादा कोल्हे, मा.श्री.प्रताप भोसलेव मा.श्रीमती रुबल अग्रवाल (भा.प्र.से.), मुख्य कार्यकारी अधिकारी यांचा समावेश करणेत यावा. तसेच या गर्व्हर्निंग कौन्सिलने I.A.S.ॲकॅडमी सुरु करणेकामी उपरोक्त प्रस्तावात नमुद केलेल्या विषयावर मार्गदर्शन करावे, असे ठरले.<br>तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे अध्यक्षतेखाली उपजिल्हाधिकारी – २, उपकार्यकारी अधिकारी, मुख्य लेखाधिकारी व कार्यकारी अभियंता यांचे कार्यकारी मंडळ (Executive Council) तयार करणेस मान्यता देण्यात आली.<br>श्री.सुधीर ठाकरे यांची संस्थानच्या प्रस्तावीत आयएएस ॲकेडमीच्या गर्व्हनिंग कौन्सिलच्या अध्यक्षपदी निवड करणेत आलेली आहे. आयएसएस ॲकेडमीच्या कामकाजासाठी श्री.सुधीर ठाकरे यांना शिर्डी येथे येणे-जाणेसाठी व शिर्डी येथे वाहन व्यवस्था, निवासव्यवस्था, भोजनव्यवस्था संस्थानमार्फत विनामुल्य करण्यात यावी. तसेच शिर्डी येथील वास्तव्याच्या कालावधीत एक सुरक्षा कर्मचारी पुर्णवेळ त्यांचेबरोबर देणेत यावा, असे ठरले. |
| ०५ | **मा.व्यवस्थापन समिती सभा दिनांक ०२/०५/२०१८, आयत्या वेळेचा विषय नं.०६, निर्णय क्रमांक ३३५-** श्री साईबाबा प्रशासकीय प्रबोधिनी (SSIAC) सुरु करणेबाबत. | प्रस्तावास मान्यता देणेत आली. |

उपरोक्त मा.व्यवस्थापन समितीचेनिर्णयानुसार, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडेस संस्थान व्यवस्थापनामार्फत आयएएस ॲकॅडमी सुरु करणेबाबत प्रस्ताव सादर करणेत आलेला होता. त्यास अनुसरुन, मा. विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन यांनी क्र.सासंवि-१०१७/ १९९२/प्र.क्र.२२५/ का.१६ दि.१२ ऑक्टोबर, २०१८ रोजीचे पत्रान्वये काही मुद्यांबाबत अहवाल / अभिप्राय शासनास सादर करणेबाबत निर्देश देवुन, आय.ए.एस. अकॅडमी सुरु करण्यास तत्वतः मान्यता देण्यात आली होती. तथापि, त्यानंतरची कार्यवाही प्रलंबित आहे.

**आता,** साईप्रसाद निवासस्थान विभागाने साईपालखी निवारा येथील इमारती व त्यातील खोल्यांचा साईभक्तांच्या निवासाकरीता वापर सुरु करणेबाबत मा.तदर्थ समिती सभेपुढे प्रस्ताव सादर केलेला आहे. त्यामुळे सदर इमारती या साईभक्तांच्या तात्पुरत्या निवासाकरीता उपलब्ध करुन देणेबाबत कार्यवाही सुरु करणेत आलेली आहे. त्यामुळे उपरोक्त तक्त्यात नमुद करणेत आय.ए.एस.ॲकॅडमीचे संदर्भातील अ.नं.०१ ते ०५ मधील नमुद मा.व्यवस्थापन समिती सभेतील निर्णय निरस्त करावे लागणार आहेत, असे मत आहे.

तरी उपरोक्तप्रमाणे तक्त्यातील संस्थान व्यवस्थापनामार्फत आयएएस ॲकॅडमी सुरु करणेबाबत, तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीने घेतलेले अ.नं. ०१ ते ०५ चे निर्णय / ठराव निरस्त करणेकामी सदरचा प्रस्ताव मा. तदर्थ समितीचे सभेपुढे विचारार्थ / निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.३५४** **यावर सविस्तर चर्चा झाली, सदर निर्णय अस्तीत्वात आणणेसाठी संस्थानला दैनंदीन बाबींकडे लक्ष द्यावे लागणार आहे. असेही लक्षात आले की त्यासाठी expert staff उपलब्ध होणे अशक्यप्राय आहे. अशा परिस्थितीत सदर इमारत विनावापर ठेवणे योग्य नाही. करीता मौजे निमगांव को-हाळे हद्दीतील देणगी मिळालेल्या इमारतींमध्ये आयएएस ॲकॅडमी सुरु करणेबाबत तत्कालीन मा.व्यवस्थापन समितीचे दि.१५.०६.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.५११, दि.२०.०८.२०१७ रोजीचे सभेतील निर्णय क्र.६८५, व दि.०२.०५.२०१८ रोजीचे सभेतील निर्णय क्र.३३५निरस्त करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच याकामी मान्यतेसाठी मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथे सिव्हील ॲप्लीकेशन दाखल करण्यात यावे,असे ठरले.**

**(कार्यवाही-सामान्य प्रशासन विभाग/विधी विभाग)**

---

वरील निर्णय क्र.३०६ ते ३५४ सर्वानुमते घेण्यात आले.
यानंतर दुपारी ०३.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.

**स्वाक्षरीत/-**
**(श्रीमती गिता पी.बनकर)**
**सहा.धर्मादाय आयुक्त,**
**अहमदनगर.**

**स्वाक्षरीत/-**
**(दिलीप स्वामी)**
**अप्पर महसुल विभागीय आयुक्त,**
**नाशिक**

**स्वाक्षरीत/-**
**(अरुण डोंगरे,भा.प्र.से.)**
**मुख्य कार्यकारी अधिकारी,**
**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी.**

**स्वाक्षरीत/-**
**(श्रीकांत एल.आणेकर)**
**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश,**
**अहमदनगर.**